म. ग्रं. सं. ठाणें

१६००

म. ग्रं. सं. ठाणें

विषय कादंबरी

संग्रहालय क्रमांक १८३

लेखक दामोदर

सन १९०८

पुस्तकाचें नांव कार्यकारण भाव

# कार्यकारणभाव.

परचुरे, पुराणिक आणि मंडळी.

[illegible]

ठाणे

सं.क्र. ४३१

छापखा[illegible]

---

शके १८३०.

किंमत बारा आणे.

# कार्यकारणभाव.

परचुरे, पुराणिक आणि मंडळी.
पुस्तकसेलर्स माधवबाग, मुंबई नं. ४

( एक मनोरंजक गोष्ट )

लेखक.

दामोदर

प्रमीला, निसर्गप्रभाव, मनोरमामाधविनी, कुकर्मपरिपाक

वगैरे पुस्तकांचा

कर्ता.

वाई येथें

मोदवृत्त छापखान्यांत छापलें.

शके १८३०.

किंमत बारा आणे.

# प्रस्तावना.

ठाणे.

रोजच्या आयुष्यक्रमांत पुष्कळ गोष्टी अशा घडतात कीं त्यांचें कारण आपल्याला सांगता येत नाहीं. अशा गोष्टींना आपण अकल्पित किंवा अनपेक्षित घडलेल्या गोष्टी ह्मणतों. आपल्या मर्यादित इंद्रियशक्तीस कांहीं विवक्षित गोष्टींच्या कारणांचें आकलन होत नाहीं ह्मणून त्या गोष्टीस कारणच नाहीं असें मात्र समजतां कामा नये. कार्यकारणशृंखलेंतून या जगांतील कोणतीही गोष्ट सुटली नाहीं. कारण समजणें न समजणें हें ज्याच्या त्याच्या चाणाक्षपणावर अवलंबून आहे. अगदीं सामान्य मनुष्यास एखाद्या गोष्टीचें कारण न समजून तो त्या गोष्टीस दैवाचा विचित्र खेळ असेंच ह्मणेल. परंतु त्याच्यापेक्षां अधिक धोरण असलेला माणूस अनुमानशास्त्राच्या सामर्थ्यानें चटदिशी तिचें कारण शोधून काढील. सूक्ष्मनिरीक्षणानें व सतत अभ्यासानें अनुमानशास्त्रांत प्राविण्य संपादतां येऊन मनुष्यास हव्या तसल्या गुतागुतीच्या प्रकरणांतील कार्यकारणाचा दुवा शहाजोग रीतीनें जोडतां येऊन विशेषत: गुन्हेगाराचा शोध लावण्याचे कामीं उत्कृष्ठ सहाय्य करतां येईल हें या पुस्तकाच्या वाचनावरून कोणाच्याही लक्ष्यांत येणार आहे.

पुस्तककर्ता.

सं का
३३१

# कार्यकारणभाव.

## खंड १ लें.

### भाग पहिला.

### शरच्चंद्र.

माझी वैद्यकीची परीक्षा पास होऊन आज तीन वर्षें झालीं. परीक्षा पास झाल्याबरोबर कांहीं दिवस लष्करांत नोकरी करावी लागते, ह्याप्रमाणें सरहद्दीवरील कित्येक घनघोर संग्रामांत लष्कराच्या पिछाडीस हजर राहण्याचा मला प्रसंग आला. पांचव्या पलटणीवर माझी योजना झाली होती. माझ्याप्रमाणें लष्कराबरोबर दुसरेही कित्येक अधिकारी होते. सरहद्दीवरील संग्रामांत आमच्या बाजूचा जय होऊन कित्येकांना नवीन किताब, मोठ्या अधिकाऱ्यांच्या जागा व सरंजाम मिळाले. परंतु, संकट, दुख, हालअपेष्टा यांशिवाय माझ्या वाटणीस मात्र कांहींच आलें नाहीं. एका लढाईंत माझ्या खांद्याला मोठी जखम लागून मी तेथेंच समरांगणावर विह्वल होऊन पडलों. बेशुद्ध स्थितींत मी किती वेळपर्यंत होतों हें निश्चित सांगतां येणें अशक्य आहे; तरी-पण युद्धाच्या गर्दींत माझ्याकडे बराच वेळ कोणाचें लक्ष गेलें नसावें असा माझा अंदाज आहे. गोळी लागून माझ्या खांद्याचें हाड दुखावलें, व बरेच दिवसपर्यंत त्याच्या यातनाही मला सोसाव्या लागल्या. भाग्यरहित मनुष्य कोठेंहि गेला तरी त्याच्यामागें यातना ह्या हात धुवून लागलेल्या असतात ! ज्या वेळेस मी अशरण होऊन समरभूमीवर पडलों त्यावेळेस माझा नोकर माझ्याजवळ नव्हता.

थोड्याच वेळापूर्वीं त्याची माझी चुकामूक झाली होती. डोंगरांत राहणाऱ्या क्रूर लोकांच्या मी हातांत पडणार इतक्यांत माझा इमानी सेवक शोध करीत करीत माझ्याजवळ आला. मोठ्या धैर्यानें त्यानें शत्रूंच्या गोटांतून उचलून मला घोड्यावर टाकलें व छावणींत सुरक्षित नेऊन पोहोंचविलें.

आईबाप लहानपणींच निवर्तलेले ! जेवलास कां, साललास कां ? म्हणून जिव्हाळ्यानें विचारणारें माणूस कोणीच नाहीं. अशा स्थितींत बाल्यावस्था गेली. त्यानंतर लोकांच्या दारोदार हिंडून विद्याभ्यास केला. अशा प्रकारेंच माझा पिंड वाढल्यामुळें माझें शरीर स्वभावतःच खंगलेलें होतें. आतां कोठें चार पैसे मिळून सुखाचे दिवस दिसणार तोंच हा मध्यंतरीं अचानक घाला बसला ! माझ्यासारख्या इतर कित्येक अभागी प्राण्यांसमवेत मला इस्पितळांत नेऊन ठेवलें. तेथें माझी शुश्रूषा फारच उत्कृष्ट तऱ्हेनें झाली. स्वतः मी वैद्यच होतों. तरी माझ्या धंद्याचें महत्व स्वतःच्या अनुभवानें जसें माझ्या निदर्शनास आलें तसें तें इतर प्रसंगीं केव्हांच आलें नाहीं. दवाखान्यांत आल्यापासून मी थोड्याच दिवसांत खोलींतल्याखोलींत हिंडूं फिरूं लागलों. कांहीं दिवसानंतर बाहेर पडवींतहि येऊन बसूं लागलों. आजपर्यंत भोगाव्या लागलेल्या आपदा थोड्याच झाल्या म्हणूनच कीं काय जखम भरून मी चांगला खडखडीत होतों न होतो तोंच ज्वरानें माझा पिच्छा पुरविला. यांतून मी कांहीं आतां बचत नाहीं असें माझ्या भोंवतालचे सर्व लोक म्हणूं लागले व शेवटीं जगण्याबद्दल माझी स्वतःची सुद्धां बहुधा निराशाच झाली. असें होतां होतां ईश्वरास माझी करुणा येऊन त्यानें त्या खडतर ज्वरापासून माझी एकदांची मुक्तता केली. ज्वराच्या बऱ्याच पाळ्या चुकल्या, ज्वर उलटण्याची मुदतहि निघून गेली, तरी माझ्या तोंडाला रुचि म्हणून येईना; किंवा यत्किंचितहि दगदग केलेली सोसेना. हवा पालटल्याशिवाय माझी प्रकृति ताळ्यावर येणार नाहीं असा माझ्या व्यवसायबंधूंचा अभिप्राय पडल्यावरून माणिपुरास माझी रवानगी करण्यांत आली. परंतु, प्रवासाच्या दगदगीनें मी अधिकच निःशक्त झालों.

मला कोणीहि आप्त नव्हतें, किंवा माझी अशी म्हणण्याला या

पृथ्वीच्या पाठीवर एक बोटभरहि जागा नव्हती ! माझ्यामागें कोणतेंहि बंधन नसल्यामुळें वाऱ्याप्रमाणें मनास वाटेल तिकडे संचार करण्यास मी मोकळा होतों. महिना चाळीस रुपये घ्यावेत आणि हरएक तऱ्हेनें ते खर्चून टाकून पुनः महिना अखेरीस धोतर झाडून मोकळें व्हावें, या विरहित दुसरा धंदाच मला उरला नाहीं. मणिपूर हें खुशालचंदांचें मुख्य ठाणेंच होतें. वडिलोपार्जित पैसे हव्या त्या बदकर्मांत उधळून आपल्या घरादाराचें वाटोळें करणारे सहस्रावधि हरीचे लाल त्या नगरींत वास्तव्य करीत होते. त्याचप्रमाणें बाहेर वर्षभर पैसा मिळवून या शहरांत कांहीं दिवस विश्रांति करितां येऊन राहणारे लोकहि पाण्यासारखा पैसा खर्चून बेहोष रीतीनें रहात असत. अशा शहरीं माझ्यासारख्या बिगरधंद्याच्या माणसाचा आयुष्यक्रम कशाप्रकारें जात असेल याचें वर्णन देऊन मी वाचकांचा अमोलिक वेळ घेऊं इच्छित नाहीं. याप्रमाणें सुमारें दोन महिने मीं घालविले. माझी प्रकृति बरीच ताळ्यावर आली. अशा उधळभस्केपणानें आपण जर वागलों तर आपली थोडक्याच दिवसांत तारंबळ उडून जाईल असें वाटून मीं आपला पूर्वीचा आयुष्यक्रम बदलण्याचा संकल्प ठरविला. एक तर हें शहर सोडून दुसरीकडे कोठें खेड्यांत जाऊन रहावें किंवा येथेंच स्वस्त्यांत एकादें लहान घर घेऊन काटकसरीनें वागावें असा मी विचार करूं लागलों.

असा विचार करून एके दिवशीं मी सहल करावयास गेलों असतां पाठीमागून कोणी येऊन माझ्या खांद्यावर थाप मारली. त्याबरोबर मागें वळून पाहतों तों माझा लहानपणचा वर्गबंधु सुशील हा मला दिसला. मणिपुरासारख्या विशाळ नगरींत सुशीलासारखा बाळमित्र भेटल्यानें मला किती आनंद झाला असेल त्याची कल्पनाहि होणें कठीण आहे ! आज दोन महिने या नगरींत घालविले; परंतु, ओळखीचा चेहरा माझ्या नजरेस एकहि पडला नाहीं. सुशील माझा मोठा जिवलग मित्र होता अशांतला भाग नाहीं. परंतु, आजच्या एकाकी स्थितींत मला त्याची किंमत फारच वाटूं लागली. त्याचीहि तशीच स्थिती झालेली दिसली. वर्षानुवर्षे एकत्र घालविल्यानेंहि त्याच्या माझ्यामध्यें जी निकट मैत्री उत्पन्न होणें शक्य झालें नाहीं ती त्या एका क्षणांत

उत्पन्न होऊन चांगली रूढावस्थेसहि आली. मी त्याला मोठ्या आनंदानें आपल्या बिऱ्हाडीं घेऊन गेलों. आनंदातिरेकानें दोघांच्याहि तोंडून एकहि शब्द निघणें बराच वेळपर्यंत मुष्किलीचें झालें ! कित्येक वेळपर्यंत चाकांच्या व घोड्यांच्या टापांचाच आवाज फक्त ऐकूं येत होता. अखेर सुशील मला ह्मणालाः—" वसंता, तूं आपला आयुष्यक्रम कशा रीतीनें घालवितोस हें कांहीं मला माहीत नाहीं; परंतु, तुझ्या चहऱ्यांत व शरीरप्रकृतींत पराकाष्ठेचा फरक झाला एवढें मात्र खास. तुझी माझी अतिशय घसट होती ह्मणून तूं मला ओळखूं आलास, सामान्य सहवासाच्या माणसास तूं कधींहि ओळखूं येणार नाहींस. "

यावर मीं त्याला आपल्या आयुष्यक्रमाचा संक्षिप्त वृत्तांत सांगितला. तोंच आह्मी बिऱ्हाडीं जाऊन पोहोंचलों. तेथें तो पुनः मला ह्मणालाः— " तूं किती जरी लपविलेंस तरी तुझ्या मनांत कांहीं तरी विचार चालला आहे, तुझ्यामागें कांहीं तरी चिंता लागली आहे खास. तूं आहेस तरी कोणत्या भानगडींत ? "

वसंत— मी बिऱ्हाडाच्या भानगडींत आहें. या महागड्या शहरांत स्वस्त भाड्यानें प्रशस्त जागा कशी मिळेल हा प्रश्न मी सोडवीत आहें.

सुशील— या प्रश्नाचा विचार करणारे आपण आह्मांला दुसरेच दिसला ?

व०— आणि पहिले कोण ?

सुशील— येथें प्रयोगालयांत एक गृहस्थ काम करीत असतात. कोणी पार्तीदार मिळाला तर एक छान जागा आपल्याला आढळली आहे; ती आपण घेऊं असें ते आज सकाळींच मजजवळ ह्मणत होते. जागा चांगली प्रशस्त आहे, पण तिचें भाडें आपल्या एकट्याच्यानें झेंपणार नाहीं असेंहि त्यांनीं मला सांगितलें.

मी— वा ! काय बहार झाली ! तो जर मला पत्करील तर मी मोठ्या आनंदानें त्याचा भागीदार होईन. मलाहि एकटें राहण्यापेक्षां कोणी सोबतीला असलेलें बरें.

हें माझें भाषण ऐकून सुशील माझ्याकडे आश्चर्ययुक्तमुद्रेनें पाहून

म्हणाला:– " ज्याच्या बरोबर रहावयाचें आहे त्या स्वारीचा इतिहास आपल्याला माहीत नाहीं. म्हणून आपण इतकें आनंदलांत ! त्यांचा वृत्तांत आपल्या कानावर येईल तर आपला हा आनंद मावळल्याशिवाय राहील किंवा नाहीं याची शंकाच वाटते.

मी—कां ? ते दुर्व्यसनी वगैरे आहेत कीं काय ?

सु०—छे छे, तशांतला कांहीं भाग नाहीं; जरा ते तऱ्हेवाईक आहेत. त्यांच्या कांहीं कल्पना जरा विचित्र आहेत. कांहीं कांहीं बाबतींत तर ते विशेष छांदिष्ट आहेत इतकेंच. तरी पण त्यांची चालचलणूक चांगली सभ्यपणाची आहे.

मी—ते आयुर्वेदाचा अभ्यास करतात वाटतें ?

सु०—तें कांहीं सांगतां येत नाहीं. त्यांचें अध्ययन कशाचें चाललें आहे, किंवा त्यांना पुढे धंदा काय करायचा आहे याचा ठावठिकाण लागणें फार कठीण आहे. वैद्यकाचेंहि त्यांचें अध्ययन चांगलें आहे; त्याचप्रमाणें रसायन शास्त्राचाहि त्यांचा अभ्यास बराच झालेला दिसतो. परंतु, अमुक एक निश्चित व्यासंग पद्धतशीरपणानें त्यांनीं चालविलेला आहे असें हमखासपणानें सांगतां येणें जवळ जवळ अशक्यच आहे.— आज एक, तर उद्यां दुसरेंच; अशीच कांहींशीं त्यांची तऱ्हा आहे. मनुष्य मात्र बहुश्रुत आहे याबद्दल शंका नाहीं. अवांतर ज्ञानाचा त्यांच्याजवळ इतका संग्रह आहे कीं तो पाहून प्रसंगविशेषीं मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या पंडितांनाहि तोंडांत बोट घालावें लागेल.

मी—त्यांना पुढें धंदा कोणता करावयाचा आहे यासंबंधानें तुम्ही त्यांना कधीं विचारलें नाहीं काय ?

सु०—छे. त्याचें नांवच घ्यावयाला नको ! तसें विचारून कधींच पत्ता लागावयाचा नाहीं. लहर लागली तर ते मन मोकळेंहि करून बोलतात; नाहीं असें नाहीं. परंतु, त्यावरून त्यांचें हृद्गत मात्र कधींहि जाणतां यणार नाहीं !

मी—मग तर त्यांची आमची एकदां गांठ पडलीच पाहिजे. विद्याव्यासंगांत गढलेल्या मनुष्याची बहुधा दुसऱ्यास उपाधि नसते; आणि आम्हांलाहि असाच माणूस पाहिजे. माझी तरी तब्येत अजून कोठें

निखालस बरी झाली आहे. गडबड किंवा गोंगाट अथापाहि मला सहन होत नाहीं आणि त्यांतून त्याचा आह्मांला आजपर्यंत पूर्ण प्रसाद मिळालेला असल्यामुळें त्याबद्दलची आतां आह्मांला इतकी हौसहि राहिली नाहीं ! बरें पण, त्यांची आमची आतां गाठ कशी पडणार ?

सु०– तें कांहीं इतकें कठीण नाहीं. आतांच आपण प्रयोगालयांत गेलों तर ते तेथें आपल्याला खास भेटतील. एकदां प्रयोगालयाचा आठवड्या आला ह्मणजे ते गृहस्थ तेथें दिवसच्यादिवस घालवितात. नाहीं तर त्याचें महिना महिना नांवहि घेत नाहींत अशी तऱ्हा आहे. तुमची इच्छा असली तर आपण आतांच तिकडे जावयास निघूं.

मी– ठीक आहे. चला तर तिकडे.

येणेंप्रमाणें संवाद झाल्यानंतर आह्मीं चालूं लागलों. इतर कित्येक बावीसंबंधानें बोलणें झाल्यावर आमच्या भागीदारासंबंधानें सुशीलानें मला आणखी कित्येक गोष्टी सांगितल्या. त्या योगानें आश्चर्यचकित झालेली माझी मुद्रा पाहून सुशील ह्मणालाः– ‘ पहा बोवा. तुझें त्यांचें जमलें नाहीं तर मला तूं बोल लावतां कामा नये. माझें त्यांच्याशीं विशेष संघट्टण नाहीं. कधीं कधीं त्यांची माझी गांठ पडते. तेवढ्यावरून जी मला माहिती मिळाली, ती तुला सांगितली. प्रथम ही गोष्ट तूंच काढलीस. तेव्हां यदाकदाचित् तुझें त्यांचें जर बिनसलेंच तर माझ्याकडे कांहीं नाहींहो ! ’

मी—त्यांचें माझें जुळलें नाहीं तर त्यांची संगत मी सोडून देईन. पण सुशीला, तूं जें मला इतकें हडसून खडसून सांगतोस त्यावरून खरें इंगित कांहीं तरी वेगळें असावें ! काय, खरें आहे तरी काय ? तो मनुष्य खरोखरच इतका भयंकर आहे काय ? काय खरें असेल तें स्पष्ट सांग. एक अवाक्षरहि लपवून ठेवूं नकोस.

सु०—जें सांगतांच येणार नाहीं तें सांगूं तरी काय ? ब्रह्मदेवासमुद्धां त्यांच्या स्वभावाचा किल्ली सांपडणार नाहीं. हें पहा मला कांहीं शास्त्राध्ययनाची विशेषशी आवड नाहीं आणि ते तर त्याला प्राणापेक्षांहि प्रिय वाटतें. केव्हां केव्हां त्याचा स्वभाव मला तर बोवा अगदीं

रुक्ष व नीरस वाटतो. स्वारींना औषधें करण्याचा तर फारच नाद आहे. एकदां त्यांनीं तपकीर तयार केली होती. ती कशी काय बनली आहे ह्मणून कसोटी पाहण्याकरितां त्यानें ती एका गृहस्थाच्या हातास अत्तर ह्मणून लावली. आणि तो गृहस्थ जेव्हां फडाफडा शिंकूं लागला, तेव्हां आमचा शरच्चंद्र त्यांच्याकडे टक लावून एकसारखा पाहूं लागला. तो हंसला वगैरे बिलकुल नाहीं. कोणाला वाटेल कीं त्यानें हें कृत्य थट्टेनें केलें. पण थट्टाही त्याच्या स्वभावास क्वचित्च शिवली असेल. बरें, असा प्रयोग दुसरा कोणी त्याच्यावर केला तर त्याचाहि तो विधिनिषेध बाळगीत नाहीं. त्याचें ह्मणणें नेहमीं असें असतें कीं कोणत्याहि गोष्टीचा पूर्ण छडा पाहण्याकरितां शक्य त्या साधनांचा अवश्य तो उपयोग करावा.

मी—अगदीं बरोबर आहे.

सु०—होय. परंतु, एखाद्या वेळेस याचा परिणाम काय होईल ? समज, त्यानें एखादी छडी तयार केली तर ती तो केवळ प्रयोगासाठीं दुसऱ्यावर चालवून पाहणार.

मी—पण कायरे, तो वैद्यकाचा अभ्यास करतो ना ?

सु०—त्यांच्या अध्ययनाचा काय विषय आहे हें एका देवाला माहीत ! पण त्याबद्दल आतां पाल्हाळ काय करायचें आहे ? हें पहा, त्याचें ठिकाण आलें. आतां प्रत्यक्ष काय तें पाहून घे. आणि ते गृहस्थ कोणत्या प्रतीचे आहेत याची आपल्या मनाशींच अटकळ बांध.

असें बोलत बोलत आम्ही दोघेहीजण डाव्याबाजूच्या बोळांत वळून उजव्या हातच्या तिसऱ्या घरांत शिरलों. तेथें जिना चढून आम्हीं माडांवर गेलों. दिवाणखान्याच्या अगदीं पलीकडल्या दालनास एक कमानदार दरवाजा होता, त्यांतून आम्हीं प्रयोगालयांत प्रवेश केला.

प्रयोगालयाचें छत खूप उंच होतें. त्याच्या चोहोंबाजूंस असंख्य बाटल्या ठेवलेल्या होत्या. दोन हात उंचीचीं ठेंगणीं परंतु, बरींच प्रशस्त मेजें तेथें ठेवलेलीं होतीं. त्याचप्रमाणें सरळ, वाकड्या, कमानदार, बांकदार अशा कांचेच्या कित्येक नळ्याहि तेथें पडलेल्या दिसत होत्या. त्याचप्रमाणें स्पिरिटचे कित्येक दिवेहि तेथें जळत असून

त्यांच्या नीलवर्ण मिणमिण जळणाऱ्या ज्योती प्रयोगालयांत कोणीतरी काम करीत आहे असें दाखवीत होत्या. या खोलींत आतां एकच विद्यार्थी होता. तो खालीं वाकलेला असून कांहीं शास्त्रीय प्रयोगांत गढलेला दिसत होता. आमच्या पावलांचा आवाज होताच त्याच्या एकाग्रतेचा भंग होऊन तो कोण आलें म्हणून आपल्या सभोंवतीं पाहूं लागला. आमच्याकडे त्याची नजर जातांच तो मोठ्या आनंदानें ओरडून ह्मणालाः—' शेवटीं शोधून काढलें. अखेर श्रमाचें चीज झालें. ' असें ह्मणत तो हातांतील कांचेच्या नळीसह आह्मी होतों तेथपर्यंत पळत आला ! ' आज एक रसायन शोधून काढलें. तें अगदीं साधें आहे. परंतु त्याच्यापासून पुढें केवढे उपयोग होणार आहेत ? ' असें तो पुनः आनंदानें ह्मणाला. खरोखर सोन्याची खाण सांपडली असती तरीहि त्यास इतका आनंद झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे.

' शरच्चंद्र, हे आमचे स्नेही वसंत आपल्याला भेटावयास आले आहेत. यांनींहि वैद्यकाचा कांहीं अभ्यास केला आहे. '

शरच्चंद्रानें उत्तर केलें ' वाः ! मग आज काय मोठी मौजच झाली ह्मणावयाची ! '

असें ह्मणून त्यानें माझा हात धरला. व प्रयोगपीठाजवळ असलेल्या एका खुर्चीवर मला नेऊन बसाविलें.

त्याचा तो चलाखपणा पाहून मी तर अगदीं गारच होऊन गेलों ! इतक्यांत तो मला ह्मणालाः—" आपण सरहद्दीवर कांहीं दिवस काढले असावे असें दिसतें. हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच मी तर अगदीं भांबावून गेलों !

मी—हें आपल्याला कसें कळलें ?

श०—तें असो. पण या रसायनाचें महत्त्व तुह्माला कळलें का ?

मी—ाय शास्त्रीयदृष्ट्या त्याचें महत्व फार मोठें आहे हें खरें. तरी पण व्यवहार दृष्टया—

श०— व्यवहारदृष्ट्या तर याच्या इतकें महत्त्वाचें रसायन तुह्मांला आढळूनच येणार नाहीं ! रक्ताचे डाग हमखास ओळखण्यास याचा उत्कृष्ट उपयोग होणार आहे. हें पहा मी तुह्माला आतां दाखवतों !

असें ह्मणून त्यानें मोठ्या उत्सुकतेनें माझा हात धरला व मला मेजाजवळ नेलें. ' या प्रयोगाला ताजें रक्त लागतें. ' असें ह्मणून त्यानें एका शस्त्रानें आपल्या बोटास छिद्र पाडून रक्ताचे एक दोन थेंब एका कांचेच्या पेल्यांत टाकले. " आतां हें पहा मी यांत कांहीं पाणी ओततों. हें पाहिलेंतना. या पाण्यांत आतां बिलकूल तांबुसपणा दिसत नाहीं. तें चांगलें स्वच्छ दिसत आहे. आतां पहा मी हे रक्ताचे थेंब कसे शोधून काढतों तें. " असें ह्मणून त्यानें एक पांढरी भुकटी त्या पाण्यांत टाकली. व एका प्रवाही द्रव्याचे दोन थेंबही त्यांत सोडले. त्याबरोबर पाण्यास शिसवीसारखा रंग येऊन पेल्याच्या तळाशीं रक्ताचे गोंठलेले कण एकवटून राहिले !

एखाद्या मुलाला खेळण्याची नवी वस्तु मिळाली ह्मणजे त्यास जसा अपूर्व आनंद होतो तसाच आपला प्रयोग यशस्वी झालेला पाहून त्यास आनंद होऊन तो मोठमोठ्यानें टाळयाहि वाजवूं लागला !

श०—कां ? आतां आपलें याबद्दल काय मत आहे ?

मी—ही कसोटी तर खूप आहे बोआ.

श०—खूप ! न भूतो न भविष्यति आहे ! पूर्वीच्या कसोट्या सर्व अनिश्चित होत्या. सूक्ष्मदर्शक यंत्रानें रक्तबीज ओळखणें हें देखील भरंवसेशीर नसतें. कारण रक्ताचा डाग पडून एक दोन तास झाले, आणि तें वाळून गेलें ह्मणजे ही कसोटी अगदींच निरुपयोगीं ठरते. आह्मीं काढलेला शोध हा जर पूर्वींच निघाला असतां, तर पुराव्याच्या अभावीं दोषमुक्त झालेले व ह्मणूनच संभावितपणानें वावरत असलेले कित्येक बदमाष लोक आज कारागृहांत असते, किंवा कित्येकांची या पूर्वींच परलोकीं पाठवणी करण्यांत आली असती !

मी— आपण ह्मणतां तसें निःसंशय झालें असतें.

श०— बहुतेक सर्व फौजदारी खटले या एकाच मुद्यावर लटकलेले असतात. गुन्हा घडल्यानंतर कित्येक महिन्यांनीं एखाद्या मनुष्याबद्दल वहीम घेण्यांत येतो. मग त्याचे कपडे वगैरे तपासून पाहण्यांत येतात. त्यावर तांबुस डाग दिसतात. ते रक्ताचे आहेत, शाईचे आहेत, चिखलाचे आहेत, किंवा एखाद्या फळाचे आहेत याचा कांहींच

उलगडा पडत नाहीं ! अवांतर पुरावा हवा तितका भक्कम असला तरी या उलगड्याच्या अभावीं तो असून नसल्यासारखा ठरतो. आमचा हा शोध रूढ होऊं लागला म्हणजे ही अडचण बिलकुल राहणार नाहीं. आमच्या या उपायास ' न भूतो न भविष्यति ' असें जें मीं म्हटलें त्याचें कारण आतां लक्षांत आलें ना ?

शरच्चंद्र ही हकीगत सांगत होते तेव्हां त्यांच्या डोळ्यांत एकप्रकारचें विलक्षण तेज चमकूं लागलें. सहस्रावधि शास्त्रज्ञांच्या पुढें टाळ्यांच्या प्रचंड गजरांत आपण आपल्या शोधाचें आविष्करण करीत आहोंत असेंच जणूं काय त्यांना वाटत होतें !

मी —खरोखर आपल्या या शोधामुळें मानवजातीवर परमावधीचा अनुग्रह झाला आहे.

श०—परवां तो महंमददिनचा खटला सुटला, तो आमची ही कसोटी अस्तित्वांत नव्हती म्हणूनच ! आमची ही वडी त्या वेळींच जन्मास आली असती तर त्याच्या दुष्कृत्याचें पारिपत्य झाल्याशिवाय कधींहि राहिलें नसतें.

रक्ताचे डाग अचूक ओळखण्याची औषधि उपलब्ध नसल्यामुळें सुटलेल्या शेंकडों गुन्हेगारांचीं त्यानें घेतलेलीं नांवें ऐकून मी म्हणालों, " गुन्हेगारांची आपण चालती बोलती जंत्रीच आहांत. "

सु०—आपण एखादें वर्तमानपत्र काढलें तर तें खरोखरच फार मनोरंजक होईल !

श०—आणि उपयुक्तहि होईल ! हें औषध तुम्हांला सामान्य दिसतें आहे. पण विशेषतः प्रस्तुतच्या पिढीचे पुत्रपौत्र याची सदैव प्रशंसाच करीत राहतील. फार काय पण मला वाटतें आज जन्मास आलेली ही वडी माझें नांव या पृथ्वीतलावर अजरामर करून ठेवील ! प्रयोगशाळेंत काम करणें म्हणजे कांहीं तोंडच्या गप्पा नाहींत. त्यासंबंधांत फार सावध रहावें लागतें ! हा पहाना माझा तळहात ! आज सकाळपासून याला मीं कमींतकमी पन्नास छिद्रें पाडलीं असतील. याला वरचेवर जंतुसंहारक औषध लावावें लागतें. जरा दिरंगाई झाली तर प्रसंगीं प्राणावरहि बेतण्याची भीति असते !

सु०—यांत काय संशय ! आपल्याकडे आह्मी कांहीं कामाला आलों आहोंत. आमचे हे स्नेही येथें आलेले आहेत. त्यांना कोणी जोडीदार मिळाला तर एक चांगलें बिऱ्हाड घ्यावयाचें आहे. आपणहि काल माझ्यापाशीं बिऱ्हाडाची गोष्ट काढली होती. कोणी सोबती मिळत नाहीं ह्मणून आपली फार अडचण होते, असेंहि आपण मजजवळ उद्गार काढलें. हे गृहस्थ आले आहेत. पहा यांचें तुमचें जमलें तर दोघांचेंहि काम होईल.

श०— वा: ! तुह्मीहि आज आमच्या बरोबरीचाच शोध लावला ह्मणावयाचा ! मी येथें एक प्रशस्त दुमजली घर पाहून ठेवलें आहे. त्यांत दोघांचाहि निर्वाह होण्यासारखा आहे.

मी— मग आपल्या सहवासांत राहण्यानें मला फार आनंद होईल असें वाटतें.

श०— तसें झालें तर फारच चांगलें. पण मी तंबाखु ओढीत असतों. आपल्याला तंबाखूचा वास सहन होतो ना ?

मी — या बाबतींत तर तुमचे आमचे आंकडे पटले ! आह्मीहि अग्निहोत्रीच आहोंत.

श० — मग आयतेंच काम झालें. एकास दोघे असले ह्मणजे ठीक जमतें. आम्हाला हें प्रयोग करण्याचें व्यसन आहे. याच्यापासून तुम्हांला कांहीं त्रास होणार नाहीं ना ?

मी— छे, छे, भलतेंच एखादें.

श०— ठीक आहे. येथपर्यंत तर तुमची आमची पत्रिका जमली. आतां आमच्या आणखी काय खोडी आहेत त्या पाहून घ्या. हो, एखादे वेळेस आह्मी अगदीं घुम्यासारखें बसतों. दिवसच्या दिवस तोंड उघडीत नाहीं. पहा हें तुह्माला खपेल कां ? नाहीं तर ह्मणाल कुठल्या सुस्तुबळाशीं गांठ पडली. आह्मी घुम्यासारखें बसलों ह्मणजे तह्मी आमच्याशीं बोलतां कामा नये. आमचा विकार कालावधीनें आपोआपच नाहींसा होतो. इतकेंच नव्हें तर पुढें आह्मी आपल्या जिव्हेस जरा सैल सोडून थकलेली बाकीहि काढून घेतों ! तुम्हा आम्हांला एकेठिकाणीं रहावयानें आहे तेव्हां आमचे सर्व गुण तुम्हांस आधीं समजलेले बरें.

त्यांचें हें भाषण ऐकून मी हंसून म्हणालों—' माझी तब्बेत बरेच दिवस बिघडली होती. अद्यापहि माझ्या अंगांत चांगलीशी शक्ति आली नाहीं. मला गोंगाट सपत नाहीं. शिवाय रात्रींबेरात्रीं उठून बसण्याची मला सवय आहे. दिवसच्या दिवस मी बसून काढतो. माझा स्वभाव म्हणण्यासारखा उद्योगी नाहीं. याशिवायहि माझ्या अंगीं कांहीं दुर्गुण आहेत. परंतु आजमित्तीस सांगण्यासारखे हे एवढेच मुख्य आहेत.

श०—तुम्हांला गोंगाट सहन होत नाहीं. एवढीच कायती तुमची खोड विशेष जबर दिसते आहे. गायनवादनानें तुम्हाला गोंगाट होतो काय ? कारण मधून मधून आह्मी त्याचाहि थोडासा व्यासंग ठेवतों !

मी— तें चांगलें असलें तर आमची कांहीं हरकत नाहीं. सुरवर गायनवादन कोणाला प्रिय नाहीं ?

श०— नीरस माणसाला !

मी— ( हंसून ) त्यांतला कांहीं मी नाहीं.

श०— मग ठीक आहे तर. तुमचें आमचें जमलेंच ह्मणावयाचें. आतां फक्त जागाच पसंत पडावयाची राहिली.

मी०— मग जागा पहावयाला केव्हां येणार ?

श०— उद्यां दुपारीं आपण इकडे या. ह्मणजे आपण जागा पाहण्यास जाऊं आणि सगळेंच ठरवून टाकूं.

मी— ठीक आहे. तर मग उद्यां आह्मी येतों.

असें ह्मणून आह्मी त्यांचा निरोप घेतला. बराच रस्ता चालून गेल्यानंतर मीं सुशीलास आश्चर्यानें विचारलें ' काय रे, मी सरहद्दीवर होतों हें त्यानें कसें ताडलें ? '

हे माझ्या तोंडचे शब्द ऐकून सुशील हंसून ह्मणाला— ' त्याचें तेंच तर समजत नाहीं. कांहीं लोकांना तर असें वाटतें कीं, त्याच्याजवळ कर्णपिशाच्चच आहे ! '

मी डोकें खाजवून ह्मणालों " हा मोठा चमत्कारच ह्मणावयाचा ! आमची व यांची गांठ घालून दिलीस, हें तूं फार चांगलें केलेंस. असल्या व्यक्तींचा सहवास झाल्याशिवाय जगाचें खरें ज्ञान होत नाहीं. "

यावर सुशील ह्मणाला ' मग घ्या आतां ज्ञान करून. स्वारी

इतकी विकट आहे कीं, आपला वर्षानुवर्षें जरी सहवास झाला तरी त्यांची आपल्याला माहिती होणें मुष्किलीचें आहे. आपली मात्र त्यांना सदानसदा माहिती असेल. येईलच आतां आपल्या नजरेस ! ”

---

# भाग २ रा.

## अनुमानशास्त्र.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं आह्मी घर पहावयास गेलों. तें घर दुमजली होतें. बसावयाची जागा, निजावयाची खोली वगैरे सर्व दालनें प्रशस्त, हवाशीर व स्वच्छ होतीं. त्या मानानें भाडेंहि माफक होतें आणि तें दोघांनीं मिळून द्यावयाचें असल्यामुळें तर तें फारच अल्प होतें. असा सगळा योग जमून आल्यामुळें आह्मीं तें घर तावडतोब आपल्या ताब्यांत घेतलें. त्याच दिवशीं सायंकाळीं मीं आपलें सर्व सामान तेथें घेऊन गेलों. दुसरे दिवशीं सकाळीं शरच्चंद्रही आपलें सामान घेऊन आले. सामान व्यवस्थेनें लावण्यांत पहिले दोन दिवस गेले. इतकें झाल्यानंतर आमचें बिऱ्हाड व्यवस्थित थाटून आमचें एकमेकांशीं थोडें बोलणेंचालणेंहि होऊं लागलें.

शरच्चंद्र हा वाटत होता इतका कांहीं चमत्कारिक माणूस नव्हता. त्याचा स्वभाव शांत असून वागणूकहि मोठी नियमित असे. रात्रीं दहाच्या पुढें तो कधींहि जागा नसे. त्याचप्रमाणें सकाळींहि मी उठण्यापूर्वींच तो प्रातर्विधी उरकून बाहेर जात असे. कधीं कधीं तो दिवसच्यादिवस प्रयोगशाळेंत काढीत असे. कधीं कधीं शहराबाहेर तासचेतास हिंडत असे. कधीं कधीं गांवांतून अगदीं गल्ली-कुचिनेंहि तो फिरत असे. एकदां मनांत आलें म्हणजे तो कामाला मोठा बहाद्दर असे. कामावरून लहर फिरली म्हणजे स्वारी स्वस्थ बसत असे. फार तर काय पण तोंडांतून शब्दहि काढण्याची

तसदी घेत नसे ! अशा वेळेस त्याचा चेहरा अगदीं उदास दिसत असे. दृष्टी तर इतकी निस्तेज होत असे कीं, त्याच्याकडे पहाणारास तो कांहीं-तरी अंमल करणारा असावा असें खात्रीनें वाटावें.

त्याचा माझा सहवास जसजसा वाढूं लागला तसतसें त्याच्या स्वभावाचें व आयुष्यक्रमाचें रहस्य काय आहे हें समजून घेण्याची माझी उत्कंठा अधिक अधिक प्रबळ होत चालली. त्याची मुद्रा व एकंदर चालचर्या अशीच कांहीं विलक्षण होती कीं, त्याला एकदां पाहिल्याबरोबर पहाणाराच्या मनांत त्याच्याबद्दल विलक्षण भावना उत्पन्न व्हावी ! त्याची उंची सहा फुटां पेक्षां अधिक होती. त्याचा बांधा सडपातळ असल्यामुळें तो होता त्यापेक्षां अधिक उंच दिसत असे. त्याची दृष्टी भेदक व तीक्ष्ण असे. आणि त्याचें नाक सडक व अणकोचीदार असल्यामुळें हा मनुष्य मोठा दृढनिश्चयाचा असावा अशी कोणाचीहि तेव्हांच कल्पना होई. त्याची हनुवटीहि सामान्य माणसाहून अधिक ठसठशीत दिसे. त्याच्या हातास शाईचे किंवा रसायनद्रव्याचे डाग नेहमीं असत. तरी तो काम करण्यांत मोठा व्यवस्थित असे. प्रयोग करतांना तो जेव्हां कांचेचीं भांडीं, कांचेच्या नळ्या, शस्त्रें वरचेवर घेत असे व खालीं ठेवीत असे तेव्हां त्यांचा यत्किंचितही आवाज होत नसे.

या माणसाचें मी इतकें वर्णन देत आहें, हें ऐकून माझ्या रिकामटेकडेपणाबद्दल वाचकांना कदाचित् तिरस्कारहि वाटेल. ह्मणून मला येथें हें सांगितलें पाहिजे कीं मलाहि त्यावेळेस दुसरा कांहीं उद्योग नव्हता. कोठें चार घटका बसून वेळ काढीन तर सुशीलाशिवाय दुसरी कोणाचीहि ओळख नाहीं. बरें, हिंडून फिरून वेळ घालवीन तर तशी अंगांत शक्ति नाहीं. तेव्हां अर्थातच शरच्चंद्राकडे माझें विशेष लक्ष वेधलें. आणि शरच्चंद्रहि कांहीं सामान्य माणूस नव्हता. त्याच्या स्वभावाचें व एकंदर चरित्राचें खरें मर्म काय आहे हें जाणण्याचा प्रयत्न करणारास अनेक रीतीनें बोध मिळण्याचा संभव होता. मी या व्यवधानांत इतक्या एकाग्रतेनें लागलों याचें तरी हेंच कारण होय.

तो कांहीं वैद्यकाचा अभ्यास करीत नाहीं, हें मीं त्याच्याच बोलण्यावरून ताडलें. यासंबंधानें सुशीलाकडून प्रथम मला जी माहिती

मिळाली तीच खरी होती अशी माझी खात्री झाली. विद्वत्तेचे जे म्हणून धंदे गणलेले आहेत त्या धंद्यांत शिरण्याचा त्याचा उद्देश असावा असें माझें कांहीं अनुमान होईना. तरी पण त्याचा विद्याव्यासंग मात्र फार दांडगा असे. कांहीं विवक्षित विषयांचें तर त्याला अगदीं वेडच लागून गेलें होतें ! दिसण्यांत जरी तो तऱ्हेवाईक दिसला तरी कांहीं कांहीं बाबतींतलें त्याचें ज्ञान मोठें प्रशंसनीय असें. कांहीं निश्चित उद्देश असल्याशिवाय कोणीहि मनुष्य इतका व्यासंग ठेवणार नाहीं हें उघड आहे. किरकोळ वाचन ठेवणारे जे गृहस्थ असतात त्यांना कोणच्याहि गोष्टीची सूक्ष्म माहिती नसते. कारणाशिवाय इतक्या ज्ञानाचा संग्रह करण्याची कोणीहि दगदग करणार नाहीं, अर्थात् विवक्षित धंदा करण्याच्या उद्देशानेंच शरच्चंद्र इतकी खटपट करीत असला पाहिजे असा माझ्या मनाचा ठाम निश्चय झाला.

कांहीं बाबतींत त्याचें ज्ञान जसें वाखाणण्यासारखें असें, तसें इतर बाबतींत त्याचें अज्ञानहि भयंकर असें ! तत्त्वज्ञान, शासनशास्त्र, वाङ्मय वगैरे संबंधानें त्याला पूज्य माहिती होती. सामान्य ग्रंथकारांची सुद्धां त्याला ओळख नसे. सूर्य पृथ्वी भोंवतीं फिरतो किंवा पृथ्वी सूर्या-भोंवतीं फिरते, दोघेहि एकमेकांभोवतीं फिरतात किंवा कोणीच कोणा-भोंवतीं फिरत नाहीं यासंबंधाची त्याला बिलकुल माहिती नसे. त्याच्या बोलण्याचालण्यावरून एकेदिवशीं ही गोष्ट माझ्या नजरेस आली. तेव्हां मी आश्चर्ययुक्त नजरेनें त्याच्याकडे पाहूं लागलों.

त्यावर तो मला ह्मणाला, ' याबद्दल तुह्मांला आश्चर्य वाटत ? या गोष्टी मला माहीत नाहींत हें एकपरीं बरेंच आहे असें मला वाटतें किंबहुना त्या मला येत असत्या तर मी त्या विसरण्याच्या तजविजीसच लागलों असतों ! '

" काय विसरण्याच्या ? "

" होय. हें पहा, मनुष्याचा मेंदू हा स्वभावतः एखाद्या रिकाम्या साठवणाच्या खोलीप्रमाणें असतो. जें सामान उपयुक्त असेल किंवा तुह्मांला ज्याची जरूर असेल तेंच त्यांत साठवलें पाहिजे. मूर्ख माणूस नजरेस येईल त्या गोष्टीचा आपल्या डोक्यांत संचय करीत सुटतो.

शेवटीं सहस्रावधि भाकड गोष्टींची डोक्यांत खेंच झाल्यामुळें उपयुक्त ज्ञानास अर्धचंद्र मिळण्याची बारी येते ! त्याच्या डोक्यांत या सर्व गोष्टींचा एकच गोंधळ उडून जातो. जरूर पडेल तेव्हां विवक्षित गोष्ट या सर्व गोंधळांत हरपल्यासारखी होते ! उलटपक्षीं तोच माणूस चतुर असला म्हणजे तो वायफळ गोष्टीच्या वाटेस न जाऊन आपल्याला पाहिजे असेल तेंच नेमकें उचलण्याची सावधगिरी बाळगतो. जीं हत्यारें त्याच्या कामास येतील तेवढ्यांचाच तो संग्रह करतो आणि तो नीट व्यवस्थित रीतीनें केलेला असल्यामुळें जरूर लागेल तें हत्यार त्यास अचुक उचलतां येतें. थोडक्या जागेंत अधिक संग्रह कसा होईल ? जागा कांहीं वाढत नाहीं. तिचें क्षेत्र कायमच असतें. अर्थात् त्या जागेंत एखादी नवी वस्तु टाकावयाची म्हणजे तेवढ्याच आकाराच्या जुन्या वस्तूस स्थानत्याग करणें भाग पडतें ! म्हणूनच हें पक्कें ध्यानांत ठेवा कीं, जरूरीपेक्षां अधिक ज्ञानाची हांव धरली कीं, व्यवहारास जरूर असणाऱ्या ज्ञानांत कांहींतरी कमतरता ही झालीच पाहिजे. नवी वस्तू आपल्याला जागा करण्यास जुन्या वस्तूस कोपरखळी देऊन बाहेर काढणारच !

मी—पण ग्रहमालेची सुद्धां आपल्याला माहिती असूं नये कां ?

शा०— कसची ग्रहमाला घेऊन बसलां ? तुमचें काय म्हणणें कीं, आपण सूर्याभोंवतीं फिरतों. असेल. उद्यांपासून आपण चंद्राभोंवतीं जरी घिरट्या घालावयास लागलों तरी आपल्या व्यवहारांत व कामांत रतिभरहि फरक होईल काय ?

मला त्याचा हा युक्तिवाद कांहीं पसंत पडला नाहीं. परंतु यासंबंधांत त्याच्याशीं अधिक चर्चा केल्यानें विशेष कांहीं फायदा होईल असें मला वाटलें नाहीं. त्यांचा माझा हा जो संवाद झाला त्यावर मी विचार करायला लागलों. त्यापासून सामान्यतः कोणतीं अनुमानें निघतील या विचारांत माझें मन गढून गेलें. आपल्या उद्देशास किंवा अंगीकृत कार्यास जें ज्ञान गैर लागू असतें त्याचा संचय करणें मूर्खपणाचें आहे असें तो म्हणाला. अर्थात् हा ज्या ज्ञानाचा व्यासंग करीत आहे तें याच्या उद्देशास अनुसरून असेंच असलें पाहिजे. आजपर्यंत त्याच्या माझ्या

सहवासांत त्यानें ज्या बाबीसंबंधानें असें विशिष्ट ज्ञान दाखविलें त्यांचीं मी गणना करूं लागलों. हातांत पेन्सिल घेऊन मीं त्यांचें टांचणही करण्यास सुरवात केली. हें टांचण पूर्ण होऊन जेव्हां मीं तें वांचलें तेव्हां माझें मलाच हंसूं आलें. तें टांचण येणेंप्रमाणें:—

१–वाङ्मयाचें ज्ञान–शून्य.

२–तत्त्वज्ञान–पूज्य.

३–खगोलशास्त्र–सदरहू.

४–राजकीय गोष्टींचें ज्ञान–सामान्य.

५—वनस्पतीशास्त्र–तुरळक, विशेषतः बचनाग, अफू, कुचला, धोतरा वगैरे विषारी वनस्पतींचें विशेष ज्ञान. बागबगीचाची माहिती मुळींच नाहीं.

६– भूगर्भशास्त्र– निर्वाहापुरतें, नुसतें पाहिल्या बरोबर जमिनीचे गुण-धर्म सांगतो. त्याच्या धोतराला चिखलाचे डाग पडले ते शहराच्या कोणच्या भागांत पडले असावे हेंहि तो अचुक सांगतो.

७– रसायनशास्त्र– खूप.

८– इंद्रियशास्त्र– अचुक, परंतु पद्धत नाहीं.

९– मनोवृत्ति उचंबळविणारे ग्रंथ–अमर्याद वाचन. गेल्या शंभर वर्षांत ज्या ज्या ह्मणून भयप्रद गोष्टी घडल्या त्या सर्व त्याला बहुधा मुखोद्गतच आहेत.

१०– गायनवादनाकडे चांगली प्रवृत्ति आहे.

११– दांडपट्टा, कुस्ती– वाकबगार.

१२– कायदा– व्यवहारोपयोगी ज्ञान उत्तम.

इतकी याद झाल्यावर मीं तिचें एकदां मनन केलें आणि ह्मणालों:—'या खिचडींतून मला काय निष्कर्ष काढतां येणार? या गृहस्थाला धंदा कोणता करावयाचा आहे हें या यादीवरून निश्चित करणें अत्यंत वेडेपणाचें आहे.' असें ह्मणून मीं ती यादी निराशेनें विस्तवांत फेंकली.

त्याला गायनवादनाची लजत असे हें मीं वर सांगितलेंच आहे. यासंबंधांत सुद्धां त्याच्या तऱ्हेवाईकपणानें त्यास सोडलें नव्हतें. वाद्यावर कांहीं कांहीं अत्यंत अवघड राग त्यास वाजवितां येत असत. परंतु,

सामान्यत: जे राग प्रचारांत कमी ऐकावयास सांपडतात त्याच्यावरच त्यानें विशेष तयारी केलेली होती. स्वारी एकटी असली ह्मणजे तर कांहीं विचारूंच नका. मग कसला राग आणि विराग? मनास येईल तें भरकटत सुटावयाची! एखादे वेळेस तर त्याच्या वादनाचा अगदीं कंटाळाहि येत असे. तरी पण तो एकांतवासांत स्वत:शींच वाजवीत बसत असल्यामुळें त्याला दोष लावणें असभ्यपणाचें होईल ह्मणून त्याच्या वादनाचा कंटाळा आल्यास मीच अंमळ लांब जाऊन बसत असें; पण त्याला कधींहि बोलत नसे.

पहिल्या आठवड्यांत आमच्या घरीं कोणीहि आलें नाहीं. आह्मांला जसे सखेसोबती कोणी नाहीं त्याप्रमाणें या राजश्रीनाहि कोणी मित्र नाहीं असें मला वाटूं लागलें. परंतु, शेवटीं हा विचार मला बदलावा लागला. कारण पुढें पुढें अनेक दर्जाचीं, अनेक धंद्याचीं अशीं माणसें त्याच्या भेटीस येतांना मला दिसलीं. त्यांपैकीं एक गृहस्थ दररोज–निदान एक दिवसाआड–आमचें येथें खेप टाकून जात असत. त्यांचें नांव लक्ष्मणसिंग असल्याचें मला पुढें समजलें. त्यांचा चेहरा मोठा चमत्कारिक दिसत होता. हे मोठे पाताळयंत्री गृहस्थ असावेत असें त्यांच्या मुद्रेवरून वाटे. एके दिवशीं सकाळीं उत्तम प्रकारचा पोषाख केलेली एक तरुण मुलगी शरच्चंद्रास भेटावयास आली. ती सुमारें अर्धाअधिकतास आमच्या येथें होती. त्याच दिवशीं सायंकाळीं एक हाडकुळे व दिसण्यांत बरेंच वयातीत असे गृहस्थ आले. ते कांहींतरी मोठ्या गडबडींत असावेत असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें. त्यांच्या मागोमाग एक वयस्क स्त्रीहि तेथें आली. दुसऱ्या एका प्रसंगीं केस पिकलेले एक गृहस्थ शरच्चंद्राकडे येऊन त्याच्याशीं बराच वेळपर्यंत खलबत करीत बसले होते. याप्रमाणें आज एक तर उद्यां दुसराच, असे नानाप्रकारचे लोक शरच्चंद्राची गांठ घेऊं लागले. त्याच्याकडे कोणी गृहस्थ भेटायला आले ह्मणजे मी दुसरीकडे जाऊन बसत असें. 'तुमची निरुपायानें अशी गैरसोय होते याबद्दल राग मानूं नका.' असें तो मला वरचेवर ह्मणत असे. 'माझ्याकडे येणारे हे माझे सर्व पक्षकार आहेत, हे कांहीं कामाकरतां वरचेवर माझ्याकडे

येत असतात.' असेंहि त्यानें मला बऱ्याच दिवसांनंतर सांगितलें. 'आपला धंदा काय? हे लोक आपल्याकडे कोणत्या कामाकरितां येत असतात?' असें मीं त्याला एकदां विचारलें. पण त्यानें कांहीं मला त्याचा पत्ता लागूं दिला नाहीं. त्याच्याकडे येणाऱ्या गृहस्थांपैकीं माझी आतां बऱ्याच जणाशीं तोंडओळख झाली होती. त्यांच्याकडूनहि कांहीं सुगावा लागेल ह्मणून मीं प्रयत्न केला; पण त्यांत मला यश आलें नाहीं.

एकेदिवशीं सहजगत्या तो उठण्यापूर्वीं मी उठलों. व प्रातर्विधी उरकून एक मासिक पुस्तक घेऊन तें वाचीत बसलों. कांहीं वेळानें शरच्चंद्रहि जागे झाले. त्यांच्याशीं मीं आतां कांहीं बोलणार इतक्यांत मासिकांतील एका लेखावर पेन्सिलीनें खूण केलेली आहे असें मला दिसलें. ही खूण कशाकरितां केली आहे अशी माझ्या मनांत स्वाभाविकपणेंच जिज्ञासा उत्पन्न झाल्यामुळें मी तो लेख बारकाईनें पाहूं लागलों.

संसाराची चोपडी असा त्या लेखावर मथळा होता. 'सामान्यतः ज्या गोष्टी आपणांस दृष्टिगोचर होतात त्यांचें जर पद्धतशीर रीतीनें परीक्षण करण्यांत आलें तर चाणाक्ष माणसास केवढें ज्ञानभांडार हस्तगत करून घेतां येईल, असा त्या लेखाचा मतितार्थ होता. लेखांत जसा मार्मिकपणा होता तसाच त्यांत एकप्रकारचा विलक्षणपणाहि दिसून येत होता. त्यांतील कोटिक्रम समर्पक व संगतवार होता. परंतु, त्यापासून काढण्यांत आलेलीं अनुमानें मात्र अत्यंत विपरीत व व्यवहारास निरुपयोगीं अशीं मला वाटलीं. कपाळाला आठ्या पडल्या किंवा कोणी भिंवया चढवल्या किंवा दृष्टींत यत्किंचित्हि फरक केला तर त्या माणसाचें हृद्गत चालतां चालतां ओळखतां येईल. निरीक्षणशक्ति व विवेचकशक्ति यांचा प्रयोग कसा करून घ्यावा हें ज्याला समजलें आहे, त्याच्या कोशांतून फसवणूक हा शब्द काढून टाकला पाहिजे! तो जें जें अनुमान करील त तें बिनचूक ठरलेंच पाहिजे. हीं अनुमानें तो कशी काढतो याचें रहस्य ज्यांच्या लक्ष्यांत आलें नाहीं तीं माणसें अशा गृहस्थास जादूगार किंवा अंतर्ज्ञानीहि समजतील.' असें या लेखकाचें ह्मणणें होतें.

सदर लेखक आपल्या लेखांत एके ठिकाणीं ह्मणतोः—"पाण्याच्या

एका थेंबाची कल्पना आली ह्मणजे एखाद्या तार्किकास महासागराचें किंवा प्रचंड धबधब्याचें बिनचुक अनुमान काढतां येईल त्याप्रमाणें या संसाराचीही गोष्ट आहे. मानवजातीचा आयुष्यक्रम ह्मणजे दुसरें कांहीं नसून कार्यकारणशृंखलेनें बद्ध झालेली अशी ती वस्तुपरंपराच होय. त्या परंपरेंतील एक दुवा आपल्या दृष्टीस पडला कीं सबंद साखळी संगतवार रीतीनें आपल्या लक्षांत आलीच पाहिजे. इतर सर्व शास्त्रांप्रमाणें अनुमानशास्त्र हेंहि सतत अभ्यासानें व परिश्रमानेंच प्राप्त होतें. या शास्त्रांत परिपूर्णता संपादन करण्यास समग्र आयुष्याहि पुरणार नाहीं. मनुष्यस्वभावाच्या मानसिक वृत्तीवर किंवा नैतिक गुणावर पगडा बसविण्याचा प्रयत्न न करतां प्रत्येकानें आरंभीं व्यक्तिमात्राच्या चरित्रांत सामान्यतः दृग्गोचर होणाऱ्या बाबींचेंच परिशीलन करण्यास लागावें. एखाद्या मनुष्याची गांठ पडली कीं, ठोकळमानानें त्याचा पूर्वेतिहास काय असला पाहिजे; तो आपला आयुष्यक्रम कशा-रीतीनें घालवीत आहे, त्याचा धंदा काय असावा इत्यादि सामान्य गोष्टींचें सूक्ष्म पर्यालोचन करून त्याबद्दल बिनचुक अनुमानें काढण्यास आरंभीं प्रयत्न करावा. अशा प्रकारचा प्रयत्न जरा चमत्कारिक दिसेल हें खरें; परंतु त्यायोगानें निरीक्षण शक्तीस एकप्रकारचें शिक्षण मिळून गुंतागुंत सोडविण्याकरितां प्रथम कोणच्या धाग्यास हात घालावा हेंहि समजूं लागेल. मनुष्याच्या नखावरून, त्याच्या पोषाखावरून, त्याच्या पादत्राणावरून, त्याच्या चर्येवरून, सारांश, त्याच्या चालचलणुकींत दिसून येणाऱ्या हरएक गोष्टीवरून मनुष्याचा धंदा कोणता आहे हें तावडतोब ओळखतां येईल. अशारीतीनें निरीक्षण करण्याचें दृष्टीला व मनाला एकदां वळण दिलें ह्मणजे व्यक्तिमात्राच्या आयुष्यक्रमांतील कोणतीहि गोष्ट अगम्य राहणें शक्य नाहीं असें सामान्य विधान करतां येण्यासारखें आहे. ”

मासिक पुस्तक खालीं जमिनीवर आपटून मी ह्मणालों:—“ इतका भिकार लेख आपण पूर्वी कधीं जन्मांतहि वाचला नव्हता. ”

“ काय आहेहो तें ? ” असा यावर शरच्चंद्रानें मला प्रश्न केला.

मीं उत्तर केलें “ हा या मासिकांत एक लेख आहे. तो मी वाचीत

होतों. पण मला अगदीं कंटाळा येऊन गेला. लेखकानें कांहीं भलभलतींच विधानें केलेलीं आहेत. लेख लिहिला आहे मोठा छान. पण त्यांतली विचारसरणीमात्र आपल्याला पसंत नाहीं. ज्याला कांहीं करायचें नाहीं त्यानें या गप्पा खुशाल वाचाव्यात. त्या जशा रिकामपणीं लिहिलेल्या आहेत, तशाच त्या रिकामपणीं करमणूक करण्यासारख्या असतील; परंतु, व्यवहारामध्यें तर त्यांचा बिलकुल उपयोग दिसत नाहीं. मला वाटतें कीं, या लेखकाला आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत न्यावें आणि त्या डब्यांत खेंचून भरलेल्या माणसांचे ‘ सांग काय धंदे आहेत ते ? ’ असें त्याला कान धरून विचारावें. मी पैज मारून सांगतों कीं त्या गर्दींतील एकाचेंहि त्याला यथार्थ वर्णन देतां येणार नाहीं.

श०— मी आपल्याला खात्रीनें सांगतों कीं आपली पैज आपल्या अंगावर येईल. तो लेख मीं लिहिला आहे.

मी— काय ? तुह्मी ?

श०— होय. मीच. त्यांत जी निरीक्षणशक्ति आणि अनुमान कौशल्य हीं सांगितलीं आहेत तीं सर्व माझ्या अंगीं आहेत. त्यांतलीं जीं विधानें आपल्याला इतकीं बाष्कळ वाटतात तीं व्यवहारांत खरी ठरतात, अशी मी तुमची खात्री करून देईन. फार कशाला ? याच धंद्यावर माझा चरितार्थ चालला आहे.

मी—तो कसा ?

श०—होय तो माझा धंदा आहे. या जगांत हा धंदा करणारा माझ्यासारखा दुसरा कोणी असेल असें मला वाटत नाहीं. एखादा गुंतागुंतीचा खटला आला किंवा एखादी भानगडीची गोष्ट उपस्थित झाली ह्मणजे लोक माझा सल्ला घेतात. मीं ठरविलेलें निदानच हजार हिश्शांनीं खरें ठरतें. आणि त्याच्यावरच मला सहस्रावधि रुपये मिळतात. मोठमोठाले सरकारी अधिकारीसुद्धां मला कौल लावतात. दोन्ही बाजूंच्या पुराव्याची योग्य शहानिशा करून मी त्यांना तात्काळ मार्गाला लावतों. दुष्कर्मं घडण्याची कारणपरंपरा बहुधा सारखीच असते. भावांभावांतील भांडणें किंवा शेजाऱ्याशेजाऱ्यांतील कुरापती, द्रव्याभिलाषानें किंवा सूड उगवण्याच्या बुद्धीनें झालेले खून वगैरे नानाप्रकारच्या गुन्ह्यास बर-

चेवर तीच तीच कारणं घडत असतात. एकेकाप्रकारचे हजारों गुन्हे माहीत असले म्हणजे विशेष गुन्हा कारणपरंपरेच्या कोणत्या दालनांत बसवावयाचा हें तेव्हांच समजतें. कांहीं बनावट कागदपत्रांसंबंधानें लक्ष्मणसिंगाला मोठें कोडें येऊन पडलें आहे आणि तें कोडें सोडविण्याकरितांच हल्लीं तो माझ्याकडे हेलपाटे घालीत असतो. "

" आणि हे दुसरे लोक ? "

" ते अशाच कांहींतरी कामाकरितां येत असतात. पुढें काय करावें हें सुचेनासें झालें कीं सगळे माझ्याकडे धांव घेतात. मी त्यांची हकीगत ऐकून घेतों व त्यांना तोड सांगतों. आणि आयते माझ्या खिशांत पैसे येऊन पडतात ! "

" म्हणजे तुमचें असें म्हणणें काय कीं ज्यांना एखाद्याप्रकारची इत्थंभूत माहिती असते त्यांच्यापेक्षांहि खोलींतल्या खोलींत बसून तुह्मांला अधिक माहिती असते ? "

" यांत काय संशय ? मला पुष्कळ गोष्टी उपजत बुद्धीनें समजतात ! माझी अटकळ बहुधा बरोबर ठरते. तसा कांहीं विशेष भानगडीचाच खटला आला तर मला स्वतःहि थोडेसे श्रम करावें लागतात. श्रम कोणत्या मार्गानें करावेत हें मी पूर्णपणें जाणत असल्यामुळें थोड्या दगदगीनें मला अधिक काम करतां येतें. त्या लेखांत अनुमानशास्त्रासंबंधानें घालून दिलेल्या नियमांचा आपण आतां तिरस्कार केलांत; पण त्यांचेंच आह्मांला व्यवहारांत अमोलिक सहाय्य होतें. एखाद्या वस्तूचें रहस्य चटदिशीं कसें ओळखावें यासंबंधानें माझी अगदीं हातोटी बसून गेली आहे. आपण कांहीं दिवस सरहद्दीवर घालविलेत असें जेव्हां मीं तुह्मांला पहिल्याच भेटीला सांगितलें तेव्हां आपल्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. "

" आपल्याला आधीं कोणीं तें सांगितलें असेल ! "

" छे. मुळींच नाहीं. तुह्मांस पाहिल्याबरोबरच माझ्या मनांत एकदम एका मागून एक संगतवार अनुमानें ठरून शेवटचें अनुमान मीं तुह्मांस चटदिशीं सांगितलें आणि तें खरेंहि ठरलें. मीं हें अनुमान कसें काढलें हेंहि तुह्मांला थोडक्यांत सांगतों. तुह्मी मला प्रथम दिसलां तेव्हां आपल्याला

वैद्यकाची माहिती आहे असें मला समजलें. तुमचा लष्करी पेषा दिसला तेव्हां अर्थात् तुह्मी कांहीं दिवस लष्करांत नोकरी केली असली पाहिजे. तुमचें मनगट गोरें दिसतें आहे. आणि तुमचा चेहरा तर काळवंडलेला आहे. अर्थात् सरहद्दीवरील कडक उन्हाळ्याचाच हा परिणाम असला पाहिजे असें माझें ठाम अनुमान झालें. शिवाय तुमच्या उजव्या खांद्याला जखम लागली आहे हें तुमच्या उजव्या हाताच्या हालचालीवरून स्पष्ट दिसतें. लढाईतच तुह्मांला कोठें तरी वार लागला असला पाहिजे, त्याशिवाय अशी स्थिति होणार नाहीं असें कायम ठरल्याबरोबर आपण सरहद्दीवर होतां असें मीं आपणांस ताबडतोब सांगितलें. ”

“ हें सर्व आपण सांगितलेंत तर मोठ्या साध्या भाषेंत ! परंतु, व्यवहारांत घडलेली गोष्ट मी ऐकत नसून एखाद्या पुस्तकांत दिलेलें वर्णनच ऐकत आहे असें मला वाटतें. ”

यानंतर मी त्यांना एकदोन अद्वितीय पुरुषांच्या गोष्टी सांगितल्या. त्यांचा उपहास करून तो मला ह्मणाला “ तुमच्या कथानकाच्या नायकाच्या अंगीं एकेक गुण वेगवेगळा होता. पण माझ्या अंगीं सर्वगुण एकवटलेले आहेत. ”

हें त्याचें भाषण ऐकून मला बराच राग येऊन मी मनांत ह्मणालों ‘ हा गृहस्थ विशेष चाणाक्ष असेल, परंतु त्याला अहंकार मात्र फार दिसतो. ’

तो पुनः ह्मणाला ‘ हें पहा तुह्मांला काय सांगूं ! असे भानगडीचे खटलेच उपस्थित होत नाहींत. असें जर एखादें प्रकरण उद्भवेल तर मग मी आपल्या बुद्धीची करामत तुह्मांला दाखवीन. या शास्त्राचा माझ्यासारखा कोणींहि व्यासंग केला नसेल. पण प्रचंड भानगडीचें असें प्रकरणच उपस्थित होत नसल्यामुळें माझ्या बुद्धीचा योग्य उपयोग करण्याची मला संधीच येत नाहीं. ’

हें ऐकून मीं पुनः फार त्रासून गेलों. आत्मस्तुतीची यानें कमालच केली असें वाटून विषय बदलण्याच्या हेतूनें मीं खिडकीबाहेर डोकावलें व रस्त्यांतून साधा पोषाख केलेला एक गृहस्थ घरांचें नंबर मोठ्या बारकाईनें पहात चालला होता, त्याच्याकडे बोट दाखवून मीं म्हटलें ‘ हा मनुष्य कशाचा शोध करीत आहे ? ’

हे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडतांच शरच्चंद्र म्हणाला ' हं, तो होय ? तो एक पेन्शनर नोकर आहे. '

या योगानें तर मला फारच संताप आला. त्यानें कांहींहि सांगितलें तरी मला ऐकून घेणेंच होतें. कारण मला कोणाचीच ओळख नव्हती ! असा विचार माझ्या मनांत चालतो आहे तोंच तो मनुष्य नेमका आमच्याच दारापाशीं येऊन थबकला. दार उघडून तो घरांत शिरला व इकडे जिना चढतांना त्याचीं पावलेंहि वाजूं लागलीं. " शरच्चंद्राकडे मी आलों आहे. " असें ह्मणून त्यानें एक पत्र माझ्या हातीं दिलें. त्याबरोबर मला वाटलें कीं, शरच्चंद्राची खोड मोडण्यास ही वेळ चांगली आहे. अशा विचारानें मीं त्या मनुष्यास विचारलें " भल्या माणसा, तुझा धंदा काय ? "

तो मनुष्य ह्मणाला " खलाशाचा. माझा पोषाख मी दुरुस्तीकरितां दिला आहे. "

" हल्लींहि तूं नोकरीवर आहेस काय ? "

" नाहीं, महाराज, मी पेन्शनर आहे ! "

हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच आमचा जागच्याजागींच गारठा झाला व तो मनुष्य मुजरा करून तावडतोब निघून गेला.

---

## भाग ३ रा.

### लालबागेंतील भयंकर खून

चर्येवरून मनुष्य ओळखल्याचें माझ्या मित्राचें हें दुसरें उदाहरण पाहून मी फारच चकित झालों. त्याच्या अंगीं तशाप्रकारचें कांहीं सामर्थ्य आहे असें मलाहि वाटूं लागलें. तरी पण दुसऱ्यावर छाप पाडण्याच्या हेतूनें त्यानें ह्या सर्व गोष्टी आधीं ठरवून ठेवल्या असल्या पाहिजेत असा माझ्या मनांत अद्यापहि कांहींसा संशय अवशिष्ट राहिला होताच. पण इतकी लबाडी करून त्याला साधावयाचें तरी काय ? या विचारानें तो संशय तात्काळ कमजोरहि होऊं लागला. मीं त्याच्या-

कडे पाहिलें; तेव्हां नवीन आलेली चिठ्ठी तो वाचीत होता. ती चिठ्ठी वाच-तांच त्याची मुद्रा बदलून त्याचें मन कांहीं विचारांत व्यग्र झालें असावें असें मला वाटलें. 'हा मनुष्य अमुकच आहे, हें आपण कशावरून ओळखलेंत ?' असें मीं त्याला विचारिलें.

" आतां प्रत्येक बारीकसारीक गोष्ट मी तुह्मांला कोठपर्यंत समजावून देऊं ? मनांत माझा कांहीं विचार चालला होता. त्यांत मात्र तुह्मीं व्यत्यय आणलांत; तरीपण तुमच्या प्रश्नाचें मी समाधान करतोंच. मी जरा असभ्यपणानें बोललों याबद्दल माफी करा. मग एकूण तो मनुष्य तुह्मांला ओळखला नाहीं ? खरें पुसाल तर त्याला ओळखण्यापेक्षां कसें ओळखलें हें समजाऊन देणेंच अधिक कठीण आहे. दोन आणि दोन मिळून चार होतात ही तुमच्या मनाची पक्की खात्री आहे. परंतु, तें समजाऊन सांगणें मात्र बरेंच कठीण आहे. त्या मनुष्याच्या हातावर गोंदलेलें होतें; तें येथून सुद्धां स्पष्ट दिसत होतें. त्याच्या दाढीवरून सुद्धां त्याचा धंदा ओळखतां येण्यासारखा होता. याशिवाय त्याची चालण्याची ढब, हातांत काठी धरण्याची त्याची तऱ्हा यांवरून तो खलाशी असावा असें मी तेव्हांच अनुमान केलें."

" तुमचें हें बस्तान मोठें आश्चर्यकारक आहे बुवा !"

या माझ्या स्तुतीनें त्याला अंतर्यामीं बरें वाटलें तरी तो बाह्यात्कारी ह्मणाला " छे. यांत इतकें स्तुति करण्यासारखें कांहीं नाहीं. ही अगदीं साधी गोष्ट आहे. मघाशीं मी तुह्मांला सांगितलेंच कीं, अक्कल गुंग करणारीं अशीं भानगडींचीं खटलीं उपस्थितच होत नाहींत. पण त्यास हें प्रकरण अपवादक झालें. ही एवढी चिठ्ठी जर वाचून पहाल तर तुमची मी ह्मणतों याबद्दल खात्री होईल."

यावर मीं चिठ्ठी वाचली, तींत खालीं दिल्याप्रमाणें मजकूर होता.

रा. रा. शरच्चंद्र यांसः—

" काल रात्रीं येथें लालबागेंत मोठा भयंकर प्रकार घडला. आमच्या पहारेवाल्यानें तेथें दोन वाजण्याच्या सुमारास एक दिवा पाहिला. त्या घरांत कोणी रहात नव्हतें. त्या अर्थी त्याच्या मनांत स्वाभाविकच संभव आला. तेव्हां तो तेथें जाऊन पाहूं लागला तों घराचा

दरवाजा मोकळा आहे, दरवाज्या जवळच्या खोलींत सामानसुमान वगैरे कांहीं नाहीं. परंतु, तेथें चांगला पोषाख केलेल्या एका सभ्य गृहस्थाचें प्रेत मात्र पडलेलें आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. मयत मनुष्याच्या खिशांत "दिनकर" या नांवचें एक पत्र सांपडलें. त्यावरून त्याचें नांव दिनकरच असावें असें वाटतें. घरांत चोरीचिरी झाल्याची कांहीं चिन्हें दिसत नाहींत. त्या मनुष्यास मरण कसें आलें याबद्दलहि कांहीं सुगावा लागत नाहीं. खोलींत ठिकठिकाणीं रक्ताचे डाग पडलेले आहेत. परंतु मयताच्या अंगावर जखम झाल्याची निशाणी कोठेंहि दिसत नाहीं. या रिकाम्या घरांत त्यास कोणी आणून टाकलें हेंहि कांहीं समजत नाहीं. या सर्व प्रकरणाचा धागा दोरा काय असावा हें आमच्या कांहीं लक्षांत येत नाहीं. आज दुपारीं केव्हां तरी आपण जर त्या घराकडे याल तर तेथें माझी तुमची गाठ पडेल. तेथील सर्व मुद्देमाल मीं जशाचा तसाच ठेवला आहे. तेथें येऊन तेथील स्थिती प्रत्यक्ष पाहण्याची आपणांला सवड होणार नसेल तर मी तुह्मांला सावंत हकीगत कळवीन. या संबंधानें आपण जर आपला अभिप्राय द्याल तर आमचें मोठें काम होईल."

आपला
गिरधरलाल.

हें पत्र ऐकून तो ह्मणाला 'गिरधर व लक्ष्मणसिंग हे दोघेजण मोठे चाणाक्ष अधिकारी आहेत. दोघेहि मोठे समयसूचक व मेहनती आहेत, परंतु त्यांच्या अंगीं असावा तसा चलाखपणा दिसत नाहीं. एकमेकांचा तर ते पराकाष्ठेचा मत्सर करतात. इतका कीं एखादां गुन्हा पकडण्याचें काम दोघांकडेहि दिल्यास ते एकमेकांच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करण्याचा इतका प्रयत्न करतात कीं अखेर यांच्या सवतीमत्सराच्या भांडणांत गुन्हेगार शहाजोग सुटून जातो !'

'आतां आपल्याला एक पळहि वायां दवडून चालणार नाहीं; मी आतां जाऊन गाडी आणूं का ?' असें मीं त्यास विचारलें.

यावर तो ह्मणाला 'मी जाईनच असें कांहीं खात्रीनें सांगवत नाहीं. कारण, स्वभावतः मी फार आळशी आहें. अंग हालविण्याची लहर आल्याशिवाय माझ्यानें कोणतेंहि काम होत नाहीं.'

" कां बरें ? तुह्मी तर ह्मणत होतां कीं, चांगला भानगडीचा खटला आला तर मोठी बहार होईल. आणि आतां तर ही चांगली संधि तुमच्या येथें चालून आली आहे. मग दिरंगाई कां ? "

' कसली आली आहे संधि ? तिची मला इतकी प्रतिष्ठा बाळगण्याचें कारण नाहीं. कारण असें समजा कीं, मीं हें सर्व कोडें उकललें तरी त्याचें श्रेय अधिकाऱ्यांनाच सर्व मिळेल. कारण माझा पडला खाजगी पेषा. मी कोणाचा बांधलेला नाहीं. हा एकीकडे माझा फायदा असला तरी उलटपक्षीं माझ्या श्रमाचें श्रेय दुसऱ्यांनाच मिळतें हा त्यांत एक तोटाच आहे. '

" परंतु, मोठ्या नम्रपणानें तो तुमचें सहाय्य मागत आहे. "

" मागेल तर काय झालें ? त्याची खात्रीच आहे कीं, मी त्याच्यापेक्षां अधिक वाकबगार आहें ! तो माझ्याजवळ हें कबूलहि करतो. परंतु, प्राण गेला तरी तो चारचौघांत ही गोष्ट कधींहि कबूल करणार नाहीं. तुह्मी ह्मणतांच आहां तेव्हां आपण आतांच तिकडे जावयास निघूं. बघूंतर खरें काय आहे तें. " असें ह्मणून त्यानें आपला पोषाख चढाविला. " मीं यावें अशी तुमची इच्छा आहे कां ? " असें मीं विचारतांच तो ह्मणाला " हो हो. तुह्मांला दुसरें कांहीं काम नसलें तर तुह्मींहि चला. "

त्या दिवशीं आकाशांत ढग आले होते. सर्व घरावर एकप्रकारचें अंधुक आच्छादन पडलेलें दिसत होतें. आमचे सोबती मात्र आज खूप खुषींत होते. गाडींत एकसारखें ते गुणगुणत होते. त्यादिवशीं पडलेली सर्द व कुंद हवा आणि आह्मीं पहावयास जात होतों. त्या प्रकरणाचा भयंकरपणा या दोन कारणांमुळें मी मात्र अगदीं उदास बसलों होतो. शेवटीं मी त्याला ह्मणालों " आतां ज्या कार्याकरतां आपण चाललों आहों त्याच्यासंबंधानें तुमच्या मनांत कांहीं विचार चालत नाहीं काय? "

" छे. मुळींच नाहीं. विचार करायला मिळालें आहे काय ? भक्कम पाया झाल्याशिवाय त्यावर इमारत रचल्यानें ती ढासळण्याची जशी भीति असते. तसेंच एखाद्या गोष्टीसंबंधानें पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय तिजबद्दल विचार करणें ह्मणजे आपल्या मनास आपल्या हातानें मळल्या

मार्गाला लावण्याप्रमाणें आहे. एखाद्या गोष्टीसंबंधानें एकदां मन कलुषित झालें, ह्मणजे आपला विचार एकदेशीय होऊन निर्णयहि एकतर्फी होतो. याकरतां समर्पक सामुग्री मिळाल्याशिवाय एखाद्या बाबीचा विचार करण्याचा, मनास शीण दिल्यास तो निरर्थक होतो इतकेंच नव्हें तर केव्हां-केव्हां अनर्थ मूलकहि होतो. ”

‘ तेथें गेल्यावर तर आपणांस ही सर्व सामुग्री मिळेलच. पण कांहो मला वाटतें आपल्याला जायचें तें हेंच घर. ’ असें ह्मणून मीं बोटानें घर दाखविलें. त्याबरोबर गाडीवाल्यास तो ह्मणाला ‘ गाडी उभी कर; आह्मांला येथेंच उतरावयाचें आहे. ’

आह्मीं गाडींतून उतरलों त्या ठिकाणापासून तें घर सुमारें शंभर यार्डावर होतें. तेथपर्यंत आह्मीं पायीं चालत गेलों.

त्या बागेंत एकंदर चार घरें होतीं. दोन रिकामीं होतीं व दोहोंत बस्ती होती. आमचें घर रिकाम्या घरांपैकींच एक होतें. त्या घराच्या खिडक्यावरसुद्धां एक प्रकारचा उदासपणा दिसत होता. ‘ भाड्यानें देणें आहे ’ अशी एका खिडकीवर पाटीहि होती. ज्या आवारांत हें घर होतें त्याला बाग ह्मणण्यापेक्षां परडें ह्मणणेंच अधिक शोभलें असतें. कारण तेथें जीं कांहीं झुडपें उगवलेलीं होतीं, तीं स्वयंभूच असून स्वपराक्रमानेंच वाढत असलेलीं दिसत होतीं. पूर्वीं कधींकाळीं त्या जागीं बगीचा असेल ह्मणूनच त्या आवाराची त्या नांवानें अद्यापहि प्रसिद्धि असावी असा माझा तर्क झाला. त्या बागेभोंवतीं सर्व बाजूंनीं सुमारें तीन फूट उंचीचा एक तट होता. आह्मी जाण्यापूर्वींच त्या घरांत पोलिस तपास चालू होता. प्रवेशद्वाराजवळहि कित्येक पोलिस उभे होते. रस्त्यानें जाणाऱ्या लोकांचीहि तेथें साधारण गर्दी जमली होती. आंत काय चाललें आहे याबद्दलचा निदान कांहीं तरी सुगावा लागावा ह्मणून प्रत्येकजण आपल्या चवड्यावर उभा राहून आंत डोकावीत होता. परंतु, त्यांच्यापैकीं कोणाचीहि ती आशा सफल झाली असेल असें मला वाटत नाहीं.

मला वाटलें होतें कीं, शरच्चंद्र एकदम आंत जाऊन तेथील वस्तुस्थिति मोठ्या उत्सुकतेनें पाहील. परंतु, याकामीं त्यानें माझी अगदींच

निराशा केली. या प्रकरणाशीं जणूं काय त्याचा अगदीं संबंध नाहीं अशा त्रयस्थ मुद्रेनें तो बाहेर इकडून तिकडे फिरत होता. तो हें मुद्दाम करीत होता असें वाटून त्याच्या ढोंगीपणाबद्दल मी मनांत किंचित् रागावलोंहि. इतक्यांत बागेच्या हद्दीवर उगवलेल्या गवताकडे लक्ष-पूर्वक पहात इकडून तिकडे तो येरझाऱ्या घालूं लागला. मध्येंच कांहीं महत्त्वाची वस्तू दिसल्यासारखी करून तो एकदम थांबत असे. एकदां तर मीं त्याला आपल्याशींच हंसतांनाहि पाहिलें. आणि जणूं काय मोठें काम झालें अशा प्रसन्न मुद्रेनें तो पुनः गवताकडे पाहूं लागला. माझी स्थिती मात्र फार विलक्षण झाली. मी येथें आलों तरी कशाला असें मला होऊन गेलें. हे गृहस्थ उगींच कोणीतरी लुडबुड करणारे आहेत असें तेथें जमलेल्या लोकांना वाटून ते माझ्याकडे एकसारखें पाहूं लागले. तेव्हां आपण येथें कांहीं उद्देशानें आलों आहों असें दाखविण्याकरितां कांहीं तरी हालचाल केली पाहिजे, असें वाटून मीहि गवताकडे पहात त्याच्या बरोबर हिंडूं लागलों. गवतावर उमटलेलीं पावलेंच हा निरखून पहात असावा असा माझा तर्क झाला. पण या पावलांवरून सुगावा काय लागणार? कारण शेंकडों माणसें त्या रस्त्यावरून येऊन गेलेलीं दिसत होतीं—तरीपण त्यांतूनहि हा कांहीं मख्खी काढील असें वाटून मीं त्याला त्याबद्दल कांहींहि विचारलें नाहीं.

अखेर तो घराकडे जावयास वळला. घराच्या दरवाज्याजवळ जातांच एका गृहस्थानें त्याला लवून मुजरा केला व 'आपण आलांत; फार चांगलें केलेंत; आपली आह्मी वाटच पहात होतों' असें ह्मटलें.

त्यावर आमच्या मित्रानें उत्तर केलें 'गाई गुरांचा कळप जरी या गवतावरून गेला असतां तरी त्यावर पावलांची इतकी गर्दी झाली नसती. पावलांवरून कोणत्याहि प्रकारचा माग़मूस लावतां येणें केवळ अशक्य दिसतें. तरीपण गवतावर जाणाऱ्या येणाऱ्या पावलांचे शेंकडों ठसे उमटण्यापूर्वीं तुह्मीं ते पाहून त्यापासून कांहीं तरी कायमचें निदान ठरविलें असेलच."

यावर गिरधरलाल ह्मणाले "मीं घरांतल्या कामांत गुंतलों होतों. लक्ष्मणसिंग बाहेर होते. त्यांनीं हें सर्व पाहून ठेवलें असेल."

हे त्याच्या तोंडून शब्द निघताच शरच्चंद्रानें किंचित् हंसून माझ्याकडे पाहिलें. त्याच्या हंसण्याचा भावार्थ काय होता हें माझ्या तेव्हांच लक्षांत आलें.

शरच्चंद्र पुनः ह्मणाला 'तुमच्या सारखे दोन वाकबगार गृहस्थ येथें असल्यावर तिसऱ्या माणसाचें वास्तविक कामच नाहीं.'

यावर गिरधरलाल ह्मणाला 'या संबंधांत आह्मी शक्य ती खबरदारी घेतलीच आहे. तरी पण असल्या प्रकरणाची शहानिशा करण्याची आपल्याला जात्याच विशेष आवड आहे ह्मणूनच आपल्याला पांचारण केलें.'

शरच्चंद्र ह्मणाला 'आपण गाडींत आला असाल ?'

गिरधर०—छे. आह्मी पायींच आलों.

शरच्चंद्र—ठीक आहे तर मग. चला आतां आपण घरांत जाऊं.

असा प्रश्न विचारण्याचें कारण काय हें कांहीं माझ्या ध्यानांत आलें नाहीं. या प्रश्नाबद्दल गिरधरलालासहि आश्चर्य वाटल्याचें त्याच्या मुद्रेवरून दिसलें असो. यानंतर आह्मी घरांत शिरलों. आंत डाव्या व उजव्या बाजूस असें आह्मांला दोन दरवाजे लागले. यांपैकीं एक पुष्कळ आठवडेपर्यंत बंदच असावा असें दिसलें, दुसरा दरवाजा भोजनगृहाचा होता. याच खोलींत तें कृत्य घडलें होतें. शरच्चंद्र खोलींत गेला व आह्मीहि गपचीप त्याची पाठ धरली.

ती खोली बरीच मोठी होती. आंत सामानसुमानाची अडगळ कांहीं नव्हती. त्यामुळें ती अधिकच मोठी दिसत होती. तिच्या भिंतीवर वेलबुटीदार कागद चिकटवले होते. परंतु, ते अत्यंत जीर्ण झाल्यामुळें त्यांना जागोजाग भोकें पडलीं होतीं व आंतील भिंतीस दिलेला पिवळा रंग मधून मधून डोकावीत होता. खोलीच्या एका दालनांत एक चांगली प्रशस्त चूल होती. चुलीच्या बाजूसच फरसबंदी मोरी होती. या खोलींत उजेड येण्याकरतां एकच झरोका ठेवलेला असल्यामुळें खोलींतील हवा अगदीं कोंदट होती. खोलींतील भिंतीवर व पटईवर धुराळाहि मनस्वी बसला होता. त्यामुळें खोलींतील प्रत्येक वस्तू अंधुक अंधुक दिसत होती.

खोलीच्या ह्या सर्व खाणाखुणा मीं मागून पाहिल्या. प्रथम माझी

दृष्टी तेथें असलेल्या भेसूर प्रेताकडेच लागली होती. त्याचे निस्तेज डोळे पटईकडे लागलेले होते. मयत मनुष्याचें वय चाळीस वर्षांपासून पंचेचाळीस वर्षांपर्यंत असावें असें दिसत होतें. त्याचा बांधा विशेष ठेंगणाहि नव्हता व उंचाहि नव्हता. त्याचे केस कुरळे असून त्याला थोडी दाढीहि होती. त्याच्या अंगांत बनातीचा कोट होता. डोक्याला एक टोपीहि होती. त्याच्या मुठी वळलेल्या होत्या व दोन्ही हात एकमेकांत गुरफटलेले असे छातीवर होते. त्याप्रमाणें त्याच्या पायालाहि आढी पडलेली होती. द्वेष व भीती या मनोविकारांचा त्याच्या चेहऱ्यावर सजीव अवस्थेंत उमटलेला ठसा अद्यापहि अवशिष्ट होता असा मला भास झाला. त्याच्या कपाळाला आठ्या पडलेल्या होत्या. मस्तक खालीं वांकलेलें होतें; दांत आवळलेले होते; सारांश मरणापूर्वी त्या माणसाची स्थिती प्रक्षुब्ध झाली असली पाहिजे अशी माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाची सुद्धां खात्री झाली. मीं शेंकडों लोकांचे मृत्यू पाहिले; परंतु हा नमुना मीं प्रथमच पाहिला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

लक्ष्मणसिंग तेथेंच उभा होता. तो माझ्या मित्रास ह्मणाला " असें प्रकरण आजपर्यंत आपण कधींहिं पाहिलें नव्हतें ! "

गिरधर—आणि याचा सुगावा कांहींच लागत नाहीं.

लक्ष्मण—अगदीं लागत नाहीं !

प्रेताजवळ जाऊन शरच्चंद्र त्याकडे बराच वेळ निरखून पाहून ह्मणाला ' येथें हे रक्ताचे थेंब दिसत आहेत; याला जखम बिखम तर कोठें झाली नाहीं ना ? '

' छे. जखमेचें तर नांवच घ्यावयास नको. ' असें दोघांनींहि उत्तर दिलें. '

श०—मग हें कोणाचें तरी दुसऱ्याचें रक्त असावें. हा खून जर झाला असेल तर हें खुनी माणसाचेंच रक्त असलें पाहिजे. असेंच प्रकरण मीं पूर्वी एकदा पाहिलें होतें. दोन वर्षांपूर्वी असा एक खटला झाला होता तो तुह्मांला आठवतो काय ?

गि०—नाहीं बोवा.

श०— मग तो तुह्मी एकद अवश्य वाचा. मी तुह्माला सांगतों कीं या पृथ्वीतळावर अपूर्व अशी गोष्ट घडावयाचीच राहिली नाहीं. ज्या ज्या गोष्टी प्रत्यहीं घडत असलेल्या आपण पाहतों, त्या पूर्वीं एकदां घडलेल्या गोष्टींच्या आवृत्तीच होत.

इकडे त्याचें असें बोलणें चाललें होतें तरी त्याची नजर कांहीं थांबली नव्हती. तिचें काम एकसारखें चालूंच होतें. एका क्षणांत तेथील सर्व रागरंग त्यानें आपल्या दृष्टिद्वारां हृत्पटलावर कोरून ठेवला होता झटलें तरी चालेल. त्यानें त्याचे ओठ तपासून पायाचे घोटेहि निरखून पाहिलें.

शेवटीं तो म्हणाला ‘ याला तुम्ही हलवलें नाहीं ना ? ’

‘ छे. तसें म्हणण्यासारखें कांहीं आम्हीं त्याला हलवलें नाहीं. तपास चालला असतांना थोडे इकडे तिकडे केलें असेल एवढेंच. ’

श०—मग याला आतां येथून उचलून घेऊन जा. माझें काम झालें. शरच्चंद्रानें असें सांगतांच गिरधरनें चार माणसें आणलीं व त्यांना तें प्रेत तेथून उचलून घेऊन जाण्यास सांगितलें. ते त्यास उचलतात तोंच एक अंगठी जमिनीवर पडली. ती अंगठी उचलून घेऊन तिच्याकडे लक्ष्मणसिंग मोठ्या आतुरतेनें पाहूं लागला. ‘ कोणा तरी स्त्रीमुळेंच हें प्रकरण उद्भवलेलें आहे. कारण या अंगठीवर स्त्रीचें नांव दिसत आहे. ’

असें बोलून त्यानें ती अंगठी सर्वांना दिसेल अशा रीतीनें तळहातावर धरली. त्याबरोबर आह्मीं सर्वजण त्याचे भोंवतीं गोळा झालों; व त्या अंगठीकडे टक लावून पाहूं लागलों. पूर्वीं ही अंगठी कोणातरी स्त्रीच्या अंगुलींत असावी याबद्दल आह्मांपैकीं कोणासहि संशय उरला नाहीं.

गि०— हें प्रकरण तर फारच गुंतागुंतीचें दिसतें.

श०— असें डोळे वटारून काय होतें आहे ? मग एकूण तुमचे सर्व उपाय थकले ? बरें त्याच्या खिशांत तुह्मांला कांहीं सांपडलें कां ?

गि०—होय. तें सर्व येथें ठेवलेलें आहे. एक सोन्याचें घड्याळ आहे; सोन्याची सांखळी आहे; त्यांच्यावर कारखानदारांचीं नांवें आहेत; दिनकर या नांवाचीं खिशांत कांहीं पत्रें आहेत व एक लहानसें पुस्तक आहे; त्याच्या मुखपृष्ठावर ‘ श्रीनिवास ’ असें नांव आहे.

‘ पत्रावर पत्ता काय आहे ? ’

‘ त्याच्यावर ‘ मोतीचौकांत ’ असा पत्ता आहे. तो कुसुमपुरास लवकरच जावयास निघणार होता असें पत्रांतील मजकुरावरून दिसतें. ’

श०—तुह्मीं या श्रीनिवासासंबंधानें कांहीं तपास केलात काय ?

गि०— होय. मीं तावडतोब तपास केला. सर्व वर्तमानपत्रांतून मीं जाहीराती दिल्या आहेत व माझा मनुष्यहि मीं मोतीचौकांत रवाना केला होता, तो अद्याप परत आला नाहीं.

‘ कुवलयपुरास तुह्मी कांहीं चौकशी केली का ? कारण तेथीलच तो राहणारा आहे असें त्याच्या पत्रावरून दिसतें. ’

‘ होय. आज सकाळींच आह्मी कुवलयपुरला तार केली. ’

‘ तारेंत तुह्मीं काय मजकूर लिहिला होता ? ’

‘ येथील अगदीं संक्षिप्त हकीगत लिहून या मनुष्यासंबंधानें आम्हांला जर कांहीं खुलासा कळेल तर फार चांगलें होईल, असें तारेंत लिहिलें होतें ! ’

‘ याशिवाय इतर मुद्यासंबंधानें तुम्ही कांहीं विचारपूस केली नाहीं ? ’

‘ होय. आम्हीं श्रीनिवासासंबंधानेंहि चौकशी मागवली आहे. ’

‘ याशिवाय कांहीं नाहीं ? या प्रकरणासंबंधांत दुसरा कांहीं महत्त्वाचा मुद्दा तुम्हांला दिसत नाहीं ? ’

गि०— ( त्रासून ) आम्हीं काय केलें तें तुम्हांला एकदा सांगितलें आहे ! ’

यावर शरच्चंद्र आपल्या मनाशीं कांहींसें पुटपुटला. तो बोलणार होता इतक्यांत लक्ष्मणसिंग पुढच्या खोलींत होता तो तेथें येऊन मोठ्या आढ्यतेनें म्हणाला ‘ गिरधरलाल, मीं अत्यंत महत्त्वाची एक गोष्ट शोधून काढली आहे. मीं जर काळजीपूर्वक तपास केला नसता तर ती कोणाच्याहि लक्षांत आली नसती !

आपल्या प्रतिस्पर्ध्याची चारचौघांत फजिती करण्याची आपल्याला अमूल्य संधि मिळाली या आसुरी आनंदानें त्याची चर्या तेजःपुंज दिसूं लागली !

खोलींतून तें प्रेत उचलून नेल्यानंतर तिचा पूर्वींचा भेसूरपणा बराच

कमी झालेला दिसत होता. लक्ष्मणासिंग खोलींत जाऊन आपल्या व्यवसायबंधूस ह्मणाला ‘ इकडे आंत या आणि येथें उभे रहा. ’ असें ह्मणून त्यानें एक काडी ओढली. ‘ तें पहा तेथें काय दिसतें तें. ’ असें तो मोठ्या आढ्यतेनें गिरधरलालास ह्मणाला.

खोलीच्या भिंतीला लावलेला कागद कित्येक ठिकाणीं फाटलेला होता हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें लक्ष्मणसिंगानें दाखविलेल्या कोंपऱ्यांतीलहि कागद निघालेला होता. त्याजागीं ‘ कीना ’ अशीं रक्तानें अक्षरें लिहिलेलीं होतीं. त्यांकडे बोट दाखवून लक्ष्मणसिंग ह्मणाला ‘ सर्व खोलींत ही फारच अंधाराची जागा आहे. यामुळें इकडे सर्वांचेंच दुर्लक्ष झालें. खुनी मनुष्यानें किंवा स्त्रीनें हीं अक्षरें रक्तानें लिहिलेलीं आहेत. तेव्हां या मनुष्यानें आत्महत्या केली असेल असें संभवत नाहीं. बरें. त्या खुनी माणसानें इतर सर्व जागा सोडून हीं अक्षरें येथेंच कां लिहावीं ? मीं सांगतों त्याचें कारण ! येथें ह्या कोनड्यांत ही मेणबत्ती ठेवलेली आहे. खून झाला त्यावेळेस ही येथें जळत असावी. आणि ह्मणूनच तिच्या उजेडांत त्याला येथेंच अक्षरें लिहिण्याची बुद्धि झाली असें अनुमान निघतें. ’

गि०—आपण हा शोध लावला हें खरें. पण त्यापासून लभ्यांश काय निघणार ?

ल०—लभ्यांश ? कां बरें ? येथें ‘ कीना ’ हा स्त्रीलिंगवाचक शब्द लिहिण्याचा खुनी माणसाचा उद्देश होता. अर्थात् या कृत्याशीं कोण्यातरी स्त्रीचा संबंध असला पाहिजे हें उघड होतें. शरच्चंद्र ! आपलें हंसू अनावर झालें; होवो बिचारे. पण अखेर मी ह्मणतों तेंच खरें ठरणार. आपण मोठे वस्ताद व धूर्त असाल; परंतु तेवढ्यानें सदांसर्वदां लोकांचा उपहास करण्याचा हक्क पोहोंचतो असें मात्र समजूं नका.

श०—मीं हंसलों याबद्दल तुमची माफी मागतों. ही गोष्ट शोधून काढण्याचें श्रेय आह्मी प्रांजलपणें तुह्मांस देतों. खुनी माणसानें हें लिहिलें असावें हाहि तुमचा तर्क खरा असूं शकेल. ही खोली सगळ्या बाजूंनीं तपासण्यास मला अद्यापि वेळ मिळाला नव्हता; परंतु ती मी आतां तपासतों.

असें ह्मणून आमचे मित्र यत्किंचित्‌हि गलबल न करतां खोलींत चोहोंफेर हिंडूं लागले. कोठें तो एकदम थांबे; कोठें खालींच बसे; कोठें दीर्घ निश्वास सोडी; कोठें शीळच वाजवी; कोठें आपल्या मनाशींच कांहीं बोले; कोठें खरोखरच कांहीं महत्त्वाची गोष्ट नजरेस आली अशी मुद्रा करी; अशाप्रमाणें सुमारें अर्धातासपर्यंत त्याची टेहळणी चालली होती. या टेहळणीचें काय धोरण आहे हें आमच्यांपैकीं कोणाच्याहि लक्षांत येईना. मध्यंतरीं तो भिंतीचाच मेज घेई; त्याप्रमाणें रक्ताच्या डागांमधील जागाहि मोजून पाही; शेवटीं जमिनीवरची एक चिमुटभर माती घेऊन एका पाकिटांत घालून त्यानें तें खिशांत घातलें. भिंतीवर लिहिलेलीं अक्षरेंहि त्यानें वरचेवर निरखून पाहिलीं. आपली तपासणी यशस्वी होणार अशी मुद्रा करून शेवटीं तो ह्मणाला " अलौकिक बुद्धि ह्मणजे सतत परिश्रम करण्याची पात्रता अशी त्याची कोणी व्याख्या करतात. ही व्याख्या कांहीं बाबतींत लागूं पडत नसेल; परंतु ती या कामाला फारच उपयोगी पडते. "

गिरधर व लक्ष्मणसिंग हे त्याच्याकडे एकसारखे टक लावून पहात होते. आपल्या चातुर्याची हा रिकामी ऐट मारीत आहे. अशा तिरस्कारपूर्वक भावनेनें ते त्याचें बोलणें ऐकत होत. शरच्चंद्र अगदीं क्षुल्लक गोष्ट सुद्धां उद्देशाशिवाय करीत नाहीं हें त्याच्या स्वभावाचें रहस्य माझ्याप्रमाणें त्यांच्या लक्षांत आलें नव्हतें अशी त्यांच्या वृत्तीवरून माझी खात्री झाली.

" आपलें मत काय झालें ? " असा त्या दोघांनींहि यानंतर शरच्चंद्रास प्रश्न विचारला.

त्यावर तो ह्मणाला ' या बाबतींत माझें मत मी आपल्याला सांगणें ह्मणजे आपलें श्रेय हिरावून घेण्यासारखें आहे. तुमचें काम इतकें यथास्थित रीतीनें चाललें आहे कीं, त्यामध्यें तिऱ्हाइतानें हात घालणें चांगलें नाहीं. ' या त्याच्या बोलण्यांत व्याजोक्तीचा बराच भाग दिसत होता. शेवटीं तो म्हणाला ' माझ्या हातून जी काय तुह्माला मदत होईल ती मी तुह्मांस मोठ्या आनंदानें देईन. बरें, हें प्रेत प्रथम कोणाच्या नजरेस आलें हें मला सांगाल काय ? त्या माणसाचें नांव व पत्ता तुह्मांला देतां येईल काय ? '

यावर लक्ष्मणसिंग ह्मणाला 'होय.' त्याचें नांव जगन्नाथ. तो अदालतीजवळ रहातो.'

यावर शरच्चंद्र मला ह्मणाला 'वसंतराव, चला आपण आतां त्याच्याकडे जाऊं.' जातां जातां तो त्या दोघांकडे वळून म्हणाला 'या प्रकरणासंबंधांत मी तुह्मांला कांहीं महत्त्वाच्या गोष्टी सांगतों. हा खून झालेला आहे आणि खून करणारा इसम पुरूष आहे. त्याची उंची सहा फुटांपेक्षां अधिक असावी. तो तरुणच असला पाहिजे. उंचीच्या मानानें त्याचे पाय फारच आंखूड आहेत. त्याच्या जोड्याच्या टाचा चौकोनी असाव्यात. त्यानें त्रिचनापल्लीच्या तंबाखूची येथें विडी ओढली. ज्याचा खून झाला त्या माणसाला त्यानें येथें एका चौचाकींत घालून आणलें. चौचाकीच्या घोड्याचे तीन नाल जुने झालेले होते व पुढच्या पायांपैकीं एका पायास नवीन नालबंदी केलेली होती. एवढ्या गोष्टी तुह्मी ध्यानांत ठेवल्या तर तुह्मांला बराच उपयोग होईल असें वाटतें.'

हे गप्पीदास विनाकारण आपला शहाणपणा मिरवीत आहेत अशा भावनेनें लक्ष्मणसिंग व गिरधरलाल एकमेकांकडे पाहून हंसू लागले.

"या मनुष्याचा खून झाला असें आपलें ह्मणणें आहे; पण तो खून कशानें झाला?" असें लक्ष्मणसिंगानें त्याला विचारलें.

'विषप्रयोगानें!' असें उत्तर देऊन शरच्चंद्र ताबडतोब निघाला. परंतु द्वारापर्यंत गेल्यानंतर पुनः माघारा वळून ह्मणाला 'तुह्मांला आणखी एक गोष्ट मला सांगावयाची आहे. ती ही कीं 'कीना' याचा अर्थ सूड असा आहे. तें स्त्रीचें नांव आहे अशी कल्पना करून तुह्मी कदाचित् तिचा शोध करण्यांत व्यर्थ कालक्षेप कराल ह्मणूनच तुह्मांला हें बजावून सांगितलें आहे.' असें म्हणून तो तेथून तडाक्यानें निघाला. ते दोघेजण बिचारे 'आ' करून त्याच्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पहात होते.

---

# भाग ४ था.

## जगन्नाथाची हकीगत.

आम्ही त्या घरून जगन्नाथाकडे जावयास निघालों; तेव्हां दुपारचा एक वाजला होता. वाटेंत आम्हांला एक तारऑफिस लागलें. तेथें उतरून शरच्चंद्रानें एक लांबलचक तार पाठविली तदनंतर आम्ही जगन्नाथाचा शोध करीत चाललों. वाटेंत शरच्चंद्र मला म्हणाला ' खरो-खर पाहतां या प्रकरणाचा सर्व तल्लास मी सर्व समजलों आहें. पण या संबंधांत जितकी हकीगत समजणें शक्य आहे तितकी सर्व मिळवली पाहिजे. शिवाय जगन्नाथाचा पुरावा म्हणजे अस्सल पुरावा होय. असल्या भानगडीच्या प्रकरणांत अस्सल पुराव्या शिवाय पुढें पाऊल टाकणें चांगलें नाहीं. '

यावर मी म्हणालों ' खरोखरच तुमचें मला फार आश्चर्य वाटतें. आतां तुम्हीं या ज्या एकामागूनएक सतरा गोष्टी सांगितल्या त्याबद्दल तुमच्या मनाची खरोखरच खात्री पटली का ? '

' होय. खात्री पटल्याशिवाय मी सांगेन कसें ? मीं ठाम ठरविलेल्या निदानांत चुकीला जागाच नाहीं ! त्या घरीं जातांना पहिली गोष्ट माझ्या नजरेस आली ती ही होय कीं, त्या घराजवळ असलेल्या वळणावर चिखलांत चाकांचे स्पष्ट वण पडलेले होते. गेल्या आठवड्यांत काल रात्रींच काय तो पाऊस पडला. तेव्हां ही गाडी पाऊस पडल्यानंतर काल रात्रींच त्या रस्त्यानें गेली असावी. त्याप्र-माणें चिखलांत घोड्याचे नालहि उमटलेले होते. त्यांतील एका नालाचा वण स्पष्टपणें उमटलेला होता. अर्थात् तो नवीन नाल असला पाहिजे. शिवाय सकाळीं त्या रस्त्यानें गाडी गेली नाहीं हें मीं गिरधर-लालाच्या तोंडून खास करून घेतलेंच. अर्थात् तीं दोन माणसें गाडीं-तूनच त्या घरीं आलीं. असें अनुमान करण्यास काय हरकत आहे ? '

' बरें हें झालें; पण त्या मनुष्याची उंची तुह्मीं कशी ताडली ? '

' कां बरें ? तें कांहीं अवघड नाहीं. पावलांच्या लांबीवरूनच मनु-

ण्याची उंची कळूं शकते. मी आतां तुह्माला हें आंकड्यानें कांहीं सिद्ध करून दाखवीत नाहीं. या माणसाची पावलें बाहेर चिखलांत उमटलेलीं होतीं. याशिवाय त्याच्या उंचीचा अजमास करण्यास दुसरेंही एक सबळ कारण आहे. एखादा मनुष्य भिंतीवर जेव्हां कांहीं अक्षरें लिहितो तेव्हां तीं बरोबर आपल्या डोळ्यासमोर लिहिण्याची त्याची स्वाभाविकच प्रवृत्ति असते. भिंतीवर तीं जीं अक्षरें लिहिलेलीं होतीं तीं जमिनीपासून सहा फुटापेक्षां अधिक उंचीवर होतीं. त्याची उंची कशी ताडली हें आतां तुमच्या लक्षांत आलें ना ? '

' आणि त्याचें वय ? '

' तेंहि कांहीं अवघड नाहीं. कारण, बाहेर जीं पावलें उमटलेलीं होतीं त्यांच्या दरम्यान चार चार फुटांचें अंतर दिसत होतें. चार फुटावर पावलें टाकणारा माणूस अर्थात् तरुणच असला पाहिजे. त्याच्या जोड्याच्या टाचाहि चिखलांत उमटलेल्या होत्या. त्यावरून त्यांचाहि आकार सांगणें कठिण नाहीं. '

' बरें त्याच्या नखाचा आकार ? '

' भिंतीवर जीं अक्षरें लिहिलेलीं होतीं तीं नखानें लिहिलेलीं होतीं. तीं वरच्यावर लिहिलेलीं नसून भिंतींत कोरलेलीं दिसत होतीं. त्याचीं नखें काढलेलीं असतीं तर त्याला तीं भिंतींत खोदतां आलीं नसतीं. आतां त्रिचनापल्लीची तंबाखू मीं कशी ओळखली असें तुह्मी विचाराल. त्यास माझें एवढेंच उत्तर आहे कीं निरनिराळ्या ठिकाणच्या तंबाखूचा मीं फार बारकाईनें अभ्यास केला आहे. तंबाखूची राख पाहिली कीं मला त्या तंबाखूचें ठिकाण ताबडतोब सांगतां येतें. गिरधरलाल व लक्ष्मणसिंग यांच्या व माझ्यामध्यें फरक आहे तो हाच. '

' त्याचा चेहरा दिमाखदार होता हें तुह्मी कशावरून ओळखलेंत ? '

' तें माझें अनुमान फारच खुबीदार होतें. परंतु त्या संबंधानें मात्र मीं तुह्माला आतां कांहीं सांगत नाहीं. तें तुह्मांला पुढें आपोआपच समजेल. '

मी आपला हात डोक्यावरून फिरवून ह्मणालों ' माझ्या डोक्यांत सगळी गडबड उडून गेली आहे बुवा. तुमची हकीकत जसजशी जास्त-

जास्त ऐकावी तसतसा अधिकअधिकच घोटाळा होतो. तीं दोन माणसें त्या मोकळ्या घरांत कशी आलीं, त्या गाडीवाल्याचें काय झालें, एक मनुष्य दुसऱ्या माणसास विष घ्यायला कसें लावील; तेथें रक्त कोठलें पडलें; खुनी माणसाचा खून करण्यांत काय हेतू होता; कारण चोरी वगैरे करण्याचा हेतू दिसत नाहीं. बाईची अंगठी कोठून आली ? असा जों जों एकेका गोष्टीचा विचार करीत जावें तों तों कशाचा कशालाच पत्ता लागत नाहीं ! ”

माझा मित्र हंसून ह्मणाला ‘ सर्व अडचणी एकेठिकाणीं संकलित करण्याची तुमची हातोटी मोठी तारीफ करण्यासारखी आहे. तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें कांहीं कांहीं गोष्टींचा अद्याप उलगडा व्हावयाचा राहिलेला आहे, तरीपण मुख्य गोष्टी मीं आपल्या मनाशीं निर्विवाद ठरवून ठेवल्या आहेत. लक्ष्मणसिंगानें भिंतीवरील तीं अक्षरें दाखविलीं त्यांत मात्र कांहीं अर्थ दिसत नाहीं. या प्रकरणाचा तपास लावणाऱ्या माणसांनीं भलत्याच मार्गाला लागावें म्हणून त्यानें ही शक्कल काढली असावी. ज्या भाषेंतील तो शब्द आहे ती भाषा लिहिणाराची मातृभाषा नसली पाहिजे; हें त्या अक्षराच्या वळणावरून स्पष्ट दिसतें. या प्रकरणासंबंधानें आतां मीं आपल्याला अधिक कांहीं सांगत नाहीं. कारण जादुगारानें आपल्या हातचलाखींतील खुबी एकदां सगळ्यांना सांगितली म्हणजे त्याच्या जादूंतली सर्व मौज नाहींशी होते, त्याप्रमाणेंच माझी काम करण्याची काय पद्धत आहे हें मीं तुम्हांला सांगितलें म्हणजे तुम्ही म्हणाल ‘ यांत काय आहे ? हें कोणासहि सहज साधण्यासारखें आहे. ’

त्यावर मी ह्मणालों ‘ छे ! छे. असें मात्र मी कधीं ह्मणणार नाहीं. कारण कार्यकारणभावाचें शास्त्र व्यवहारांतील सामान्य गोष्टींपासून तों बिकट प्रश्नापर्यंत सर्वांना लागू करण्याचे तुमचे जे प्रयत्न चालू आहेत ते तुमच्या असामान्य बुद्धिमत्तेचे द्योतकच होत. ’

माझ्या तोंडचे हे उद्गार ऐकून माझ्या मित्राला फारच समाधान वाटलें. एखाद्या स्त्रीच्या सौंदर्याचें वर्णन तिच्यासमक्ष केलें ह्मणजे तिला जसा आनंद होतो तसाच, सत्यान्वेषणाच्या या कलेची कोणी प्रशंसा केली ह्मणजे माझ्या मित्रास आनंद होत असे.

यानंतर तो म्हणाला ' मी तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगतों. ते दोघेजण गाडींतून उतरल्यानंतर अगदीं जिवलग मित्राप्रमाणें एकमेकांच्या हातांत हात घालून इकडून तिकडे बराच वेळ हिंडत होते. कारण बाहेर गवतावर दोन माणसें एकमेकास लगटून चालल्यासारखीं पावलें उमटलेलीं आहेत. खोलींत गेल्यानंतरहि ते कित्येक वेळपर्यंत असेंच हिंडत असावेत. त्यांतील एक गृहस्थ कांहीं वेळानें जरा चवताळला असावा असें दिसतें. कारण घराच्या आंतल्या बाजूस पावलांचें अंतर जरा लांब लांब दिसतें. खोलीमध्यें त्यांची बराच वेळ बाचाबाचीहि झाली असावी व शेवटीं हा दुःखकारक प्रकार घडला असावा. माझीं जीं कांहीं या संबंधांत ठाम अनुमानें झालीं आहेत तीं मीं तुह्मांला सांगितलीं. बाकीहि कांहीं गोष्टी मला सांगतां येतील; पण त्या इतक्या खात्रीनें सांगतां येणार नाहींत. आतां आपल्याला लवकर गेलें पाहिजे; कारण, मला दुसरें आणखी काम आहे. '

आमची गाडी रस्त्यानें चालू असतांच आमचा असा संवाद चालला होता. कित्येक वळणें झालीं; कित्येक बोळ ओलांडले; तरी अद्याप अदालत येईना. शेवटीं एकदाची अदालत आली व गाडीवानानें तेथें गाडी उभी केली. तो आह्मांला ह्मणाला ' महाराज, ही तुमची अदालत आली. तुमचें घर बघा आतां कोठें आहे तें. तुह्मी परत येईतोंपर्यंत मी येथेंच उभा राहतों. ' अदालतीच्या आसपासचा प्रदेश स्वच्छ नव्हता. त्या रस्त्यास दोन्ही बाजूंसही गटार असून रस्त्याची रुंदी साधारणच होती. तेथील बहुतेक घरांच्या तळमजल्याला ओल होती. त्या गल्लींत बरींच घामट पोरें इकडून तिकडे धांवत पळत होतीं. त्यांतून मोठ्या मिन्नतवारीनें आपला रस्ता काढून शोध करीत करीत आह्मी जगन्नाथाच्या घरीं येऊन दाखल झालों.

ओटीवर जाऊन बसल्यानंतर थोड्याच वेळानें तो बाहेर आला. ' कामाच्या दगदगीनें आधींच मी त्रासलों होतों आणि माझ्या मागें ही ब्याद कशाला आली ! ' असा त्याच्या मनांत विचार चालला असल्याचें त्याच्या मुद्रेवरून दिसलें.

' या प्रकरणासंबंधानें तुह्मांला काय माहिती आहे ? असा शरच्चंद्रानें

त्यास प्रश्न करतांच तो ह्मणाला ' मीं आपला रिपोर्ट ऑफिसांत दिला आहे. '

यावर शरच्चंद्रानें आपल्या खिशांतून एक रुपया काढला व त्यास खालून आंगठ्यानें ठोका मारून तो झेलण्यास सुरवात केली. नाण्याचा आवाज ऐकल्याबरोबर जगन्नाथानें कान उभारलेले पाहून शरच्चंद्र ह्मणाला ' रिपोर्ट तर तुह्मीं केलाच असेल; पण सर्व हकीगत तुमच्या तोंडून ऐकण्याची इच्छा आहे. '

' हो, हो, मी ती आपल्याला मोठ्या आनंदानें सांगेन ' असें जगन्नाथ ह्मणाला.

' जी काय घडलेली हकीगत तुह्मीं पाहिली असेल ती जशीच्यातशी साद्यंत सांगा. '

जरा भिंवया खालीं करून जगन्नाथानें थोडावेळ आपल्या डोक्यावरून हात फिरवला व पाहिलेल्या हकीगतीपैकीं एक अक्षरहि गाळावयाचें नाहीं अशा मुद्रेनें तो ह्मणाला ' मी तुह्मांला मुळापासून सर्व हकीगत सांगतों. माझी वेळ रात्रीं दहापासून सकाळीं सहापर्यंत आहे. मी गेटीवर पहारा करीत असतांना सुमारें अकरा वाजतां रस्त्यावर मारामारी झाली. तिचा बंदोबस्त करून मी परत येतों तों एक वाजतां झिमझिम पाऊस पडण्यास सुरवात झाली. गेटीवर हरिबा नायकाशीं सुमारें दोन वाजेपर्यंत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत होतों. इतक्यांत माझ्या मनांत असा विचार आला कीं, गेटी समोरच्या रस्त्यावरून एकदां चक्कर घेऊन यावें. समोरचा रस्ता अगदीं घामट व शुष्क असा होता. सगंद रस्त्यांत मला कोणीहि माणूस भेटलें नाहीं. एक दोन गाड्या मात्र मला भेटल्या असतील. इतक्यांत त्या घरीं मला एकदम प्रकाश दिसला. त्या व त्याच्या शेजारच्या घरांत कोणीहि रहात नव्हतें हें मला माहित होतें. उजेड दिसतांच मी थबकलों. येथें कांहीं तरी भानगड असावी असा माझ्या मनांत वहीम आला; व मी दरवाज्याजवळ गेलों. '

' तूं थांबलास आणि मग बागेच्या दरवाज्याकडे गेलास ? '

हें ऐकतांच जगन्नाथ आश्चर्यचकित होऊन ह्मणाला ' हो, असें खरें.

पण हें तुह्मांला कसें समजलें ? मी दरवाज्याजवळ गेलों तेव्हां तेथें मला इतकें भयाण दिसलें कीं, तेथें एकट्यानें जाण्याची सोय नाहीं असें मला वाटलें ! मी भ्यालों नाहीं हो. कारण मला कशाचीच भीति वाटत नाहीं ! त्या जागीं दोषी ज्वरानें एकदोन माणसें नुकतींच मयत झालीं होतीं. त्यांची मला एकदम आठवण झाली. त्याबरोबर मी दरवाज्याकडे परत वळून रस्त्यांत जाणाऱ्यायेणाऱ्यांपैकीं कोणी सोबतीला भेटेल ह्मणून पाहूं लागलों. '

' रस्त्यांत कोणीहि नव्हतें ना ? '

' कोणी चिटपाखरूंहि नव्हतें. मग मी तसाच धीर करून पुनः दरवाज्याकडे आलों. आंत सर्वत्र सामसूम होतें. तरी मी तसाच ज्या ठिकाणीं प्रकाश दिसत होता तेथें गेलों. तेथें मला एक मेणबत्ती जळत असलेली दिसली. तिच्या उजेडानें मी— '

' होय. तुह्मीं काय पाहिलें तें मला ठाऊक आहे. तुह्मीं खोलींत बऱ्याच वेळां इकडे तिकडे खेपा केल्या. कांहीं वेळ त्या प्रेताकडे वांकून पाहिलें. व पुनः उठून स्वयंपाकघराचें दार उघडतें कां नाहीं हें तुह्मीं पाहिलें. त्यानंतर— '

हें ऐकतांच जगन्नाथाची अगदींच गाळण उडून तो ह्मणाला ' हें सर्व पहात आपण कोठें लपून बसलां होतां ? '

" तुह्मी कांहीं असें घाबरूं नका. मला खुनीचिनी ह्मणून पकडाल हो ! मी तशांतला नाहीं. पाहिजे तर आपल्या अंमलदारांना विचारा; त्यांना माझी माहिती आहे. बरें मग पुढें आपण काय केलें ? '

शरच्चंद्राची ही वृत्ती पाहून जगन्नाथ पूर्वींपेक्षाहि आश्चर्यचकित होऊन ह्मणाला ' त्यावर मी फाटकाजवळ परत गेलों व मोठ्यानें शीळ वाजवली. त्याबरोबर हरिबा व दुसरा एकजण असे दोघे तेथें आले. '

' त्यावेळेस रस्ता मोकळाच होता काय ? रस्त्यांतून कोणी जात येत नव्हतें ? '

' हो. त्या वेळेला रस्त्यांतून जाणारे जे असावयाचे ते जात येत होतें. '

'ह्मणजे काय ?'

( जरा अडखळून ) 'ह्मणजे रस्त्यांतून क्वचित् दारूबाज जात येत होते. परंतु, मी आलों तेव्हां त्या फाटकापाशीं उभा असलेला माणूस मात्र निशेनें अगदीं झिंगून गेला होता.'

'तो कसा मनुष्य होता ?'

'तो खूप झिंगलेला होता. हें जर लचांड मध्यें उपस्थित झालें नसतें तर आह्मी त्याला पहाऱ्यांतच अडकविलें असतें.'

'त्याचा चेहरा कसा होता, पोषाख कसा होता हें कांहीं तुमच्या नजरेस पडलें काय ?'

'होय. त्याचें सर्व शरीर झग्यानें झांकलेलें होतें. त्याची काठी चांगली उंच होती. त्याच्या चेहऱ्याचा रंग लाल असावा असें वाटतें.'

'ठीक आहे. मग पुढें तुह्मी त्याचें काय केलेंत ?'

'त्याच्याकडे पहायला आह्माला वेळच सांपडला नाहीं. आह्मी इकडे गुंतलों तेव्हां त्यानें बहुतेक घरचाच रस्ता सुधारला असावा.'

'त्याचा पोषाख कसला होता ? त्याच्या हातांत चाबूक होता काय ?'

'त्याचा पोषाख तांबडा होता. त्याच्या हातांत चाबूक नव्हता.'

'चाबूक तो विसरला असावा. बरें, त्यानंतर तेथें एखादी गाडी आलेली तुह्मीं पाहिली काय ? किंवा गाडीचा आवाज तरी ऐकला काय ?'

'नाहीं.'

याप्रमाणें संवाद झाल्यानंतर जगन्नाथाच्या हातावर रुपया ठेवून माझा मित्र तेथून जातांना जगन्नाथास ह्मणाला. 'जगन्नाथ, तुझें डोकें अगदींच मठ्ठ दिसतें. तुझें शरीर त्याशिवाय अगदींच विद्रूप दिसलें असतें, ह्मणूनच ब्रह्मदेवानें तुला तें दिल्यासारखें दिसतें. बाकी या जन्मांत तर त्याचा उपयोग होण्याची आशा दिसत नाहीं. ज्या मनुष्यास तूं दारूबाज समजत होतास व जो तुझ्या अगदीं एका हातावर उभा होता त्याच्या हातांतच हें सर्व प्रकरण खुलें करण्याची किल्ली होती ! बरें असो. आतां बोलून काय उपयोग ? काल जर त्या मनुष्यास तूं धरून ठेवलें असतेंस, तर आजला तुला कदाचित् बढतीहि मिळाली असती.'

असें ह्मणून आह्मी दोघेहिजण घरांतून निघालों. गाडींत बसल्यानंतर शरच्चंद्र मला ह्मणाला ‘ काय मूर्ख बेटा ! मूर्खानें हातांत आयती आलेली शिकार घालवली ! ’

मी ह्मणालों ‘ मला या संबंधानें अजून सर्वच अंधार आहे. या प्रकरणांतील खुनी माणसाचें आपण जें पूर्वी वर्णन दिलें त्याच्याशीं या शिपायानें सांगितलेल्या मनुष्याचें वर्णन तंतोतंत जुळतें ही गोष्ट खरी. परंतु एकदां त्या घरांतून निघून गेल्यानंतर तो पुनः तेथें थबकेल कशाला ? ’

‘ ती अंगठी तेथें तो विसरला होता; ती नेण्याकरतांच तो परत फिरला असला पाहिजे. मी तुह्मांला खास सांगतों कीं, अखेर ही अंगठीच त्या मनुष्याचा खास पत्ता लावील. असो. मला यासंबंधांत तुमचे उपकार मानले पाहिजेत. वरून ताबडतोब निघण्याचा तुह्मी जर मला आग्रह केला नसता तर इतक्या तांतडीनें मी या प्रकरणांत कधींहि पडलों नसतों. जरा डोकें चालवलें पाहिजे, कीं हवी ती गूढ गोष्ट आपलें पांघरूण काढून हात जोडून पुढें उभी राहते ! आतांच पत्रानात या प्रकरणाचा आतां छडा निघालाच असें समजा. त्यांतील एक लवलेशहि आतां उघडकीस आल्याशिवाय राहणार नाहीं. ’

यानंतर बिऱ्हाडीं गाडी पोहोंचेतोंपर्यंत आह्मी दोघेहि एकमेकांशीं बोललों नाहीं. आरंभीं आरंभीं तो ज्याचें वर्णन देत होता, तें अनुमानशास्त्र ह्मणजे केवळ गप्पा आहेत असें मला वाटत होतें; परंतु त्याच्या हालचालींवरून तेंच आतां माझ्या पावलांपावलीं प्रत्ययास येऊं लागलें.

---

# भाग ५ वा.

## जाहिरातीचा परिणाम होतो.

सकाळीं बरीच दगदग झाल्यामुळें मी अगदीं थकून गेलों व भोजनोत्तर विश्रांति करतां बिछान्यावर पडलों. एकेठिकाणीं गाणें होतें तिकडे माझा मित्र गेला होता. घटकाभर डोळा लागून दगदगीचा

क्षीण निघावा ह्मणून मी हरतऱ्हा केल्या, परंतु झोंप कांहीं येईना. मी जो प्रकार पाहून आलों होतों तो कांहीं केल्या डोळ्याआड होईना. पाहिलेल्या प्रकारासंबंधानें अनेक कल्पनातरंगांची माझ्या मनांत गर्दी उसळून गेली. डोळे मिटण्याचा मी जों जों अधिक प्रयत्न करूं लागलों तों तों त्या प्रेताची भेसूर मूर्ति माझ्यापुढें अधिकच स्पष्ट-पणें उभी राहूं लागली. खून झालेला मनुष्य अत्यंत दुर्वृत्त असावा, पापपुण्याची त्यास यत्किंचितूही क्षिति नसावी असें त्याचा चेहरा पाहून माझें मत झालें. त्याच्यासंबंधानें माझ्या मनास इतका वीट येऊन गेला कीं, ज्यानें त्याची इहलोकांतून वस्ती उठवली त्याचे जगावर फारच उपकार झाले असें मला वाटूं लागलें. पण दुर्वृत्त माणसाचा काय आणि सुवृत्त माणसाचा काय, कायद्याच्या दृष्टीनें दोन्हीहि गुन्हे सारखेच भयंकर आहेत. दोघांनाहि शासन देणें हें कायदा आपलें कर्तव्य समजतो. अशा रीतीनें त्या प्रकरणाविषयीं माझ्या मनांत अनेकप्रकारचे विचार येऊं लागले.

या प्रकाराविषयीं मी जसजसा अधिक विचार करूं लागलों तसतसें माझ्या मित्राच्या अनुमानाबद्दलही मला अधिकच आश्चर्य वाटूं लागलें. त्या मनुष्यास विषप्रयोग झाला असावा हें माझ्या मित्रानें कसें ओळ-खलें ? त्यानें असा निर्णय देण्यापूर्वीं प्रेताची चांगली बारकाईनें तपा-सणी करून पाहिली होती. विशेषतः त्याचे ओठ त्यानें नीट निरखून पाहिले होते. विषप्रयोगाची त्याची कल्पना खोटी मानावी तर त्या मनुष्याचा खून तरी कशानें झाला ? त्याच्या अंगावर कोठें जखम दिसत नव्हती, किंवा त्याचा गळा दाबल्याचेंहि कांहीं चिन्ह दिसत नव्हतें. उलटपक्षीं तेथें जमिनीवर जें रक्त पडलें होतें तें कोणाचें असावें ? खून होण्यापूर्वीं तेथें झटापट झाली असल्याचीहि कांहीं खूण दिसत नव्हती. खून झालेल्या माणसानें खून करणाऱ्या माणसावर शस्त्र चालविलें असावें असेंहि मानण्यास कांहीं कारण नव्हतें. असे नाना-प्रकारचे विचार जोंपर्यंत माझ्या मनावर झडप घालीत होते तोंपर्यंत आपल्याला झोंप येण्याची आशा करणें व्यर्थ आहे असें खास वाटून मी उठून बसलों. माझ्या मित्रानें या प्रकरणासंबंधानें जीं निदानें ठर-

विलीं होतीं तीं खरींच असलीं पाहिजेत अशी वरचेवर कबुली देण्यास जरी माझें मन तयार होतें तरी हीं निदानें त्यानें ठरविलीं कशी याबद्दल मात्र माझ्या मनाचा कांहींच उलगडा होईना !

माझ्या मित्राला गाण्याहून परत येण्यास वाजवीपेक्षां अधिक वेळ लागला तेव्हां गाणें संपून स्वारी दुसरीकडे कोठें बसली असावी असा माझा तर्क होतो, तोंच आमचे मित्र दिवाणखान्यांत येऊन थडकलेंच !

दिवाणखान्यांत पाऊल टाकतांच शरच्चंद्र ह्मणाला ' आज गाण्याची काय बहार झाली ह्मणून सांगूं ! मनुष्याच्या अंगीं बोलण्याची शक्ती येण्यापूर्वींच गायनकला व तिचें गुणग्रहण करण्याची अभिरुचि मनुष्यमात्रांत उत्पन्न झाली असावी असें जें एका तत्त्वज्ञानें ह्मटलें आहे तें खरोखरच यथार्थ आहे. गायनानें मनुष्याच्या मनावर एवढा विलक्षण परिणाम होतो त्याचें कारण हेंच असलें पाहिजे. हें सर्व जग बाल्यावस्थेंत होतें; त्या वेळची सुद्धां अंधुक स्मृति आपल्या अंतर्यामांत वास करीत असते याबद्दलहि मला संशय वाटत नाहीं. '

' आपला हा विचार फारच विस्तृत दिसतो. '

' निसर्गसृष्टीप्रमाणें आपले विचारहि विस्तृत असले पाहिजेत. दोघांचीहि व्याप्ति समान असल्याशिवाय सृष्टीचें गूढ उकलण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं कधींहि राहणार नाहीं. बरें, पण आज आपली चर्या उतरलेली कां दिसते ? या प्रकरणाचा आपल्या मनावर परिणाम झालेला दिसतो. '

' खरोखरच माझी तशी स्थिती झालेली आहे. लढाईत माझे शेंकडों संवगडी क्षणार्धांत इहलोक सोडून जातांना मीं अनेक प्रसंगीं पाहिलेले आहेत. परंतु, आतांप्रमाणें त्यांचा माझ्यावर कधींच परिणाम झालेला नव्हता. '

' उघडच आहे. एरव्हींच्या मरणांत व या मरणांत महदंतर आहे. या मरणांत जें एक प्रकारचें गूढ आहे त्यामुळेंच तुमच्या कल्पनाशक्तीस संचलन मिळालें आहे आणि कल्पनेची भरारी एकदां सुरू झाली ह्मणजेच मन अस्थिर होऊन जातें. बरें तुह्मीं सायंकाळचें वर्तमानपत्र पाहिलेंत कां ? '

‘ नाहीं. ’

‘ वा: ! त्यांत तर कालच्या प्रकरणाचें काय सुंदर वर्णन दिलेलें आहे. प्रेत उचलतांना एक अंगठी जमिनीवर पडली ही मात्र बातमी त्या हकीकतींत नाहीं. आणि नाही, हेंहि एकपरीं बरेंच झालें. ’

‘ कां ? ’

‘ ही जाहिरात पहा. तिकडून आपण परत आलों तेव्हांच ही मीं सर्व पत्रांत दिली आहे. ’ ही अंगठी ज्याची असेल त्यानें ‘ वसंता’ कडे शोध करावा असें मीं त्यांत लिहिलें आहे. तुम्हांला न विचारतां तुमचें नांव घातलें याबद्दल मात्र मला दोष देऊं नका. मला तसें करावेंच लागलें. कारण मीं आपलें स्वतःचेंच नांव घातलें असतें तर त्या लोकांनीं कदाचित् मध्यंतरी कांहीं विघ्न उपस्थित केलें असतें. ’ असें ह्मणून त्यानें जाहिरात ज्या पत्रांत होती तें पत्र माझ्याकडे टाकलें.

ती वाचून पाहून मी म्हणालों ‘ हें सर्व ठीक झालें. परंतु माझ्याकडे जर कोणी येईल तर मी त्यास दाखवूं काय ? माझ्याजवळ अंगठी तर नाहीं ! ’

‘ त्याची आपल्याला काळजी नको. ही घ्या अंगठी. बघा, त्या अंगठी सारखी हुबेहुब आहे कीं नाहीं ती ! ’

‘ आणि ही जाहिरात पाहून अंगठी कोणी मागायला येईल असें तुम्हांला वाटतें का ? ’

‘ कां बरें ? तांबडा कोट घातला होता वगैरे ज्याचें आपण वर्णन ऐकलें आहे तोच मनुष्य ही अंगठी मागायला येईल किंवा दुसऱ्या कोणास पाठवील. ’

‘ असें करणें त्याला धोक्याचें वाटणार नाहीं का ? ’

‘ नाहीं, मुळींच नाहीं. माझा एकंदर कयास जर खरा असेल —आणि तो खरा आहे याबद्दल मला शंका वाटत नाहीं—तर अंगठी हातीं येण्याविषयीं हा मनुष्य हरतऱ्हेचे प्रयत्न करील; कारण या अंगठीवरच त्याचा प्राण अवलंबून आहे. दिनकराच्या प्रेताकडे वांकून पहातांना त्याच्या हातून ही विसरतेपणीं पडली असावी असें वाटतें. घर सोडून कांहीं अंतरावर गेल्यावर त्याच्या ही गोष्ट लक्षांत येऊन तो परत

फिरला; परंतु, तेथें माणसाची चाहूल पाहतांच व घरांत चुकून जळती मेणबत्ती राहिलेली दृष्टीस पडतांच तो फाटकापाशींच थबकला. शिपायांनीं आपल्याला पकडूं नये ह्मणून त्यानें दारूनें झिंगल्याचा बहाणा केला. आणि शिपायांना चकविण्याचा त्याचा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला. शिपाई घराकडे शोधांत गुंतलेले पाहतांच त्यानें तेथून पळ काढला. जगन्नाथानें सांगितलेल्या हकीगतीची संगती लावावयाची ती ह्याच रीतीनें लावली पाहिजे. अंगठी कदाचित् रस्त्यांत पडली असेल असाहि त्यास संशय येणें अस्वाभाविक नाहीं आणि ह्मणूनच अंगठीची जाहिरात वर्तमानपत्रांत पाहतांच तो जाहिरात देणाराची तावडतोब गाठ घेतल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. आपल्याला अडकवण्यासाठीं हा फांस टाकला आहे असा त्याचे मनांत यत्किंचित्हि संशय येणार नाहीं. अंगठी पुनः हातीं येण्याची संधि मिळाली हें पाहून उलट त्यास आनंदच होईल. इतकेंच नव्हे तर तो माणूस आतांपासून एक तासाच्या आंतच तुमची गांठ घेण्याकरितां येईल.'

'आणि मग मी काय करूं ?'

'पुढें काय करायचें तें मी पाहीन. त्याची आपल्याला बिलकूल काळजी नको. आपल्याजवळ एखादें हत्यार आहे काय ?'

'होय. माझ्याजवळ एक जुनी बंदुक आहे.'

'ठीक आहे तर. तुह्मी ती भरून तयार ठेवा. नजाणो उलट्या काळजाच्या मनुष्याशीं प्रसंग आहे; आपण आपलें तयारींत असा.'

यावर मी आपल्या खोलींत जाऊन बंदुक भरून घेऊन आलों.

बंदूक आणलेली पाहून आमचे मित्र म्हणाले 'या प्रकरणाला आतां बराच रंग येऊं लागला. आतांच मला कुसुमपुराहून एक तार आलेली आहे. शेवटीं माझाच कयास खरा ठरणार.'

यावर मीं उत्सुकतेनें विचारलें 'तो कसा ?'

'तो कसा तें थोडक्या वेळांत समजेल. तो मनुष्य आला म्हणजे त्याच्याशीं तुम्ही आपलें एरव्हींप्रमाणेंच बोला. त्याला दटावणी वगैरे कांहीं दाखवूं नका. पुढली सर्व तजवीज मी करतों.'

'आतां आठ वाजले आहेत.'

'असें का ? मग तर तो आतां थोडक्याच वेळांत येईल.'

इतक्यांत दरवाजावर कोणी थाप मारलेली ऐकूं आली. त्याबरोबर शरच्चंद्रानें आपली खुर्ची दारापाशीं घेतली. इकडे नोकरानें दरवाजा उघडला. त्याबरोबर कोणी आंत येऊन 'वसंत येथेंच राहतात काय ?' म्हणून विचारिलें. विचारणाराचा आवाज घोगरा परंतु, स्पष्ट होता. नोकरानें याला काय उत्तर दिलें हें कांहीं आम्हांला ऐकायला आलें नाहीं. इतक्यांत कोणी पायऱ्या चढत असल्याचा आवाज आमच्या कानीं आला. जिना चढणारा माणूस अगदीं निःशक्त असावा असें पावलांच्या आवाजावरून वाटलें व त्यामुळें माझ्या मित्राला अत्यंत आश्चर्यहि वाटलें. येणाऱ्या इसमानें दारावर बोटें वाजविल्यानंतर मीं दार उघडलें; तों येणारा नसून येणारी आहे असें आमच्या नजरेस पडतांच आम्ही अगदीं थक्क होऊन गेलों. मोठा थोरला धिप्पाड माणूस आपल्यापुढें येऊन उभा राहील अशी आमची अटकळ होती; परंतु ती निष्फळ होऊन शेवटीं सर्वांगास सुरकुत्या पडलेली, कंबर वांकलेली अशी एक म्हातारी जख्खड बाई आमच्यापुढें येऊन उभी राहिली. आमच्या तेथें झगझगीत उजेड पाहतांच ती बाई चपापली. तिचे पिचपिचे डोळे दिव्याच्या प्रकाशास अधिकच बिचकून वरचेवर मिटूं लागले. तिची ती चमत्कारिक मुद्रा पाहून मी आपल्या मित्राकडे पाहूं लागलों. त्याच्या मुद्रेंत मात्र यत्किंचितहि बदल झाला नव्हता. अर्थात माझीही मुद्रा एका क्षणार्धांत गंभीर झाली.

म्हातारीनें वर्तमानपत्र काढून ती जाहिरात आम्हांस बोटानें दाखवली व ती म्हणाली 'या अंगठीकरितांच मी येथें आलें. माझी मुलगी शालिनी हिची ही अंगठीं आहे तिचें लग्न होऊन नुकतेंच एक वर्ष झालें. तिचा नवरा येथेंच गोदींत नोकर आहे. त्याला जर ही गोष्ट कळेल तर फार वाईट परिणाम होईल; कारण तो अतिशय तिरसट आहे. काल रात्रीं ती घोड्याची सर्कस पहावयास --'

मी म्हणालों 'ही तिची अंगठी आहे काय ?'

अंगठीकडे पाहून म्हातारी म्हणाली 'ईश्वरानें आज मोठी खैर केली.

ही अंगठी पाहून माझ्या मुलीला किती आनंद होईल ह्मणून सांगूं ! हीच ती अंगठी. '

' तुमचा पत्ता काय ? ' असें मी त्या ह्मातारीस विचारलें.

' मी काजीच्या दरग्याजवळ घर नंबर १३– '

' कांहो, दरग्यांतून सर्कसच्या तंबूला जातांना मध्यंतरीं लालबाग लागते काय ? ' असें माझ्या मित्रानें मध्येंच विचारलें.

हें ऐकतांच ती बाई जरा चपापल्यासारखी होऊन ह्मणाली ' या गृहस्थांनीं माझा पत्ता विचारला होता ! माझी ! मुलगी आनंदपुऱ्यांत नं. ३ चे घरीं राहते. '

' आणि तुमचें नांव -- '

' माझें नांव सरोजा. '

' मग, सरोजाबाई, ही तुमची अंगठी. ही तुमच्याच मुलीची आहे हें आतां स्पष्ट झालें. तेव्हां ती ज्याची त्याला मिळणें हेंच इष्ट आहे. ' असें माझ्या मित्राकडून खूण मिळतांच मी त्या बाईस ह्मणालों.

यावर ' माझ्यावर तुमचे फार उपकार झाले ' असें ह्मणून त्या ह्मातारीनें ती अंगठी कनवटीस लावली व ताबडतोब आपल्या घराचा रस्ता धरला. ती जिना उतरून खालीं जातांच माझा मित्र खोलींत गेला व एका निमिषार्धांत पोषाख चढवून बाहेर आला.

' मी तिच्या आतां मागोमाग जातों. ती या प्रकरणांतली साथीदार असली पाहिजे. तिचा ठावठिकाण समजला ह्मणजे या प्रकरणाचा सुगावा लागलाच ह्मणून समजा. ' असें ह्मणून माझा मित्र ताबडतोब तिच्या मागोमाग गेला. मीं खिडकींतून डोकावून पाहिलें; तों ती ह्मातारी खालीं वांकत वांकत रस्त्यानें चालली आहे व रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें तिच्या साधारण बरोबरच आमचे मित्र चालले होते असें मला दिसलें. माझी नेहमींची निजावयास जाण्याची वेळ झाली होती. परंतु या प्रकरणाचा उलगडा होईपर्यंत मला नित्रस्तपणें झोंप येणें अशक्यच होतें. माझा मित्र बाहेर गेला तेव्हां नऊ वाजून गेलें होतें. त्याला परत यावयास किती वेळ लागतो. याचा भरंवसा नव्हता. ह्मणून मी एक पुस्तक काढून तें वाचीत बसलों. पुस्तक नुसतें निमित्ताला माझ्या डोळ्यापुढें

होतें. जरा कोठें पावलाची चाहूल लागली कीं, माझा मित्र परत आला असें वाटून मीं खिडकीकडे पहावें व पुनः आपल्या जाग्यावर येऊन बसावें, असें मध्यान्हीच्या सुमारापर्यंत माझे एकसारखे हेलपाटे चालले होते. कांहीं वेळानें बाराचा ठोका पडणार, इतक्यांत दरवाज्याची खिटी वाजली. स्वारीच्या चेहऱ्यावरून शिकार फसली असें मीं तेव्हांच ताडलें. शरच्चंद्र रागानें व निराशेनें धुमसत आहे असें त्याच्या मुद्रेवरून मला दिसलें. आतां हा रागानें त्या बाईस शिव्याशाप द्यावयास लागणार असा मी मनाशीं अंदाज करतो; तोंच तो मोठ्यानें हंसून ह्मणाला ‘ मी हें त्या अधिकाऱ्यांना मात्र कधीं कळविणार नाहीं. त्यांना यासंबंधांत जितकी माहिती होती तितकी कांहीं त्यांनीं मला सांगितली नाहीं हें खास. ठीक आहे; त्यांना ह्मणावें शेवटीं माझीच सरशी होणार. ’

त्यावर मी ह्मणालों ‘ भानगड तरी काय आहे. मला सांगाल कां नाहीं ? ’

‘ हो तर तुमच्यापासून मी कांहींहि चोरून ठेवणार नाहीं. ‘ मान सांगावा जनांत व अपमान सांगावा मनांत ’ अशी प्रचारांत ह्मण आहे; परंतु त्या ह्मणीचा दास मी कधींहि होणार नाहीं. ती बाई आपल्याकडे आली होती, ती घरांतून बाहेर पडून थोड्या अंतरावर जातांच लंगडूं लागली. तिच्या पायाला कांहीं तरी दुःख झालें असावें असें पहाणारास हमखास वाटे. थोडा अंतर चालून गेल्यावर तिनें एक गाडी बोलावली. गाडीवाल्याला ही आपला पत्ता सांगेल तो आपणास समजावा, ह्मणून मी जरा जवळ गेलों. परंतु यासंबंधांत इतकी सावधगिरी बाळगण्याचें कांहीं कारण नव्हतें; कारण गाडीवाल्यास तिनें आपला पत्ता इतका मोठ्यानें सांगितला कीं, मी प्रथम होतों त्यापेक्षां दुप्पट अंतरावर असतों तरी तो मला स्पष्ट ऐकूं आला असता. काजीच्या दर्ग्याजवळ १३ नंबरच्या घरीं आपणांस उतरविण्यास गाडीवाल्यास सांगून ती गाडींत बसली. गाडी चालूं होत न होते तोंच आह्मीहि गाडीच्या मागल्या फळीवर आसन ठोकलें. बाईनें सांगितलेल्या रस्त्यावर गाडी जाऊन पाहोंचे तोंपर्यंत गाडीवानानें घोडे एकसारखें दामटले. घर साधारण दिसूं लागलें, तोंच आह्मी हळूंच खालीं उडी ठोकली. चार

पावलें गाडी पुढें गेल्यानंतर गाडीवानानें मोठ्या तत्परतेनं दरवाजा उघडला. आंतून कोणी येईल ह्मणून तो मोठ्या आतुरतेनें दाराशीं उभा राहिला. परंतु आंतून कोणीच बाहेर आलें नाहीं ! तो आश्चर्ययुक्त मुद्रेनें गाडींत चापचून पाहूं लागला ! आपला उतारू कदाचित् गादी खालींहि जाऊन बसला असेल असें वाटूनच कीं काय त्यानें गाद्याहि उलथ्या पालथ्या करून पाहिल्या. उतारूचा कोठेंहि ठाव ठिकाण लागत नाहीं हें पाहून त्यानें शिव्याशापाचा भडिमार सुरूं केला. नंबर १३ च्या घरीं आह्मी शोध करून पाहिला, तों तेथें एक इभ्रतदार व्यापारी रहात होता. आह्मी सांगितलेला मजकूर ऐकून तो आश्चर्यचकित होऊन ह्मणाला ' आपण ह्मणतां त्या बाईचें नांव मीं कधीं जन्मांतहि ऐकलें नाहीं. भलतेंच नांव देऊन कोणी तरी आपल्याला चकविलें असावें असें वाटतें. '

हें ऐकून मी ह्मणालों ' ह्मणजे ? गाडी वेगानें चालत असतां तुमचीं दोघांचीहि नजर चुकवून ती बाई फरारी झाली कीं काय ? '

' अरे ! ती बाई कसची घेऊन बसलास ? खरोखरच तिला बाई समजण्यांत स्त्रियापेक्षांहि भोळसटपणा आपण दाखविला. तो कोणी तरी चलाख तरुण माणूसच असला पाहिजे. त्यानें बतावणी कशी मोठ्या शिताफीनें केली. मला वाटतें त्या मनुष्याचे पुष्कळ साथीदार आहेत. माझ्या हातावर तुरी देऊन तो एकदम नाहींसा झाला; त्या अर्थीं त्याचे साथीदार त्याच्याच आसपास नेहमीं वागत असावेत. बरें या प्रकरणाचा आपण आतां उद्यां विचार करूं. आपले डोळे जड झालेले दिसतात; तेव्हां आपण आतां बिछाना सुधाराल तर बरें होईल. '

' खरोखरच माझे डोळे झोंपेनें अगदीं घेरले होते. तेव्हां आमच्या मित्राचा हा उपदेश मी ताबडतोब अंमलांत आणिला. ते मात्र या प्रकरणाचा विचार करीत बसले होते.

# भाग ६ वा.

## गिरधर लालाची कामगिरी.

दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत याशिवाय दुसरा विषयच नव्हता. या प्रकरणाच्या निरनिराळ्या हकीगती त्या पत्रांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. कांहींनीं यावर अग्रलेखहि लिहिले होते. मीं पूर्वीं न ऐकलेली अशीहि त्यांत कांहीं हकीगत होती. त्यांतील कांहींचीं मीं आपल्या स्मरणवहींत टिपणेंहि करून ठेवलीं आहेत.

"गुन्ह्यांच्या इतिहासांत इतका विलक्षण प्रकार पूर्वीं कधींहि घडून आला नसेल. वित्तापहारासारखा या गुन्ह्याच्या संबंधांत दुष्ट हेतूहि दिसत नाहीं. भिंतीवर रक्तानें लिहिलेलीं अक्षरें तर फारच अपूर्व आहेत. खून झालेल्या गृहस्थाचें नांवहि परिपाठांतलें आहे. हा गुन्हा कोणीतरी विदेशी माणसानें केला असावा, दूर दूर देशाच्या अराजक चळवळींतले लोक येथें निर्धास्तपणें येऊन राहिले आहेत; त्याचाच हा परिणाम असावा असें दिसतें. अर्थात् या देशांत येणाऱ्या विदेशी माणसावर विशेष रीतीनें नजर राहण्याची तजवीज झाल्याशिवाय असल्या गुन्ह्यांचा बंदोबस्त होणार नाहीं." असें 'दैनिक संदेश' पत्रांत लिहिलें होतें.

"या देशांत असल्याप्रकारचीं बेकायदेशीर कृत्यें अलिकडे वरचेवर होऊं लागलीं आहेत. या प्रकरणांतील खून झालेला मनुष्य कुसुमपुरचा आहे. कुसुमपुरास परत जाण्याकरतां तो पांच चार दिवसांपूर्वींच निघाला होता. तो व त्याचा कारकून श्रीनिवास या दोघांसहि येथें अनेक गृहस्थांनीं पाहिलेलें आहे. इतक्यांत त्याचा खून होऊन त्याचें प्रेत एका मोकळ्याघरांत सांपडलें. तो त्या घरांत कसा गेला, तेथें त्याचा खून होण्यास काय कारण झालें वगैरे संबंधांत अद्याप यत्किंचितहि सुगावा लागला नाहीं. त्याचा कारकून श्रीनिवास याचा पत्ता काय हेंहि अद्याप समजलेलें नाहीं. लक्ष्मणसिंग व गिरधर यांच्या सारख्या कसलेल्या अधिकाऱ्यांकडे या प्रकरणाचें काम देण्यांत आलें आहे; तेव्हां याचा लवकरच तपास लागेल अशी आम्हांस उमेद आहे" असा 'कालमान' पत्रांत मजकूर होता.

“ हा गुन्हा राजकीय स्वरूपाचा आहे याबद्दल बिलकुल संदेह नाहीं. परदेशांतल्या असंतुष्ट लोकांची येथें भरती होऊं लागल्यामुळें अलिकडे असले प्रकार इकडे वरचेवर होऊं लागले आहेत. या लोकांचे जागजागीं गुप्त कट असून त्यांनीं त्यासंबंधाचे कांहीं सक्त नियमहि ठरविले आहेत. या नियमांचें अतिक्रमण करणारास देहांत शासन देण्यांत येतें हीहि गोष्ट आतां सर्व विश्रुत आहे. श्रीनिवासाचा पत्ता लागल्याशिवाय या प्रकरणाचा तपास कधींहि लागणार नाहीं. त्याचा ज्या घरीं येथें मुक्काम होता त्या घराचा पत्ता समजला आहे ही मोठ्या सुदैवाचीच गोष्ट समजली पाहिजे. या पत्याचें श्रेय गिरधरलालासच दिलें पाहिजे. ” असें ‘ दिनचर्या ’ पत्रांत या प्रकरणासंबंधानें उद्गार काढले होते.

या सर्व पत्रांतील मजकूर आम्हीं दोघेहि दुसरे दिवशीं सकाळीं एकत्र वाचीत होतों. पत्रांतील मजकूर ऐकून त्याला एकप्रकारची मौज वाटत होती.

मजकूर वाचणें झाल्यानंतर तो मला ह्मणाला ‘ कां ? पहिल्यांदाच मीं सांगितलें होतेंना कीं या प्रकरणांत कोणी कितीहि श्रम केले तरी अखेर लक्ष्मणसिंग व गिरधरलाल यांचीच प्रतिष्ठा वाढणार. ’

‘ अजून काय झालें आहे ? प्रकरणाची अखेर तर अद्याप पोहोंचावयाची आहे. ’

‘ अखेर पोहोंचो अथवा न पोहोंचो त्यांचा लौकिक व्हावयाचा हें ठरलेलेंच. गुन्हेगार सांपडलाच तर तो त्यांच्या शिताफीनें सांपडला असे लोक म्हणणार. बरें नच सांपडला तर त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले; पण अखेर गुन्हेगाराचा पत्ता लागला नाहीं असें लोक ह्मणणार. मिळून त्यांची महती कायमच. ’

असें आमचें इकडे बोलणें चाललें आहे तोंच पांच सहा असामी आमच्या घरांत शिरले. त्यांचे पोषाख अगदीं गलिच्छ असून त्यांची एकंदर मुद्राहि घामट दिसत होती. ते जिना चढताहेत हें पाहून माझें डोकें अगदीं चढल्यासारखें झालें व मी ह्मणालों ‘ ही ब्याद कोठून आली ? ’

यावर आमचे मित्र ह्मणाले ' वा ! यांच्याबद्दल असा तिरस्कार दाखवूं नका हो. यांच्यावर तर आमची सर्व मदार. सरकारी अधिकाऱ्यांना माहिती देण्यास लोक कचरतात; परंतु आमच्या या चमूशीं कोणीहि झालें तरी मन मोकळें करून बोलतें. कोठेंहि किंवा कोणाच्याहि घरीं जाण्यास यांना कोणत्याहि प्रकारची आडकांठी होत नाहीं. '

आपल्या चमूसंधानें अशा प्रकारें माहिती देऊन शरच्चंद्र चमूच्या नायकाकडे वळून ह्मणाले ' विनू, कां कांहीं तपास लागला कां ? तुझ्या चेहऱ्यावर कांहीं ठीक चिन्ह दिसत नाहीं. बरें कांहीं हरकत नाहीं. काम असेंच चालूं ठेवा. आज नाहीं उद्यां तपास लागेल. पण हें ध्यानांत ठेव कीं, पुनः कामाची वर्दी द्यावयाला तूं एकटा येत जा. हा सर्व लवाजमा घेऊन येत जाऊं नकोस. '

असें ह्मणून त्यानें त्या सर्वांस वेतन दिलें व ते सर्वजण तात्काळ निघून गेले.

ते निघून गेल्यानंतर आमचे मित्र मला पुनः ह्मणाले ' यांच्या चेहऱ्यावर तुह्मी जाऊं नका. यांच्या कामाची शिताफी तुह्मी अजून पाहिली नाहीं. यांची चोकसबुद्धि सुईच्या अग्राप्रमाणें तीक्ष्ण आहे. फक्त त्यांना दिशा दाखविणारें कोणी तरी पाहिजे. '

यावर मी आश्चर्यानें ह्मणालों ' या शेंदाड शिपायांच्या सामर्थ्यावर आपण हा किल्ला सर करणार वाटतें ? '

' होय. याप्रकरणासंबंधांत एक अशीच बाब आहे कीं, या लोकांच्या मदतीशिवाय तिचा छडा निघणें दुरापास्तच आहे. पण कां हो, गिरधरलालांची स्वारी मोठ्या आनंदानें आमच्याकडेच येत आहे असें दिसतें. तें पाहिलें कां ते शिरलेंच आमच्या घरांत. '

इतक्या झपाझपा पावलें टाकीत जिन्याच्या तीन तीन पायऱ्या ओलांडीत गिरधरलालांची स्वारी आमच्यापुढें येऊन थडकली. माडीवर येऊन पोहोंचतांच ते शरच्चंद्रास आनंदानें ह्मणाले ' आतां या प्रकरणांत यत्किंचितहि गुतागुत राहिली नाहीं. सर्व गोष्टींचा मीं पूर्ण छडा लावला. '

माझा मित्र ह्मणाला ' ह्मणजे ? काय ह्मणतां काय ? '

'अहो ह्मणायचं काय ? हें प्रकरण आह्मी कार्बीज केलें ह्मणून समजा. मुख्य गुन्हेगाराला कोठडींतहि नेऊन पोहोंचविलें !'

'आणि त्याचें नांव ?'

गिरधर डोकें खाजवून मोठ्या आढ्यतेनें म्हणाला 'त्याचें नांव रामचरण.'

हें ऐकून उल्लसित मुद्रा करून शरच्चंद्र म्हणाले 'खालीं तर बसाल. आपण शिकार तर खूप मारलीत. मग आतां म्हणतां या प्रकरणासंबंधांत कांहीं बाकी राहिली नाहीं.'

'होय; मला तर असें वाटतें. असल्या भानगडीच्या प्रकरणाच्या कामीं किती डोकें खर्चावें लागतें हें तुम्ही जाणतांच आहां.'

'तुम्ही मला उगींच मोठेंपणा देत आहां. बरें तें असो. तुम्ही माहिती कशी काढलीत हें तर सांगाल.'

'मी माहिती कशी काढली हें मग सांगेन; पण आमचे लक्ष्मणसिंगाला शहाणपणाची केवढी घमेंड, मुळानें प्रकरणाचा तलास लावण्यास अगदीं उलट्या दिशेनें सुरुवात केली. अहोरात्र श्रीनिवासाचा पत्ता लावण्यांत गढून गेला आहे. कदाचित् पत्ताहि त्याला लागला असेल; परंतु त्याचा या प्रकरणाशीं संबंध काय हें मला तर कांहीं समजत नाहीं.'

असें म्हणून गिरधरलाल मोठ्या आनंदानें खदखदां हंसूं लागला. त्याचें हंसणें झाल्यानंतर माझा मित्र त्यास म्हणाला 'आपल्याला धागा कसा समजला हें तर सांगाल ?'

'तें मी तुम्हांला आतां सांगतों. पण हें पहा, वसंत, या गोष्टी येथल्या येथेंच ठेवावयाच्या हो. बाहेर कोठें बोलावयाच्या नाहींत. आह्मांला या प्रकरणांत प्रथम अडचण आली ती या कुसुमपुरकराचा ठावठिकाण काढावयाचा ही होय. या संबंधांत वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊन, जाहिरात वाचून कोणीतरी आपल्याकडे शोध विचारायला येईल ह्मणून एखादा वाट पहात बसला असता. परंतु, आमचा हा असा दीर्घसूत्री कारखाना नाहीं. कायहो, पण त्या प्रेताजवळ टोपी पडलेली तुह्मीं पाहिली ना ?'

' होय. टोपीच नव्हे, पण ती कोणत्या कारखान्यांत केली होती हेंहि माझ्या लक्षांत आहे. जनार्दन आणि कंपनी, १२९ कुंभारगल्ली. '

हे माझ्या मित्राच्या तोंडचे शब्द ऐकून गिरधरलालाची अगदीं गाळ-णच उडून गेली.

तो ह्मणाला ' तुह्मी इतक्या बारकाईनें या गोष्टी पाहिल्या असतील अशी माझी केव्हांहि कल्पना झाली नाहीं. बरें. त्या टोपीवर कारखान्याचें नांवाहि तुह्मीं पाहिलें. पण तेथें जाऊन तुह्मीं चौकशी केली कां ? '

' नाहीं. '

' हें पाहिलें, येथेंच चुकतें. किती क्षुल्लक कां गोष्ट असेना; पण तिचा अवश्य फायदा घेतला पाहिजे. '

यावर माझा मित्र ह्मणाला ' थोरांचें सगळेंच थोर. त्यांची दृष्टि मोठी असल्यामुळें त्यांना क्षुल्लक गोष्टीहि मोठ्या दिसतात. '

' असो. मी मात्र त्या कारखान्यांत जाऊन शोध केला व विवक्षित आकाराची व वर्णनाची टोपी तूं कोणास विकली होती काय असा मीं कारखानदारास प्रश्न विचारला. त्यावरोबर त्यानें आपली कीर्द बघून उत्तर केलें ' होय. मीं तो टोपी दिनकर नांवाच्या गृहस्थास विकली आहे. ' त्याबरोबर मीं त्याला पत्ताहि विचारला. '

' मग तुम्हीं खूप काम केलेंत ! '

' मुख्य काम अद्याप पुढेंच आहे. मी लागलींच त्या पत्त्यावर शोध करण्यास गेलों. तेथें त्या घराची मालकीण भेटली, तिचा चेहरा मला खिन्न व फिकट असा दिसला. तिच्याजवळ तिची एक मुलगीहि उभी होती. मुलगी चांगली खुपसुरत होती. तिचे डोळे लाल दिसत होते. मी बोलूं लागलों तसे तिचे ओठ थरथर कापूं लागले. या सर्व गोष्टी मीं नीट पाहून ठेवल्या. येथें कांहीं तरी खास पाणी मुरतें आहे हें मीं तेव्हांच ओळखलें. आपण ज्या गोष्टीची चवकशी करतो तिचा आतां सुगावा लागणार असें मनांत वाटूं लागतांच माझें सर्व शरीर आनंदमय होऊन गेलें. शेवटीं मीं त्या बाईला प्रश्न केला, दिनकरपंत ह्मणून कोणी गृहस्थ येथें रहात होते; त्यांचा खून झाला ही बातमी तुमच्या कानावर आली आहे कां ? यावर त्या बाईनें नुसती मान

हलवली. तिच्या तोंडून एकहि शब्द निघेना. मुलीच्या डोळ्यांतून मात्र अश्रू गळूं लागले. त्यामुळें येथें आपल्याला खास तपास लागणार अशी खात्री वाटून दिनकरपंत येथून बाहेर केव्हां गेले ? असा मीं तिला प्रश्न केला. '

त्यावर ती ह्मणाली ' त्यांना सवानऊच्या गाडीनें जायचें होतें; ह्मणून ते ८ वाजतां घरांतून निघालें. '

' त्यांची तुमची तीच अखेरची गांठ काय ? '

हा प्रश्न विचारतांच त्या बाईची मुद्रा एकदम पालटली व मोठ्या मिनतवारीनें शेवटीं तिनें ' होय ' ह्मणून उत्तर दिलें.

हें उत्तर कांहीं खरें नव्हें अशी माझी तेव्हांच खात्री झाली. इतक्यांत मुलगी आपल्या आईकडे वळून ह्मणाली ' आई, उगाच खोटें बोलण्यांत काय अर्थ आहे ? दिनकरपंताची व आपली पुन: गांठ पडली नाहीं कां ? '

त्याबरोबर आई ह्मणाली ' तूं हें काय आरंभिलेंस ? आपल्या भावाच्या जिवावर उठतेस काय ? '

यावर मुलगी ह्मणाली ' आई, दादाला सुद्धां आपण खोटें बोललेलें खपणार नाहीं ! '

' तुह्मांला जें काय माहीत असेल तें सर्व मला सांगा. अर्धवट सांगण्यापेक्षां मुळींच न सांगणें बरें. कारण अर्धवट सांगण्यापासून कदाचित् भलतेंच लचांड उपस्थित होण्याची भीति आहे; शिवाय यासंबंधानें आह्मांला माहिती नाहीं असें समजूं नका. '

' तूं हें इतकें केलेंस. ' असें आपल्या मुलीला ह्मणून ती बाई मला ह्मणाली. ' मी तुम्हांला सर्व हकीगत सांगतें. मी घाबरलें ह्मणून माझ्या मुलाचा या भयंकर कृत्याशीं संबंध आहे असें मात्र समजूं नका. असा तमचा कदाचित् गैरसमज होईल ह्मणूनच मला भीति वाटली. माझ्या वृत्तींत पालट होण्याचेंहि हेंच कारण होय. तरीपण माझ्या मुलाचा असल्या प्रकरणाशीं संबंध असणें केवळ अशक्य होय. त्याची इभ्रत, त्याचा दर्जा व त्याचा पूर्वेतिहास हीं ज्यांना माहीत आहे त्यांना ही गोष्ट कालत्रयींहि खरी वाटणार नाहीं. '

'उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे माझ्यापासून कांहींहि लपवून न ठेवतां मला सर्व हकीगत साद्यंत सांगा. तुमचा मुलगा जर खरोखरच निरुपद्रवी आहे तर तुमच्या केंसासहि धक्का लागणार नाहीं.'

'अने, तूं जरा बाहेर जा. या गृहस्थांशीं मला कांहीं वेळ बोलावयाचें आहे.' असें तिनें आपल्या मुलीला सांगतांच मुलगी बाहेर निघून गेली. त्यानंतर सरोजिनीबाई मला ह्मणाली 'तुह्मांस हीं सर्व हकीगत सांगण्याचा माझा कांहीं इरादा नव्हता. परंतु माझ्या मुलीनें ही बातमी फोडली असल्यामुळें ती तुह्मांस समग्र सांगितल्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं. आतां एकदां सांगायला सुरवात केली ह्मणजे या हकीगतींतलें एक अवाक्षरहि मी तुह्मापासून चोरून ठेवणार नाहीं?'

'वा: ! फार छान ! माझें तरी हेंच ह्मणणें आहे.'

'दिनकरपंत माझ्या येथें सुमारें तीन आठवडे होते. ते व त्यांचे दिवाण श्रीनिवास हे आज बरेच दिवसपर्यंत प्रवास करीत आहेत. कपिलपूर हा मुक्काम त्यांच्या सामानाच्या पेट्यांवर डकविलेला आहे; तेव्हां त्या गांवाहूनच ते येथें आले असावेत असा तर्क होतो. श्रीनिवास हा मोठा सात्विक व शांत मनुष्य दिसतो. परंतु मोठ्या दिलगिरीची गोष्ट ही कीं, त्याचा धनी मात्र त्याच्या अगदीं विरुद्ध आहे. त्याची चालरीत अगदींच असभ्य व ग्राम्य आहे. ज्या दिवशीं तो आमच्या येथें उतरला त्या दिवशीं तो दारूनें अगदीं झिंगून गेला होता. रात्रीं बाराच्या पुढें प्रतिदिवशीं तो असाच झिंगलेला असतो. येथील मोलकरीण वगैरेशींहि त्याची वागणूक असभ्यपणाची असे. माझ्या मुलीकडेहि तो वाकड्या नजरेनें पाहूं लागला. तो तिच्याशीं विशेष लगट करूनहि एकदोन वेळां बोलला. एके दिवशीं त्यानें तिच्या अंगावर हातहि टाकला. त्याबद्दल श्रीनिवासानें त्याची परस्पर कानउघाडणी केली.'

यावर मी ह्मणालों 'पण हें सर्व तुह्मी कसें सहन केलेंत ? तुह्मी त्याला त्यादिवशींच घालवून कां दिलें नाहींत ?'

मी असा प्रश्न करतांच सरोजिनी जरा लज्जित होऊन ह्मणाली 'खरोखर त्याच दिवशीं ही ब्याद मी आपल्या घरांतून घालवून दिली असती तर फार चांगलें झालें असतें. परंतु मी भाड्याच्या

लोभांत गुंतलें. एरव्हींपेक्षां त्याचेकडून मला तिप्पट भाडें मिळत होतें. माझा नवरा मरून आज बरींच वर्षे झालीं. मुलाला शिक्षण मिळून त्याला नोकरी लागे तोंपर्यंत माझा पैसा बराच खर्च झाला. पैशाच्या आशेनेंच मीं त्याला आपल्या येथें राहू दिलें. परंतु ही शेवटची गोष्ट घडल्याबरोबर मी त्याला ताबडतोब घर सोडून जावयास सांगिलें. '

' पुढें काय झालें ? '

' तो गाडींत बसून निघून गेल्यानंतर माझा जीव खालीं पडला. माझा मुलगा हल्लीं रजेवर असल्यामुळें तो घरींच असतो. त्याचा स्वभाव अंमळ तापट आहे; तेव्हां त्याला या गोष्टींतलें मीं कांहीं कळूं दिलें नाहीं. आणि शिवाय आपल्या बहिणीवरहि त्याचें फार प्रेम आहे. दिनकराची गाडी चालूं झाली तेव्हां दार लाऊन मी मोठ्या आनंदानें घरांत गेलें. या गोष्टीस एक तास होतो न होतो तोंच दिनकरपंत पुनः परत आले. यावेळींहि दारूच्या अमलानें ते गैरशुद्धींत होते. मी आपल्या मुलीस घेऊन ज्या खोलींत बसलें होते तेथें तो आला व माझी गाडी चुकली ह्मणून मला परत यावें लागलें असें कायसेसें पुटपुटला. नंतर माझ्या मुलीकडे वळून धडधडीत माझ्या समक्ष तो तिला ह्मणाला ' तूं माझ्याबरोबर निघून चल. तूं आतां कांहीं लहान नाहींस. चांगली वयांत आली आहेस; तेव्हां तुझें माझ्याबरोबर येणें बेकायदेशीर होणार नाहीं. माझ्यापाशीं हवा तितका पैसा आहे; माझ्याबरोबर आलीस तर तुला सर्वप्रकारें सुखच होईल. त्या ह्मतारीच्या नादाला लागूं नकोस. तुला मी एखाद्या राजाच्या-राणीप्रमाणें ठेवीन. ' हें त्याचें बोलणें ऐकून माझी मुलगी भयानें माझ्या-कडे धांवत आली, तरी त्यानें तिचें मनगट धरून तिला दरवाजापर्यंत ओढून नेण्याचा प्रयत्न चालविला. हें पाहून मींहि भयानें किंकाळी फोडली. इतक्यांत रामचरण बाहेरून घरीं आला. त्यानंतर काय काय गोष्टी घडल्या हें कांहीं मला खात्रीनें सांगतां येणार नाहीं. त्यांची त्यांची बरीच बाचाबाच झाली. मारामारीहि झाली असावी असें वाटतें. दिनकर बाहेर निघून गेल्यानंतर माझा मुलगा दारांतच उभा राहून हंसून म्हणाला ' पुनः तो इकडे तोंड करील असें मला वाटत नाहीं. तरीपण मी त्याच्या मागोमाग जाऊन तो काय करतो,

कोठें जातो हें पाहून येतों.' असें म्हणून शिरस्त्राण चढवून तो निघून गेला. दुसरे दिवशीं सकाळीं दिनकराचा खून झाल्याची वार्ता माझ्या-कानीं आली.'

'ही हकीगत सांगतांना सरोजिनीचे ओठ थरथर कांपत होते. मधून मधून ती जोरानें श्वासहि टाकीत होती. सरतेशेवटीं तिचें बोलणें इतकें हळू येत होतें कीं मला तें ऐकण्यासहि अडचण पडत होती. लघुलेखनानें तिच्या बोलण्याची मी नोंद करून घेतली.'

गिरधरलालाची ही सर्व हकीगत ऐकून शरच्चंद्र मोठ्या आश्चर्यानें म्हणाला 'तुमचा हा वृत्तांत फारच मनोरंजक आहे. बरें, पुढें तुह्मीं काय केलें ?'

'मला असें कळून आलें कीं, या सर्व खटल्याचें मूळ रामचरण आहे. शेवटीं मीं त्या बाईला निक्षून विचारलें 'तुमचा मुलगा घरांतून बाहेर केव्हां गेला ?'

ती म्हणाली 'मला माहित नाहीं.'

'काय माहित नाहीं ?'

'नाहीं. त्याच्याजवळ किल्ली आहे, तो दाराला कुलुप लावून पर-स्पर जातो.'

'मग तर तुह्मी निजल्यावर तो गेला असेल ?'

'होय. आह्मी सुमारें अकरा वाजतां निजलों, त्यानंतर तो गेला. बाहेर तो सुमारें ४।५ तासपर्यंत असेल.'

'बाहेर इतकावेळ तो काय करीत होता ?'

'तें मला माहित नाहीं.'

'हें शेवटचें उत्तर त्या बाईच्या तोंडून निघालें तेव्हां तिची मुद्रा मात्र सपशेल पालटली. असो. याप्रमाणें अवश्य ती माहिती तेथून काढून घेतल्यानंतर मी रामचरणच्या तपासास गेलों. दोन अधिकारी घेऊन अखेर मीं त्याला पकडलें. पकडतांना तो मला म्हणाला 'त्या दिन-कराच्या खुनासंबंधांत माझें अंग आहे म्हणूनच तुम्ही मला पकडीत आहां असें वाटतें. तुमचा समज काय आहे तें माझ्या ध्यानांत आलें !' हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच आमचा वहीम अधिकच बळावला.

आम्ही कांहीं न बोलतां न सवरतां जेव्हां यानें त्याच गोष्टीचा उल्लेख केला तेव्हांच त्याचा या प्रकरणाशीं अगदीं निकटसंबंध आहे अशी माझ्या मनाची खात्री झाली.'

माझा मित्र म्हणाला 'उघडच आहे.'

'त्याच्याजवळ जी काठी होती म्हणून आईनें सांगितलें ती त्याच्याजवळ आतांहि होती. ती काठी चांगली वळकट व मजबूत होती.'

'मग या संबंधाचें तुमचें एकंदर निदान काय ठरलें?'

'या सर्व हकीगतीवरून माझें असें मत झालें आहे कीं, रामचरणानें दिनकराचा बराच दूरपर्यंत पाठलाग केला असावा. रस्त्यांतच यांची मारामारी होऊन दिनकरला नाजूक जागीं काठीचा तडाका लागून तो ठार झाला असावा. रात्रीं पाऊस पडत असल्यामुळें रस्त्यांत कोणी नसणें स्वाभाविकच होतें. जवळ एक मोकळें घर पाहून त्यानें दिनकरचें प्रेत तेथें नेऊन टाकलें असावें. तेथें मेणबत्ती होती, रक्त पडलें होतें, भिंतीवर कांहीं लिहिलें होतें, हीं केवळ पोलिसाला चुकविण्याकरितां शक्कल काढली असेल असें मला वाटतें.'

यावर माझा मित्र म्हणाला 'गिरधरलाल या खटल्याच्या तपासाच्या कामीं तुम्ही तर खूप बहार केली. तुम्ही मिळवलेल्या माहितीतच फार चांगला उपयोग होणार आहे.'

गिरधरलाल मोठ्या अभिमानानें ह्मणाला 'या कामांत हा शोध मोठा उत्तम लागला असें मलाहि वाटतें. आपल्या मागून येतांना दिनकरनें मला पाहतांच तात्बडतोब एक गाडी ठरवली असें रामचरण आपल्या जबाबांत ह्मणतो. दिनकरचा नाद सोडून घरीं परत जात असतां आपल्या एका जुन्या मित्राची गांठ पडली असेंहि त्यानें सांगितलें. तो मित्र कोठें राहतो असा मीं त्यास प्रश्न केला; त्याचें मात्र त्यास नीट उत्तर देतां येईना. मला वाटतें या प्रकरणाचा आतां निकाल लागलाच असें समजण्यास हरकत नाहीं. लक्ष्मणसिंगाची मात्र मला मौज वाटते. त्याला या प्रकरणाचा कांहीं मागमूस लागेल असें मला वाटत नाहीं. कारण त्यानें भलताच मार्ग स्वीकारला आहे. अरे! पण हे कोण? खुद्द लक्ष्मणसिंगच आले. अगदीं नांव घेतल्याबरोबर हजर!'

खरोखरच लक्ष्मणासिंग आमच्यापुढें येऊन उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर उल्हास दिसत नव्हता. नेहमीं त्यांची मुद्रा मोठी प्रफुल्लित असावयाची; पण आज ते उदासीन व खिन्न दिसत होते. त्यांचा पोषाखहि विस्कळित झालेला दिसत होता. कांहीं तरी निकडीच्या कामाकरतांच ते आले असावेत, किंबहुना कांहीं महत्त्वाच्या बाबतींत शरच्चंद्राचा सल्ला घेण्याकरितांच येथें येण्याचा त्यांचा उद्देश असावा, असें एकंदर रागरंगावरून स्पष्ट दिसत होतें. आपले व्यवसायबंधू येथेंच आहेत हें पाहून ते अंमळ गोंधळल्यासारखें झाले. आतां पुढें काय करावें हें त्यांस कांहींच सुचेनासें झालें. शेवटीं ते ह्मणाले 'हें प्रकरण खरोखर मोठें अपूर्व आहे. याचा कांहीं धागाच समजत नाहीं.'

यावर गिरिधरलाल मोठ्या आश्चर्यतेनें ह्मणाले 'एकूण तुह्मीहि या प्रकरणांत हात टेकलेंत ? यासंबंधांत तुमची अशी स्थिति होईल हें मीं प्रथमच भाकीत केलें होतें. बरें, मग त्या श्रीनिवासाचा पत्ता लागला का नाहीं ? कारण त्याच्यावर तुमचें सगळें तारूं होतें.'

यावर लक्ष्मणासिंगांनीं शांतपणानें उत्तर केलें. 'होय लागला तर. त्याचा आज सकाळीं सहा वाजतांच खून झाला.'

---

# भाग ७ वा.

## प्रकाश पडूं लागला.

---

लक्ष्मणसिंगाची ही बातमी ऐकतांच आह्मी तिघेहि स्तिमित होऊन गेलों. गिरधरलाल तर ती बातमी ऐकतांच आपल्या जाग्यावर एकदम ताडकन् उभे राहिले. मी शरच्चंद्राकडे टक लावून पहात होतों. ओठ आवळून व भिंवया वर चढवून शेवटीं तो आपल्या मनाशीं पुटपुटला-'श्रीनिवासाचाहि खून झाला. या प्रकरणांत आणखी नवीन नवीन कप्पे उपस्थित होत आहेत.'

यावर लक्ष्मणासिंग ह्मणाले 'आधींच हें प्रकरण गुतागुतीचें होतें; आणि या बातमीनें तर तें अधिकच गुतागुतीचें झालें.'

गिरधरलाल ह्मणाला ' या बातमीबद्दल आपली खात्री आहे नां पण ? '
लक्ष्मणसिंगांनीं उत्तर केलें ' ज्या जागीं श्रीनिवासाचा खून झाला तेथूनच मी आतां आलों. '

आमचे मित्र शरच्चंद्र ह्मणाले ' गिरधरलालांनीं सांगितलेली हकीगत आह्मी आतांपर्यंत ऐकत होतों. आपण यासंबंधांत काय काय तपास केला हेंहि आपण आह्मांस सांगितल्यास बरें होईल. '

लक्ष्मणसिंगानें उत्तर केलें ' वा: ! तें तर मी मोठ्या आनंदानें सांगेन. दिनकरच्या खुनाशीं श्रीनिवासाचा संबंध असावा असें माझें मत होतें हें मी कबूल करतों. ही नवीन बातमी आतां समजली आहे तिच्यामुळें माझा तो समज खोटा ठरला. असो. आरंभीं माझें तसें ठाम मत असल्यामुळें मी प्रथम श्रीनिवासाचा शोध करूं लागलों. तारीख ३ रोजी सायंकाळीं ८॥ वाजतां दिनकर व श्रीनिवास हे दोघेहि स्टेशनवर असलेले पुष्कळांनीं पाहिलें होतें. त्याचदिवशीं रात्रीं २ वाजतां लालबागेंत दिनकराचें प्रेत सांपडलें. या दरम्यान व त्यानंतर श्रीनिवासाच्या हालचाली काय होत्या याचा मी बारकाईनें तपास करूं लागलों. कुसुमपुरला जाणाऱ्या बोटीवर सक्त नजर ठेऊन श्रीनिवासाच्या वर्णनाचा मनुष्य सांपडल्यास त्यास तेथें पकडून ठेवावें अशाबद्दल मीं बंदरावर तारहि केली. गांवांतील सर्व भोजनगृहें व बिऱ्हाडाच्या जागा याहि मीं बहुधा सर्व शोधून पाहिल्या. दिनकर व श्रीनिवास यांची स्टेशनावर चुकामूक झाली असल्यास श्रीनिवास रातोरात कोठें तरी गांवांतच राहिला असला पाहिजे अशा समजावरच मीं हा शोध चालविला होता. यावर माझा मित्र म्हणाला ' कदाचित् चुकामूक झाल्यावर त्यांची पुन: गांठ पडली असेल ! '

' हो असें झालेंच. कारण काल मीं सगळा दिवसभर या शोधांत होतों; परंतु शेवटीं माझे श्रम निष्फळ झाले. आज सकाळीं सुमारें आठ वाजतां मी हत्तीमहालचे रस्त्यावर गिरजाशंकर यांचें घरीं त्याचा शोध केला. श्रीनिवास नांवाचा कोणी गृहस्थ येथें राहतो ! असें मला घरांतील लोकांनीं सांगितलें. '

' त्या घरांतील एक गृहस्थ मला म्हणाला ' श्रीनिवास हा कालपासून

एका गृहस्थाची सारखी वाट पहात आहे; ते आपणच असाल असें वाटतें ! ’

‘ पण तो आतां कोठें आहे ? ’ असे मी विचारल्यावर तो गृहस्थ म्हणाला ! ‘ ते माडीवर निजले आहेत. मला नऊ वाजतां उठवा असें त्यांनीं सांगितलें आहे. ’

‘ एकदम माडीवर जाऊन त्याची गांठ घ्यावी असा विचार प्रथम माझे मनांत आला. पण पुनः वाटलें कीं, मी एकदम जाऊन त्याच्यापुढें उभा राहिलों तर तो घाबरून जाऊन भलतेंच कांहीं तरी सांगूं लागेल. तेव्हां घरांतील एका नोकरास घेऊन मी माडीवर गेलों. माडीचा दरवाजा मला दाखवून नोकर परत खालीं जाण्याच्या बेतांत होता. परंतु दरवाज्या-जवळ जातांच माझ्या मनांत कांहीं भलतेच विचार येऊं लागले ! इतक्यांत दाराच्या उंबऱ्यांत रक्ताची रेषा उमटलेली माझ्या दृष्टीस पडली ! दार उघडून पाहतों तों ती रेषा लांबवर गेलेली दिसली ! त्याबरोबर मीं आरोळी ठोकली. आरोळी ऐकतांच नोकर धांवत आला. माझ्याप्रमाणेंच दरवाज्याच्या फटींतून रक्ताची दूरवर गेलेली रेषा त्याच्या दृष्टीस पडतांच त्याचे डोळे फिरून गेले. दरवाजाला आंतून कडी होती. तेव्हां आम्हीं दोघांनीं दरवाजा उखळून आंत प्रवेश केला. आंतील खिडकी मोकळीच होती. खिडकीजवळ एका मनुष्याचें प्रेत गाठोड्याप्रमाणें पडलेलें होतें. त्याला मरून बराच वेळ झाला होता असें एकंदर चिन्हांवरून दिसलें. श्रीनिवास या नांवानें ज्यानें भाड्यानें खोली घेतली होती तोच हा मनुष्य असें सेवकानें तेव्हांच ओळखलें. त्याच्या उजव्या कुशीस एक मोठा वार लागला होता, या सर्व वृत्तांतातला विलक्षण भाग आतां मी सांगणार आहें. त्या प्रेतावर काय होतें असें तुम्हांला वाटतें ? ’

‘ कीना हा शब्द रक्ताच्या अक्षरांनीं तेथें लिहिला होता. ’ असें शरच्चं-द्रानें सपाट्यानें उत्तर दिलें !

‘ अगदीं बरोबर. ’ असें लक्ष्मणसिंगानें तात्काळ म्हटलें. शरच्चं-द्राची ही शिताफी पाहून आम्हा सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलें. कांहीं वेळपर्यंत कोणाच्या तोंडून एक शब्दहि निघाला नाहीं. खून करणारा

हा माणूस कोणीतरी अद्वितीय असला पाहिजे असें वाटून आम्हीं सर्वजण एकमेकांकडे मोठ्या आश्चर्यानें पाहूं लागलों. समरांगणावरहि अचल राहिलेले माझे स्नायू मनःक्षोभानें तटातट उडूं लागले ! माझें काळीज इकडे तिकडे धांवपळ करूं लागलें. लक्ष्मणसिंगानें पुनः बोलण्यास सुरुवात केली नसती तर माझी अवस्था काय झाली असती हें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं.

लक्ष्मणसिंग ह्मणाला ' खुनी मनुष्याला कोणी एकानें पाहिल्याचेंहि मला समजलें आहे. तांबडें फुटण्याचें पूर्वी एक गवळ्याचा मुलगा त्या घरावरून जात होता. त्याला त्या माडीच्या खिडकीशीं एक शिडी लावलेली दिसली. घराच्या जरा पुढें जाऊन त्यानें मागें वळून पाहिलें तों एक मनुष्य त्या शिडीवरून खालीं उतरतांना त्याला दिसला. तो मनुष्य शिडीवरून इतक्या शांतपणानें व सावकाश उतरला कीं, इमारतीची दुरुस्ती वगैरे करण्याकरतांच त्यास कामावर लावलेलें असावें असें पाहणारास वाटेल ! त्या मनुष्याकडे मुलाचें अर्थातच विशेषसें लक्ष गेलें नाहीं. हा मनुष्य इतक्या लवकर कामवर आला याबद्दल उलट त्यानें त्याची प्रशंसाच केली. या मनुष्याचा चेहरा जरा तांबडसर असून त्याच्या अंगांत एक तपकिरी रंगाचा कोट असावा अशी त्या मुलास अंधुक कल्पना आहे. खून केल्यानंतर कांहीं वेळपर्यंत तो मनुष्य खोलींतच असावा असें दिसतें. कारण खोलींत पाण्यानें भरलेलें एक भांडें होतें; त्यांतलें पाणी रक्तानें लाल झालेलें होतें. खून केल्यानंतर त्यानें आपले हात या भांड्यांत धुतले असावेत असा तर्क होतो. रक्तानें भरलेला आपला सुरा तेथील पलंगपोसास त्यानें बराच वेळपर्यंत पुसून स्वच्छ केला असावा असें पलंगपोसास पडलेल्या डागांवरून स्पष्ट दिसत होतें. '

शरच्चंद्रानें खुनी माणसाचें प्रथम जें वर्णन दिलें होतें त्याच्याशीं हें बरोबर जमलें हें या हकीगतीवरून माझ्या तात्काळ लक्षांत आलें. व मी शरच्चंद्राकडे निरखून पाहूं लागलों. परंतु, त्याच्या चर्येंत यत्किंचित्हि फरक झालेला दिसला नाहीं.

तो पुनः शांतपणानें ह्मणाला ' खुनी माणसाचा कांहीं शोध लागेल असा कांहीं मुद्देमाल तेथें तुह्मांला सांपडला काय ? '

'कांहीं नाहीं. श्रीनिवासाच्या खिशांत एक पैशाचें पाकिट मात्र होतें. त्यांत सुमारें ३०० रुपयांची रक्कम होती. दिनकराचा तो कारकून होता, त्याअर्थी खर्चवेंचाचे पैसे त्याजवळ असणें स्वभाविकच होतें. पाकिटांतले पैसे कांहीं हलल्यासारखे दिसले नाहींत. अर्थात् खून करण्यांत द्रव्यापहार हा कांहीं खुनी माणसाचा उद्देश नसावा हें उघड होतें. श्रीनिवासाच्या खिशांत दुसरें कांहीं ह्मणण्यासारखें कागदपत्र वगैरें नव्हतें. एक महिन्यापूर्वीं त्यानें कोणास तार केली होती तिचा मसुदा मात्र त्याच्या खिशांत होता.'

'याशिवाय दुसरें कांहीं नव्हतें ?'

'महत्वाचें असें कांहीं नव्हतें. झोंप येण्याकरितां एक कादंबरी तो वाचीत असावा. ती मात्र तेथें उशाशीं पडलेली होती. खोलींत पाण्याचा एक तांब्याही भरलेला होता. खिडकीच्या उंबरठ्यावर एक डबी होती; त्या डबींत दोन गोळ्या होत्या.'

हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच शरच्चंद्र खुर्चीवरून ताडकन् उठून ह्मणाला 'झालें ! माझें काम झालें. हा शेवटचाच धागा कमी होता तो मिळाला.'

गिरधरलाल व लक्ष्मणसिंग हे एकमेकांकडे टक लावून पाहूं लागले. शरच्चंद्राचें हृद्गत त्यांना कांहींच उमजेना.

शरच्चंद्र पुनः ह्मणाला, 'या गुतागुतीचे सर्व धागे आतां माझ्या हातीं आले. आतां ही सोडविण्यास मोठीशी अडचण पडेल असें वाटत नाहीं. कांहीं किरकोळ बाबी अद्यापही समजावयाच्या आहेत; परंतु, त्या आपसुखच क्रमाक्रमानें हस्तगत होत जातील याबद्दल बिलकुल संशय वाटत नाहीं. दिनकर व श्रीनिवास यांची चुकामूक झाल्यावेळेपासून तो श्रीनिवासाचें प्रेत नजरेस येईतोंपर्यंतच्या सर्व महत्वाच्या गोष्टी समजल्या आहेत. या सर्व मीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत असेंच मला वाटत आहे ! तशाप्रकारें मी हवीतर खात्रीहि करून देईन. तुह्माला त्या गोळ्या मिळतील कां ?'

लक्ष्मणसिंगानें उत्तर केलें, 'त्यातर माझ्याजवळ आहेत !' असें ह्मणून त्यानें आपल्या खिशांतून एक डबी काढली. 'ही डबी, डबींतील गोळ्या व तो तारेचा मसुदा हें सर्व मीं आपल्याजवळ ठेवलें आहे. या गोळ्या

बरोबर घेण्याची मला बुद्धि झाली हें माझें भाग्यच समजावयाचें. कारण खरें सांगावयाचें म्हणजे या गोळयांचें मला इतकें बिलकुल महत्व वाटलें नाहीं. '

' बरें तर ते माझ्यापाशीं द्या. ' असें म्हणून शरच्चंद्रानें त्या गोळ्या लक्ष्मणसिंगापासून घेतल्या व त्या मला दाखवून तो म्हणाला ' या गोळ्या साध्याच आहेत काय ? '

त्या खरोखरच साध्या नव्हत्या. त्या पाणीदार मोत्याप्रमाणें तेजःपुंज असून गोलाकार होत्या. त्यांचा रंग काळसर होता. आणि त्या पारदर्शक होत्या. इतक्या गोष्टींचा विचार करून मी म्हणालों, ' गोळ्यांच्या स्वरूपावरून त्या पाण्यांत विरघळतील असें वाटतें. '

' अगदीं बरोबर; बरें माझ्यासाठीं एवढी तसदी घेतां कां ? खालीं जाऊन तेवढें कुत्र्याचें पिल्लुवर घेऊन याल काय ? बिचारें आज महिनाभर खरजेनें पिडलेलें आहे. खरोखरच मृत्युलोकच्या तापत्रयांतून त्याची सोडवणूक करण्यास ही फार चांगली संधि आली आहे. '

हें त्याचें बोलणें ऐकून मी खालचें कुत्रें घेऊन वर आलों. त्याच्यानें श्वास सुद्धां पुरता टाकवत नव्हता. त्याच्या जीवित यात्रेच्या समाप्तीची वेळ फार दूर नव्हती असें त्याच्या एकंदर रागरंगावरून स्पष्ट दिसत होतें.

कुत्रें वर आणलेलें पाहून शरच्चंद्र म्हणाला ' यांपैकीं एका गोळीचे मी दोन तुकडे करतों. अर्धा या पाण्याच्या पेल्यांत टाकतों व अर्धा डबींत ठेवतों. त्याचा पुढेंहि एखादे वेळेस उपयोग होईल. वसंत, तुमची कल्पना बरोबर आहे. हें पाहिलें कां ही गोळी पाण्यांत विरून गेली ? '

हे आपला उपहास करीत आहेत असें वाटून लक्ष्मणसिंग जरा रागानेंच म्हणाला ' प्रयोग तर फार मनोरंजक आहे. परंतु श्रीनिवासाच्या खुनाचा व या प्रयोगाचा अर्थाअर्थी काय संबंध आहे हें मात्र माझ्या ध्यानांत येत नाहीं. '

' अशी गर्दी करूं नका. थोडा वेळ थांबा म्हणजे तुमच्या लक्षांत येईल कीं या प्रयोगानेंच श्रीनिवासाच्या खुनाचा उलगडा होणार आहे. आतां या पाण्यांत मी थोडेसें दूध मिसळतों म्हणजे हें कुत्रें तें मिश्रण

मोठ्या आवडीनें पिऊन टाकील. ' असें ह्मणून शरच्चंद्रानें त्यांत थोडेसें दूध ओतलें. कुत्र्यापुढें तें भांडें ठेवतांच त्यानें तें मिश्रण ताबडतोब पिऊन टाकलें. शरच्चंद्राची ती गंभीर वृत्ति पाहून आह्मी सर्वजण तटस्थ बसलों. या मिश्रणाचा त्या प्राण्यावर कांहीं तरी विलक्षण परिणाम होणार आहे आणि तो आपणांस आतांच पहावयास सांपडेल ह्मणून आह्मी मोठ्या आतुरतेनें वाट पहात बसलों. तसा परिणाम कांहीं दिसेना. तें कुत्रें तेथेंच धापा टाकीत पडलें होतें. मिश्रण पिऊन टाकल्यानें त्याच्या स्थितींत कांहीं फरक झालेला दिसला नाहीं.

शरच्चंद्र आपलें घड्याळ काढून बसला. मिनिटामागें मिनिट जाऊं लागलें. तरी कांहीं परिणाम दिसेना. तेव्हां त्याचा चेहरा जरा निराश दिसूं लागला. तो आपले ओठ चाऊं लागला, कपाळाला आठ्या घालूं लागला, टेबलावर वरचेवर हात आपटूं लागला, सारांश मिश्रणाचा परिणाम पहाण्याबद्दल तो अगदीं अधीर होऊन गेला होता. त्याची ती स्थिती पाहून मला वाईट वाटलें; परंतु ते दोघेजण मात्र एकमेकांकडे पाहून हंसू लागले. बरी खोड मोडते आहे याबद्दल दोघांनाहि समाधानच वाटत असल्याचें दिसलें.

इतक्यांत एकदम खुर्चीवरून उठून व खोलींत इकडेतिकडे येरझारा घालून शरच्चंद्र आपल्या मनाशीं पुटपुटला ' कावळा बसायला आणि ढाळी मोडायला एकच गांठ पडली असें ह्मणतां येत नाहीं. दिनकराच्या बाबतींत ज्या गोळ्यांचा मला वहीम आला होता त्याच गोळ्या श्रीनिवासाच्या मरणानंतर त्याच्या उशाशीं सांपडतात आणि त्यांचा परिणाम तर कांहीं होत नाहीं यांतला अर्थ तरी काय ? माझें अनुमानशास्त्र चुकीचें ठरणार काय ? छे. ती तर गोष्ट अशक्य होय. आणि इकडे कुत्र्याकडे पहावें तर तें आहे तसेंच पडलें आहे. त्याच्यावर यत्किंचितहि परिणाम होत नाहीं. हें गौडबंगाल आहे तरी काय ? हां, समजलों ! ध्यानांत आलें ! तरी ह्मटलें असें कां होत होतें. ' असें ह्मणून त्यानें पुनः ती डबी हातांत घेतली व दुसऱ्या गोळीचा निम्माभाग दूधपाण्याच्या मिश्रणांत विरवून त्यानें तें मिश्रण कुत्र्यापुढें ठेवलें. तें मिश्रण त्या दुर्दैवी प्राण्याच्या जिभेस लागलें असेल नसेल तोंच त्याच्या सर्वांगाचा

थरकांप होऊन त्यानें शेंवटचा श्वास सोडून या जगाचा अखेरचा निरोप घेतला.

तें पाहतांच शरच्चंद्राचा जीव खालीं पडला. कपाळाचा घाम पुसून तो म्हणाला ' हें मला प्रथमच समजावयास पाहिजे होतें. जेव्हां एखाद्या गोष्टीची अनुमानें एकामागून एकसारखीं खरीं ठरतात; परंतु मधलेंच एखादें चुकतें, तेव्हां त्यास दुसरेंच कांहींतरी आगंतुक कारण असतें. येथेंच पहानांत ! या डबींत दोन गोळया होत्या. त्यांपैकीं एक अत्यंत विषारी होती व दुसरी अगदीं निरुपद्रवी होती. ही दवी पहाण्यापूर्वींच माझ्या हें लक्षांत यावयास पाहिजे होतें. '

शरच्चंद्राचें हें शेंवटचें विधान ऐकून मला जरा चमत्कारच वाटला. ' हा कांहीं हें शुद्धीवर बोलत नाहीं. ' असेंहि मी आपल्या मनांत ह्मटलें. परंतु इकडे कुत्र्याकडे पाहावें तर त्याचें बोलणें बरोबर होतें.

माझी आश्चर्ययुक्त मुद्रा पाहून शरच्चंद्र ह्मणाला ' मीं ह्मणतों याचा तुह्मांला चमत्कार वाटतो. परंतु प्रथमच आपल्याला मीं जेव्हां गोळी दाखवली तेव्हां त्यांतील मख्खी आपल्या ध्यानांत आली नाहीं. सुदैवानें माझ्या ती लक्षांत आली. आणि ह्मणूनच माझ्या पहिल्या अनुमानाबरहुकुम सर्व गोष्टी यथास्थित घडून आल्या. तुमच्यासारख्यांना हें प्रकरण ज्या गोष्टीमुळें अधिक गुतागुतीचें वाटलें त्याच गोष्टी या प्रकरणाचा परिस्फोट होण्यास मला उपयोगीं पडल्या. जी जी विलक्षण गोष्ट आहे ती ती अगम्य असलीच पाहिजे असें समजणें चुकीचें आहे. उलटपक्षीं दिसण्यांत सामान्य असलेली गोष्टहि उकलण्यास फार जड जाते. कारण त्या गोष्टीस दुसऱ्या इतर आनुषंगिक बाबींचें साहचर्य नसतें. उदाहरणार्थ हा खूनच पहानांत ! हेंच प्रेत रस्त्यांत एका गटाराच्या कडेस पडलेलें सांपडलें असतें तर त्याचा पत्ता लावणें शतपट कठीण झालें असतें. परंतु आतां त्यासंबंधां । हा अवांतर पुरावा हातीं आला; त्या योगानें हें प्रकरण उकलण्याचें काम अधिक सोपें झालें. '

शरच्चंद्राचें हें विवेचन संपतें तेव्हां असें गिरिधरलालास होऊन गेलें होतें. शरच्चंद्र थांबतांच तो मोठ्या गर्दीनें म्हणाला– ' शरच्चंद्र, इकडे पहा. आपण मोठे चलाख आहां, तपास लावण्याची आपली पद्धत फार

घाखाणण्यासारखी आहे हें सर्व आह्माला कबूल आहे. परंतु आतां आपल्या या शास्त्रीय विवेचनापासून कांहीं उपयोग होईलसें मला वाटत नाहीं. प्रत्यक्ष कृतीची ही वेळ आहे. खुनी मनुष्याला पकडणें हें आपलें काम आहे. यासंबंधांत मीं काय केलें हें आपल्याला सांगितलेंच आहे. रामचरणाचा श्रीनिवासाच्या खुनाशीं संबंध असणें अशक्य दिसतें. लक्ष्मणसिंगांनीं श्रीनिवासाची पाठ पुरविली, परंतु त्यांचाही कयास चुकीचा होता असें आपण दर्शविलें. आपण हें करावें, तें करावें, असें केलें असतां सोईचें पडेल अशा अनेक गोष्टी आपण सांगितल्या. आमच्यापेक्षां आपल्याला या संबंधांत अधिक ज्ञान झालें आहे असें आपण दाखवतां; परंतु आतां या शाब्दिक ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करण्याचा समय आला आहे. तर आतां आपल्याला माझें एवढेंच विचारणें आहे कीं, हा खून कोणी केला त्या मनुष्याचें नांव आपल्याला सांगतां येईल काय ? ’

यावर लक्ष्मणसिंग ह्मणाले ‘ गिरधरलालांचें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. आह्मीं दोघांनींहि आपापल्या परीं या कामीं शिकस्त केली; परंतु दोघांनाहि यश आलें नाहीं. या कामीं जो पुरावा असणें अवश्य आहे तितका सर्व मिळाला असें मी येथें आल्यापासून आपल्या तोंडून अनेकदां उद्गार निघाले. आतां या पुराव्याचा प्रभाव दाखवण्यास आपण यत्किंचित्‌हि विलंब लाऊं नये एवढीच आमची विनंति आहे. ’

मी ह्मणालों ‘ खुनी माणसाला पकडण्यांत आतां विलंब होता उपयोगींच नाहीं; कारण त्यास मोकळें राहूं दिल्यास तो आणखीहि एखादा नवीन खून करील. ’

याप्रमाणें आह्मा सर्वांकडूनच मारा झाल्यामुळें शरच्चंद्र बराच त्रासून गेला. बराच वेळ खालीं मान घालून विचार करीत व आपल्याशींच कांहीं पुटपुटत तो इकडून तिकडे फिरला व शेवटीं ह्मणाला ‘ त्या मनुष्याच्या हातून आणखी एखादा खून होईल अशी तर धास्तीच बाळगायला नको. खुनी माणसाचें नांव माहीत आहे का असा तुह्मीं मला प्रश्न केलात. होय मला माहीत आहे. केवळ त्याचें नांव माहीत असल्यानें आपणांस त्याला पकडतां येणार आहे अशांतली गोष्ट नाहीं. तरी पण

त्याला लवकरच पकडतां येईल असा माझा अंदाज आहे. माझ्याच पद्धतीनें हें काम फत्तें होईल अशीहि मला उमेद वाटते. परंतु ही गोष्ट फार नाजूक आहे. हिच्यासंबंधांत घाई करतां उपयोगीं नाहीं. घाई केली कीं, गळयांतच आलें ह्मणून समजा. ज्या मनुष्याशीं आपली गांठ आहे तो फार धूर्त व धाडसी मनुष्य आहे. त्याला दुसऱ्याहि एका चाणाक्ष मनुष्याचें चांगलें सहाय्य आहे हेंहि मी थोडक्याच काळांत सिद्ध करून दाखविणार आहें. आपण त्या मनुष्याचा पाठलाग करीत आहों ही गोष्ट त्याला एकदां समजली ह्मणजे सर्वच बस्तान फसलें ह्मणून समजा. आपल्या हालचालींची यत्किंचितही वार्ता त्याच्या कानीं गेली तर तो आपलें नांव बदलून या शहरच्या लक्षावधिलोकसंख्येंत कोठें नाहींसा होऊन जाईल याचा पत्ता लागणार नाहीं. तुह्मीहि फार धूर्त अधिकारी आहांत; आपल्या कामांत मोठें वाकबगार आहांत परंतु, तुमच्याहि हाता-वर तो तुरी दिल्याखेरीज राहणार नाहीं. फार कशाला? सर-कारीरीतीनें त्याला पकडण्याचें प्रयत्न सफल होणें जवळ जवळ अश-क्यच आहे. या विचारानेंच हें काम मीं आपल्या एकट्याच्या शिरा-वर घेतलें आहे. तुमच्या मदतीची मी अपेक्षा कां करीत नाहीं हें यावरून तुमच्या लक्षांत येईलच. याकामीं मला अपयश आलें तरी त्या-चा दोष माझ्या एकट्यावरच राहील. तुम्हांला सांगितलें असतां कांहीं बिघडणार नाहीं; येथपर्यंत जेव्हां या कामीं माझी मजल जाईल तेव्हां माझें सर्व हकीगत तुम्हाला निवेदन करण्यास मी एक क्षणाचाहि विलंब लावणार नाहीं.'

शरच्चंद्राच्या या बोलण्यानें गिरधरलाल व लक्ष्मणसिंग यांपैकीं कोणा-चेंच समाधन झालें नाहीं हें सांगावयास नकोच. इतकेंच नव्हें तर दोघां-नाही त्याच्या बोलण्याचा फार राग आला असें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्टपणें दिसत होतें. हा राग शब्दांनीं व्यक्त करण्यास त्यांना मुळींच वेळ मिळाला नाहीं. कारण ते कांहीं बोलण्याचा संकल्प करतात तोच शरच्चंद्राच्या संशोधक सेनेचा सेनानी विनायक हा दिवाणखान्यांत येऊन थडकला.

शरच्चंद्रास मुजरा करून तो म्हणाला. 'रावसाहेब, गाडी खाली उभी आहे.'

‘ शाबास ’ असें त्या मुलास म्हणून कपाटांतून एक हातबेड्यांची जोडी काढून तो लक्ष्मणासिंगास म्हणाला ‘ हा पाहिला कां आम्ही हातबेड्यांचा नवीन नमुना काढला आहे ? याचा चाप किती फक्कड आहे म्हणून सांगूं. स्पर्श व्हावयाचा अवकाश कीं मिटलाच. हा तुह्मी उपयोगांत आणून कां पहात नाहीं ? ’

यावर लक्ष्मणसिंगानें उत्तर दिलें ‘ जुना नमुना काय वाईट आहे ? तो हातांत घालण्यास मनुष्यच सांपडला पाहिजे. ’

यावर शरच्चंद्र हंसून ह्मणाला ‘ ठीक आहे. विनू त्या गाडीवाल्यास वर बोलावून आण. कारण, या पेट्या गाडींत घालावयाच्या आहेत. ’

माझ्या मित्राची ही गांवाला जाण्याची तयारी पाहून मला फार आश्चर्य वाटलें. कारण त्याबद्दल तो माझ्यापाशीं आधीं अवाक्षरही बोलला नव्हता. खोलींत एक कातड्याची पेटी होती; त्या पेटीवर तो वाद्या चढवूं लागला; इतक्यांत गाडीवाला वर आला.

गाडीवाल्याचा पाय वाजतांच तो त्यास ह्मणाला ‘ अरे, या एवढ्या वाद्या चढव पाहूं. ’

गाडीवाल्यानें हें ऐकतांच रागीटमुद्रा करून पेटीशीं वांकून वाद्या खेंचण्याकरतां वाद्यास हात लावला. इतक्यांत कशाची घंटा वाजल्यासारखा खणकन् आवाज झाला. आवाज ऐकतांच ताडकन् उभा राहून शरच्चंद्र ह्मणाला ‘ भले गृहस्थहो, दिनकर व श्रीनिवास यांचा खून करणारे हेच जीवनराव ! ’

हें सर्व एका क्षणांत झालें. हें आपण कांहीं प्रत्यक्ष पहात आहोंत कां स्वप्नांत आहोंत असें आह्मा सर्वांना होऊन गेलें. शरच्चंद्राचा तो पाणीदार चेहरा, त्याचा घंटेसारखा खणखणीत आवाज, त्या गाडीवाल्याची क्रूर मुद्रा, आपल्या हातांत लखलखणाऱ्या हातबिड्या पडल्या आहेत हें पाहून त्याची झालेली कावरीबावरी वृत्ति इत्यादि गोष्टी अद्यापाहि माझ्यापुढें मूर्तिमंत उभ्या असलेल्या दिसतात. शरच्चंद्रानें त्याच्या हातांत या हातबिड्या इतक्या चलाखीनें कशा ठोकल्या, हें कांहींच न समजून आह्मी दगडाच्या पुतळ्याप्रमाणें कांहींवेळ निश्चल बसलों. इकडे कैद्यानें भलामोठा हिसका देऊन आपली शरच्चंद्राच्या हातांतून

मुटका करून घेतली व एका धक्क्यास खिडकीचें तावदान व चौकट पाडून त्यांतून घुसून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला; तो सफळ होण्यापूर्वींच गिरधरलाल, लक्ष्मणसिंग व शरच्चंद्र हे तिघेहि त्याच्या अंगावर तुटून पडले. त्यांनीं त्यास खेंचून परत आणलें आणि त्यांच्यांत भयंकर लढालढी सुरू झाली. या नवीन माणसाचें सामर्थ्य केवढें मोठें होतें, तो चौघांनाहि भारी होता! तो नुसता अंग हालवल्याबरोबर माणसांना भराभर लांब झुगारून देत असे. त्याचें तोंड व हात यांना तावदानाची कांच लागल्यामुळें त्यांतून एकसारखें रक्त वहात होतें; तरी त्याचें त्याला बिलकुल गुमान नव्हतें. शेवटीं लक्ष्मणसिंगानें त्याचा सदरा गळ्याशीं धरला, तेव्हां त्याची धडपड थांबली. याच्या पायांतहि बिड्या ठोकल्या पाहिजेत, त्याशिवाय हा बधावयाचा नाहीं असें वाटल्यावरून ताबडतोब तशी तजवीज करण्यांत आली; व तदनंतरच आमच्या जीवांत जीव आल्यासारखें झालें.

इतकें झाल्यानंतर शरच्चंद्र ह्मणाला 'खालीं गाडी उभी आहे; त्या गाडींतून आपण याला अदालतींत घेऊन जाऊं. काहो लक्ष्मणसिंग, का गिरधरलाल, शेवटीं या प्रकरणाची कड पोहोंचली नां? आतां तुह्मी मला हवा तो प्रश्न करा! मी कोणतीहि गोष्ट तुमच्यापासून लपवून ठेवीत नाहीं!'

---

खंड पहिलें समाप्त.

# खंड दुसरें.

## भाग १ ला.

### निर्जन वनस्थळ.

कुसुमपुराच्या उत्तरेस भलें मोठें रूक्ष अरण्य आहे. हें अरण्य इतकें भयंकर आहे कीं, त्यांतून जाण्याचें आजपर्यंत कोणत्याही प्रवाशानें धाडस केलें नाहीं. तेथें पक्ष्यांचीसुद्धां वस्ती असेल किंवा नाहीं याची शंका आहे. या प्रदेशाचें ऋतुमानहीं फार विलक्षण आहे. या अरण्यांत कित्येक ठिकाणीं मोठमोठाले पर्वत असून त्याच्या दुर्गम दऱ्यांत अखंड अमावास्याच असते ह्मटलें तरी चालेल. पर्वताच्या शिरोभागीं सदोदित बर्फाचें आच्छादन असतें. खालीं सपाटीवर कित्येक सोंसाट्यानें वाहणाऱ्या नद्या तुडुंब भरलेल्या दिसतात. ह्याप्रमाणेंच तेथील मैदानेंहि अत्यंत विस्तृत असून तीं वर्षांतून कित्येक महिने बर्फाच्छादनानें धवल झालेलीं असतात, तर कित्येक महिने अगदीं कोरडीं असून पांढऱ्या वाळूनें आच्छादलेलीं असतात. ऋतुमानांत किंवा देखाव्यांत कोणत्याहि प्रकारचे फरक झाले तरी उदासपणांत सर्व स्थलांची एकवाक्यताच झालेली दिसते.

या प्रदेशांत कायमचे रहिवासी नाहींत हें सांगावयास नकोच. त्या नीरस प्रदेशांतील कायमचे मिरासदार ह्मटले ह्मणजे अस्वलें वगैरे वन्यश्वापदेंच होत. या अरण्यांत झाडीहि ह्मणण्यासारखी नाहीं. जे कांहीं थोडे वृक्ष असतील त्यांचीही वाढ खुंटलेली व त्यांचें स्वरूप दिसण्यांत अगदीं रूक्ष व उदास असें असतें. या अरण्याच्या एका सीमांतावर एक मली लांबलचक पर्वतांची रांग आहे. पर्वतांच्या आसपासच्या भूप्रदेशांतहि कोठें कोणत्याहि प्राण्याचा वावरा असलेला दिसत नाहीं. नभोमंडळांतून कोणीहि विहंगम कधींहि संचार करीत असलेला दिसत नाहीं, किंवा भूपृष्ठावरूनहि कोणी प्राणी जात येत असलेला दिसत नाहीं. वर्षानुवर्षे कानोसा घेत उभे राहिले तरी कशाचाहि आवाज ऐकूं येणें शक्य नसतें. जिकडे पहावें तिकडे शुक.

या मैदानांच्या एका भागांतून मात्र कांहीं कांहीं ठिकाणीं मळलेली वाट दिसते. ही वाट नागमोडीसारखी गेलेली असून तिचें पर्यवसान कोठें झालें असावें हें मात्र सांगतां येणें कठिण आहे. या वाटेवर कांहीं कांहीं ठिकाणीं गाड्यांची चाकोरीहि उमटलेली दिसते. कोठें कोठें श्वेत-वर्णाच्या वालुकानिचयांत शुभ्र वस्तू सूर्यप्रकाशांत चकाकत असलेल्या दृष्टीस पडतात. कोणीहि माणूस त्याकडे पाहून त्याच्याजवळ जातो आणि मोठ्या आतुरतेनें त्या हातात घेऊन त्यांचें परीक्षण करूं लागतो. हातानें ज्या कठिण वस्तू आपण चापचीत आहोंत त्या वस्तू दुसऱ्या कांहीं नसून जनावरांचीं व माणसांचीं हाडकें आहेत हें ध्यानांत येतांच तो तीं धिक्कारयुक्त मुद्रेनें फेंकून देतो. या अरण्यांतून प्रवास करणाऱ्या सार-वानांची किंवा लमाणांची हीं हाडें हात. त्यांतील जीं मोठीं असतात तीं त्यांच्या वाहनाचीं ह्मणजे उंटांचीं किंवा बैलांचीं हाडें होत.

अशा या विपरीत सृष्टीचें निरीक्षण करीत एक प्रवासी निश्चल उभा-राहिला होता. हा या सर्व वनस्थलांचा एकटा मालक असावा असें त्याच्या मुद्रेवरून दिसें. त्याचें वय चाळीस वर्षांचें होतें कीं, साठ वर्षांचें होतें हें त्याच्या चर्येवरून ठरविणें अत्यंत कठिण होतें. त्याचा चेहरा हडकुळा व भेसूर दिसत असून त्याची त्वचा पिंगट रंगाची होती. त्याचे केस भोवरे व सडक असून मधून पिकलेले होते. त्याचे डोळे खोल गेलेले होते, तरी त्यांत विलक्षण प्रकारचें तेज चमकत होतें. त्याच्या हातांत एक बंदूक होती. त्याचा हात अगदीं हाडकुळा होता. तो आपल्या बंदुकीवर टेंकून उभा होता. त्याची काठीं किडकिडीत व उंच होती; तरी त्याची शरीरप्रकृति चांगली धडधाकट असावी अशी जरा बारकाईनें पाहणाराची तेव्हांच खात्री होई. त्याचा चेहरा आंत ओढलेला असून त्याचे कपडेहि गलिच्छ होते. या मुळेंच त्याचा चेहरा विशेष भेसूर दिसे. तो मनुष्य क्षुधेनें व तृषेनें अगदीं व्याकुळ झाला होता.

कोठें पाणी मिळेल या आशेनें त्यानें अनेक डोंगर पालथे घातले. अनेक मैल मार्ग आक्रमिला; तरी त्यास अद्याप पाण्याची दृष्टादृष्ट होईना ! जिकडे पहावें तिकडे रूक्ष व निर्जन मैदान ! त्याच्या सीमेवर शुष्क पर्वतांच्या रांगा अस्ताव्यस्त पसरलेल्या ! पाण्याची वर्दी देणारा असा

एकही तरू किंवा वनस्पती त्याच्या दृष्टीं पडेना ! आतां आपल्याला प्राणधारणाची कांहीं आशा नाहीं असें वाटून त्याचा चेहरा अगदीं खिन्न दिसूं लागला. उत्तरेस, पूर्वेस, पश्चिमेस तो मोठ्या आशेनें दृष्टिक्षेप करूं लागला, जिकडे पहावें तिकडे एकच मासला ! आतां उगीच तिष्ठत रहाण्यांत तरी काय अर्थ आहे असा विचार करून तो एका शिळेवर बसला, बसण्यापूर्वीं त्यानें आपली बंदूक खालीं ठेवली. तसेंच त्याच्या उजव्या खांद्यावर शालींत बांधलेलें कसलेसें ओझें होतें तेंही त्यानें धरित्रीवर ठेविलें. तें त्याला झेपेनासेंच झालें होतें असें दिसलें; कारण तें त्यानें खालीं ठेविलें म्हणण्यापेक्षां तें आपखुषीनेंच खालीं पडलें असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. तें गाठोडें खालीं पडतांच त्यांतून एक डोकें बाहेर निघून बारीक आवाजही ऐकूं येऊं लागला ! त्या प्राण्याचे डोळे सुंदर असून त्याचा बांधा फारच नाजूक, सुबक व मनोहर होता.

'मला लागलें ना ?' असें तें लहान अर्भक रागावून म्हणालें.

'लागलें ना ? मी मुद्दाम केलें बरें !' असें म्हणून त्या मनुष्यानें शालींतून त्या मुलास बाहेर काढलें. तें मूल म्हणजे दुसरें कोणी नसून एक पांच वर्षांची सुकुमार मुलगी होती. तिचे ते लोकरीचे पायमोजे, अंगातील रेशमी कोट, त्यावर पोपटांचीं वगैरे काढलेलीं मोहकचित्रें इत्यादि सर्व चिन्हावरून त्या मुलीच्या आईचें तिच्यावरील उत्कटप्रेम व्यक्त होत होतें. त्या मुलीचा चेहरा रोड व निस्तेज झालेला दिसत होता. तरी पण तिच्या हातापायाचा गोंडसपणा दृष्टींस पडला म्हणजे त्या मनुष्याइतके तिचे हाल झाले नव्हते हें चटकन लक्षांत येई.

ती मुलगी अद्यापही आपलें डोकें चोळीत आहे हें पाहून त्या मनुष्यानें पुनः तिला विचारलें-'आतां राहिलें ना ?'

त्यावर ती मुलगी म्हणाली-'मला असें कधीं लागलें म्हणजे आई तें हळूंच चोळीत असे. तसें तुम्ही करा; पण माझी आई कोठें आहे ?'

'आई बाहेर गेली आहे; ती लवकरच माघारी येईल.'

'आई मला विचारल्याशिवाय गेली ! मला विचारल्याशिवाय ती यापूर्वीं कधींही गेली नाहीं. आणि आतां तर तिला जाऊन

तीन दिवस झाले ! येथें तर प्यायला पाणीही दिसत नाहीं. आणि खायला अन्नही नाहीं ! '

' बाळ, जरा दम धर. आपल्याला सर्व कांहीं मिळेल. पुनः तूं आपली शालींत नीज कशी ! ह्मणजे तुला बरें वाटेल. पण तें तुझ्या हातांत काय दिसतें आहे ? '

आपल्या हातांतील अभ्रकाचे दोन तुकडे पुढें करून ती ह्मणाली ' मीं आपल्याजवळ गंम्मत ठेवली आहे. घरी जाईन तेव्हां ही मी आपल्या भाऊला देईन. '

' घरीं गेल्यावर याहीपेक्षां चांगली गंम्मत मी तुला देईन. तूं कांहींवेळ दम धर. तूं नदी पाहिलीस ती तुला आठवते का ? '

' हो. मला आठवते. '

' तर मग आतां तशी नदी लवकरच येईल. घाबरूं नकोस अं ! आपला अंदाज कांहीं तरी चुकला; नाहीं तर आपल्याला आतांच नदी लागली असती ! '

' तुह्मी आंघोळ नाहीं केली ? '

' आंघोळ नाहीं केली आणि पाणीही नाहीं प्यालों. आपला बिंदु पहिल्यानें नदींत गेला. नंतर पिलू गेला, मग रेवती गेली. त्यावर जनी गेली आणि मग तुझी आई गेली ! '

मुलगी हुंदके टाकीत ह्मणाली—' काय ? आईही देवाच्या येथें गेली ! '

' होय बाळ, तूं आणि मी कायते राहिलों. या दिशेला आपल्याला नदी लागेल असें वाटलें ह्मणून तुला खांद्यावर टाकून मी इकडे वळलों. परंतु, इकडेही येऊन फसल्यासारखें झालें. आतां देव आपलें रक्षण करणार आहे ! '

आपले हुंदके आंवरून व वर पाहून मुलगी ह्मणाली:—काय ' आपणही आतां मरून जाणार ! '

' तोच लाग आला आहे ! '

यावर मुलगी हसत हसत ह्मणाली—' मग तुह्मी मला पहिल्यानेंच कां नसें सांगितलें नाहीं. मग आतां आईची व आपली लवकरच गांठ पडेल ! '

'होय बाळ, लवकरच पडेल बरें !'

'आणि तूंही आमच्याबरोबर येणार ! मग तर काय मौज होईल ! तूं मला खांद्यावर वागविलेंस असें मी तिला सांगेन. मग तीला कितीतरी आनंद होईल ! एका झारींत पाणी आणि एका ताटलींत ती माझ्यासाठीं भात घेऊन बसली असेल ! आईकडे जायला आपल्याला अद्याप किती अवकाश आहे ?'

'तें कांहीं खात्रीनें सांगतां येत नाहीं; तरी पण फार वेळ लागणार नाहीं.'

त्या मनुष्याचे डोळे उत्तरेच्या बाजूस लागले. नीलवर्ण आकाशांत तीन लहान ठिपके त्याच्या दृष्टीस पडले. ते जसजसे जवळ येत चालले तसतसा त्यांचा आकार वाढूं लागला. ते शेवटीं त्या मनुष्याच्या डोक्यावर फडफड उडूं लागले. आणि अखेरीस एका खडकावर विश्रांतिकरितां बसले. तीं तिन्हीं गिधाडें होतीं. गिधाडांचीं सावली डोक्यावर पडणें ह्मणजे मृत्यूचा शकुनच होय.

त्या गिधाडांकडे बोट दाखवून मुलगी ह्मणाली— 'त्या पहा कोंबड्या !' असें ह्मणून ती टाळ्या वाजवून त्या पक्ष्यांस उठविण्याचा प्रयत्न करूं लागली.

तिनें पुनः प्रश्न केला 'हा देश देवानेंच केला ?'

'होय. देवानेंच केला.' असें त्या मनुष्यानें उत्तर दिलें. मुलीनें हा अचानक प्रश्न विचारलेला पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें.

मुलगी ह्मणाली— 'इतके सगळे देश एकटा देव कसा करील ? मला वाटतें हा देश इतरानें कोणीं तरी केला असावा ! देवानेंच केला असता तर येथें पाणी आणि झाड कां नसावें ?'

'मी देवाचें गाणें तुला शिकविलें होतें तें आतां ह्मणतेस का ?'

'अजून रात्र कुठें झाली आहे ?'

'रात्र नसली झाली ह्मणून काय झालें ? दिवसाचा का देव निजलेला असतो काय ? केव्हांही ह्मटलें तरी त्याला ऐकूं जातेंच.'

'मग तूंच कां ह्मणत नाहींस ?' असें त्या मुलीनें आपल्या बापास उत्तर दिलें.

'मला तें आठवत नाहीं. मीं तें पुष्कळ दिवस झालें ह्मटलें नाहीं. तूं आरंभ कर ह्मणजे मी तें तुला पाहिजे तर ह्मणूं लागतों.'

यावर त्या मुलीनें गाणें ह्मटलें. काय तो तिचा मंजुळ आवाज परंतु योगायोग असा कांहीं विलक्षण आहे कीं, त्याठिकाणीं गिधाडाशिवाय तें गाणें ऐकावयासच कोणी नव्हतें. बापाचा निबर आवाज व मुलीचा बारीक कंठ यांचा मिलाफ किती मधुर लागे. गाणें झाल्यानंतर थोड्याच वेळानें ती मुलगी झोपीं गेली. आपलें आपल्या बापाला केवढें हडदें आहे याची त्या मुलीला कल्पना तरी होती काय ? तीन दिवसपर्यंत अहोरात्र त्याला अलोचन जागरण झालें होतें. शेवटीं त्याचा निरुपाय होऊन त्यालाही झोंपेनें घेरलें. व तोही मुलीला पुढें घेऊन तेथेंच आडवा झाला.

हा मनुष्य आणखी अर्धातासपर्यंत जागा असता तर त्याला एक चमत्कृतिपर देखावा दिसला असता. त्या मैदानाच्या एका टोंकास प्रथम बारीक धूळ उडूं लागली. ती हळूं हळूं वाढत जाऊन तिचा मोठा थोरला लोट झाला; अखेर तो लोट इतका जवळ जवळ येऊं लागला कीं, जवळपास पुष्कळ लोकांचा समुदाय धूळींतून चालत असल्याशिवाय इतकी धूळ कधींही उडली नसतीं असें कोणीही खास अनुमान केलें असतें. तो प्रांत सुपीक असतां तर पिकें खाण्याकरितां गव्यांचा तांडा आला असाही कोणी अंदाज केला असता. परंतु या नापीक व ओसाड प्रदेशांत ही गोष्ट केवळ अशक्य होती. तो धुळीचा लोट त्या झोंपी गेलेल्या माणसास आवृत करूं लागला; तसतशा सामानाच्या गाड्या व त्यांच्या मागून चालत असलेले घोडेस्वार त्यांच्याजवळ येऊन ठेपलें. प्रथम भुताटकीच्या खेळाप्रमाणें जो चमत्कार वाटत होता तो तसा नसून कांहीं सारवानांचा तांडा पश्चिमेकडे चालला होता हें स्पष्ट झालें. पण हा सारवानांचा केवढा तांडा ! त्याची अवाडी डोंगराच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचली तरी क्षितिजावरही पिछाडी दिसेना ! त्या मैदानावर या लोकांचा विस्तीर्ण संमर्द दूरवर पसरला होता. गाड्या, घोडेस्वार, पदाति लोक इतक्यांची एकच खेंच उडून गेली होती. असंख्य स्त्रिया आपल्या डोक्यावर ओझीं घेऊन चालल्या होत्या. ओझ्यांनीं त्या अगदीं बेदम झाल्या होत्या. त्यांचीं मुलें सामानाच्या गाड्यांत टाकलीं होतीं. गाड्या मागून

चालणाऱ्या आपल्या आयांकडे तीं वरचेवर डोकावून पहात होतीं. हे सर्व लोक सामान्य प्रवासी नसून कोठें तरी नवीन प्रदेशांत वसाहत करावयास चालले होते असें त्यांच्या एकंदर कैवारावरून दिसत होतें. जन्मभूमींत निर्वाह चालत नाहीं ह्मणून देशांतर करावें लागण्यानें चेहऱ्यावर दिसून येणारी खिन्नता, नवीन देशांत तरी आपलें बस्तान कसें बसतें याबद्दल त्यांच्या मुद्रेवर दिसत असलेली चिंता या योगानें या लोकांबद्दल कोणास अनुकंपा वाटल्यावांचून राहिली नसती. घोड्यांचें खेंकाळणें चाकांचा खडखडाट, मुलांची किरकीर, स्त्रियांचा एकमेकांशीं चालत असलेला संवाद इत्यादींनीं तें एरव्हीं अत्यंत शांत व निर्जन असलेलें वातावरण अगदीं गजबजून गेलें होतें; परंतु, धरित्रीच्या अंकावर प्रशांत निद्रासुख अनुभवीत असलेल्या आमच्या या दोन प्राण्यांची निद्रासमाधि यत्किंचितही विच्छिन्न झाली नाहीं !

अरण्यांतून चाललेल्या प्रचंड जनसमूहाच्या अग्रभागीं सुमारें वीस घोडेस्वार चालले होत. त्यांची देहयष्टि चांगली मजबूत असून त्यांच्या मुद्रेवर विलक्षण प्रकारचा निर्धार अंकित झाला होता. त्यांच्या हातांत बंदुकी असून त्यांचा पोषाख काळ्या रंगाचा होता. त्यांच्या पोषाखाचें कापड घरींच विणलेलें असावें असें त्याच्या वाणावरून दिसत होतें. डोंगराचा पायथा जवळच दिसूं लागला तेव्हां आपला कूच थांबवून पुढें कोठें जावयाचें यासंबंधानें त्यांचा एकमेकांत विचार चालू झाला. त्यांच्यापैकीं एक अनुभवी व पोक्त गृहस्थ ह्मणाला—याच्या उजव्या बाजूस विहिरी आहेत.

यावर दुसरा ह्मणाला—मग तर आपण पाण्याच्या अगदीं जवळ आलों.

तिसरा ह्मणाला—पाण्याची इतकी काळजी कशाला पाहिजे ? ज्याला खडकांतून पाणी उत्पन्न करतां येतें तो आपली उपेक्षा कधीं तरी करील काय ?

ते सर्वजण आपला प्रवास पुढें चालू करण्याच्या अगदीं बेतांत होते इतक्यांत एक तरुण व चाणाक्ष गृहस्थ पुढें आला, व डोंगराकडे बोट दाखवून ह्मणाला—या डोंगराचा दगड काळा आहे. डोंगराच्या मध्यभागीं पिंगटरंगाची अशी कांहीं वस्तु दिसत आहे. तें श्वापद आहे किंवा माणूस आहे किंवा दुसरें कांहीं आहे याबद्दल खात्री करून घेतल्यावांचून पुढें जाणें सुरक्षित नाहीं.

हें त्याचें बोलणें ऐकतांच सर्वांनीं आपले घोडे खेंचून धरले. व सर्व तांडा एकदम जागच्याजागीं थोंपून राहिला. या डोंगरांत कोणा तरी रानटीजा-तीची वस्ती असावी असा कित्येकांचा तर्क झाला. इतक्यांत एक वृद्ध माहीतगार पुढें येऊन ह्मणाला—

' येथें वस्ती वगैर असेल अशी शंका बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं. वस्ती असलीच तर ती या डोंगराच्या पलीकडे आहे. '

' श्रीनिवासराव, मी पुढें जाऊन पाहून येऊं कां ? ' असें एकानें विचारलें. याच प्रमाणें आणखीहि कित्येकांनीं प्रश्न केले; तेव्हां तो पोक्त गृहस्थ त्यांना ह्मणाला ' तुह्मी आपलीं घोडीं येथेंच सोडा. तुह्मी जाऊन परत येईतोंपर्यंत आह्मीं तुमची येथेंच वाट बघतों. ' असा त्याचा हुकुम होतांच एका क्षणांत कित्येक तरुण माणसें आपल्या घोड्यावरून खालीं उतरलीं व डोंगरावर ती पिंगटरंगाची वस्तू काय आहे हें पाहण्याकरतां तीं पुढें गेलीं. ते भराभरा पावलें टाकीत डोंगराच्या पायथ्याशीं गेले व या दगडावरून त्या दगडावर उड्या टाकीत ते डोंगर चढूं लागले. मैदानावर उभ्या असलेल्या लोकांना ते दिसत होते. जो तरुण मनुष्य सर्वांच्या पुढें चालला होता त्यानें आश्चर्यचकित झाल्यासारखें आपले हात वर केले. त्याच्या अनुचरांच्या तें दृष्टीस पडतांच तेहि काय आहे ह्मणून पाहण्याकरतां धांवत त्याच्या जवळ गेले. त्यांना तेथें जी वस्तु दिसली तिनें त्या तरुण माणसांप्रमाणें त्यांनाहि आश्चर्यचकित करून सोडलें. या डोंगराच्या पहिल्या टप्प्याच्या अखेरीस एक भली मोठी प्रचंड शिळा होती. एक उंच मनुष्य या शिळेस टेकून निजला होता. त्याचें शरीर सडपातळ होतें तरी मजबूत दिसत होतें. त्याची दाढीहि खूप लांब होती. त्याचा चेहरा शांत असून तो गाढ झोंपेंत होता. त्याच्या जवळ एक लहान मुलगी होती. ती त्याच्या गळ्यांत हात घालून निजली होती. तिच्या अनावृत्त ओष्ठप्रांतातून तिची कुंदकळ्यांप्रमाणें दंतपंक्ति, तिच्या सुकुमार मुखश्रीवर विलसत असलेल्या हास्यास अधिकच शोभा देत होती. तिचा गौरवर्ण होता. तिच्या पायांत पायमोजे होते. हीं दोघें निजलीं होतीं त्याच्या पृष्ठभागीं असलेल्या शिळेवर तीन गिधाडें बसलीं होतीं. हीं सर्व मंडळी तेथें पोहोंचल्यानंतर

त्या बिचाऱ्यांची निराशा होऊन तीं खिन्नमुद्रेनें तेथून आकाशमार्गानें निघून गेलीं.

त्या पक्ष्यांच्या ओरडण्यानें तीं दोघें जागीं होऊन गोंधळून भोंवतालीं बघूं लागलीं. झोंपीं जाण्यापूर्वीं जें मैदान ओसाड व निर्जन होतें तेंच आतां माणसांनीं व जनावरांनीं गजबजलेलें पाहून त्या मनुष्याची विलक्षण स्थिती होऊन गेली ! आपल्या डोळ्यालाच कांहीं तरी विकार झाला आहे असें त्यास खास वाटूं लागलें. त्याची मुलगी त्याच्या अंगरख्याचा पदर धरून जवळच उभी राहिली. तिलाहि आपल्या बापाप्रमाणेंच आश्चर्य वाटून ती बावरल्यासारखी चोहोंकडे बघूं लागली.

तुमच्यापुढें दिसतो आहे हा भुताटकीचा बाजार नसून हीं खरोखरच माणसें आहेत अशी त्या लोकांनीं त्याची लवकरच खात्री केली. त्यांच्यांपैकीं एकानें मुलीस कडेवर घेऊन दुसरा त्या मनुष्यास धरून त्यास गाडीकडे घेऊन चालला.

" माझें नांव जनार्दन होय. आह्मी एकंदर एकवीसजण होतों; त्यांपैकीं मी व ती लहान मुलगी हें दोनच काय ते अवशिष्ट राहिलों. आह्मी दक्षिणेकडून प्रवास करीत येत होतों; त्या प्रवासांत तहानेनें किंवा भुकेनें बाकीचीं सर्व माणसें मरण पावलीं " अशी त्या मनुष्यानें त्या लोकांना हकीगत सांगितली.

' ही तुमचीच मुलगी कां ? ' असा त्यांच्यापैकीं एकानें प्रश्न केला.

त्यावर त्या मनुष्यानें उत्तर केलें ' होय. आतां ती माझीच ह्मटली पाहिजे. कारण मींच तिचें संरक्षण केलें. कोणाहि मनुष्याला तिला माझ्यापासून घेतां येणार नाहीं. '

' आपण कोण ? ' असा त्यानें आपल्यासमोर उभा असलेल्या धिप्पाड मनुष्याला प्रश्न केला.

' आह्मी सुमारें दहाहजार माणसें आहों. केवळ धर्मच्छलामुळें आह्मांला आपला देश सोडावा लागला. ' असें त्यांच्यापैकीं एका तरुण-मनुष्यानें उत्तर दिलें.

' आपण कोणत्याधर्माचें आहांत हें कृपाकरून मला सांगाल काय ? '

' आह्मी जगजीवनपंथाचे आहों आमच्या पंथाचा आद्यप्रवर्तक जगजीवन

याच्याकरितां देवानें आकाशांतून सुवर्णपत्रिका टाकली. आमच्या पंथाचा संस्थापक इच्छापूर संस्थानांत जन्माला आला. सुवर्णपत्रिकेवर लिहिलेल्या धर्मतत्त्वांचा ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें तो प्रसार करूं लागला. त्यानें इच्छापूर येथें आमच्या पंथाचें एक मंदिरहि बांधलें. आमच्या पंथाचा संस्थानांत झपाट्यानें प्रसार होत आहे हें पाहतांच तेथील राजानें आमचा परोपरीनें छळ करण्यास प्रारंभ केला. त्या चांडाळापासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून अखेर आम्हांस देशत्याग करावा लागला. ज्या वास्तूंत आमचीं सहस्रावधि वर्षें गेलीं, त्या वास्तूचा त्याग करून केवळ धर्माकरतां आम्ही हा अरण्यवास पतकरला आहों.'

यावर जनार्दन म्हणाला 'मग एकूण तुम्ही जीवनपंथी आहांत? आणि तुम्ही जातां आहांत कोठें?'

यावर ते म्हणाले 'तें आम्हांस माहीत नाहीं. ईश्वराचा आमच्यावर वरदहस्त आहे. आम्हांस मार्ग दर्शविण्यास त्यानें एक अवतारी पुरुष जन्मास आणला आहे. त्याच्याकडे तुम्ही चला, म्हणजे तुमची काय तजवीज करावयाची हें ते सांगतील.'

यावेळेपर्यंत तो सर्व जनसमूह टेंकडीच्या पायथ्यापर्यंत पोहोंचला. त्या मनुष्याकडे व त्याच्या लहान मुलीकडे पाहून जो तो आश्चर्यचकित व सदय अंतःकरणानें तेथें थबकूं लागला. याप्रमाणें या नवीन मनुष्याकडे व मुलीकडे पाहत पाहत तो यात्रेकरूंचा कळप पुढें चालूं लागला. अशा रीतीनें शेंकडों माणसें गेल्यानंतर शेवटीं एक भली मोठी गाडी तेथें आली. ती गाडी फारच उत्कृष्ट रीतीनें शृंगारलेली होती. तिला सहा घोडे जोडलेले होते. गाडीमध्यें एक तरुण व तेजःपुंज मनुष्य बसला होता. त्याच्या चयवरून त्याचें वय तीस वर्षांहून अधिक दिसत नव्हतें! परंतु तोच त्यांचा नायक असावा हें त्याच्या विशाळ भालस्थलावरून व पाणीदार मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें. तो एक मोठा थोरला ग्रंथ वाचीत होता. परंतु लोकांची गर्दी गाडीपुढें जमूं लागली तेव्हां त्यानें तो ग्रंथ बाजूस ठेवला. लोकांकडून त्यास त्या दोन प्राण्याबद्दल सर्व हकीगत समजली. नंतर त्या नवीन मनुष्याकडे वळून तो म्हणाला.

'जर तुम्हाला आमच्या बरोबर यावयाचें असेल तर तुम्ही आमच्या

पंथाची दीक्षा घेतली पाहिजे. विधर्मी लोकांना आम्ही आपल्यामध्यें राहूं देणार नाहीं. कारण मोहरी एवढ्या डागानेंहि सर्व फळ नासून जातें. माझे सर्व लोक तुमच्या संगतीनें भ्रष्ट होण्याची भीति आहे. सबब आमच्यांमध्यें येण्याची आशा करण्यापूर्वीं तुह्मी आमचा पंथ स्वीकारण्यास तयार झालें पाहिजे.'

यावर जनार्दन ह्मणाला 'तुह्मी सांगाल त्या शर्तीवर मी तुह्मांस येऊन मिळण्यास तयार आहे.'

यावर त्या लोकांचा नायक ह्मणाला 'श्रीनिवासराव याला मुक्कामावर घेऊन चला. त्याला व त्या मुलीला खायला प्यायला देऊन दोघांचीहि नीट तरतूद ठेवा. त्याला आपल्या धर्माचीं तत्त्वें नीट शिकवा. येथें आपली बरीच खोटी झाली; चला आतां आपण पुढें जाऊं.'

याप्रमाणें त्यांचा हुकूम होतांच तो सर्व जनसंमर्द पूर्वींप्रमाणें पुढें चालूं लागला. चाबुकाचे आवाज ऐकूं येऊं लागले. चाकें करकर वाजूं लागलीं व तें निर्जन वनहि गजबजल्यासारखें दिसूं लागलें. ज्याच्या दिमतींत तीं दोन माणसें दिलीं होतीं त्यानें त्यांना अन्नपाणी देऊन त्यांची नीट बरदास्त ठेवली. शेवटीं तो त्यांना म्हणाला 'तुह्मी आतां आमच्या जवळच राहणार. थोडक्याच दिवसांत तुमच्या श्रमाचा परिहार होऊन तुमची शरीरप्रकृति ताळ्यावर येईल. परंतु हें मात्र ध्यानांत ठेवा कीं, तुह्मी आजपासून आमच्या पंथाचे आहांत. आमच्या गुरूनें आतां तुह्मांस काय सांगितलें तें तुह्मी ऐकलेंच, त्याचा शब्द ह्मणजे ईश्वराची आज्ञाच होय हें तुह्मी विसरूं नका.'

---

# भाग २ रा.

## सर्व नगरीचें सारसर्वस्व

नवीन प्रदेशांत येऊन वसाहत करणाऱ्या या जगजीवनपंथी लोकांना कोणत्या आपत्ति भोगाव्या लागल्या, किती हाल सोसावे लागले याचें विस्तरशः वर्णन देण्याचें हें स्थळ नव्हे. त्यांच्याइतके करारी प्राणी या भूपृष्ठावर दुसरे क्वचितच सांपडतील. डोंगरांतून, अरण्यांतून, दऱ्या

खोऱ्यांतून त्यांनीं आपला मार्ग मोठ्या निर्धारानें आक्रमिला. मनुष्यभक्षक रानटी द्विपाद् अथवा चतुष्पाद् प्राणी, क्षुधा, तृषा, रोग, थकवा वगैरे निसर्ग-सृष्टींत जेवढे म्हणून प्रत्यवाय मनुष्याच्या आयुष्यक्रमास विघातक होतात त्या सर्वांच्या समुच्चयाशीं टक्कर देऊन त्यांनीं मोठ्या नेटानें, मनोनिग्रहानें आपलें उद्दिष्टस्थान गाठलें. या सर्व आपत्परंपरेनें, व दीर्घकालच्या दग-दगीनें त्यांच्यांतील मोठे मी मी ह्मणणारे सुद्धां मेटाकुटीस आले. अखेर त्यांना एक मोठी थोरली प्रचंड दरी दिसूं लागली. त्या दरीवर सूर्याचा सुंदर प्रकाश पडून ती नेत्राला मोठी आल्हादकारक दिसत होती. कारण याच दरींत आपल्याला वसाहत करावयाची आहे असें त्यांच्या गुरूंच्या तोंडून त्यांना समजलें होतें. ज्याच्याकरितां आजपर्यंत आपण इतके हाल व आपत्ति सोसल्या तें स्थान अगदीं सन्निध आलें हें पाहून त्यांच्या मनास जी कृतकृत्यता वाटली तिची कल्पना कर्तृत्वहीन मनुष्यास होणें दुष्कर आहे. आज जें आपल्यापुढें विस्तीर्ण पटांगण दिसत आहे त्यावरच आपण शहरें वसविणार, तेथेंच कृषिकर्म करून आपण आपला चरितार्थ चालविणार, धर्मच्छलामुळें स्वदेशाचा त्याग करून आपण निघालों याचें भावी पिढ्यांना याच भूमीमुळें हक्कप्रत्यय होणार इत्यादि अनेक प्रका-रचे विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांचें अंतःकरण आनंदमय होऊन गेलें. या विस्तीर्ण वनस्थलीचें नांव प्रमोदारण्य असें होतें.

या प्रमोदारण्यांत आपलें शहर कोठें बसवावयाचें, त्याची लांबी रुंदी काय ठेवावयाची, शहरांत मंदिरांना, विश्रांति गृहांना वगैरे जागा कोणती कायम करावयाची वगैरे संबंधानें त्यांच्या धर्मगुरूंनीं सर्वव्यवस्था मुक्रर केली. निरनिराळ्या स्थानांचें यथार्थ दर्शक असें त्यांनीं मोठाले चित्रपट तयार केले. नगरी भोंवतीं शेतांच्या निरनिराळ्या सीमा ठरवून त्यांनीं एक एक तुकडा प्रत्येकास त्याच्या ऐपतीप्रमाणें व कुटुंब विस्तारा-प्रमाणें वाटून दिला. निरनिराळे हुन्नर करणारीं जीं माणसें होतीं त्यांना त्यांच्या त्यांच्या उद्योगधंद्यांची तजवीज लावून दिली. शहरांत चांगले ऐसपैस रस्ते तयार केले. सर्व प्रदेशांतील सांडपाणी वाहून जाण्याची उत्तम व्यवस्था झाली. जीं घरें शहराच्या अगदीं कडेस होतीं त्यांना अडोसा होण्याकरितां कुसवें किंवा भक्कम तट उभारण्यांत आले.

ही सर्व तजवीज जणू काय जादूची कांडी फिरवूनच त्यानें केली असें त्याच्या अनुयायास वाटूं लागून त्यांचें आपल्या गुरूवरील प्रेम सहस्रपट वृद्धिंगत झालें हें सांगावयास नकोच. शेतांच्या सीमा घालून देण्यांत आल्यावरोबर त्यांत ताबडतोब लागवडही झाली व वसंतऋतूच्या सुमारास सर्व शेतें पिकांनीं सुशोभित होऊन तो सर्व प्रदेश नेत्रास आल्हादकारक दिसूं लागला. त्या वसाहतींत सर्व प्रकारचीं धान्यें, सर्वप्रकारचीं फळें, पुष्पें येऊं लागून हवा तो किराणा जिन्नस मिळूं लागला. नगरीच्या मध्यभागीं एक प्रचंड मंदिर निर्माण झालें. त्याचें शिखर अतिशय उंच होतें. सर्व लोक त्याच्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागले ! अगदीं प्रभातकालापासून तों सूर्यास्तापर्यंत सर्व माणसें आपापल्या उद्योगांत व्यापृत झालेलीं दिसत. रिकामा फिरत असलेला असा एकही मनुष्य दिसत नव्हता. हरएक प्रकारचे क्लेश सहन करून अखेर आपल्याला ही पुण्यभूमि लाभली हें पाहून प्रत्येकाच्या अंतःकरणास अपूर्व आनंद झाला. किंबहुना ही सुवर्णभूमि हस्तगत होण्यापूर्वीं आपल्याला आपत्ति सोसाव्या लागल्या या गोष्टीचें कित्येकांना तर विस्मरणच पडलें. ईश्वराच्या कृपाप्रसादामुळें आपल्याला हे सोन्याचे दिवस दिसूं लागले ही पवित्र भावना मात्र सर्वांच्या ठिकाणीं सदैव जागृत होती. ईश्वराची कृतज्ञतापूर्वक सद्गदित अंतःकरणानें प्रार्थना करण्यास त्यांच्यापैकीं कोणीहि दिरंगबत नसे.

जनार्दन व त्याची कृतककन्या हीं दोघेंही या जनसमूहांत होतीं. मृदुला ही श्रीनिवासाच्या गाडींत होती. त्याच्या तीन भार्या त्याच गाडींत होत्या. त्याचा मुलगा मोठा वात्य होता. तरी पण तो मृदुलेस मोठ्या प्रेमानें वागवी. कालावधीनें तिला आपल्या आईचाही विसर पडूं लागला. त्या स्त्रियांनाही ती फारच आवडती झाली. इतक्या अवधींत जनार्दनही चांगला खडखडीत झाला. मार्गाचा शिणवटा नाहींसा होऊन तो त्या जनसमूहास नगर वसविण्याचे कामीं फार चांगलें सहाय्य देऊं लागला. सर्व माणसांचें त्याच्यावर इतकें विलक्षण प्रेम बसलें कीं, त्याला ते आपला मार्गोपदेशकच समजूं लागले. श्रीनिवास, कविराज, गदाधर व दिनकर हे चौघे जगजीवनाचे मुख्य शिष्य असल्यामुळें

त्या जनसमाजाची सर्व व्यवस्था बहुधा यांच्याच हातून होत असे. जनार्दनास यांच्या खालोखाल मान मिळूं लागला. जगजीवनाचे पूर्वी चार मुख्य कारभारी होते ते आतां पांच झाले.

जनार्दनाच्या वांट्यास जें शेत आलें होतें त्याची त्यानें नीट मशागत करून तें चांगलें सुपीक केलें. त्याच शेताच्या कडेस त्यानें एक मोठी थोरली हवेली बांधली. शेतांतून जसजशी अधिक किफायत होऊं लागली तसतशी त्यानें आपली इमारतही अधिक मोठी करण्यास सुरुवात केली. कालावधीनं ती इमारत इतकी वाढली कीं, तेथें एक लहानसा मोहल्लाच झाला. जनार्दन हा मोठा व्यवहारचतुर माणूस होता. देण्याघेण्यांत तो जसा चोख असे तसेंच त्याचें हस्तकौशल्यही वाखणण्यासारखें असे. त्याची शरीरप्रकृति चांगली निकोप असल्यामुळें त्याच्यानें सकाळपासून सायंकाळपर्यंत हवेतितके शारिरीक श्रम होत असत. इतरांपेक्षां त्याची स्थावर मिळकत विशेष किफायतशीर झाली त्याचें कारण हेंच होय. तीन वर्षांच्या अवधींतच तो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यापेक्षां संपन्न झाला. सहावर्षांत तो बऱ्याच जिनगीचा मालक झाला. नऊ वर्षांत त्याची संपत्ति बरीच वाढून कर्तबगारीबद्दल त्याचा चांगलाच लौकिक वाढला. एक तप उलटलें तेव्हां त्या नगरींत पांच चार माणसेंही त्याच्या इतकी ऐपतदार निघणार नाहींत इतका त्याचा उत्कर्ष वृद्धिंगत झाला. त्या सर्व वसाहतींत त्याचें नांव सर्वतो मुखीं झालें.

जगजीवनपंथांतील सर्व तत्वें त्यास मान्य होतीं; परंतु, त्यापंथानुयायांचे व त्याचें एका बाबतींत मात्र पटेनासें झालें. त्या पंथांत आपल्या पदरीं अंत:पूर ठेवण्याची चाल असे ती त्याला पसंत नसे. त्याला याबद्दल पुष्कळांनीं आग्रह केला; परंतु त्याच्या मनास ही गोष्ट मुळींच पसंत वाटेना. याबद्दल तो कधीं कोणाशीं वादविवाद करीत बसत नसे. आमचा धर्म तूं नीट पाळीत नाहींस असाही त्याचेवर कांहींजण आरोप करूं लागले. धनलोभानेंच हा आपल्या घरीं अंत:पूर ठेवण्याच्या भानगडींत पडत नाहीं असाही त्याच्यावर कित्येकजण दोषारोप करीत. याचें दुसऱ्या कोणा स्त्रीवर प्रेम आहे. ती याच्या पूर्वींच्या वसतिस्थानांतच राहिली म्हणून हा लग्न करीत नसेल असाही कित्येकांनीं संशय घेतला.

सारांश, या त्याच्या वृत्तीसंबंधानें अनेकांचे तर्कवितर्क चालत; परंतु, यांपैकीं कोणासही उत्तर देण्याची त्यानें कधीं तसदी घेतली नाहीं. इतर सर्व बाबतींत मात्र तो त्या पंथाचा अगदीं कट्टा अनुयायी बनला, इतका कीं, कांहीं लोक तर त्याला महात्मा समजूं लागले!

मृदुला ही चांगली सुशील मुलगी होती. तिचें अपत्य निर्विशेष संगोपन करण्यास जनार्दनाच्या हातून यत्किंचितूही कसूर होत नसे. रानांतील मोकळी हवा व डोंगरकठडीचें तेजस्वी वातावरण या योगानें तिची प्रकृति चांगली निकोप होऊन तारुण्याचीं सर्व चिन्हें तिच्या कोमल व मनोहर तनूवर दृश्यमान होऊं लागलीं. तिचें तें सुंदर, सुशील व बाल्यावस्थेंतच प्रौढ दिसणारें स्वरूप पाहून सर्वांना मोठें कौतुक वाटे. त्या हवेलीवरून जाणारे येणारे लोक तिच्याकडे आदरपूर्ण प्रेमानें लक्ष्यपूर्वक पहात असत. बालस्वभावास सहज अशा सलील वृत्तीनें ती शेतांतून इकडे तिकडे उल्लासितवृत्तीनें संचार करीत असे तेव्हां तर अगदीं परक्या माणसाच्या नेत्रांतून सुद्धां आनंदाश्रू पडत असत. तिच्या इतकी सुंदर व सुशील मुलगी त्याच प्रदेशांत काय पण इतरत्रही पहावयास क्वचितच सांपडेल. तिच्या बापाचा उत्कर्ष इकडे परमावधीप्रत जाऊं लागला तसें तिचें सौंदर्यही शुक्लेंदुप्रमाणें वृद्धिंगत होत जाऊन शेवटीं पूर्णेंदुप्रमाणें सर्वांगसुंदर दिसूं लागलें.

मृदुला चांगली प्रौढावस्थेस येऊन पोहोंचली होती. तरी पण ती मोठी झाली होती असें तिच्या बापास मात्र कधींही वाटलें नाहीं. आणि कोठेंही झालें तरी असाच प्रकार असतो. रोज जी वस्तु आपल्या डोळ्यापुढें असते, जिच्यावर आपलें अनन्वित प्रेम असतें, जी आपल्या प्रेमसंगोपनानेंच वृद्धिंगत होत असते त्या वस्तूचें अवस्थान्तर होत आहे ही गोष्ट आपल्याला लोकांनींच सांगावी लागते. आणि मुलीच्या बाबतींत तर ही स्थिति विशेष दृष्टीस पडते. आपण प्रौढ होत चाललों आहों याचें ज्ञान खुद्द मुलीलाही नसतें. तिचे आईबाप, भाऊ किंवा इतर ऋणानुबंधांतलीं माणसें तिच्याशीं पूर्ववतूच लडिवाळपणानें वागत असतात. पुढें एक दिवस असा येतो कीं, तिच्या अंगास कोणी स्पर्श केला किंवा पूर्वीच्या लडिवाळपणानेंच तिच्याशीं कोणी वर्तन केलें कीं, तिला एक प्रकारची भीति

वाटते, एकप्रकारचा संकोच वाटतो व कांहींतरी विलक्षण व अपूर्व प्रकार झाला असें तिच्या अंतर्यामीं वाटूं लागतें. आपल्या प्रौढावस्थेचें तिला सज्ञान होतें तें हेंच क्षण होय. आपल्या आयुष्यक्रमांत अशी वेळ कोणती आली होती हें मात्र कोणासही सांगतां येणार नाहीं. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यांत तें एकदा येतें ही गोष्ट मात्र खास. मृदुलेच्या आयुः-क्रमांत हा काळ फार महत्वाचा होता. आपल्या प्रौढावस्थेचें तिला संवेदन झालें ती गोष्ट फारच विलक्षण होती. त्या गोष्टीचा तिच्या भावी आयु-ष्यक्रमावर परिणाम झाला इतकेंच नव्हे तर त्या एकाच गोष्टीमुळें इतरही कित्येकांच्या चारित्र्यावर परिणाम होऊन त्यांत विलक्षण प्रकारची क्रांति घडून आली.

एकेदिवशीं सकाळीं शेतकरी शेतांतून काम करीत आहेत. मेंढ्यांचा कळप कुरणांत खुशाल चरत आहे. आसपासच्या प्रदेशांतून प्रवासी इकडून तिकडे जात आहेत. कांहींजण रस्त्याच्या कडेस आपलीं घोडीं बांधून किंवा गाड्या सोडून विश्रांति घेत आहेत. अशावेळेस मृदुला झपाट्यानें पावलें टाकीत त्या बहुविध जनसमूहांतून आपला मार्ग आक्रमीत चालली होती. दगदगीनें तिचा चेहरा म्लान झालेला दिसत असून तिचे केश विखुरलेले होते. बापानें तिला कांहीं कामगिरी सांगितली होती ती बजावण्यास ती शहरांत चालली होती. मार्गांत अनेकप्रकारच्या वस्तु होत्या; पण त्याकडे तिचें बिलकुल लक्ष्य नव्हतें. बापानें सांगितलेल्या कर्तव्याच्या ठिकाणीं तिचें मन तन्मय होऊन गेलें होतें. प्रवासी लोक तिच्याकडे विस्मयानें टक लावून पाहूं लागले. त्या प्रदेशांतून येणारे जाणारे लोक सामान्यतः अडाणीच असत; परंतु, मृदुलेची ती सुशील मुद्रा पाहून त्यांच्याही मनांत उदात्त विचारांचा उद्भव झाला.

वाटेंत तिचा एक मळा होता. त्या मळ्यांतील घोडी घेऊन ती तिच्यावर आरूढ झाली होती. त्यानंतर लवकरच ती शहराच्या हद्दीपर्यंत येऊन पोहोंचली. रस्त्यावरून बरींच गुरें चाललीं होतीं. त्यांच्या मागून पांच सहा गुराखी होते. गुरांमधून जाण्यास वाट नव्हती. मध्यंतरीं थोडी फट दिसतांच ती त्या कळपांत शिरून आपला मार्ग पुढें काढूं लागली. इतक्यांत दोन धिप्पाड बैल

तिच्या दोहोंबाजूस शिंगें रोखून उभे राहिलें. गाई बलांची तिला चांगली संवय होती तेव्हां तिला त्या बैलांची विशेषशी भीति वाटली नाहीं. परंतु, दोन्ही बाजूस उभे असलेल्या बैलांचीं शिंगें घोडीच्या कुशीस लागून घोडी उधळली ! व ती बुजून मागच्या दोन पायांवर उभी राहिली. अशा वेळेस चांगला घोडेस्वारही खालीं येता. परंतु मृदुला आपल्या बैठकींवरून यत्किंचित्हि मागें पुढें सरली नाहीं ! घोडीनें पुनः खालीं पाय टेकावेंत व पुनः तिच्या कुशीस बैलांचीं शिंगें लागून तिनें मागच्या पायावर उभे रहावें ! असें कित्येक वेळां झालें. मृदुलेवर हा मोठा बिकट प्रसंग आला होता. घोड्यावरून घसरून ती खालीं पडती तर बैलांनीं शिंगें भोंसकून तिची चांदीच उडविली असती ! खोगीर गच्च आवळून धरून तिनें बैठक हालूं दिली नाहीं. परंतु हा प्रकार कितीवेळ टिकणार ! तिचे डोळे फिरून हात ढिले पडूं लागले. जनावरांच्या खुरांनीं उडालेली धूळ डोळयांत, नाकांत, व तेथून घशांत जात होती. तिचा अखेर निरुपाय झाला. लगाम व खोगीर सोडून आतां खालीं उडी टाकावी, मग पुढें काय होईल तें होवो असा ती मनांत विचार करते आहे तोंच एका मनुष्यानें ' घाबरूं नको, घाबरूं नको ' असे ह्मणून घोड्याचा लगाम खेंचून धरला. त्याबरोबर सर्व गुरें बाजूस होऊन तिला रस्ता मिळाला व ती मोकळ्या मैदानांत येऊन उभी राहिली.

संरक्षणाकरितां धावून आलेला मनुष्य ह्मणाला– ' मुली, तुला लागलें नाहीं ना ? '

त्या धिप्पाड मनुष्याकडे पाहून मृदुला हसून ह्मणाली ' मी फारच भिऊन गेले होते. गाई गुरांच्या कळपास घोडी इतकी बुजेल असें माझ्या कधीं स्वप्नींही आलें नव्हतें. '

' असो. पण ईश्वरानें मोठी खैर केली, तूं खालीं कां घसरली असतीस तर मग मात्र धडगत नव्हती. ' असें तो मनुष्य ह्मणाला. तो मनुष्य चांगला भक्कम असून खूप उंचही होता. त्याचा पोषाख जाडाभरडाच होता. त्याच्या खांद्यावर एक बंदुकही असून तो नुकताच शिकारीहून जाऊन आला असावा किंवा जाण्याच्या तयारींत असावा असें त्याच्या चर्येवरून

दिसत होतें. त्या मुलीकडे नीट न्याहाळून पाहून तो पुनः तिला ह्मणाला ' तूं जनार्दनपंतांची मुलगी ना ? त्यांच्याच हवेलींतून निघतांना मीं तुला पाहिलें. तूं घरीं जाशील तेव्हां त्यांना विचार कीं, जीवनरावची तुमची ओळख आहे का ह्मणून ? मी समजतों तेच ते जनार्दनपंत असतील तर त्यांच्या वडलांचा व आमचा फार ऋणानुबंध होता.'

' मग आपणच घरीं येण्याची तसदी घेऊन त्यांना स्वतः विचाराना ? ' असें तिनें नम्रपणानें उत्तर दिलें.

हें तिचें बोलणें ऐकतांच त्या तरुण मनुष्यास फार समाधान वाटलें. व तो मोठ्या आनंदानें ह्मणाला ' बरें, मीच येईन. आह्मी आणि त्यांनीं दोन महिने एकत्र काढले आहेत तेव्हां ते मला ओळखावयाचे नाहींत असें वाटत नाहीं. '

' माझी तुह्मी या संकटांतून मुक्तता केली हें ऐकून माझ्याप्रमाणेंच त्यांनाही फार आनंद होईल. त्यांचें माझ्यावर पराकाष्ठेचें प्रेम आहे. मी खालीं पडून मला जर का आज गाईबैलांनीं तुडविलें असतें तर त्यांचें अवशिष्ट आयुष्य खास दुःखात गेलें असतें. '

' आणि माझीहिपण तशीच स्थिति झाली असती. '

' काय ! तुमची ! ती कशी ? मला अपघात घडला असता तर तुमच्या मनोवृत्तींत पालट होण्याचें मला तर कांहीं कारण दिसत नाहीं. तुमची माझी आजच प्रथम दृष्टादृष्ट झाली. '

हें तिचें भाषण ऐकून त्याच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता एकदम नाहींशी झाली ! हें पाहून मृदुला हसून पुनः ह्मणाली, ' माझ्या ह्मणण्याचा तसा अर्थ नाहीं, आतां तर तुह्मी आमचे मित्र झाला. तुह्मी आमच्या घरीं आलेंच पाहिजे. पण आतां मला उशीर झाला आहे; मला गेलेंच पाहिजे. बाबा अगदीं माझी वाट पहात बसले असतील. ठीक आहे तर, मी आपला आतां निरोप घेतें. '

ती निघून गेल्यानंतर जीवनराव उदास होऊन आपल्या स्नेह्यांबरोबर पुढें चालता झाला. या नवीन वसाहतीच्या हद्दीवर जा पर्वत होता त्या पर्वताच्या आसपास रुप्याच्या खाणी होत्या. त्या खाणींचा शोध लावून

खाणींचें काम चालूं करण्यास द्रव्यसहाय्य मिळविण्याच्या उद्देशानेंच हा कंपू लवणपुरास चालला होता. या उद्देशांत आतांपर्यंत त्याचें मन अगदीं गढून गेलें होतें. परंतु मध्यंतरी त्या सुशील मुलीची गांठ पडण्याचा योग आल्यामुळें त्याच्या मनाची स्थिति द्विधा होऊन गेली. त्या सुंदर मुलीचें दर्शन होतांच त्याला दुसरें कांहींच सुचेनासें झालें. तिची मूर्ति त्याच्या हृदयांत प्रतिबिंबित होऊन राहिली. वियोगजन्य दुःख ह्मणजे काय याचा त्याला अपरोक्षानुभव त्याक्षणीं आला. त्याचें मन तिच्याबद्दल एकसारखा विचार करूं लागलें. रुप्याच्या किंबहुना सोन्याच्या खाणीही त्या विचारापुढें कःपदार्थ वाटूं लागल्या. त्या कुमारिकेविषयीं त्याच्या मनांत जें प्रेम उत्पन्न झालें होतें तें वर्षाकाळांत येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें क्षणजीवी नसून कायमचें होतें. तरुण अल्लडपोराच्या मनांत एखाद्या वस्तूविषयीं उत्कट प्रेम उत्पन्न होतें; परंतु, भोंवतालीं प्रतिक्षणीं घडणाऱ्या अनेक गोष्टींमुळें त्याचा त्यास तात्काल किंवा कालावधीनें विसर पडतो. प्रौढ मनुष्याचें प्रेम अशाप्रकारचें क्षणिक नसतें. त्या मनुष्याच्या हृदयांत प्रेमानें एकदा वास्तव्य केलें ह्मणजे तें तेथेंच रूढमूल होऊन कालगतीनें कमजोर न होतां उलट वृद्धिंगतच होत जातें. जीवनराव जरी तरुण होता तरी त्याचें हें प्रेम प्रौढस्वरूपाचें होतें. एखाद्या गोष्टीची नुसती हाव धरून स्वस्थ बसणारा तो नव्हता. इष्ट वस्तु प्राप्त करून घेण्याकरितां तो कोणतांही शक्य प्रयत्न शिलक ठेवीत नसे. हातीं घेतलेल्या कोणत्याही कामांत त्याला आजपर्यंत अपयश आलें नाहीं याचें रहस्य हेंच होय.

त्या दिवशीं रात्रीं तो जनार्दनपंताकडे गेला. त्याचें व त्यांचें थोडें बोलणें चालणेंही झालें. त्यानंतर तो वरचेवर तेथें जाऊं येऊं लागला. जनार्दनपंत हे आपल्या शेतीच्या कामांत सदैव इतके गर्क झालेले असत कीं, गेल्या बारावर्षांत जगांत काय उलाढाली झाल्या त्याही त्यांना माहीत नव्हत्या. ही माहिती जीवनराव त्यांना देऊं लागला. वर्णन देण्याची त्याची शैली इतकी कांहीं विलक्षण होती कीं, जनार्दनपंत व मृदुला हीं दोघेंही त्याच्या गोष्टी अगदीं सावधानचित्तानें व मोठ्या आतुरतेनें ऐकत असत. तो अनेक देश हिंडून आला होता व त्याच्या आयुष्यांत अनेक

प्रकारच्या क्रान्ति झाल्या होत्या. इतक्या लहान वयांत येवढा मोठा अनुभव असलेले त्याच्या सारखे थोडेच गृहस्थ सांपडतील. पेढ्यांचीं दिवाळीं कशीं वाजतात, लफंगे लोक भोळया भावड्यांना थापा देऊन कसे लुबाडतात, हल्लींच्या मन्वंत अगदीं दरिद्री मनुष्य अल्पावधींत लक्षाधिपति कसा होतो; उलट अनेक नऊकोट नारायण क्षणार्धांत धुळीस कसे मिळतात याचीं वर्णनें तो देत असे तीं नुसतीं मनोरंजकच नाहींत तर बोधप्रदही असत. जनार्दनपंत जीवनरावांची आतिशय स्तुति करूं लागले. याचा आपला परिचय झाला हें ते मोठे सुदैवच समजत. त्याची जनार्दनपतांनीं प्रशंसा केलेली मृदुलेस अंतर्यामीं फारच आवडत असे. बाहेर ती कधीं बोलून दाखवीत नसे; परंतु जीवनरावाबद्दलचें तिचें प्रेम सामान्य प्रकारचें नसून कांहीं वेगळेंच होतें असें एकंदर लक्षणावरून स्पष्ट दिसूं लागलें.

एके दिवशीं तिचा निरोप घेतांना जीवनराव तिला ह्मणाला ‘ माझ्याबरोबर येतेस का ? बरें पण आतांच मी तुला घेऊन जात नाहीं. मी पुनः येईन तेव्हां मात्र तयारींत अस. ’ तिनें हसून उत्तर दिलें ‘ आपण पुनः केव्हां येणार ? ’

तो ह्मणाला ‘ मला परत येण्यास फार तर दोन महिने लागतील. मग मी तुला सत्तेनें घेऊन जाईन. तेव्हां कोणासही आडकाठी करतां येणार नाहीं. ’

‘ पण आपण बाबांचें मत घेतलें आहे का ? ’

‘ हो तर ! त्यांची पूर्ण अनुमति आहे. फक्त खाणींचें माझें काम चांगलें चाललें पाहिजे अशी त्यांची शर्त आहे. पण त्या शर्तीची विशेषशी फिकीर बाळगण्याचें कारण नाहीं. खाणींचें काम उत्कृष्ट चालणार याबद्दल मला मुळींच धास्ती वाटत नाहीं. ’

‘ तुमचें आणि बाबांचें जर असें ठरलें असेल तर मग आतां कांहीं बोलणेंच राहिलें नाहीं ! ’

यावर शेवटीं तो ह्मणाला ‘ ठीक आहे तर; मग ठरलेंना आतां ! आतां मी येथें जसजसा अधिक थांबेन तसातसा माझा पाय येथें घोटाळूं लागेल. मी यावर दोन महिन्यांनीं येईन; तुझी तयारी असूं दे. ’

असें ह्मणून तो तेथून तडाक्यानें निघाला व घोड्यावर बसला. त्यानें पहिल्यासपाट्यासच घोडा भरधाव सोडला. मागें पाहिलें असतां कदाचित् आपला निश्चय डळमळेल असें वाटूनच कीं काय त्यानें एकदां सुद्धां मागें वळून पाहिलें नाहीं. मृदुला मात्र त्याच्याकडे एकसारखी पहात दारांत उभी होती. तो अंगर्दी दिसेनासा झाला तेव्हां ती घरांत निघून गेली.

---

# भाग ३ रा.

## भार्गवाशीं मुलाखत.

जीवनराव लवणपुरास निरोप देऊन पुढें रवाना झाल्यास आज तीन आठवडे झाले. त्याची परत येण्याची मुदत जसजशी जवळ येत चालली तसतशी जनार्दनपंताच्या चित्तास हुरहुर वाटूं लागली. कारण, त्याचें आगमन व आपल्या मुलीचा वियोग या दोन्ही गोष्टी समकालीनच घडणार असल्यामुळें त्यांच्या मनास चिंता वाटणें साहजिकच होतें. आपल्या मुलीला योग्य पती मिळाला, जीवनराव तिच्या सारखाच सुशील, थोरमनाचा व चाणाक्ष आहे या गोष्टीनें त्यांच्या मनास समाधान होई. त्यांच्या मनाचा पक्का निर्धार झाला होता कीं, प्राण गेला तरी बेहेत्तर परंतु आपली मुलगी जगजविनपंथीयास कदापि द्यावयाची नाहीं. या पंथांतील लोक एकाच वेळीं अनेक बायका करणारे असल्यामुळें त्यांच्यामधील विवाहसंस्काराची पवित्रता भ्रष्ट होते. त्यांचीं इतर धर्मतत्वें कितीही चांगलीं असलीं तरी हें अनेक विवाहांचें तत्व जनार्दनपंतास बिलकुल मान्य नव्हतें. या विषयाचा ते वाच्यांश मात्र कधींही करीत नसत. कारण, या संबंधांतील आपलें मत स्पष्टपणें सांगावें तर आपण पाखंडी ठरून आपल्यावर भलतीच बिलामत यावयाची अशी त्यांना धास्ती होती.

त्या पंथांतील तत्वाविरुद्ध बोलणें म्हणजे खरोखरच त्या नगरींत अतिशय भयंकर होतें. मनुष्य कितीही सद्वर्तनी असला तरी धार्मिक बाबतींत त्याला आपलें तोंड दाबून धरावें लागत असे. पंथाच्या गुरूंची जी

आज्ञा होईल ती शिरसावंद्य मानण्यापलीकडे तेथील लोकांना कोणताही कार्यभाग करावयाचा नव्हता. मतस्वातंत्र्याबद्दल ज्या लोकांनीं देशत्याग केला त्यांच्यामध्यें सुद्धां मतस्वातंत्र्य नव्हतें. पूर्वींच्या देशांत जी गोष्ट त्यांना निंद्य वाटत होती तीच ते आतां स्वतः अमलांत आणूं लागले. पूर्वींच्या भूमींत जो धर्मच्छल त्यांना दोषार्ह व द्वेषार्ह वाटत होता तोच त्यांना आतां आदरणीय वाटूं लागला. इतकेंच नव्हे तर धार्मिक मत-भेदाचा पाडाव करण्याची त्यांनीं जी येथें कडक शिस्त ठेवली होती, ज्या निष्ठुर शिक्षा ठेवल्या होत्या त्या पूर्वींच्यास बऱ्या ह्मणवितील अशा होत्या.

धर्माच्या बाबतींत कोण कसा वागतो, कोण कसा चालतो याबद्दल बातम्या देणारे शेंकडो हेर त्या नवीन नगरांत संचार करीत होते. धर्म-गुरूंस व त्यांच्या मुनीमास हे हव्या त्या बातम्या जाऊन सांगत. कोणा-वर केव्हां कोणता प्रसंग येईल याचा कांहीं भरंवसा नव्हता. एखादा मनुष्य जगजीवनपंथाविरुद्ध आचरण करतो अशी बातमी धर्माधिका-ऱ्यांच्या कानावर गेली कीं, त्या माणसास तावडतोब पाचारण होई. व धर्माधिकाऱ्यांच्या दर्शनास गेलेला मनुष्य पुनः परत येण्याची क्वचितच आशा असे. त्याचें काय होई हें कोणासही समजत नसे. त्याचीं बायका-मुलें तो आतां येईल, मग येईल, आज येईल, उद्यां येईल ह्मणून व्यर्थ वाट पहात बसत. पुनः त्यांची व त्याची गाठ पडण्याचा क्वचितच प्रसंग येई. येवढेंसें कोणी कांहीं बोललें कीं, तें धर्माधिकाऱ्यांच्या कानावर जाऊन त्यास बोलावणें हें यावयाचेंच; आणि तें बोलावणें ह्मणजे यमाच्या येथीलच बोलावणें असल्यामुळें सर्वजण अगदीं भेदरून जात. धर्माधिकाऱ्यांचें निमंत्रण ह्मणजे मृत्युपत्र करण्याची वर्दीच होय असाच सामान्यतः सिद्धांत ठरून गेला होता. पंथाच्या तत्वाविरुद्ध ब्रही काढण्याची कोणाची छाती होत नसे!

जगजीवनपंथ स्वीकारून नंतर पुनः धर्मांतर करणारावर प्रथम या शिक्षांचा रोंख असे. परंतु पुढें पुढें यांची व्याप्ती अधिक अधिक रुंदावत जाऊन शिक्षांच्या कक्षेंत हवा तो मनुष्य सांपडूं लागला. एकेकानें चार चार पांच पांच बायका करावयाच्या असा तेथील रिवाज असल्यामुळें लवकरच

बायकांचा तुटवडा पडूं लागला. तेव्हां त्या प्रदेशांत नवीन येऊन राहणाऱ्या लोकांना ठार करून त्यांच्या मोकळ्या झालेल्या बायकांशीं विवाह लावावयाचा असाही अमानुषप्रकार धर्माच्या नांवाखालीं त्या नगरींत सुरू झाल्याची दाट बोलवा होती. व पुढें पुढें तर हा प्रकार राजरोस रीतीनें होऊं लागला. अशारीतीनें गतभर्तृका केलेल्या स्त्रियांस जबरदस्तीनें बड्या लोकांच्या अन्तःपुरांत लोटण्यांत येत असे. त्या बिचाऱ्या स्त्रिया आपला सर्व जन्म रडूनच काढीत असत. भोंवतालीं असलेलीं सर्व सुखें त्यांना असून नसल्यासारखींच होत. रस्त्यांत प्रवास करतां करतां अपरात्र होऊन कोठें तरी निवाऱ्याच्या जागेंत रातोरात आश्रय करून राहणाऱ्या कुटुंबांपैकीं नेमके पुरुषच नाहींसे होत ! व दुसऱ्यादिवशीं बायकांना कोणातरी धर्मगुरूच्या अन्तःपुरांतील रिकाम्या झालेल्या जागेवर नियोजित करण्यांत येत असे. धर्माधिकाऱ्यांचे हेर अहोरात्र नगरीचा जसा कानोसा घेत तसेंच ते नगरीच्या आसपास येऊन उतरणाऱ्या कुटुंबवत्सल पांथस्थांवरही टेहळणी करीत.

या नवीन नगरींत अशाप्रकारचे जुलमी व अनिष्ट प्रकार प्रत्यहीं घडूं लागल्यामुळें संभावित व निराधार माणसास तेथें राहणें दिवसेंदिवस अधिक अधिक धोक्याचें होऊं लागलें. धर्माधिकाऱ्यांच्या हेरांचें काम कोण करतो ह्याचा कोणासही थांग लागेना. दोन जिवलग स्नेही एकमेकांशीं सुखासमाधानाच्या गोष्टी बोलत असतां ' हा धर्माधिकाऱ्यांचा गुप्त हेर तर नसेलना ' असेंही एकमेकांचें मन एकमेकाबद्दल साशंक होऊन दोघेही जपून बोलूं लागत ! बापाचा मुलास भरंवसा नाहीं, मुलाचा बापास भरंवसा नाहीं अशी त्या नगरीची स्थिति होऊन गेली होती. आपल्या मनांतील गोष्ट प्राण गेल्यानेंही कोणाजवळ बोलावयाची नाहीं अशीच जो तो सावधगिरी बाळगूं लागला.

एकेदिवशीं सकाळीं जनार्दनपंत आपल्या शेतास जाण्याच्या अगदीं बेतांत होते इतक्यांत दरवाज्याची खिट्टी वाजल्याचा त्यांना आवाज ऐकूं आला. ह्मणून ते खालीं पाहूं लागले तों एक मध्यमवयी मनुष्य आपल्याकडेच येत आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या मनुष्यास पाहतांच त्यांच्या पोटांत धस्स झालें. कारण हे गृहस्थ ह्मणजे दुसरे कोणी नसून

भार्गवरावच होत. भार्गवराव ह्मणजे कांहीं लहान सहान गृहस्थ नव्हते. त्यांचें दर्शन ज्याला घडेल त्याच्यावर कांहींना कांहीं तरी अनिष्ट प्रसंग आलाच पाहिजे असा त्यांचा प्रभाव होता ! ते घरांत शिरतांच जनार्दन-पंत त्यांना सामोरे गेले.

दिवाणखान्यांत जाऊन 'या बसा' वगैरे शिष्टाचार झाल्यानंतर भार्गवराव ह्मणाले, 'आमच्या पंथाच्या निःसीम भक्तांचें तुमच्यावर अत्यंत प्रेम आहे. तुह्मी अत्यंत आपत्तींत होता तेव्हां आह्मीं तुह्माला आसरा दिला. तुह्मी उपाशी मरत होतां तेव्हां आह्मी आपल्या तोंडचा घास तुह्मास दिला. आह्मीं तुह्मास जमीन जुमला दिला. आमच्याच संरक्षणाखालीं तुह्मी धनसंपन्न झाला. का ! मी ह्मणतो हें खरें ना ?'

'होय अगदीं अक्षरशः खरें आहे.'

'या सर्व उपकाराबद्दल आह्मीं तुम्हाला एकच शर्त सांगितली. आणि ती तुह्मी मान्य करून आमच्या पंथाची दीक्षा घेतली. परंतु जनापवाद जर खरा असेल तर मी तुह्मास असें निक्षून सांगतों कीं तुह्मी ती शर्त पाळावी तशी पाळली नाहीं.'

'काय, मी तुमच्या पंथाचें उल्लंघन केलें ! तें कसें ? मी तुमच्या धर्माज्ञेप्रमाणें धर्मादाय करतों. मी नियमितपणें मंदिरांत जातों.'

'तें सारें खरें; परंतु, तुमच्या बायका कोठें आहेत ? कृपा करून त्यांना बाहेर बोलावून आणाल काय ?'

'मीं लग्न केलें नाहीं हें खरें आहे. परंतु, त्याचें कारण फार वेगळें आहे. आधीं आपल्या वसाहतीस स्त्रियांचा पुरवठा जरूरीहून कमी आहे. त्यांतून येथें अविवाहित असे कित्येक तरुण गृहस्थ आहेत. आमच्यासारख्या वयोवृद्धांनीं लग्नें करून तरुण माणसांना अविवाहित स्थितींतच राहूं देणें कधींहि श्रेयस्कर होणार नाहीं. शिवाय मी एकटा आहें असांतलीहि कांहीं गोष्ट नाहीं. माझी मुलगी आहे ती फार सुशील आहे. माझें यत्किंचितही ती कोठें कमी पडूं देत नाहीं.'

त्या मुलीसंबंधांतच मी तुमच्याशीं बोलावयास आलों आहे. आमच्या नगरींत तिच्या इतकी सुंदर व सुशील दुसरी मुलगीच नाहीं ह्मटलें तरी चालेल. नगरींतील मोठमोठे अमीर उमरावसुद्धां तिच्याशीं विवाह कर-

ण्यास मोठ्या आनंदानें तयार होतील. अलीकडे गांवांत आपल्या मुली-संबंधानें अनेक गप्पा ऐकूं येतात. कोणी ह्मणतात तिचा वाग्निश्चयही तुह्मीं करून टाकला आहे. मला हें कांहीं खरें वाटत नाहीं. रिकाम्या लोकांनींच ही कंडी पिकविली असावी. आपल्या पंथातली मुलगी पर-धर्मीयास द्यावयाची नाहीं असा आपल्या धर्मांतील कडक निर्बंध आप-णांस माहीत असेलच. अर्थात् आपण अशाप्रकारचा वाग्निश्चय ठरविला असेल हें संभवनीय दिसत नाहीं. '

जनार्दनपंत हा सर्व मजकूर मुकाट्यानें ऐकत होते. त्यांच्या अन्तः-करणांत नानाप्रकारच्या मनोभावना उठत होत्या. परंतु या गृहस्थास स्पष्ट उत्तर देणें धोक्याचें होईल असें वाटून उत्तर देण्याचा मोह त्यांनीं मोठ्या कष्टानें आवरून धरला.

भार्गवराव पुनः ह्मणाला—' तुह्मी आमच्या पंथाचे खरेच आहांत अशी आमची खात्री करून द्यावयाची असल्यास तुह्मी या मुलसंबंधांत आमचें ह्मणणें ऐकून घेतलें पाहिजे. आमच्या परिषदेंत हें मुक्रर ठरलें आहे. मुलगी तरुण आहे, होतकरू आहे. तेव्हां ती भलत्याच्याच पदरीं पडणें चांगलें नाहीं. अशी मुलगी येथील प्रमुख नागरिकांपैकींच कोणाच्यातरी येथें पडली पाहिजे. श्रीनिवासांना एक मुलगा आहे, दिनकरपंतांनाही एक मुलगा आहे, यांच्यापैकीं कोणासही तुह्मीं मुलगी दिली तर मुलीचें कल्याण होईल. यांपैकीं कोणाला मुलगी देण्याची तुमची इच्छा आहे हें एकदां सांगा ह्मणजे त्याप्रमाणें तावडतोब तजवीज करूं. ते तरूण व श्रीमान असून जीवनपंथाचे कट्टे अभिमानी आहेत. तुमचें काय ह्मणणें आहे बोला. '

जनार्दनपंत थोडावेळ विचार करून ह्मणाले, ' ही गोष्ट शरीरसंबं-धाची आहे. तेव्हां घाईनें कोणताही निकाल देणें चांगलें नाहीं. त्यांतून माझ्या मुलीचेंही वय कांहीं मोठें नाहीं; आजच तिचें लग्न करून टाकलें पाहिजे अशांतला कांहीं भाग नाहीं. तेव्हां आपण अशी कांहीं घाई करूं नये अशी माझी विनंति आहे. '

' ठीक आहे तर; आपणास एक महिन्याची मुदत देतों त्या मुदतींत आपण सर्व गोष्टींचा विचार करून आह्मास काय तें कळवा.

असें ह्मणून भार्गवराव जनार्दनपंताचा निरोप घेऊन निघाले. दारापर्यंत गेल्यावर पुनः मागें वळून ते म्हणाले, ' आतां जातांना येवढीच अखेरची गोष्ट सांगतों कीं, यासंबंधांत नीट विचार करा. उगीच घाईनें कांहींतरी निकाल द्याल तर जन्माचें नुकसान करून घ्याल. ' अशाप्रकारचें जरा धमकावल्यासारखें भाषण करून भार्गवराव चालते झाले.

हा संवाद झाल्यानंतर जनार्दनपंत बराचवेळपर्यंत विचार करीत बसले होते. ' आपल्या मुलीला ही वार्ता कशी सांगावी हें त्यांच्यापुढें मोठें कोडें येऊन पडलें. ' इतक्यांत त्यांच्या खांद्यावर हळूच कोणी हात ठेवला. इतका मृदु हात त्याच्या मुलीशिवाय दुसरा कोणाचा असणार ? तिच्या निर्विण्ण व भयभीत झालेल्या मुद्रेकडे पाहून त्यांची खात्री झाली कीं, आपला संवाद हिनें सायंत ऐकला.

इतक्यांत ती ह्मणाली–' बाबा, माझा निरुपाय झाला. तो इतका मोठ्यानें बोलला कीं, त्याच्या आवाजानें सर्व घर दुणाणून गेलें. बाबा, आतां आपण काय करावयाचें ? त्याचा बोलण्याचा स्वर कांहीं विपरीतच दिसत होता. '

तिला जवळ घेऊन जनार्दनपंत मोठ्या प्रेमळपणानें ह्मणाले ' बाळ, अशी भिऊं नकोस. यांतूनही आपण कांहीं मार्ग काढूं. त्याच्याबद्दलचें तुझें प्रेम कायम आहे ना ? '

यावर कांहीं उत्तर न देतां ती लाजेनें खालीं मान घालून बसली.

' छे, तुझें प्रेम कधींही कमी होणार नाहीं. आणि व्हावें अशी माझी इच्छाही नाहीं. तो पुरुष तसाच तरतरित, पाणीदार, व खुपसुरत आहे. शिवाय तो आपल्या धर्माचा आहे. या लोकांनीं आपल्या धर्माचा कितीही डांगोरा पिटविला तरी त्यांतील कित्येक तत्वें अमानुषपणाचीं असून नीतिमत्तेचा ऱ्हास करणारीं आहेत. उद्यां जीवनरावाच्या मुक्कामाला येथून एक माणूस जावयाचा आहे त्याच्याबरोबर मी एक पत्र देतों. येथील सर्व स्थिति मी त्या पत्रांत लिहितों. पत्र वाचल्यावर एक क्षणाचाही विलंब न लावतां तो इकडे तात्बडतोब निघून येईल अशी मला खात्री वाटते. '

बापानें जीवनरावाचें केलेलें वर्णन ऐकून त्या स्थितींतही किंचित् स्मित केल्याशिवाय तिच्यानें राहवलें नाहीं.

‘ पुढें कोणता मार्ग स्वीकारावयाचा हें तो येथें आल्यावर आपणास उत्कृष्टरीतीनें समजेल. खरें ह्मणशील तर खुद्द माझ्यासंबंधानें मला मुळींच भीति वाटत नाहीं. जीवनपंथी लोकांचें ह्मणणें तुला मान्य नाहीं असें त्यांच्या कानावर गेल्यास ते तुझी काय अवस्था करतील याबद्दल मी विचार करूं लागलें म्हणजे माझ्या मनास फारच दुःख होतें. ’ हें तिचें भाषण ऐकतांच जनार्दनपंत म्हणाले ‘ पण अद्याप आपण त्यांना ‘ नाहीं ’ म्हणून कोठें सांगितलें आहे ? अद्याप आपणास एक महिना अवधि आहे. महिना संपण्यापूर्वींच आपण ही नगरी सोडून जाऊं. ’ यावर तिनें आश्चर्यानें उत्तर दिलें ‘ काय ही नगरी सोडून जावयाचें ? ’

‘ बहुधा आपल्यावर तोच प्रसंग येणार. ’

‘ मग आपल्या शेतवाडीचें कसें होणार ? ’

‘ शेत आपण कोणास खरेदी देऊन टाकूं. काय येतील ते पैसे येतील; उगीच घासाघीस करीत बसूं नये म्हणजे झालें. खरें म्हणशील तर हा विचार माझ्या मनांत आज कित्येक दिवसांपासून चालला आहे ! मला त्या जगजीवनाची किंवा कोणाचीही भीति वाटत नाहीं. मी कोणाला भिऊन राहावयाचा नाहीं. मीं असे धर्मगुरु कित्येक पाहिले आहेत. माझ्या मनांत आलें नाहीं तोंपर्यंत, नाहींतर मी या पाखंडी लोकांची एक क्षणभरही प्रतिष्ठा बाळगणार नाहीं. ’

‘ पण आपल्याला ते हें गांव सोडून देणार नाहींत. ’

त्याबद्दल इतकी काळजी करण्याचें कारण नाहीं. जीवनराव एकदां येऊं दे ह्मणजे एका क्षणांत आपण सर्व व्यवस्था जमवून टाकूं. पण तुला माझें येवढें सांगणें आहे कीं, तूं अशी दुःख करीत बसूं नकोस. तुझे असे लाल झालेले डोळे पाहून कोणी चाणाक्ष मनुष्य आपली स्थिति चटकन् ओळखून धर्माधिकाऱ्यांना ही वर्दी देईल. ’

बापानें अशाप्रकारें तिला धीर दिला. तिचेंही त्यायोगानें समाधान झालें. परंतु, आपल्या बापाला अंतर्यामीं ही गोष्ट बोचत होती, त्याच्या मनालाही या धास्तीचा काच होता हें एकंदर रंगावरून

तिच्या लक्षांत येण्यास चुकलें नाहीं. त्यादिवशीं रात्रीं त्यानें विशेष सावधगिरीनें दरवाजे बंद केले. आपली बंदुकही भरून सज्ज करून ठेवली. न जाणो कोण्यावेळेस कोणता प्रसंग ओढवेल याचा त्याला भरंसा नव्हता.

---

# भाग ४ था

## जीवनकलह

दुसरे दिवशीं सकाळीं पहाटे उठून जनार्दनपंत शहरांत गेले व जीवनरावच्या मुक्कामास जावयास निघणाऱ्या गृहस्थाची त्यांनीं गाठ घेतली. आपल्यावर कोणता प्रसंग आहे, त्यांतून पार पडण्याची लवकर तोड काढणें कसें अवश्यक आहे वगैरे गोष्टींचा खुलासा करून जीवनरावास ताबडतोब निघून येण्यास त्यांनीं पत्रांत लिहिलें होतें. तें पत्र त्या गृहस्थाजवळ पोहोंचतें केल्यावर त्यांचा जीव अंमळ खालीं पडला.

आपल्या हवेलीकडे ते परत येतात तों दाराशीं घोडा बांधलेला त्यांच्या दृष्टीं पडला. त्याबरोबर आश्चर्यचकित होऊन ते भरभर पावलें टाकूं लागले. आपल्या बसावयाच्या खोलींत ते प्रवेश करतात तों तेथें दोन माणसें बसलीं आहेत असें नजरेस पडतांच ते अगदीं गोंधळून गेले. त्यांतील एकाचा चेहरा चिंचोळा असून फिकट दिसत होता. तो तेथें एका खुर्चीवर ऐटींत टेकून बसला होता. दुसरा एक बैलासारखी मान असलेला धटिंगण खिडकीशीं शीळ घालीत मजेंत उभा होता. जनार्दनपंत आंत येतांच दोघांनींही त्यांना नमस्कार केला. आणि खुर्चीवर असलेल्या मनुष्यानें प्रथम बोलण्यास सुरुवात केली.

तो ह्मणाला -- आपण कदाचित् आह्माला ओळखीत नसाल. हे दिनकरपंतांचे चिरंजीव; आणि माझें नांव श्रीनिवास. आपण ज्याच्या बरोबर प्रथम प्रवास केला तोच मी गृहस्थ. महाराजांनीं आपणास माझ्याच दिमतींत दिलें होतें.

यावर दुसरा म्हणाला---महाराजांची गोट कशाला पाहिजे ? ते एका शब्दाच्या प्रभावानें इकडची सृष्टि तिकडे करतील !

आपल्या येथें आलेले हे उपटसूळ कोण असावे हें आतां जनार्दनपंतांच्या लक्ष्यांत आलें !

कांहीं वेळ सर्वजण एकमेकांकडे पहात स्वस्थ राहिले. थोड्या वेळानें श्रीनिवास म्हणाला ' आम्ही दोघेहीजण आमच्या तीर्थरूपांच्या सांगण्यावरून आपल्या कन्येस मागणी घालण्याकरतां आलों आहों. आमच्यापैकीं जो आपणांस पसंत पडेल त्यास आपण मुलगी द्यावी. मला चार बायका आहेत. हे धाकटे दिनकरपंत यांना आतांच सात बायका आहेत; तेव्हां तुमच्या मुलीवर अर्थातूच माझा हक्क अधिक पोहोंचतो. '

यावर दुसरा म्हणाला ' अहो, श्रीनिवासराव उगीच भलत्याच गोष्टी सांगूं नका. कोणाला किती बायका आहेत हा येथें प्रश्न नाहीं. बायका करणें सोपें आहे; पण त्यांचें संगोपन झालें पाहिजे. अधिक जिनगी कोणापाशीं आहे हाच यासंबंधांत मुख्य मुद्दा आहे. माझ्या बापानें आपली सर्व जिनगी माझ्या नांवानें करून दिली आहे. तुमच्याजवळ सत्तेची कांहीं जिनगी आहे का ? '

' आतां माझ्याजवळ कांहीं नसलें म्हणून काय झालें ? वडलांच्या पश्चात् तर मी तुमच्यापेक्षां सधन होईन ! बरें आमच्या वडलांचें वयही पाहिलें तर त्यांच्यामध्यें व मरणामध्यें, आतां कांहीं फारसा अंतर उरला नाहीं. शिवाय मी तुमच्यापेक्षां वयानें मोठा आहे. आणि लोकांत माझी मान्यताही तुमच्याहून अधिक आहे ! '

' पण आपआपल्यांत हा वाद माजविण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तुमच्या आमच्यांत कोण सरस आहे हें पाहणें त्या मुलीचें काम आहे. '

बाजार भरण्यास अद्याप ठिकाण नाहीं आणि उचल्यांनीं कंबरा बांधल्या, तशांतला हा प्रकार पाहून जनार्दनपंत अत्यंत संतप्त होऊन गेले होते. घोड्याचा चाबूक काढावा आणि दोघांनाही लंबे करून सोडावेत असें त्यांना वाटूं लागलें.

शेवटीं आपला राग आंवरून ते ह्मणाले— ' आपला विवाहाचा संकल्प माझ्या मुलीकडून जाहीर होईतोंपर्यंत तुह्मी येथें येण्याचा व्यर्थ

शीण घेऊं नये येवढेंच माझें तुह्मां दोघांनाही निक्षून सांगणें आहे. तशी वेळ येईतोंपर्यंत माझा उंबरठाहि चढण्याचें आपल्याला कारण नाहीं !'

हें त्यांचें निग्रहाचें बोलणें ऐकून ते दोघेही विस्मयानें एकमेकांकडे पाहूं लागले. आपणासारखे सधन गृहस्थ याच्या मुलीला मागणी घालताहेत असें पाहून यास वास्तविक धन्यताच वाटली पाहिजे होती. आणि हा तर आपल्याला तिरस्कारानेंच वागवीत आहे यामुळें त्यांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें हें सांगावयास नकोच.

हे अद्यापही आपल्या घरांतून चालते होत नाहींत हें पाहून जनार्दनपंत शेवटीं निकरावर येऊन ह्मणाले 'हें पहा, या घरांतून बाहेर जाण्यास दोन मार्ग आहेत. एक आपण आलांत त्या रस्त्यानें ह्मणजे सरळ दरवाज्यांतून; व दुसरें या खिडकींतून ! दरवाज्यांतून जाण्याची तसदी घ्यावयाची नसल्यास पाहिजे तर खिडकींतूनेंच रवानगी करतों !'

त्यांचा चेहरा रागानें लालभडक झाला होता. डोळ्यांतून ठिणग्या पडतात कीं काय असें वाटूं लागलें ! त्यांचे ओंठ थरथर कापूं लागले. त्यांचें तें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून ते दोघेही भेदरून गेले व दोघांनींही निमुटपणें दाराचा रस्ता सुधारला ! दारापर्यंत जनार्दनपंतही त्यांच्या मागोमाग गेले.

दारांत गेल्यावर ते ह्मणाले--' 'कोणत्या रस्त्यानें जावयाचा तुमचा विचार ठरला हें सांगितल्याशिवायच तुह्मी चालला !'

दाराच्या बाहेर पडल्यावर श्रीनिवास मागें वळून म्हणतो—कोणाशीं गांठ आहे हें तुमच्या ध्यानांत आलें नाहीं वाटतें ? बरें आहे समजेल आतां ! धर्माधिकाऱ्यांची आज्ञा उल्लंघन करण्याचे काय परिणाम होतात याचा लवकरच अनुभव येईल !

धाकटे दिनकरपंतही ( यांच्या वडलांना थोरले दिनकरपंत म्हणत ) मिशीवर ताव देऊन म्हणाले, ' आपण धर्माज्ञेचा उपमर्द केला आहे; पण संभाळून असा; याचें पारिपत्य लवकरच होईल !

' बरें आहे ! मीही पाहून घेईन ' असें जनार्दनपंत रागानें ह्मणाले. त्यांच्या मुलीनें येऊन मध्यंतरींच त्यांना आडवून धरलें नसतें तर त्यांनीं माडीवर जाऊन बंदुक खालीं आणली असती व ती या दोघांवर झाडली

असतो ! मुलीच्या हातून सुटण्याचा ते प्रयत्न करीत आहेत तोंच घोड्याच्या दवडण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला व ते दोघही बरेच दूर गेले.

आपल्या कपाळावरचा घाम पुसून ते ह्मणाले—' कोण मूर्ख आहेत हो ! लोकांना अन्नूची बिलकुल चाड नाहीं ! इतके हलकट लोक कोणत्याही देशांत नसतील ! '

त्यावर बराचवेळ थांबून ते आपल्या मुलीस ह्मणाले ' यांच्यापैकीं कोणाशींही विवाह होण्यापेक्षां तुला मरण आलेलें पुरवलें ! '

' यावर मृदुला हळूंच ह्मणाली ' होय बाबा, मलाही असेंच वाटतें; पण जीवनराव आतां लवकरच येथें येतील. '

' होय, माझीही तशीच अटकळ आहे. तो जितका लवकर येईल तितकें तें आपणास इष्टच आहे. कारण आतां यापुढें कोणतें लचांड उपस्थित होईल. याचा कांहीं भरंवसा सांगता येत नाहीं ! '

जनार्दनपंत आतां वृद्ध झाले होते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांना सहाय्य देण्यास कोणीतरी मनुष्य जितक्या लवकर मिळेल तितकें अवश्य होतें. धर्माधिकाऱ्यांची आज्ञा उल्लंघन केल्याचें या वसाहतींत येवढें मोठें उदाहरण दुसरें घडलेंच नव्हतें. येवढीशी चुकी झाली तर त्याबद्दलही भयंकर शिक्षा होत असे; मग या गुन्ह्याच्या वाट्यास काय येईल याचा तर विचार करावयाचेंच कारण नव्हतें. या समयीं आपली इभ्रत व पैसा याचा बिलकुल उपयोग होणार नाहीं हे जनार्दनपंत जाणून होते. त्यांच्या प्रमाणेंच इभ्रतदार व धनसंपन्न अशा कित्येक माणसांना पूर्वीं देहान्तशासन किंवा हद्दपारीची शिक्षा मिळून त्यांची जिनगी, चीजवस्त वगैरे सर्व देवस्थानाकडे किंवा मठाच्या सरंजामांत जमा झालें होतें याबद्दलचीही हकीकत जनार्दनपंतांना माहीत होती. ते फार शूर व निर्भय गृहस्थ होते; परंतु आपल्यावर काय प्रसंग येणार हा विचार त्यांच्या मनांत आला ह्मणजे त्यांचेंही देहभान नाहींसें होऊन जाई. असुक एक संकट आपल्यावर येणार आहे हें जर त्यांना निश्चितपणें कळतें तर ते इतके डगमगले नसते; परंतु या संकटाच्या अनिश्चितपणामुळें त्यांच्या चित्तास अहर्निश एकसारखी चिंता लागून राहिली. तरी

पण ही आपल्या मनाची स्थिति आपल्या मुलीस कळूं नये ह्मणून त्यांनीं शक्य ती खबरदारी घेतली. परंतु मृदुलेच्या चाणाक्ष नजरेपुढें खरी गोष्ट छपून राहणें अशक्य होतें. आपल्या बापास हृद्रोगानें पछाडलें आहे ही गोष्ट तिच्या लक्ष्यांत येऊन तिलाही परमावधीचें दुःख झालें.

भार्गवरावांकडून ताबडतोब कांहीं तरी निरोप येईल अशी त्यांची अटकळ होती आणि ती निरर्थकही झाली नाहीं. ज्या बाजूनें हा निरोप समजेल असें त्यांच्या स्वप्नींही येणें संभाव्य नव्हतें त्या बाजूनें हा निरोप त्यांना समजला. दुसरे दिवशीं सकाळीं ते आपल्या अंथरुणावरून उठून पहातात तों उशाशीं एक चिट्ठी पडली आहे असें त्यांच्या नजरेस पडलें.

'एकोणतीस दिवस तुझ्माला विचार ठरविण्यास मुदत दिली आहे; तितक्या अवधींत तुमचा योग्य विचार झाला नाहीं तर-'

असा मजकूर या चिट्ठींत होता. 'तर' याच्यापुढें कांहींच लिहिलें नव्हतें, येवढ्यानेंच त्यापुढील मजकूर काय होता याची जनार्दनपंतांना उत्कृष्ट कल्पना आली. हा निरोप आपल्या निजावयाच्या खोलींत कोणी आणून टाकला याचा मात्र त्यांना कांहींच सुगावा लागेना! खोलीच्या बाहेर नोकर चाकर निजलेले होते, दारें व खिडक्या रोजच्या प्रमाणेंच लावलेल्या होत्या; मग हा कागद आंत कसा आला याबद्दल त्यांना अचंबा वाटूं लागला. त्यांनीं त्या कागदाची गुंडाळी करून तो बाहेर टाकून दिला; त्याबद्दल मुलीला कांहींच कळविलें नाहीं. परंतु, त्यांच्या मनांत मात्र ता विचार एकसारखा चालूं राहिला. 'एकोणतीस दिवस तुझ्माला मुदत दिली आहे' याचा अर्थ इतकाच कीं, महिन्यांतला एक दिवस कमी झाला. इतक्या अजबरीतीनें येथें चिट्ठी आणून टाकणारा माणूस खरोखरच अमानुष शक्तीचा असला पाहिजे. त्याच्या कारस्थानास टक्कर देणें केवळ अशक्य होय. आपण कोणतीही गोष्ट केली तरी ती याच्या नजरेंतून लपून राहणें दुर्घट होय. हा विचार मनांत येऊन त्यांना एकसारखी तळमळ लागून राहिली.

दुसऱ्या दिवशीं तर त्यांच्या मनास याहीपेक्षां जबर धक्का बसला! दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते दिवाणखान्यांत बसले असतां मृदुला आश्र-

यांनें ह्मणाली ' बाबा, तें पाहिलेंत का पाटणीवर काय लिहिलें आहे तें ! ' वर मान करून पाहतात तों तुळईवर ' २८ ' हीं अक्षरें कोळशानें लिहिलेलीं जनार्दनपंतांच्या दृष्टीस पडलीं. मृदुलेला याचा कांहींच अर्थ समजला नाहीं. परंतु जनार्दनपंतांना त्याचा भावार्थ चट्कन् समजला ! हातांत बंदूक तयार ठेवून त्या रात्रीं ते एकसारखा पहारा करीत बसले. त्यांना कोणाची चाहूल ऐकूं आली नाहीं किंवा कोणी मनुष्यही दिसलें नाहीं. तरी दुसऱ्या दिवशीं सकाळीं तुळईवर ' २७ ' हा आंकडा लिहिलेला दिसला !

याप्रमाणें दिवसामागें दिवस जात चालला तरी रोज एक एक आंकडा कमी करण्यांत येऊन ही नोंद तेथें हटकून असावयाचीच असा अव्याहत क्रम चालला. कित्येक प्रसंगीं हे आंकडे दारावर लिहिलेले असत तर कित्येकवेळां भिंतीवर लिहिलेले असत. कोठें तरी सहज दृष्टीं पडावे अशा ठिकाणीं ते लिहिलेले असत. जनार्दनपंतांनीं आपल्या प्रयत्नाची शर्थ केली; परंतु हें गौडबंगाल काय आहे हें कांहीं त्यांच्या लक्ष्यांत येईना ! हा कांहीं तरी भुताटकीचा खेळ असला पाहिजे अशीही त्यांच्या मनास भीति वाटूं लागली. त्यांना एकक्षणभरही सुखाची झोंप येईना. त्यांना स्वतःलाच जणूं काय एखाद्या भुतानें पछाडलें आहे अशी त्यांची स्थिति झाली. आतां त्यांची भिस्त काय ती जीवनरावावर होती. या संकटांतून आपली मुक्तता करणें जर कोणास शक्य असेल तर तें त्यालाच होय. येवढीच त्यांना आशा वाटत होती.

वीसांचे पंधरा दिवस राहिले, पंधरांचे दहा राहिले तरी जीवनरावांकडून कांहींच खबर समजेना ! मुदतीचे दिवस कमी कमी होत चालले. आतां आपली स्थिति तरी काय होणार या विचाराची त्यांना एकसारखी जांचणी लागली. जरा कोठें गाडी आल्याचा आवाज ऐकूं आला किंवा घोड्याच्या टापा वाजल्या कीं, यांनीं खिडकी बाहेर तोंड काढून पहावें व पुनः निराश होऊन आंत जावें असा क्रम चालू झाला. अखेर मुदतीचे चार दिवस राहिले; चारांचे तीन झाले तरी जीवनरावाचा पत्ता नाहीं ! या संकटांतून आपला बचाव होण्याची आतां आशा नाहीं ! आपण एकटे आहों ! शत्रु अत्यन्त प्रबळ आहे; येथील दुष्ट लोक त्यांच्या

आड वाटा आपणास माहीत नाहींत. हमरस्त्यावर जीवनपंथी लोकांचा एकसारखा पहारा उभा ! परवान्याशिवाय कोणालाही गांव सोडून जातां येत नाहीं. कोणत्याही रस्त्यानें जा धर्माधिकाऱ्यांचे दूत रस्त्यावर उभे ठाकलेलेच ! आतां आपली अवस्था काय होणार याबद्दल ज्ञाताऱ्याला धास्ती वाटूं लागली. प्राणावर बेतली, दुसऱ्या कोणत्याहीप्रकारची भयंकर आपत्ति सोसावी लागली तरी आपल्या मुलीचा भलत्या म्हणजे नेमस्तवरा शिवाय इतर गृहस्थांशीं संबंध कधींही होऊं द्यावयाचा नाहीं, हा त्यांचा निश्चय मात्र यत्किंचितही चळला नाहीं.

एके दिवशीं सायंकाळीं ते आपल्या स्थितीबद्दल एकाग्रतेनें विचार करीत बसले आहेत; अडचणींतून मार्ग कसा काढावा याबद्दल एकामागून एक उपाय त्यांना सुचावे व ते सर्व शेवटीं निष्फळ वाटावे असा क्रम चालला होता. त्यादिवशीं घराच्या भिंतीवर ' २ ' हा आंकडा लिहिलेला होता. त्यापुढचा दिवस म्हणजे आपल्या मुदतीचा आखेरचा दिवस ! त्यादिवशीं आपल्यावर कोणता प्रसंग ओढवणार बरें ? त्यांच्या मनांत नानातऱ्हेच्या कल्पना येऊं लागल्या आणि आपली मुलगी—आपल्या-मागें तिची अवस्था काय होईल, आपल्या भोंवतीं जें जाळें पसरण्यांत येत आहे त्यांत आपण पुरतेपणीं गुरफटलेच जाणार काय ? आपण याप्रसंगीं अगदीं नादान हतवीर्य होऊन बसलों हें पाहून त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले.

पण हा आवाज कशाचा ऐकूं येत आहे बरें ? सर्वत्र सामसूम झालेलें आणि त्यांत भिंतीवर कोणी खरडतें आहे असा त्यांना आवाज ऐकूं येऊं लागला. हा आवाज घराच्या दरवाज्याजवळ होत असावा असा त्यांचा ठाम तर्क झाला. मध्यंतरीं तो आवाज थांबे व थोडा काळ गेला कीं पुन: सुरू होई ! दरवाजाच्या फळीवर कोणीतरी टिचक्या मारीत असावें किंवा खरडीत असावें याशिवाय असा आवाज ऐकूं यावयाचा नाहीं. हा मनुष्य खून करावयास तर आला नसेलना ? धर्माधिकाऱ्यांनीं हा आपल्याकडे मारेकरी पाठविला आहे कीं काय ? तुझ्या आयुष्याचा हा शेवटचा दिवस आहे अशी दारावर नोंद करण्यास सत्ताधाऱ्यांचा हा कोणी दूत नसेल ना ? अशा नानाप्रकारच्या

कल्पना त्याच्या मनांत घोळूं लागल्या. या अशा अनिश्चित अवस्थेपेक्षां मरण बरें असें त्यास होऊन गेलें! तरीपण मोठ्या धैर्यानें उठून त्यानें दरवाजाचें आडसर काढलें व दरवाजा उघडला. बाहेर पहातां तों सर्वत्र अगदीं सामसूम! अपरात्रींचीच ती स्तब्धता! मग शांततेस काय विचारावयाचें आहे? आकाश अगदीं निरभ्र असून चांदण्या चक्क दिसत होत्या. हवेली समोरील बगीच्यांतही माणसाची चाहूल कोठेंही दिसेना! त्यानें डावीकडे पाहिलें, उजव्या बाजूस पाहिलें, कोठेंही कोणी दिसेना. तेव्हां त्याचा जीव अंमळ खालीं पडला. दार लावून आंत जाऊन निजावें असा जनार्दनपंत मनांत विचार करीत आहेत तोंच त्यांची दृष्टि सहज खालीं जमीनीवर गेली. दाराच्या उंबरठ्या लगत एक माणूस भिंतीशीं अगदीं खेटून सपशेल पालथा पडला आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्यांची स्थिति काय झाली असेल याचें वर्णन देण्यापेक्षां कल्पनाच करणें बरें!

तो विपरीत देखावा पाहतांच त्यांचें काळीज अगदीं चरूर होऊन गेलें! मोठा थोरला ओरडा करून आसपासचीं माणसें जागीं करावींत असें त्यांना वाटलें परंतु त्यांनीं तो मोह मोठ्या कष्टानें आंवरून धरला. तो मनुष्य जखमी होऊन किंवा मरून तेथें पडला असावा असा त्यांचा प्रथम समज झाला. परंतु त्यांची त्या मनुष्याकडे नजर जातांच तो सापासारखा सरपटत सरपटतच घरांत शिरला. त्याच्या सरपटण्याचा यत्किंचितही आवाज झाला नाहीं. सर्व देह घरांत शिरतांच तो ताडकन् उभा राहिला. व दरवाजा लावून जनार्दनपंतांच्या पुढें आला तो कोण आहे हें पाहण्याची सुद्धां जनार्दनपंतांची प्रथम छाती होईना. शेवटीं मोठा धीर करून त्यांनीं त्याच्याकडे पाहिलें तेव्हां घरांत शिरलेला मनुष्य दुसरा कोणी नसून ज्याच्याकरितां आपण रात्रंदिवस वाट पहात बसलों आहों तो जीवनरावच होय अशी त्यांची खात्री होतांच ते आनंदानें ह्मणाले—' वः जीवनराव! इतकावेळ ज्यांना मी मारेकरी ह्मणून समजत होतों ते तुह्मीच काय? तुह्मास इतकी सावधगिरी बाळगण्याचें काय बरें कारण झालें?'

'मला आधीं कांहीं तरी खावयास द्या. आतां ४८ तास झाले. अन्नाची माझी गांठ नाहीं!'

हें त्याचें बोलणें ऐकतांच जनार्दनपंतांनीं घरांत शिलक असलेलें अन्न तावडतोब बाहेर आणलें. जीवनरावानें घासामागें घास खाऊन तें सर्व अगदीं थोडक्या वेळांत नाहींसें केलें. ' मृदुलेची प्रकृति बरी आहेना ? ' असा त्यानें त्यानंतर प्रश्न केला.

जनार्दनपंत म्हणाले--आपल्यावर कोणतें संकट आहे याची अद्याप तिला नीटशी कल्पना नाहीं.

' हें एकपरीं चांगलेंच आहे. हवेली भोंवतीं सर्व बाजूंनीं पहारा आहे म्हणूनच मला असें दबकत दबकत यावें लागलें. पहाऱ्यावरचीं माणसें दक्ष असतील परंतु, माझ्या पुढें तीं काय करतात ! सर्वांच्या हातावर तुरी देऊन आलों कीं नाहीं ? '

आतां आपण एकटें नाहीं. आपला सहाय्यकर्ता आपल्या हाताशीं आहे, या विचारानें जनार्दनपंतांची बरीच काळजी दूर झाली. ' तुमच्यासारखीं थोर माणसें या दुनियेंत फारच थोडीं सांपडतील. आमच्यावर हें केवढें संकट ! याची आपल्याला इत्थंभूत माहिती असूनही आमच्याकरितां आपण आपला जीव जाणून बुजून धोक्यांत घालण्यास तयार झाला ! याहून थोरपणाची गोष्ट ती कोणती ? '

' आपण माझी इतकी प्रशंसा केली हें पाहून मला अत्यंत समाधान वाटलें. तुमच्याबद्दल मला फार आदर वाटतो. परंतु खरें बोलावयाचें म्हणजे मी एकट्या तुमच्याकरितां येथें अशा संकटसमयीं आलों असतों किंवा नाहीं हें कांहीं मला खात्रीनें सांगवत नाहीं. मी केवळ मृदुलेकरितां आलों. या देहाचा बळी घेतल्याशिवाय तिच्या केसासही कोणास धक्का पोहोंचवितां येणार नाहीं ! '

' बरें पण आतां आपण काय करावयाचें ? '

' उद्यांचाच तुमचा अखेरचा दिवस आहे ! आज रात्रींच तुम्हाला काय तो निकाल केला पाहिजे. येथें बाहेर ओढ्याच्याकाठीं माझी गाडी उभी आहे. बरें तुमच्यापाशीं पैसे किती आहेत ? '

' माझ्यापाशीं मूर्तिमंत दहाहजार रुपयांची रक्कम आहे ! '

' मग तर फार चांगलें झालें. माझ्यापाशींही तितकी रक्कम सहज निघेल. आतां आपण डोंगरांतल्या वाटांतूनच आपला मार्ग काढला

पाहिजे. मग आतां आपण मृदुलेस जागें करा. नोकर चाकरही येथें न निजतील तर बरें असें मला वाटतें. ’

जनार्दनपंत आपल्या मुलीस उठवावयास गेले तों इकडे जीवनरावांनीं सामानाची बांधाबांध करण्यास सुरुवात केली. घरांतील सर्व खाण्यापिण्याचे पदार्थ त्यांनीं एका परडींत घेतले. एका मोठ्या सरईत प्यावयास पाणीही भरून घेतलें; कारण, डोंगराळ मुलखांत पाण्याची किती हाकाहाक असे हें त्यांना अनुभवानें माहीत होतें. त्यांची बांधाबांध संपते न संपते तोंच जनार्दनपंत मुलीस घेऊन आले. जीवनराव व मृदुला यांना एकमेकांची भेट झाल्यानें फार आनंद झाला हें सांगावयास नकोच. ती वेळ विशेष घाईची असल्यामुळें त्यांचें विशेष बोलणें चालणें झालें नाहीं.

सभोंवार पाहून जीवनराव ह्मणाला– “ आतां येथून ताबडतोब निघालें पाहिजे. हवेलीच्या पिछाडीस व आघाडीस पहारेवाले उभे आहेत. तर मग आतां आपण बाजूच्या दिंडींतूनच गेलें पाहिजे. एकदां आपण रस्त्याला लागलों ह्मणजे तेथून दोन मैलावर माझी गाडी आहे. गाडीरस्ता संपल्यावर आपण घोड्यावर बसून जाऊं. सकाळ उजाडते तों आपण निम्या डोंगरांत जाऊन पोहोंचूं. ”

जनार्दनपंत ह्मणाले— आणि आपल्याला मध्यंतरींच कोणी थांबविलें ह्मणजे ?

‘ ही बंदुक आपल्याजवळ आहे ना ? आपणास आडवे येणारे चार दोनच असले तर इचा उपयोग करण्याचें कारण पडणार नाहीं. त्यांपेक्षां अधिकच असले तर इच्याप्रभावानें आपणास त्यांची गर्दी मोडतां येणार आहे ! ’

घरांतील सर्व दिवे मालविण्यांत आले. जनार्दनपंतांनीं दिंडींतून आपल्या शेताकडे एकदां पाहिलें. या शेतांचें त्यांचें हें अखेरचेंच दर्शन होतें. तरीपण हा प्रसंग आपल्यावर येणार हें त्यांना आगाऊ महिना दोन महिनेच समजलें असल्यामुळें त्याबद्दल त्यांना इतकें वाईट वाटलें नाहीं. आपल्या मुलीसाठीं आपण हा इतका का व्याप करीत आहों या विचारानें तर त्यांना एकप्रकारें समाधानच वाटत होतें. सभोंवतालचा सर्व देखावा त्यावेळीं फार शांततेचा दिसत होता. कांहीं दगा फटका

होण्याचा बिलकुल संभव दिसत नव्हता. जीवनरावाशिवाय इतरांचें मन निर्धास्तच होतें म्हटलें तरी चालेल. मार्गांतील अडचणी काय आहेत याची त्याला अनुभवानें कल्पना आली असल्यामुळें त्याला मात्र फारच धास्ती वाटत होती.

जनार्दनपंतांनीं सर्व ऐनमाल उचलून घराचा निरोप घेतला. खाण्याच्या जिनसा व पाण्याची सरई हातांत घेऊन त्यांच्या मागून जीवनराव दिंडीच्या मार्गानें बाहेर पडले. मृदुलेनेंही आपल्या चीज वस्तूंचें गाठोडें उचललें व तीही त्यांच्या मागून बाहेर आली. आकाशांत ढग येऊन जरा काळोख पडेल म्हणून त्यांनीं थोडा वेळ वाट पाहिली. व सर्वांनीं प्रथम बागेंत प्रवेश केला. दम कोंडून धरून, पाय न वाजवितां ते सर्व-जण या पायवाटेवरून त्या पायवाटेवर, या झुडपांतून त्या झुडपांत, या बांधावरून त्या बांधावर असे ते शेतांत उघड्या मैदानावर आले. तेथें येतांच जीवनरावांनीं आडमार्गानें जाण्यास सुरुवात केली. त्यांच्या मागें अनार्दनपंत व मृदुला हीं दोघेंही चालूं लागलीं.

जीवनरावांचे कान मोठे तीक्ष्ण होते. येवढासा कोठें आवाज झाला कीं, ते आपल्या अनुयायांना झुडपांत लपवीत व भिण्यासारखें कांहीं नाहीं अशी खात्री झाल्यावर पुनः मार्गस्थ होत. थोडा रस्ता चालून जातांच घुवडांचा आवाज त्यांच्या कानीं आला. त्याचक्षणीं डोंगरांत दूरवर दिसणारी अशी माणसाची छाया त्यांच्या नजरेस पडली. त्याबरो-बर ते सर्वजण थबकले. डोंगरांतून कोणी दोन माणसें खालीं उतरत असून एकमेकांशीं कांहीं बोलत आहेत अशी त्यांना चाहूल लागली.

त्यांपैकीं एक म्हणाला--' उद्यां मध्यान्हीस जेव्हां तो चाबुकस्वार तीन वेळां हाक मारील तेव्हां. '

दुसरा म्हणाला- ' मग ठीक आहे तर; पण दिनकरास हें कळ-वावयाचें का ? '

पहिला— होय त्याला वर्दी दे. आणि मग दुसऱ्यांना कळीव. नऊ-पासून सातपर्यंत.

दुसरा- आणि सात पासून पांचपर्यंत.

असें म्हणून ते दोघेहीजण आपापल्या मार्गानें निघून गेले. त्यांचे

कांहीं तरी सांकेतिक शब्द असावेत असें त्यांच्या शेवटच्या संवादावरून कोणाच्याही ध्यानांत येईल. ते दिसेनासें होतांच जीवनरावानें झपाट्यानें चालण्यास सुरुवात केली. मृदुला थकली असें दृष्टीं पडलें कीं तिला उचलून घेऊन चालूं लागावें, पुन: खालीं उतरून तिला आपल्या बरोबर धीर देत न्यावें असा क्रम कित्येक अंतरापर्यंत चालला.

"चला, जलदी पाय उचला. आपण पहारेवाल्यांच्या टापूंतूनच चालत आहों. जितकें आपणास झटकन् जातां येईल तितकें तें आपल्या पथ्यावर पडणार आहे."

असें करतां करतां शेवटीं एकदाचा हमरस्ता लागला. मनुष्याशीं अशी त्यांचीं एकदांच गांठ पडली होती; परंतु चटकन् झुडपांत लपून त्यांनीं ती वेळ मारून नेली. गांवाकडे वळण्याऐवजीं ते डोंगराच्या बाजूस जाणाऱ्या एका पायवाटेनें चालूं लागले. मध्यंतरीं अनेक नाले व रूंद खड्डे त्यांना लागले. परंतु जीवनरावांच्या सहाय्यानें त्यांनीं ते सर्व ओलांडले. असें होतां होतां अखेर ते ज्याठिकाणीं घोडे बांधले होते त्याजागीं येऊन पोहोंचले. जीवनरावांनीं त्या दोघांना घोड्यावर बसवून आपणही एका अश्वावर आरोहण केलें.

त्या खडकाळ रस्त्यानें प्रवास करणें गैरमाहीतगार माणसास फार धोक्याचें होतें. एका बाजूस सुमारें एक हजार फूट उंचीचा तुटलेला कडा होता. त्याचें तें कृष्णवर्ण व अक्राळविक्राळ स्वरूप पाहून चांगल्या शूर व धैर्यशील माणसाचीही गाळण उडून जावयाची! दुसऱ्या बाजूस तुटलेली एक भयंकर दरड होती. चांगल्या वाकबगार माणसासही तींतून मार्ग काढणें अशक्य होतें. दांडगाईनें त्यामार्गानें कोणी गेलाच तर त्याचा कपाळमोक्षच व्हावयाचा! या दोन लचांडांतून बेड्यादांकड्या जाणाऱ्या पायवाटेनें त्यांना आपला रस्ता काढावयाचा होता. या रस्यानें घोड्यावर बसून जाण्याचें आजपर्यंत कोणीं क्वचितच साहस केलें असेल. इतक्या अडचणींतून जावयाचें होतें तरी आमच्या या त्रयीस त्याचें यत्किंचितही भय वाटत नसे. कारण एक एक पाऊल जसजसें पुढें पडे तसतसें त्या दुष्ट नगरापासून ते दूरदूर जात. शिवाय यदाकदाचित् कांहीं अपघात होऊन प्राणावर बेतली तरी त्याचीही त्यांना इतकी खातरजमा नसे.

जीवनपंथी दांभिकांच्या हातीं सांपडून हालअपेष्टा होण्यापेक्षां अशा रीतीनें मरण आलेलें पुरवलें, इतकें ते त्या नगरीस वैतागून गेले होते.

अद्यापही ते पहारेवाल्यांच्या कचाट्यांतून बाहेर गेले नव्हते, याचें प्रमाण समजण्याची वेळ अखेर आलीच. ते तिघेहीजण एका मागून एक जात असतां मृदुलेनें घाबरून मोठी आरोळी ठोंकली. वर एका तुटलेल्या कड्याच्या शिळेवर एक पहारेवाला एकटाच बसला होता. त्या पहारेवाल्यानेंही यांच्याकडे पहातांच ‘ कोण आहे ? ’ ह्मणून दणकून विचारलें.

‘ आह्मी प्रवासी आहोंत ’ असें आपली बंदुक रोंखून धरून जीवनरावानें उत्तर दिलें.

‘ कोणाच्या परवान्यानें ? ’ असा त्या रक्षकानें पुन: जबाब विचारला.

‘ धर्माधिकाऱ्यांच्या ’ असें जनार्दनपंतांनीं उत्तर दिलें. धर्माधिकाऱ्यांचें नांव घेतांच प्रवाशांना जाऊं देतात ही गोष्ट जनार्दनपंतांना माहीत होती.

‘ नऊ तें सात ’ असा पहारेवाल्याकडून इषारा होतांच सात तें पांच असें जीवनरावानें तावडतोब उत्तर दिलें. डोंगराच्या हद्दीवर दोन माणसांचा झालेला संकेत लक्ष्यांत ठेवून त्यांनीं त्याचा अगदीं वेळेवर प्रयोग केला त्यामुळें केवढी कामगिरी झाली ?

‘ ठीक आहे तर खुशाल जा. ’ असें त्या शिपायानें उत्तर दिलें. यापुढें थोडें अंतर चालून गेल्यानंतर वाट बरीच रुंदावली. तेव्हां त्यांनीं आपल्या घोड्यास जरा टांच मारण्यास सुरुवात केली. जीवनरावानें एकदां मागें मात्र वळून पाहिलें. पाहरेवाला आपल्या बंदुकीवर मान टेंकून स्वस्थ बसला आहे असें दिसतांच जीवनराव ह्मणाला—जीवनपंथी प्रदेशाची ही शेवटची हद्द आपण ओलांडली. आतां आपण स्वतंत्र वातावरणांत आलों !

# भाग ९ वा.

## अखेर दगा झाला !

दऱ्याखोऱ्यांतून, काट्याकुट्यांतून, मोठमोठाल्या ओहोळींतून त्यांनीं रात्रभर रस्ता काढला. कित्येकवेळां त्यांचा रस्ताही चुकला परंतु, जीवनरावास त्या महल्ल्याची पूर्ण माहिती असल्यामुळें त्यांना विशेष धक्के खाण्याचा प्रसंग आला नाहीं. प्रभात झाली. जिकडे तिकडे प्रकाश दिसूं लागला. रात्रभर अवघड मार्गांतून प्रवास केलेल्या या पांथस्थांना प्रभातकालचा देखावा पाहून अत्यंत आनंद झाला. पर्वतांचीं शिखरें एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून गगनमार्गास संचार करीत आहेत. तीं शिखरें खालून इतकीं अणकोचीदार दिसत होतीं कीं, त्यांच्यावर असलेले वृक्ष अगदीं एखाद्या सूक्ष्म आघातानें कडाडून खालीं पडतील असा त्यांकडे पहाणारास भास होई. हा भास केवळ अस्थानीं होता असें नाहीं. त्या खोऱ्यांत कित्येक झाडांचीं खोडें, कित्येकांच्या विस्तीर्ण फांद्या पडून त्या सुकूनही गेलेल्या दिसत होत्या. पर्वतावरून खालीं कोसळून पडलेलीं झाडें आपल्या पृष्ठावर घेण्याचा त्या खोऱ्यास चांगला सरावा झालेला दिसत होता. इतकेंच नव्हे तर शतकेंच्या शतकें उंच जागेंत रहाण्याचा कंटाळा येऊनच कीं काय कित्येक प्रचंड शिळांनींही आपलें उच्च स्थान सोडून देऊन खालीं सपाटीकडे धांव घेतली होती ! त्या खोऱ्यांतून ते प्रवास करीत असतांही अशीच एक शिळा वरून कोसळून दाणदिशी खालीं आली. थोडक्यांत चुकलें नाहीं तर त्या तिघांचाही त्या शिळेखालीं चुराडा होऊन जावयाचा !

सूर्य जसजसा क्षितिजावर येत चालला तसतशीं पर्वताचीं शिखरें उद्दीपित दिसूं लागलीं. दिग्मंडळांत एखादा दीपोत्साहच चालला आहे असें वाटलें. त्या आल्हाददायक देखाव्यानें त्या तीन पांथस्थांचे प्रवासाचे व जागरणाचे श्रम परिहार झा . वाटेंत एक मोठा थोरला जलप्रवाह लागला तेथें थोडा वेळ मुक्काम करून त्यांनीं आपल्या घोड्यांना पाणी वगैरे पाजलें. त्यांनींही थोडासा उपहार केला. मृदुला व जनार्दनपंत यांच्या मनांत तेथें अधिक

वेळ थांबावयाचें होतें. परंतु जीवनराव त्यांचें मुळींच ऐकेना ! तो ह्मणाला ' वेडे आहांत कीं काय ? थांबण्याचा किंवा विसंबण्याचा हा प्रसंग नव्हे. आपला शोध काढण्यास तिकडे सुरवातही झाली असेल. आतां आपण जितकी जलदी करूं तितकी थोडीच होणार आहे. एकदां आपण मुक्कामास जाऊन पोहोंचलों ह्मणजे हवीतितकी विश्रांति घेत बसूं.

त्या सर्व दिवसभर ते प्रवासच करीत होते. सायंकाळीं शत्रूच्या मुलुखापासून ते सुमारें ३० मैल गेले असावेत असा त्यांचा अंदाज झाला. त्या रात्रीं तेथें एका उंच खडकाची निवाऱ्याची जागा पाहून ते विश्रांति करतां राहिले. प्रवासाच्या श्रमानें त्यांचा थोडासा डोळाही लागला. पहाट होतांच ते पुनः घोड्यावर बसून निघाले. अद्यापही कोणी शोधाला येत असल्याची चाहूल लागत नाहीं हें पाहून जीवनरावास वाटूं लागलें कीं, आपण आतां शत्रूच्या आटोक्याबाहेर पूर्णपणें पडलों. शत्रूंचा आटोका कोठपर्यंत होता व थोडक्याच काळांत शत्रूंचा त्याच्यावर कसा अचानक घाला पडणार होता याची त्याला त्यावेळीं बिलकुल कल्पनाही नव्हती.

जीवनपंथी सत्ताधीशांची नगरी सोडून दोन दिवस होत आले त्याच-दिवशीं दुपारीं त्यांच्या जवळची खाण्याची पुंजी संपुष्टांत आली होती. आतां ते समुद्रसपाटीच्या सुमारें पाचहजारफूट उंच प्रदेशावर होते. मनस्वी थंडी पडली होती. जीवनरावांनीं आसपासच्या काट्याकुट्या जमवून चांगली शेकोटी केली. शेकोटीशीं बराच वेळ शेकून अंगांत चांगली ऊब आल्यानंतर जीवनरावानें घोडे नीट बांधले; व त्या दोघांना हुशारीनें वागण्यास सांगून त्यानें आपल्या खांद्यावर बंदुक टाकली व शिकारीचा मार्ग धरला. तो मार्गस्थ झाला तरी वरचेवर मागें वळून पाही. तीं दोघें आनंदानें गोष्टी बोलत शेकत आहेत व घोडी स्वस्थ उभीं आहेत असें पाहून त्याचेंही अंतःकरण प्रसन्न झालें. शेवटीं मध्यें खडक येऊन कांहींच दिसेनासें झाल्यामुळें त्यानें मागें वळण्याचें सोडून देऊन झपाट्यानें पुढचा मार्ग धरला.

एक ओहोळ ओलांडून दुसऱ्या ओहोळीवर जावें, एक दरड चढ

लागून पुन: आसमंतात् भागाची टेहळणी करावी अशारीतीनें सुमारें दोन मैल रस्ता तो चालून गेला. झाडांच्या खोडावर त्याला निशाण्या दिसल्या त्यावरून त्याचें ठाम अनुमान झालें कीं या रानांत अस्वलांची गर्दी आहे. याप्रमाणें सुमारें एक प्रहर गेला. शेवटीं आतां कांहीं शिकार हातीं लागत नाहीं. आतां परत जावें असा त्याच्या मनांत विचार चालूं झाला तोंच डोंगराच्या एका उंच शिळेवर एक प्राणी उभा आहेसें त्याला दिसलें. हा प्राणी सुमारें तीन चारशें फूट उंचीवर होता. त्याचा आकार एडक्याप्रमाणें असून त्याचीं शिंगें फारच लांब होतीं. आपल्यावर हल्ला करण्यास कोणीं आलें तर त्यास प्रतिकार करण्याकरितांच या शिंगाचा त्याला उपयोग होत असावा. जीवनरावानें त्याच्यावर बराच वेळपर्यंत आपली बंदुक रोखून धरून अखेर एक गोळी झाडली त्याबरोबर कोलमडत कोलमडत तो प्राणी दाणदिशी खालीं दऱ्यांत येऊन पडला.

तो प्राणी फारच जड होता. जीवनरावासारख्या सशक्त माणसासही तो उचलण्या सारखा नव्हता. तेव्हां त्याचे कांपून तुकडे करून जीवनरावानें त्याचें एक गाठोडें केलें व तें डोक्यावर उचलून घेऊन ते परत फिरले. यावेळेस सायंकाळ होत चालला होता. रस्ता सांपडेल त्या रस्त्यानें जीवनराव आल्यामुळें आपण कसकशीं वळणें घेत आलों हें कांहीं त्याच्या ध्यानांत आलें नाहीं. आतां नेमकें कोणत्या रस्त्यानें जावें हें कांहीं त्यास समजेना. या खोऱ्यांतील निरनिराळे भूप्रदेश एकमेकांशीं इतके सारखे होते कीं, कोणत्याही रस्त्यानें गेलें तरी आपण रस्ता चुकलों नाहींच असें वाटावें. जीवनराव एका रस्त्यानें बराच वेळ चालला. सुमारें एक मैलपर्यंत चालून गेल्यानंतर त्याला एक जलप्रवाह लागला. जातांना आपल्याला हा प्रवाह लागला नाहीं हें ध्यानांत येतांच तो बराच गोंधळून गेला. त्यावर तो दुसऱ्या रस्त्यानें जाऊं लागला; पण तेथेंही हीच स्थिति झाली. असें होतां होतां बरीच रात्र पडली; शेवटीं त्याला एक ओळखीची ओहोळ लागली. तरी सुद्धां आतां नेमक्या रस्त्यानें कसें जावें या अडचणीचें कांहीं निवारण होईना. आधीं अंधार पडलेला आणि त्यांत पर्वतांच्या पुढें आलेल्या कड्यांच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या सावलीनें त्या प्रदेशांत अधिक अंधकार दिसूं लागला. चालण्याच्या श्रमानें व खांद्यावरच्या

ओझ्यानें तो अगदीं थकून गेला. तसाच खरडत खरडत तो बराच वेळपर्यंत चालला. एक एक पाऊल टाकलें कीं, आपण मृदुलेजवळजवळ येत आहों, आपण मृदुलेस व तिच्या बापास खावयास घेऊन जात आहों या दोन विचारांनींच त्याच्या अंगांत चालण्याचें जें काय सामर्थ्य अवशिष्ट राहिलें असेल तेवढेंच. बाकी एरव्हींच्या स्थितींत त्याच्यानें एक पाऊलही पुढें टाकवलें नसतें.

ज्या खडकावर ते उतरले होते त्या खडकाजवळ तो आला. तेथील सर्व खाणाखुणा त्याच्या एका मागून एक लक्ष्यांत येऊं लागल्या. मुक्काम सोडून त्याला सुमारें पांच तास झाले होते. मुक्कामावर ते दोन प्राणी माझी अगदीं चातकासारखी वाट पहात असतील असें वाटून त्यानें एक भलीमोठी आरोळी ठोंकली. आरोळी संपते न संपते तोंच तिच्याजवळ जवळ तितकाच मोठा प्रतिध्वनिही झाला. तिकडून उत्तर येईल ह्मणून मोठ्या आशेनें तो त्या बाजूचा कानोसा घेऊं लागला परंतु, त्या बाजूनें परत कांहींच आवाज येईना ! त्यानें पुनः आरोळ्या ठोंकल्या तरी पूर्वींचीच स्थिति कायम ! त्याचा प्रतिध्वनि मात्र वरचेवर उमटत होता. पाहिजे तें उत्तर येत नाहीं. आणि आपली हाकच पुनः आपल्याला ओ देत आहे हें पाहून आपला प्रतिध्वनि आपल्याला वेडावणें दाखवून आपला उपहास करीत आहे असेंही त्यास वाटलें. प्रतिध्वनीस मूर्त स्वरूप असतें तर त्यानें संतापाच्या भरांत त्याच्यावर गोळीही झाडली असती ! हें कांहीं चिन्ह ठीक दिसत नाहीं असें वाटून त्यानें आपल्या खांद्यावरचें ओझें खालीं आदळलें.

शेवटचें वळण घेतांच तो मुक्कामाच्या अगदीं जवळ आला. ती जागा त्याला स्पष्ट दिसूं लागली. शेकोटीचा धुमसत असलेला अग्नीही त्याच्या दृष्टीस पडला. परंतु आपण गेल्यापासून शेकोटी कोणी हालवली वगैरे नाहीं हें मात्र त्यास चट्कन् समजलें. कोठेंही कशाची चाहूल ऐकूं येत नाहीं. सर्वत्र अगदीं शुकशुकाट ! ज्याबद्दल त्याला धास्ती वाटत होती तेंच अखेर खरें ठरलें. विस्तवाच्या धगीजवळ कोणीही प्राणी नाहीं. माणसें, घोडीं सर्व नाहींशीं झालीं. आपण गेल्यानंतर येथें कांहीं दगा झाला खास याबद्दल त्याच्या मनास आतां कांहीं संशय उरला नाहीं.

हा दगा कोणत्या स्वरूपाचा होता याचा सुगावा लावण्यास मात्र तेथें यत्किंचितही साधन नव्हतें.

हा प्रकार पाहून जीवनराव अगदीं गोंधळून गेला ! त्याचें डोकें गरगर फिरूं लागलें. तो झीट येऊन खालींच पडावयाचा, परंतु त्याचें डोकें बंदुकीवर टेकलें असल्यामुळें त्यास कसें बसें उभें रहातां आलें ! तो स्वभावतः कर्तृत्ववान् पुरुष असल्यामुळें याही स्थितींत पुढें कांहीं तोड योजावी याबद्दल त्याच्या मनांत विचार चालूं लागले. त्या शेकोटींतील एक जळकें लांकूड उचलून त्यानें त्याचा चांगला जाळ केला व त्याच्या प्रकाशानें तो सर्व प्रदेश धुंडाळून पाहूं लागला. जमीनीवर सगळीकडे घोड्यांच्या टापा उमटलेल्या होत्या. अनेक घोडेस्वार तेथें येऊन गेले होते व मृदुला व जनार्दनपंत यांच्यावर त्यांनींच घाला घातला असावा ही गोष्ट प्रथम त्याच्या नजरेस आली. टापांचा माग पाहिल्यावर हे घोडेस्वार जीवनपंथी अधिकाऱ्यांचेच दूत होत हेंही स्पष्ट झालें. हें सर्व कटयाळ लवणपुराहूनच आलें हें निःसंशय ठरलें. आपल्या दोन सोबत्यांना त्यांनीं घोड्यावर घालून परत नेलें काय ? जीवनराव आपल्या मनाशीं असा विचार करीत आहे तोंच त्याची नजर तांबुडसर मातीच्या एका ढीगाकडे गेली ! हा ढीग पूर्वीं त्या जागीं नव्हता. ढीगाजवळ जाऊन पाहतो तों तेथें एक मेढ रोवण्यांत येऊन त्या मेढीवर ' जनार्दनपंत यांचें थडगें ' अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं !

झालें ! त्या दुष्टांनीं जनार्दनपंतांचा खून केला. दोन प्रहरापूर्वीं ज्यांचा निरोप घेऊन आपण शिकारीस गेलों त्यांपैकीं एक प्राणीतर इहलोक सोडून गेला ! दुसरें आणखी एखादें थडगें दिसतें कीं काय म्हणून जीवनरावानें तेथें आजूबाजूस बारीक दृष्टीनें पाहिलें परंतु, तसा कांहीं प्रकार दिसला नाहीं; तेव्हां त्यांनीं तिला लवणपुरासच परत नेलें. तेथें आपल्या पूर्व संकल्पाप्रमाणें तिचा विवाह लावून ते तिला जीवनपंथी अन्तःपुरांत लोटणार हें खास ! मृदुलेवर शेवटीं असा प्रसंग यावा आणि त्याचा प्रतिकार करण्याचें आपल्या अंगीं बिलकुल सामर्थ्य नसावें अशा स्थितींत राहण्यापेक्षां जनार्दनपंताचाच रस्ता धरावा असें त्यांस वाटूं लागलें.

निराशेपासून उत्पन्न झालेल्या या वैतागानें त्याची स्थिति फारच अनुकंपनीय झाली. तरीपण थोड्याच वेळांत हें दौर्बल्य नाहींसें होऊन त्याचें हरपलेलें तेज पुनः जागृत झालें. आपल्या मित्रांचें संरक्षण करणें हें आतां आपल्या शक्ती बाहेरचें आहे तरी त्यांच्या आपत्तीबद्दल सूड घेतल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा त्याचा कृतनिश्चय झाला. जीवनराव हा जसा वीर्यशाली, सालस, उदार व तेजस्वी होता तसाच त्याचा स्वभाव अत्यंत खुनशी होता. नाहक अपकार करणारास धुळीस मिळविल्याशिवाय त्यास कधींही समाधान व्हावयाचें नाहीं ! शत्रूंनीं आपल्यावर जी ही आपत्ति आणली त्या आपत्तीबद्दल आपल्या हातानें त्यांचे पारिपत्य केलेंच पाहिजे. आपल्या अंगीं असलेलें सामर्थ्य, दृढनिश्चय व करारीपणा यांचा उपयोग या एकाच कार्यार्थ करणें अत्यंत अवश्य आहे असा त्याच्या मनाचा ठाम निर्धार ठरला. त्या निर्धारानुरूप त्यानें आपल्या शत्रूंचा पाठलाग करण्यास ताबडतोब प्रारंभ केला.

लवणपुराहून जो रस्ता तो घोड्यावरून चालून आला होता तोच त्यास आतां पायानें चालावा लागल्यामुळें त्याचे पाय अगदीं मस्यास आले. इतकें अंतर चालून जाण्यास त्यास पांच दिवस लागले. रात्र पडली कीं कोठें तरी खडकाचा आश्रय करून रहावें, उजाडलें कीं पुनः मार्ग चालूं लागावें असा त्याचा एकसारखा क्रम चालूं राहिला. सहाव्या दिवशीं तो लवणपुराच्या हद्दीवर येऊन पोहोंचला. हद्द उंचवट्यावर असल्यामुळें त्याला जीवनपंथी सत्पुरुषांच्या हवेल्या तेथून दिसूं लागल्या ! तो अगदीं थकून गेला असल्यामुळें तसाच तेथें बंदुकीवर रेलून उभा राहिला. लवणपुराकडे लक्ष्य लावून पहातो तों मुख्य मुख्य रस्त्यावर निशाणें लागलीं आहेत, कमानी उभारण्यांत आल्या आहेत, व मधून मधून वाद्यांचा आवाज ऐकूं येत आहे इत्यादि देखावा त्याच्या नजरेस पडला. आज या नगरींत हा आनंदोत्सव कशाचा असा त्याच्या मनांत साहजिकच विचार चालला. इतक्यांत जवळच घोड्याच्या टापा ऐकूं येऊं लागल्या. घोडस्वार जवळ आला. याच्या आपण पूर्वीं अनेक वेळां उपयोगीं पडलों आहों तेव्हां याला हक्कानें कांहीं प्रश्न विचारण्यास हरकत नाहीं असा

विचार करून घोडेस्वाराजवळ जाऊन त्यानें त्यास हाक मारली. ' माझें नांव जीवनराव. तूं मला ओळखलेंस काय ? '

असा त्याचेकडून प्रश्न होतांच तो जीवनपंथी स्वार आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागला. त्याचा पोषाख, चर्या व बोलण्याचा स्वर बदललेला असल्यामुळें स्वारास तो चटदिशीं ओळखूं येईना. परंतु, थोडावेळ त्याला निरखून पाहिल्यानंतर शिकारीच्या वेळेस आपल्याला भेटत असत ते हेच गृहस्थ अशी त्या स्वाराची खात्री झाली.

स्वार जीवनरावास ह्मणाला—' आपण वेडेतर नाहींना ? अशा वेळेस आपण येथें येणें फार धोक्याचें आहे. इतकेंच नव्हे तर तुमच्याशीं संभापण केल्यानें माझ्याही जीवावर वाईट प्रसंग गुदरण्याची धास्ती आहे. जनार्दनपंत व त्यांची मुलगी यांना येथून फरारी होण्याचें कामीं तुह्मीं सहाय्य केलें ह्मणून तुमचा शोध चालूं असून तुह्मी दृष्टीं पडतांच तुह्माला पकडण्यांत येईल. '

' त्याला मी मुळींच भीत नाहीं. पण कुवरसिंग, तुला मी कांहीं खुलासा विचारतों त्यासंबंधानें तूं मला अवश्य माहीती दिली पाहिजे. पाहिल्यापासून आपली दोस्ती आहे. तेव्हां माझ्यापासून कांहींही लपवून ठेवूं नको, तुला देवाची शपथ आहे. '

' काय विचारावयाचें तें लवकर विचारा. मला येथें फार वेळ उभे रहातां येत नाहीं. आणि शिवाय येथें खडकालाही कान आहेत व झाडाला डोळे आहेत ! तेव्हां काय बोलावयाचें तें लवकर बोला. '

' मृदुलेचें काय झालें ? '

' तिचा कालरोजीं धाकट्या दिनकराशीं विवाह झाला ! सद्गृहस्था, अंमळ धीर धर. ही बातमी ऐकतांच तूं असा निस्तेज कां दिसूं लागलास ? '

' त्याकडे तूं लक्ष्य देऊं नको ' असें जीवनराव ह्मणाला. तो अगदीं हतबल होऊन एका शिळेस डोकें टेकून स्वस्थ पडला व पुनः दुःखानें म्हणाला —' काय ह्मणतोस ! तिचा विवाह झाला ! '

' हो. कालच झाला. नगरांत त्याकरतांच चोहोंकडे निशाणें फडकत आहेत. तिच्याशीं कोणी विवाह लावावयाचा यासंबंधानें श्रीनिवास व दिनकर यांच्यामध्यें बरीच बाचाबाच झाली. जनार्दन वगैरेचा तपास

लावण्यास जे लोक गेले होते त्यांत हे दोघेहीजण होते. श्रीनिवासानें गोळी घालून तिच्या बापाला ठार केलें, तेव्हां मृदुलेवर दिनकरापेक्षां त्याचाच हक्क अधिक होता. परंतु जीवनपंथी सत्ताधीशांनीं दिनकराचीच मागणी पसंत ठरविली. कोणाशींही तिचें लग्न होवो त्यास ती फार दिवस लाभण्याची कांहीं आशा नाहीं. कारण ती आतांच मृत्यूच्या पंथास लागल्यासारखी झाली आहे! तुह्मी निघाला कीं काय ?'

'होय. मी निघालों' असें जीवनरावांनीं उत्तर दिलें. एखाद्या दगडाच्या पुतळ्याप्रमाणें त्याचा चेहरा निस्तेज व म्लान दिसत होता.

'तुह्मी कोठें निघाला ?'

'तें तूं विचारूं नयेस हेंच चांगलें.' असें ह्मणून त्यांनीं आपली बंदुक खांद्यावर टाकली व डोंगराकडे आपला मोर्चा फिरवला. वन्य श्वापदांच्या वस्तींत हा चालला तरी कोणीकडे असा विचार करीत स्वार बिचारा जागच्याजागींच स्वस्थ बसला.

मृदुलेसंबंधानें स्वारानें जें भाकीत केलें होतें तें अक्षरशः खरें होतें. बापाच्या मरणाचा तिच्यावर परिणाम झाला असो किंवा इच्छेविरुद्ध भलत्याशींच आपला विवाह लागल्याचा परिणाम असो, लवणपुरींत पुनः प्रवेश केल्यापासून ती एकसारखी झुरणीस लागली. व एक महिन्याच्या आंतच इहलोक सोडून गेली. श्रीनिवासानें केवळ द्रव्य लोभानेंच तिच्याशीं विवाह केला होता, तेव्हां तिच्या मरणानें त्यास दुःख होण्याचें कारणच नव्हतें. परंतु जीवनपंथी लोकांच्या चालीप्रमाणें त्याच्या इतर बायका मात्र तिच्या शवाभोंवतीं एक रात्रपर्यंत बसल्या होत्या. दुसऱ्यादिवशीं उजाडलें तरी त्या तिच्याजवळ होत्याच. इतक्यांत घराचा दरवाजा उघडून एक धिप्पाड मनुष्य आंत येऊन तडत खोलींत शिरला हें पाहून त्या सर्व बाया फारच घाबरून गेल्या. त्यांच्याकडे यत्किंतूही लक्ष्य न देतां तो मृदुलेच्या स्थूल देहापर्यंत तडक जाऊन पोहोंचला. तेथें खालीं वांकून त्यानें मृदुलेकडे बराच वेळपर्यंत निरखून पाहिलें. व तिच्या हातांतील आंगठी काढून घेतली. 'ही आंगठीं तिच्या बरोबर जमीनींत जातां कामा नये' असें ह्मणून आपल्या क्रूरमुद्रेनें सभोंवार पहात तो तेथून चालता झाला. बायकांना घरांतील कोणा पुरुष

माणसास बोलावण्यास सुद्धां फुरसत झाली नाहीं, इतक्या तडाक्यांत हें सर्व कृत्य झालें. आपल्या डोळ्यांदेखत खरोखरच ही गोष्ट घडली किंवा आपल्याला उगीच तसा भास झाला याबद्दलही त्यांच्या मनाचा उलगडा होईना प्रेताच्या हातांतील आंगठी नाहींशी झाली येवढ्यावरूनच येथें कोणी माणूस येऊन गेला ही गोष्ट त्यांना नाकारतां येईना !

जीवनरावानें यानंतर कित्येक दिवसपर्यंत डोंगराळ प्रदेशांतच वास्तव्य केलें. काय मिळेल ते खावें व कोठें तरी निवाऱ्यांत दिवस कंठावा असा त्याचा क्रम चालू होता. आपल्या शत्रूचा आतां कोणत्या प्रकारें सूड घ्यावा याबद्दल त्याच्या मनांत अहर्निश तळमळ चालू राहिली. त्यास डोंगर कठाडीनें रात्रीं अपरात्रीं हिंडतांनाही कित्येकांनीं पाहिलें; डोंगरांत अलीकडे एक पिशाच्च संचार करीत असतें अशीही गांवांत दाट वदंता पसरली. एकेरात्रीं श्रीनिवासाच्या माडीच्या खिडकींतून आंत एकदम गोळी आली व ती श्रीनिवासाच्या अंगावरून किंचित् चुकून गेली. दुसऱ्या एका वेळीं दिनकर डोंगराच्या पायथ्याशीं हिंडत असतां वरून अकस्मात् एक शिळा कोसळली व त्याच्या अगदीं जवळ येऊन पडली; शिळेचें खडखडणें ऐकतांच तो जरा बाजूला सरकला ह्मणून निभावला नाहींतर ठारच झाला असता ! या अनर्थाचें मूळ कोण असावें याबद्दल त्या दोघांनाही शंका राहिली नाहीं. दिनकर-व श्रीनिवास हे दोघेही जीवनरावाचा शोध काढण्यासाठीं डोंगराच्या बाजूस एकसारखे फिरत होते. परंतु जीवनरावाचा अद्याप त्यांना माग-मूसही लागला नाहीं. ते घराच्याबाहेर एकटे कधींही पडत नसत. बरो-बर नेहमीं एकदोन माणसें घेऊन बाहेर जात. रात्रीं तर ते कधींही घर सोडीनासें झालें. पुढें कित्येक दिवस गेले, त्यांचा जीव घेण्याचा वगैरे प्रयत्न झाला नाहीं तेव्हां त्यांना अंमळ जीवांत जीव आल्यासारखें होऊन ते जरा मोकळेपणानें हिंडूं फिरूं लागले.

आपला पिच्छा पुरविण्याचा नाद जीवनरावानें सोडून दिला असें त्यांच्या मनाला वाटूं लागलें; परंतु ती त्यांची चूक होती. जीवनरा-वाच्या क्षुब्ध मनोवृत्तींत जर कांहीं फरक झाला असला तर तो कालाव-

धीनें ती वृत्ति वृद्धिंगत होण्यांतच झाला हें त्यांना माहीत नव्हतें. एकदां मनानें एखादी गोष्ट घेतली म्हणजे ती सिद्धीस नेण्यांत प्राण गेला तरी पुरवलें पण ती अर्धवट सोडावयाची नाहीं असा त्याचा करारी स्वभाव होता. मृदुलेच्या व तिच्या बापाच्या मरणास जे चांडाळ कारणीभूत झाले त्यांना देहान्त शासन दिल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा त्याच्या मनाचा कृतसंकल्प झाला होता. दगदगीनें वेळच्यावेळीं अन्नपाणी न मिळाल्यामुळें व मानसिक क्षुब्धतेनें त्याची प्रकृति अगदीं क्षीण झाली होती; परंतु, शत्रूवर सूड घेण्याच्या एका बाबींत त्याची इच्छाशक्ति इतकी प्रबल झाली होती कीं, तिच्या प्रभावावर त्यानें हवें तें साहस केलें असतें, हवे तितकें शरीरसामर्थ्य दाखविलें असतें व प्रसंगीं एक सोडून दहा माणसें जरी अंगावर आलीं असतीं तरी तितक्यांचा समाचार घेण्यास कमी केलें नसतें ! त्याच्या करारी व निग्रही स्वभावाचा केवढा हा प्रभाव ! आपण जर या डोंगराळ प्रदेशांत असेंच राहूं तर अशीच आपली प्रकृति क्षीण होत जाऊन शेवटीं आपण मरणाधीन होऊं मग शत्रूंचा सूड घेण्याची इच्छा तशीच अवशिष्ट राहील ! तेव्हां आतां आपल्या खाणींच्या कामावर जावें. तेथें आपले लोक आहेत. ते आपल्याला चांगले जपतील; शिवाय तेथें आपल्याला थोडी किफायत होऊन चार पैसे गाठीला लावायला सांपडतील. कारण, आपल्या संकल्पित कार्यसिद्धीस पैशाचीहि जरूरी आहे असा विचार करून त्यानें आपला तिकडेच मोर्चा फिरविला.

खाणीवर फार तर एकवर्षपर्यंत रहावें असा त्याचा मूळचा उद्देश होता. परंतु कांहीं अनपेक्षित अडचणी येऊन त्याचा तेथें सुमारें पांच वर्षेंपर्यंत मुक्काम झाला. इतका काळ गेला तरी त्याच्या मनांतील सूड घेण्याची बुद्धि यत्किंचितही कमी झाली नाहीं. सर्व गोष्टी जणूकाय आतांच घडत आहेत अशी त्याची क्षुब्धवृत्ति अगदीं ताजी होती ! पुढें नांव बदलून तो लवणपुरांत आला. तेथें आपल्याला ओळखल्यास आपली अवस्था काय होईल याबद्दल त्याला मिळकुल फिकीर वाटत नव्हती. आपला उद्देश सिद्धीस गेला म्हणजे झालें; मग आपल्या स्वतःवर कोणताही संकट प्रसंग येवो ! लवणपुरांत गेल्यावर त्याच्या कानीं अशी

वार्ता आली कीं, तेथील लोकांत दोन तट झाले आहेत, एका बाजूस जुने लोक व दुसऱ्या बाजूस नवे लोक. या दोन पक्षांतील वाद इतका विकोपास गेला कीं, अखेर नव्यापक्षाच्या लोकांनीं लवणपुराचा व जीवनपंथाचा त्याग केला ! यांतच दिनकर व श्रीनिवास हे होते. ते कोठे गेले हें मात्र कोणासही निश्चित माहीत नव्हतें. दिनकरानें आपली सर्व चीजवस्त बेचून टाकून त्याचे रोख पैसे केले व त्या पुंजीनिशीं तो निघून गेला अशी जनवार्ता होती. श्रीनिवास हा मात्र अगदीं गरीब स्थितींत बाहेर पडला.

सामान्य माणूस असता तर त्यानें सूड घेण्याचा नाद सोडून दिला असता; परंतु मार्गांत इतक्या प्रचंड अडचणी होत्या तरी जीवनरावाचा तो बेत कांहीं यत्किंतूही ढळला नाहीं. जवळ काय दोन पैसे होते ते घेऊन तो गांवोगांव आपल्या शत्रूंचा शोध करीत फिरूं लागला ! वाटेंत कांहीं धंदा लागला तरी तोही करावा, काय पैसे मिळतील त्यांचा संचय करावा व पुढचा मुक्काम गाठावा असा त्याचा क्रम चालला. याप्रमाणें वर्षामागें वर्ष गेलें. त्याचे काळे केस पांढरे होऊं लागले. तरी पण त्याचा प्रयत्न तसाच चालू होता. येवढीच आपल्या जीविताची इतिकर्तव्यता असें त्याच्या मनानें पूर्णपणें घेतलें होतें. शेवटीं त्याचा दृढनिश्चय फलद्रूप होण्याचें चिन्ह दिसूं लागलें त्याचा मुक्काम केळवपूर येथें असतां तो रस्त्यानें सहज चालला होता. एका हवेलीच्या खिडकींतून एका गृहस्थानें बाहेर रस्त्यांत डोकावलें त्याबरोबर याच घरांत आपल्याला पाहिजे तीं माणसें आहेत हें जीवनरावास तात्काळ समजून आलें. आतां या दृष्टीस पडलेल्या शिकारीवर झडप कशी घालावयाची याबद्दल विऱ्हाडी गेल्यावर त्याच्या मनांत विचार चालू झाला. इकडे दिनकरानेंही जीवनरावांस ओळखलें व आपला खून करण्याकरितांच हा आपल्या पाळतीवर आहे हेंही त्याच्या ताबडतोब लक्ष्यांत आलें. श्रीनिवासास त्यानें आपलें दिवाण बनविलें होतें. दोघांनींही ताबडतोब न्यायाधीशांकडे जाऊन वर्दी दिली कीं, एक वृद्धमनुष्य कांहीं जुन्यापुराण्या अदावतीवरून आपला सारखा पाठपुरावा करीत आहे. याचा वेळींच योग्य बंदोबस्त न झाला तर आपल्या प्राणावरही बेतण्यास चुकणार नाहीं. न्यायाधीशांच्या

कानावर हा मजकूर जातांच त्यांनीं रक्षकांकरवीं जीवनरावास तात्काळ अटकेंत ठेवलें व शांतता ठेवण्याबद्दल चांगल्या इभ्रतदार गृहस्थांचा जामीन दिल्याशिवाय तुमची सुटका होणार नाहीं अशी जीवनरावास ताकीद दिली. कांहीं आठवड्यांनीं त्याची सुटका करण्यांत आली परंतु, त्याच्या आंतच दिनकर व श्रीनिवास हे दोघेहीजण ते गांव सोडून गेले अशी त्याला बातमी समजली !

जीवनरावाची पुनः निराशा झाली. तरी हतवीर्य न होता त्यांचा पिच्छा पुरविण्याचा त्यानें पुनः निश्चय केला. आज त्याच्यापाशीं पैसा शिलक नव्हता; तेव्हां कांहीं दिवस धंदा करून त्यास पैसे जमवावे लागले. पैसा जमविल्यावर त्यांनीं पुनः प्रवास सुरू केला. दररोज बहुधा एक नवीन शहर गाठावयाचें, तेथें त्या चांडाळांचा शोध करावयाचा, शोध लागला नाहीं कीं पुढें जावयाचें अशीं त्यानें कित्येक गांवें पालथीं घातलीं. पैसा सपला कीं प्रसंगीं मजुरीचेंही काम करावयाचें; पण निराश व्हावयाचें नाहीं इतकी त्याची चिकाटी विलक्षण होती ! जेव्हां तो पितृपुरास पोहोंचला तेव्हां ते परशुपुरास गेल्याची त्यास बातमी लागली. परशुपुरास गेला तेव्हां ते कौपीनपुरीस गेल्याचें तेथील लोकांनीं त्यास सांगितलें. तेथें गेल्यावर शत्रूंचा मुक्काम मणिपुरास हालल्याचें त्याच्या कांनीं आलें. शेवटीं मणिपुरास मेळ बसला ! मणिपुरास कोणकोणत्या गोष्टी घडल्या याचें वेगळें वर्णन देण्याचें कारण नाहीं. कारण, जीवनरावानें आपला सर्व वृत्तांत आपल्या तोंडानेंच सांगितला तो वसन्तराव ( शरच्चंद्राचे स्नेही ) यांच्या रोजनिशींत नमूद करून ठेवला आहे तो जशाचा तसाच आपण वाचूं.

---

# भाग ६ वा.

## वसन्तरावांच्या रोजनिशींतील उतारा.

जीवनरावानें आपली सुटका करून घेण्यासाठीं आमच्यापाशीं बरीच झटापट केली; तरी पण आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून तो शेवटीं

स्वस्थ उभा राहिला. शेवटीं तो किंचित् हसून ह्मणाला– ‘ झटापटींत माझ्या हातून कोणास दुखापत झाली नाहीं ना ? ’ यानंतर शरच्चंद्राकडे वळून तो पुन: ह्मणाला ‘ मला तुह्मी चौकींत घेऊन जात आहां असें वाटतें. माझी गाडी दाराशीं उभी आहे; तुह्मी माझ्या पायांतल्या बिड्या काढाल तर मी तेथपर्यंत चालत येतों. कारण तुह्माला मला उचलून नेण्यास फार कठिण पडेल. ’

हें त्याचें बोलणें ऐकतांच गिरधरलाल व लक्ष्मणसिंग एकमेकांकडे साशंकमुद्रेनें पाहूं लागले. परंतु शरच्चंद्राच्या मनांत बिलकुल संशय आला नाहीं. त्यानें कैद्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्याचे पाय मोकळे केले. पाय मोकळे होतांच त्यानें ते एकदां ताठ करून पाहिले. त्याच्याकडे मीं पुन: एकदा पाहिलें तेव्हां त्याच्या शरीराची मजबुती पाहून मला खरोखरच आश्चर्य वाटलें. इतकें भक्कम व पीळदार शरीर आपण तर पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें ! त्याच्या मुद्रेवरूनच तो मोठा निर्धाराचा माणूस दिसे.

शरच्चंद्राकडे वळून तो पुन: ह्मणाला ‘ गुन्ह्याचा तपास लावण्याच्या खात्यांत मुख्य अधिकाऱ्याची एखादी जागा रिकामी असेल तर त्या जागेस तुमच्या इतका लायक मनुष्य असेल असें मला वाटत नाहीं. तुह्मी माझ्या पाळतीवर राहून अखेर मला पकडलें याबद्दल तुमची प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे. ’

शरच्चंद्र त्या दोघा अधिकाऱ्यांना ह्मणाला–‘ तुह्मीही माझ्याबरोबर चलाल तर बरें होईल. ’

लक्ष्मणसिंग— मी गाडी हाकतों ह्मणजे झालें.

शरच्चंद्र—व: मग तर आयतेंच काम झालें. गिरधरलाल आंत बसतील. वसंतराव, तुह्मीही आमच्याबरोबर चचलें पाहिजे. कारण पहिल्यापासूनच या प्रकरणांत तुह्मी आमच्याबरोबर आहां. त्यांच्याबरोबर जाण्यास मी मोठ्या आनंदानें तयार झालों. आणि आह्मी सर्वजण खालीं उतरलों. कैद्यानें पळून वगैरे जाण्याचा यत्किंचित्‌ही प्रयत्न न करतां तो सावकाश शांत रीतीनें गाडींत बसला. आणि आह्मीही त्याच्या पाठोपाठ बसलों. लक्ष्मणसिंगानें गाडी हाकून थोड्याच वेळांत आह्मा

सर्वांस चौकी जवळ आणलें. आह्मी सर्वजण खालीं उतरून एका खोलींत गेलों. तेथें एक अधिकारी होते त्यांनीं कैद्याचें नांव टिपून घेऊन त्यानें ज्यांचे खून केले होते त्या माणसांचीही त्यांनीं नोंद करून घेतली. हा अधिकारी अगदींच नीरस दिसत होता. चेहऱ्यावर यत्किंचितूही फरक न दाखवितां त्यानें हें सर्व काम केलें. जणु काय तो लिहिण्याचें एखादें निर्जीव यंत्रच होता ! नांवें टिपून घेण्याचा विधि झाल्यानंतर तो अधिकारी कैद्याकडे वळून ह्मणाला—' तुमच्यावर सुमारें एक आठवड्यांत खटला सुरू होईल. तुह्माला आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय ? तुह्मी जें जें सांगाल त्याचा तुमच्या विरुद्ध उपयोग होईल हें तुह्मास मी बजावून सांगतों. '

यावर आमचा कैदी ह्मणाला, ' मला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत. या सर्व सद्गृहस्थांना माझी हकीगत सांगण्याची माझी इच्छा आहे. '

अधिकारी ह्मणाला, ' जें काय तुह्मी सांगणार असाल तें चौकशीच्या-वेळींच सांगा ह्मणजे झालें. '

' कदाचित् माझी कधीं चौकशीच न झाली तर ? हं, असें बिचकूं नका, मी कांहीं आत्महत्या वगैरे करणार नाहीं. आपण वैद्य आहांत काय ? ' हा शेवटचा प्रश्न त्यानें मला विचारला.

मी ह्मणालों ' होय, मी वैद्य आहे. '

' तर मग माझ्या छातीला हात लावून बघा. '

यावर मीं त्याच्या छातीस हात लावून पाहिला. त्याच्या छातींत खूप जोरानें ठोके पडत होते. एखाद्या इमारतीस एन्जिन लावलें असतां ती जशी धडधडते तशींच त्याच्या छातींत क्रिया चालली होती. त्याच्या छातींतील धडधडणें साधारण दुरूनही ऐकूं येत होतें.

छाती पाहून मी ह्मणालों ' तुमच्या छातीला विकार झाला आहे. '

' मलाही तसेंच वाटतें. गेल्या आठवड्यांत मी आपली छाती एका वैद्याकडून तपासून घेतली तेव्हां थोड्याच दिवसांत तुमची छाती फुटेल असें त्यानें मला सांगितलें. आज कित्येक वर्षें माझ्या छातींत हा विकार आहे. मी डोंगराळ प्रदेशांत बरेच दिवस काढले. तेथें निवाऱ्याची जागा नसे. मला पांघरायलाही पुरेसें नसे. खाण्यापिण्याचेही

हालच असत. आतां काय ! मला करायचें होतें तें मी केलें. मीं उद्या मेलों काय आणि आज मेलों काय त्याची मला मुळींच फिकीर वाटत नाहीं. तरी पण इहलोक सोडून जाण्यापूर्वी माझी हकीगत एकदा कोणापाशीं सांगितलेली असावी अशी माझी फार इच्छा आहे. मी एक सामान्य गुन्हेगार आहें. गळेकापू आहे अशी माझ्या संबंधानें जनतेची समजूत होऊं नये येवढीच माझी इच्छा आहे.

याला आपली हकीकत सांगून द्यावी किंवा नाहीं यासंबंधानें त्यांच्यामध्यें बराच खल होऊन अखेर त्या अधिकाऱ्यानें मला विचारलें, " डॉक्टर, याला अगदीं तुर्तातूर्तच भीति आहे असें तुह्मांस वाटतें कां ? "

मीं उत्तर केलें, " होय खात्रीनेंच आहे ! "

अधिकारी ह्मणाला, " असें आहे तर त्याच्या मुखानेंच त्याची हकीकत ऐकून घेणें हें आपलें कर्तव्य आहे. त्याचीही इच्छा तशीच राहूं देणें निष्ठुरपणाचें होईल. ( कैद्याकडे वळून ) बरें तर मग तुह्माला कांहीं हकीकत सांगावयाची असल्यास ती खुशाल सांगा. पण आह्मी ती सर्व टिपून घेऊं हो. "

" मला आपल्या परवानगीनें बसण्याची इच्छा आहे " असें ह्मणून जीवनराव खालीं बसून ह्मणाला — हा छातीचा रोग जडल्यापासून माझी ताकद अगदीं नाहींशी झाली. अर्ध्या तासापूर्वी या गृहस्थांची व माझी थोडी झटापट झाली तिचा परिणाम अजूनही माझ्या छातींत होत आहे ! इतका मी निःशक्त झालों आहे. माझ्या गोष्टी श्मशानांत गेल्या आहेत अशा स्थितींत मी आपणाशीं खोटें बोलेन असा संशय ही मनांत आणूं नका. मी आतां जी हकीकत सांगणार आहे त्या हकीकतीतील प्रत्येक शब्द खरा आहे. त्याचा परिणाम माझ्यावर काय होईल याबद्दल मला बिलकुल परवा वाटत नाहीं. "

अशी प्रस्तावना करून जीवनराव खुर्चीस टेंकून बसला व आपली हकीकत सांगूं लागला. तो आपली हकीकत अगदीं शांतपणानें सांगत होता. ती हकीकत जणूं काय रोजच्या व्यवहारांत घडणारी होती अशा सहजरीतीनें तो ती निवेदन करीत होता. माझ्या रोजनिशींत नमूद

झालेला हा वृत्तान्त अगदीं अक्षरशः बरोबर आहे. कारण लक्ष्मणसिंगानें त्याचें जें टिपण करून ठेवलें आहे त्याशीं मीं ती ताडून पाहिली आहे.

जीवनराव ह्मणाला, ' या मनुष्यांचा मी इतका द्वेष कां करीत होतों हें तुह्माला सविस्तर सांगण्यांत मला कांहीं विशेषसें महत्व वाटत नाहीं. तुह्मांला इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरे आहे कीं त्यांनीं एका सद्गृहस्थाचा खून करून त्याच्या मुलीसही इहलोक सोडावयास लावलें. हा गुन्हा घडल्यास इतके दिवस होऊन गेले कीं त्यांच्यावर कायदेशीर इलाज करण्यास मजजवळ साधन राहिलें नाहीं. मला मात्र त्यांचा गुन्हा पक्का माहीत होता. ह्मणून न्यायाधीश व सुळावर चढविणारा या दोघांचेही अधिकार मीं आपल्या हातांत घेतले. तुह्मी माझ्या जागीं असता, तुमच्या अंगांत जर कांहीं माणुसकी वसत असेल तर तुह्मींही असेंच केलें असतें.

' ज्या मुलीविषयीं मीं आतांच उल्लेख केला त्या मुलीचें व माझें वीस वर्षांपूर्वीच लग्न व्हावयाचें होतें. त्या दिनकरानें तिच्याशीं जबरदस्तीनें विवाह लावून तिला अकालीं यमसदनीं पाठविलें; कारण विवाह लागतांच ती झुरणीस लागून एक महिन्याच्या आंतच मृत्यु पावली. तिच्या प्रेताच्या हातांतून ही मीं आंगठी घेतली व ही आंगठी अगदीं निधनसमयीं दिनकराच्या नजरेस पडून त्याला आपल्या गुन्ह्याचें स्मरण व्हावें असा मीं संकेत ठरविला. ती आंगठी मीं प्राणापलीकडे जपून ठेवली व या दोघांचा कित्येक वर्षेपर्यंत हजारो कोस पाठपुरावा केला. मला दमवून सोडावें असा त्यांचा विचार होता पण तो अखेर निष्फळ ठरला ! उद्यां जर मला मरण येईल—आणि हें संभवनीयही आहे—तर मला निदान इतकी तरी समाधान मानण्यास जागा आहे कीं मी मरणापूर्वीं आपली प्रतिज्ञा शेवटास नेली. आतां मला या जगांत दुसरी कशाची इच्छाही नाहीं व आशाही नाहीं.

" ते श्रीमंत होते व मी गरीब होतों. अर्थात् त्यांचा पाठलाग करणें हें कांहीं सोपें काम नव्हतें. मणिपुरास जेव्हां मी आलों तेव्हां मी अगदीं कफल्लक होतों. येथें कांहींतरी धंदा बघणें मला भागच पडलें. घोड्यावर बसणें व गाडी हाकणें ह्यांत मी तरबेज असल्यामुळें मी एका गाड्यांच्या कारखानदाराजवळ नोकरी मागावयास गेलों व त्यानें

तावडतोब मला नोकरीस ठेवलें. आठवड्याची कांहीं नियत रक्कम मी कारखानदारास नेऊन द्यावयाची व बाकी जें राहील तें मी ठेवावयाचें असा त्यांचा व माझा करार झाला. वर मला थोडेंच पैसे उरत होते तरी मी तेवढ्यावरच समधान मानून आपला रोजगार इमानें इतबारें चालविला. प्रथम मला मोठी अडचण पडली ती येथील रस्ते समजून घेण्याची ! कारण, या शहरासारखे वेडे वांकडे रस्ते आपण दुसरे कोठेंही पाहिलें नाहींत. याकरितां अखेर एक नकाशा मला आपल्याजवळ बाळगावा लागला त्या नकाशांतील मुख्य मुख्य ठिकाणें मीं चांगलीं लक्ष्यांत ठेवलीं व रस्त्याचें व माझें बस्तान बसलें.

"मला पाहिजे होते ते दोन गृहस्थ कोठें रहात होते याचा तपास लावण्यांत माझा बराच वेळ गेला. त्यांच्या साठीं मीं अतोनात तपास केला तेव्हां अखेर त्यांचा मला तपास लागला. ते दोघेही नदीच्यापलीकडच्या तीरास एका मोठ्या हवेलींत रहातात. असें मला समजतांच आतां त्यांना हस्तगत करून घेण्यास आपणास विशेषशी अडचण पडणार नाहीं हा विचार माझ्या मनांत येऊन मला अंतर्यामीं फार आनंद झाला ! मीं आपली दाढी वाढविली असल्यामुळें त्यांना मी ओळखूं येण्याचा संभव नव्हता. येनकेन प्रकारेण त्यांना तावडींत धरावयाचेंच हा माझा निश्चय ठरला. आतां ही शिकार पुनः हातची जाऊं नये म्हणून मी फार सावधगिरी बाळगूं लागलों.

"तरीपण त्यांचा माझा सामनाच होईना. ते कोठेंही जावोत तरी सावलीप्रमाणें मी आपला त्यांच्या बरोबर असावयाचाच ! कित्येकदा मी गाडी हाकतां हाकतांच त्यांचा पाठलाग करी. कित्येक प्रसंगीं पायानेंच जात असे. परंतु गाडीनें पाठलाग करणें अधिक सोइस्कर होतें. अगदी सकाळीं किंवा सायंकाळ पडल्यानंतरच्या वेळांतच मला काय पैसे मिळतील ते मिळतील; बाकी वेळ माझा बहुतेक याच धंद्यांत जात असे. मालकाचा करार पुरविण्यासंबंधांत मला कित्येक वेळां बूडही येत असे. ज्या प्राण्यांचा मी पाठलाग करीत होतों ते माझ्या हातीं आले म्हणजे झालें; मग इतर प्रकारांनीं कितीही नुकसान होवो त्याची मी फिकीर बाळगीत नसे.

'तेहि विशेष सावध गिरीनें वागतच; कारण मी त्यांचा पुनः पाठपुरावा करूं लागेन यासंबंधी त्यांची भीति अद्यापही निर्मूळ झाली नव्हती. ते एकटे कधींही बाहेर पडत नसत व रात्र झाल्यानंतर तर नेहमीं घरींच असत. दोन आठवडे मी त्यांच्यामागें एकसारखा होतों परंतु, ती जोडी फुटलेली मला कधींही दिसली नाहीं. दिनकर हा जेव्हां पहावें तेव्हां दारूच्या धुंदींत असे; परंतु, श्रीनिवास मात्र नेहमीं स्वसंरक्षणार्थ मोठा दक्ष असे. त्यांना आपल्या तावडींत धरावें म्हणून मीं हरतऱ्हा केल्या परंतु, अद्याप कोणत्याही बाजूनें माझें बस्तान बसेना. तरी पण मी नाउमेद मात्र कधींही झालों नाहीं. त्यांच्या पापांचा घडा भरण्याची वेळ अगदीं समीप आली आहे असें मला कांहीं तरी एक अदृश्य शक्ति आंतून सांगत होती. मला भीति येवढीच वाटत होती कीं, माझ्या हातून संकल्पित कामगिरी होण्याच्या पूर्वींच माझी छाती फुटून कदाचित् मला मरण येईल ! कामगिरी साधून माझ्या जीविताचें सार्थक होण्यापूर्वीं हा विकार बळावूं नये येवढीच माझी देवाजवळ प्रार्थना होती.

सरतेशेवटीं एके दिवशीं संध्याकाळीं ज्या घरीं ते जेवायला जात होते त्या घराजवळ एक गाडी उभी असलेली मीं पाहिली. त्या गाडींत सामानाच्या पेट्या वगैरे चढविण्यांत येऊन दिनकर व श्रीनिवास हे दोघेही गाडींत बसले. मीही त्यांच्या गाडीमागें कांहीं अंतरावर आपली गाडी चालविली. हे परगांवला जावयास निघाले असें वाटून माझें मन फारच उद्विग्न झालें. त्यांची गाडी अखेर स्टेशनवर गेली. तेथें मीही आपली गाडी थांबविली व एका मुलास घोडा धरावयास सांगून मी त्यांच्या मागोमाग स्टेशनवर गेलों. तेथें त्यांनीं गाडीचा शोध केला तों गाडी आतांच निघून गेला व दुसऱ्या गाडीस अद्याप दोनप्रहर अवकाश आहे असा त्यांना तेथें शोध लागला. हें ऐकून श्रीनिवास फार त्रासून गेल्या सारखा दिसला. दिनकरास मात्र यामुळें एकपरीं आनंदच झाल्यासारखा वाटला. स्टेशनच्या गर्दींत मला इतकें त्यांच्याजवळ उभें रहातां आलें कीं त्यांचें सर्व बोलणें मला इत्थंभूत ऐकावयास सांपडलें. दिनकर श्रीनिवासास म्हणाला कीं मला शहरांत कांहीं काम आहे तेवढें करून

मी तावडतोब परत येता तोंपर्यंत तूं येथेंच थांब. यावर श्रीनिवासानें पुष्कळ आढेवेढे घेतले परंतु दिनकराने त्याचें बोलणें जुमानलें नाहीं. ' कोठेंही जावयाचें झालें तरी आपण दोघानीं एकत्र जावयाचें असें ठरलें असून तूं आतां एकटा चाललास हें कांहीं चांगलें नाहीं ' असेंही श्रीनिवास आपल्या सोबत्यास म्हणाला. परंतु ' हें काम मोठें नाजूक आहे. त्यासाठीं मी एकटाच जाणें अवश्य आहे ' असें दिनकरानें त्याला उत्तर दिलें. यावर श्रीनिवास काय म्हणाला तें मला ऐकूं आलें नाहीं. परंतु तें ऐकून दिनकर म्हणाला, ' या आमच्या उठाठेवी करण्याचें तुला कांहीं कारण नाहीं. तूं कसा झालास तरी माझा पगारी नोकर आहेस. तूं आपल्या पायरीनेंच वागलं पाहिजे. यावर श्रीनिवासानें ' ठीक आहे; सापुढें मला कांहीं बोलतां येत नाहीं; परंतु हें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. असो; पण आतां येवढं तरी लक्ष्यांत ठेवा कीं आतां पुनः गाडी चुकली तर आपण गिरजाशंकरच्या वरीं या तेथें तुमची व माझी गाठ पडेल. असें श्रीनिवासानें त्यांस सांगितल्यानंतर दिनकर म्हणाला, ' तशी वेळच येणार नाहीं. मी बरोबर अकरावाजतां स्टेशनवर अगदीं ठेवलेलाच ! '

जो सुयोग यावा म्हणून मी आजपर्यंत वाट पहात होतों तो आज आला. त्याक्षणींच शत्रू माझ्या हस्तगत झाले असें मी समजूं लागलों. ते एकत्र असते तर त्यांना आपलें संरक्षण करतां आलें असतें परंतु अलग झाले कीं ते माझ्या पूर्ण कब्जांत होते. असा सुयोग आला तरी त्याचा उपयोग करून घेण्यास मीं फाजील घाई केली नाहीं. या संबंधांत तरतूद काय करावयाची याबद्दलचा मी आधींच ठाम संकल्प ठरवून ठेवला होता. ज्याचा आपण सूड घेतों त्याला सूड घेणारा माणूस कोण हें समजून त्याचीं दुष्कृत्यें त्याच्यापुढें उभीं राहिली तरच सूड घेण्याची खरी मजा आहे. कांहीं दिवसांपूर्वी मीं एका गृहस्थाला गाडींतून नेलें. बक्षीगंजांत त्याला एक घर पहावयाचें होतें तें पाहून तो परत गेला; परंतु जातांना गाडींतच तो किल्ली विसरून गेला. सायंकाळीं तो माझ्याकडे शोधाला आला तेव्हां त्याला ती मीं दिली; परंतु दरम्यान वेळ सांपडला त्यांत त्या किल्लीबरहुकूम दुसरी एक किल्ली मी करून

आणली. यामुळें या शहरांतली एक निभ्रत जागा माझ्या हस्तगत झाल्यासारखें वाटून अर्धे काम झालें असें मला वाटूं लागलें. दिनकरास त्या घरांत कसें घेऊन जावें येवढाच माझ्यापुढें आंतां प्रश्न होता आणि तोच अत्यंत गहन होता.

" रस्त्यांतून जातां जातां तो एकवेळां दारूच्या दुकानांत शिरला. दुसऱ्या दुकानांत तो सुमारें अर्धातासपर्यंत होता. त्या दुकानांतून तो बाहेर आला तेव्हां तो अगदीं झिंगलेला होता. त्याच्यानें एक पाऊलही सरळ टाकवेना ! बाहेर येतांच दुकानासमोर उभी असलेली एक गाडी त्यानें बोलावली व त्या गाडींत तो बसला. मीं आपली गाडीही अगदीं तिच्या मागोमाग हाकली. इतकी कीं माझ्या घोड्याचें नाक त्या गाडीला लागावें ! याप्रमाणें आह्मीं बरेच मैल चालून गेलों, व ज्याठिकाणीं त्याची जेवण्याची व्यवस्था होती ह्मणून पूर्वींच सांगितलें आहे तेथें तो नेमका उतरला. तेथें परत येण्याचा त्याचा उद्देश काय असावा हें कांहीं माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. तेव्हां मीं आपली गाडी त्या घरापासून सुमारें ५० हातावर उभी केली. तो त्या घरांत शिरतांच त्याची गाडी निघून गेली. माझ्या तोंडाला अगदीं कोरड पडली; मला थोडेसें पाणी द्याल तर फार चांगलें होईल. '

मीं त्याला प्यावयास पाणी दिलें. एका क्षणार्धांत त्यानें तें पाणी पिऊन टाकलें.

नंतर तो ह्मणाला—" आतां मला जरा बरें वाटूं लागलें. असो. आतां आंपली हकीकत पुढें चालवूं. त्या ठिकाणीं मी सुमारें घटकाभर उभा होतो. तों आंत दोन माणसांची मारामारी होऊन मोठा थोरला गलबा झाल्यासारखा आवाज मला ऐकूं आला. इतक्यांत त्या घरांतून दोन माणसें बाहेर आलीं. त्यांपैकीं एक दिनकर होता व दुसरा एक तरुण मनुष्य होता. तो कोण होता हें मला माहीत नव्हतें, कारण मी त्याला पूर्वीं कधींही पाहिलें नव्हतें. दाराबाहेरील पहिल्या पायरीवर येतांच त्यानें दिनकरास एक गचांडी दिली त्याबरोबर तो कोलमडत रस्त्याच्या मध्यावर जाऊन पडला. यावर आपली काठी उगारून तो तरुणमनुष्य दिनकरास ह्मणाला, ' गाढवा, कुलीन घराण्यांतील मुलीच्या

वाटेस गेलें ह्मणजे काय होतें तें तुला आणखी सांगूं का ? ' तो तरुण फारच रागावलेला दिसत होता. चट्दिशीं उठून दिनकरानें तेथून पोबारा केला नसता तर तेथें त्याचीं हाडें चांगलींच नरम झालीं असतीं ! दिनकर रस्त्याच्या वळणापर्यंत गेला व तेथें त्यानें माझी गाडी बोलावली. गाडी जवळ नेतांच तो चट्कन गाडींत बसला.

' तो गाडींत बसतांच माझें हृदय आनंदानें नाचूं लागलें. इतकें कीं माझ्या मुद्रेंत एकदम हा येवढा फरक झालेला पाहून कदाचित् दिनकराचें मन साशंक होईल अशीही मला भीति वाटूं लागली. गावाबाहेर कोठें तरी उघड्या मैदानांत याला घेऊन जावें आणि त्याची परलोकीं रवानगी करून द्यावी असा मी विचार करतों आहे तोंच माझी अडचण त्यानें दूर केली. स्वारींना दारू पिण्याची पुन: हुक्की आली व त्यांनीं मला एका दारूच्या गुत्त्याजवळ गाडी उभी करावयास सांगितलें. गाडी उभी करतांच तो खालीं उतरला व ' मी परत येईपर्यंत गाडी येथें उभी कर ' असें सांगून तो दुकानांत शिरला. अगदीं दुकान बंद होईपर्यंत तो दुकानांतच होता. पुन: बाहेर आला तेव्हां तो इतका बेहोष झालेला होता कीं त्याची हवी तशी वासलात लावण्यास मला मुळींच अडचण पडूं नये !

' मी त्याला एकदम ठार करणार होतों असें समजूं नका. तसें केलें असतें तरी त्यांत कांहीं गैर झालें नसतें. परंतु माझा तसा उद्देश नव्हता. त्याला जगण्याची एक संधि द्यावी असा माझा पूर्वीपासूनच निश्चय झाला होता. न्यायदेवता तरी न्याय कोणत्या बाजूस देते हेंही मला पारखून पहावयाचें होतं. तें मी कसें केलें याबद्दलची आतां हकीकत सांगतों ती आपण लक्ष्य देऊन ऐकावी. कुसुमपुरास असतांना मी एका प्रयोगालयांत नोकर होतों. तेथील अध्यापक एकदा विषारी वनस्पतीवर आपल्या विद्यार्थ्यांना व्याख्यान देत असतां मी तेथें हजर होतों. कुसुमपुराच्या आसपासच्या जंगलांतील एक वनस्पति त्यांनीं आपल्या छात्रवर्गास दाखविली. त्याचें बीं मोहोरी इतकें बारीक होतें. तें पोटांत गेलें कीं कोणताही प्राणी तावडतोब मरतो असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या लहान लहान गोळ्या करून त्या त्यांनीं एका कुपींत ठेवल्या होत्या. ती

कुपी कोठें होती हें मी नेमकें लक्ष्यांत ठेवून वरातील सर्व मंडळी निघून गेल्यानंतर त्यांतल्या कांहीं गोळ्या आपल्या जवळ घेऊन ठेवल्या. या गोळ्यांच्या आकाराच्याच दुसऱ्या बिन विषारी गोळ्या मीं तयार केल्या. व दोन्हीं निरनिराळ्या डब्यांत घालून ठेवल्या. ज्या मनुष्यांचा मी शोध करीत होतों तीं मला भेटलीं ह्मणजे त्यांच्यापुढें या दोन्हीं मासल्यांच्या गोळ्या ठेवून त्यांना त्यांतील हवी ती उचलून खावयास सांगावयाची व बाकी राहील ती आपण खावयाची. या गोळ्या कोणत्या विषारी आहेत व कोणत्या बिन विषारी आहेत हें माझें मला सुद्धां ओळखूं नये ह्मणून मी त्या ठेवण्यास अगदीं एका आकाराचे व एकमेकांशीं हुबेहुब सारखे डबे घेतले हेतु हाच कीं न्याय त्यांच्या बाजूस आहे कीं माझ्या बाजूस आहे याचा आपोआप उलगडा व्हावा! चिट्ठ्या टाकून प्रश्न पाहतात तशांतलाच मीं हा पर्याय केला होता. आणि तो मोठा सोईचाही होता. त्या गृहस्थांना बंदुकीनें ठार करण्याच्या भानगडींत पडावें तर बंदुकीचा आवाज होऊन माणसें जमण्याची भीति! असो. अशारीतीनें मीं आपला निश्चय कायम ठरवून त्या लहान डब्या मी प्राणापलीकडे जपून ठेवल्या!

मीं पुनः गाडी चालू केली तेव्हां रात्रींचे सुमारें बारा वाजले होते. खूप काळोख पडला असून पावसाचीही संततधार सुरू होती! हा सर्व देखावा आणि गाडींत बेहोष होऊन पडलेले गृहस्थ ह्यांना पाहून मला इतका कांहीं विलक्षण आनंद झाला कीं कांहीं विचारूं नका! आनंदानें आरोळी ठोकण्याच्याही मी अगदीं बेतांत आलों होतों. सतत वीस वर्षेपर्यंत मनांत घोळत असलेल्या कार्याची सिद्धि समीप आलेली पाहून मनुष्याला किती आनंद होणें स्वाभाविक आहे याची तुह्मीच कल्पना करा! माझ्यानें त्याचें वर्णन कांहीं देववत नाहीं! तुमच्या पैकीं जर कोणी एखाद्या गोष्टीचा असाच ध्यास धरला असेल व ती तुमच्या हातून सिद्धीस जाण्याचा सुयोग तुह्माला मिळाला असेल तरच मी काय ह्मणतो याचा तुह्माला अर्थ समजणार आहे. आनंदानें माझे स्नायु थरारूं लागले. माझे हात थरथर कापूं लागले; डोक्याच्या नाड्या ताडताड उडूं लागल्या; जनार्दनपंत व मृदुला हीं दोघेंहिजण

माझ्या पुढें मूर्तिमंत उभीं राहिलीं आहेत असा मला एकसारखा भास होऊं लागला. इतकेंच नव्हे तर घोड्याच्या दोन्ही बाजूस त्याचा लगाम धरून तेही त्याच्या बरोबर पळत आहेत असेंही मला दिसू लागलें ! इतक्यांत गाडी लालबागेजवळ येऊन थडकतांच मीं घोडा उभा केला व आंत दिनकरपंत अस्ताव्यस्त पडले होते त्यांना मी ह्मणालों ' खालीं उतरावयाचें ना ? रावसाहेब. '

ते ह्मणाले– आलें का घर !

' त्यांना वाटलें आपण गिरजाशंकरच्या दाराशींच आलों आहों ! मी खालीं उतरा ह्मणून सांगतांच ते खालीं उतरले व माझ्याबरोबर बागे-कडे जाऊं लागले. त्यांचें एकसारखे झोकांडे जात होते तेव्हां त्यांना मला पदोपदीं सावरून धरावें लागत होतें. बागेच्या आंतील दरवाजा उघडून मी त्यांना खोलींत घेऊन गेलों. जनार्दनपंत व मृदुला हीं दोघेंही आमच्यापुढेंच चालत होतीं हें तुह्मांस सांगितलें असतां तुह्मांस माझें बोलणें खरें वाटेल काय ? '

सभोंवार पाहून ते ह्मणाले– किती काळोख पडला आहे हो ?

" माझ्या खिशांत मेणबत्ती व काड्यांची पेटी होती. काडी ओढून मी ह्मणालों– हा पहा आतां उजेड पडला ! उजेडाला काय उशीर ! दिवा लावल्यानंतर मी त्याला ह्मणालों–दिनकरपंत, मी कोण आहे हें आपण ओळखतां का ? "

" माझ्याकडे त्यानें बराच वेळपर्यंत निरखून पाहिलें. दारूमुळें त्याची दृष्टि एकाजागीं ठरेना. परंतु जसजशी माझी ओळख पटूं लागली तसतशी त्याची धुंदीही उतरूं लागली ! त्याच्या मुद्रेवर भयानें आपली छाप बसाविली ! त्याचें सर्व शरीर लटलट हलूं लागलें ! आतां मला यानें ओळखलें असें मी तेव्हांच ताडलें ! त्याचे दात खडखड वाजूं लागले; सर्वांगास दरदरून घाम सुटला. हें पाहून भिंतीस टेकून मी खदखद हसूं लागलों. सूड घ्यावयास सांपडेल तर फार चांगलें होईल असें मला वाटत होतें परंतु तसा सुयोग आला ह्मणजे केवढा आनंद होतो याची मला प्रत्यक्ष कल्पना आतां आली. "

" मी म्हणालों— हरामखोरा ! लवणपुरापासून सहस्रावधि कोसा-

वर मी एकसारखा तुझा पाठलाग करीत आहे. तरीपण तुझा माझा सामना होण्याचा योग एकसारखा दुरावतच चालला. आतां मात्र यापुढें तुला प्रवासाचा शीण घेण्याची मी जरूर ठेवीत नाहीं. हें माझें बोलणें ऐकून तो कचरला. पुन: त्याला वाटलें कीं मी वेडांत कांहीं तरी बरळत आहे. आणि वास्तविक पहातां मी त्यावेळेपुरता वेडाच झालों होतों. त्यावेळेस घुंगुणा फुटून माझ्या नाकांतून रक्त गेलें नसतें तर मला वाटतें मी मनोभावनांच्या अतिरेकानें तेथें बेशुद्धच होऊन पडलों असतों !

" यावर दरवाजास आंतून कुलुप घालून व त्याच्यापुढें किल्ली वाजवून मी त्याला अनुलक्षून ह्मणालों—' मृदुलेविषयीं आतां तुला काय वाटतें ? तुझें पारिपत्य होण्याची वेळ बरीच लांबली पण अखेर ती आली ! ' असें मी ह्मणत असतां त्याचे ओठ थर थर कांपत होते. जीव वांचविण्याविषयीं त्यानें मला विनंति केली असती परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नसता हें तो पक्कें जाणून होता. "

" मग आतां तुह्मी मला ठार करणार काय ? " असें त्यानें पुटपुटत विचारलें !

' यावर मी उत्तर केलें— मीं तुला ठार केलें तरी तुझा खून केला असें कधींही होणार नाहीं. खाटकाप्रमाणें मृदुलेच्या बापाचा अमानुषपणानें खून करून तूं तिला जबरदस्तीनें पळवून नेलीस तेव्हां तुझ्या मनाला कांहीं शरम वाटली का ? '

' तिच्या बापाचा मीं खून केला नाहीं ! ' असें तो ह्मणाला.

' बापाचा खून केला नसशील ! मुलीच्या मरणास तर तूं कारण झालास कीं नाहीं ? ' असें ह्मणून त्या डब्या मी त्याच्यापुढें ठेवल्या, व ह्मणालों ' या दोन डब्या तुझ्यापुढें ठेवल्या आहेत. या दोन्हींत गोळ्या भरलेल्या आहेत. एका डबींतील गोळी तूं घे. व दुसऱ्या डबींतली मी घेतों. ईश्वर आपला दोघांचाही न्याय करणारा आहे. सत्य कोणाच्या बाजूस आहे त्याची आतांच पारख होईल. '

' यावर तो माझी करुणा भाकूं लागला. त्याबरोबर मीं सुरा बाहेर काढला. घेतोस कीं नाहीं गोळी ! का भोसकूं सुरा ! कोणत्या डबींत कोणत्या गोळ्या आहेत हें मला सुद्धां माहीत नाहीं ! डब्या पाहिल्यास

ना कशा एकसारख्या आहेत त्या ? चल आटप लवकर ! अमुकच डबींतली गोळी खा असा कांहीं माझा आग्रह नाहीं. ' असें मी ह्मणतांच त्यानें एका डबींतली गोळी खाल्ली व दुसऱ्या डबींतील मीं खाल्ली. आमच्या पैकी कोण जगतो व कोण मरतो याचा निवाडा आतां लवकरच व्हाव-याचा असल्यामुळें आह्मी एकमेकांकडे पहात कांहीं वेळ स्वस्थ बसलों. त्याचें डोकें फिरूं लागलें ! आपल्या वाट्यालाच विषारी गोळी आली हें त्याच्या लक्ष्यांत येऊं लागल्याचीं चिन्हें त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागलीं. दुःखानें त्याचा चेहरा प्रेताप्रमाणें निस्तेज दिसूं लागला. मरणाच्या धास्तीनें मरणाचीच छाया त्याच्या मुद्रेवर पसरली. त्याची ती मुद्रा केव्हां तरी माझ्या स्मरणांतून जाईल काय ? ती मुद्रा पाहून मला हसूं कोसळलें व ती आंगठी मीं त्याच्यापुढें धरली ! तिच्याकडे तो पहतो न पहतो तोंच विषाचा अंमल त्याच्यावर जोरानें चालू झाला. त्यानें आपले हात पुढें धरलें, तोंड वेडेवांकडें केलें, पाय ताठविले व धाडकन् जमीनी-वर अंग टाकलें. मी त्याला पायानें हालवून पाहिलें ! पण तेथें कांहीं जीव नव्हता ? झालें; एका निमिषार्धांत सर्व ग्रंथ आटपला !

' माझ्या नाकांतून रक्त वाहत होतें पण त्याच्याकडे माझें लक्ष्य नव्हतें. त्या रक्तानें भिंतीवर लिहिण्याची बुद्धि मला कोठून झाली कोणास ठाऊक ! त्यावेळेस मी देहभानावर नव्हतों ! माझ्या अन्तःकर-णांत आनंदाच्या लहरीवर लहरी कोसळत होत्या त्या भरांत तें कृत्य केलें येवढाच त्यांतला अर्थ ! ' कीना ' हा शब्द लिहिण्यांतही माझा विशेषसा उद्देश नव्हता. परभाषेंतला शब्द पाहून या प्रकरणाचा तपास लावणारांनीं गोंधळून जावें व कांहीं वेळ गमत व्हावी येवढाच माझा हेतु ! इतकें सर्व झाल्यानंतर मी गाडीकडे गेलों. रस्त्यानें कोणीही येतजात नव्हतें. पूर्वीप्रमाणेंच सर्वत्र सामसूम होती असें पाहून मीं गाडी हाकली. थोडें दूर गेल्यानंतर मीं सहज खिशांत हात घालून पाहिलें तों त्यांत मृदुलेची आंगठी नाहीं ! ही फार वाईट गोष्ट झाली ! तिचें स्मरण होण्यास माझ्याजवळ दुसरें कांहींही नव्हतें. असा विचार करून मी पुनः त्या घराकडे गाडी वळविली. आंगठी पेक्षां मला कोणतीही गोष्ट अधिक प्रिय नसल्यामुळें तेथें मला कोणी पकडील किंवा काय याबद्दल

मला बिलकुल धास्ती वाटली नाहीं. तेथें उतरल्यानंतर नेमकाच मला एक शिपाई भेटला ! खूप दारू पिऊन मी बेहोष झालों आहे असा बहाणा करून मी बरळूं लागलों तेव्हां पोलीसच्या हातून माझी मुक्तता झाली. ’

“ याप्रमाणें दिनकरपंताची तर इहलोकांतून रवानगी झाली ! आतां राहिला श्रीनिवास ! त्याची एकदा वाट लावली ह्मणजे जनार्दनपंतांच्या ऋणांतून मीं मुक्त होणार ! तो गिरजाशंकरच्या येथें असल्याच मला आधींच कळलें होतें; ह्मणून मी तेथें आसपास सर्व दिवसभर टेहेळणी करीत राहिलो. परंतु तो घरांतून बाहेरच पडला नाहीं. दिनकर ठरल्याप्रमाणें परत आला नाहीं तेव्हां दगा फटका झाला अशी त्याच्या मनाला शंका वाटली असावी ह्मणूनच तो घर धरून बसला होता. परंतु केवळ घरीं बसून माझ्या तडाक्यांतून सुटतां येईल ही त्याची आशा व्यर्थ होती. तो ज्या माडींत निजला होता त्या माडीची खिडकी मीं आधींच हेरून ठेवली होती. तेथेंच आजूबाजूस कांहीं शिड्या होत्या त्यांतली एक शिडी घेऊन अगदीं पहाटे मी त्याच्या खोलींत खिडकींतून चढलों. त्याला मीं जागें केलें व सांगितलें कीं केल्या कर्माचें प्रायश्चित्त भोगण्याची आज वेळ आली आहे. मीं त्याला दिनकरच्या मृत्यूची हकीकत कळविली. व तेथेंही गोळ्यांच्या निवडीचा विधि पहिल्याप्रमाणेंच केला. परंतु गोळ्यासंबंधाचा माझा वृत्तान्त ऐकतां ऐकतांच त्यानें माझ्या गळ्यावर झांप टाकली; त्याबरोबर मी त्याच्या पोटांत सुरा भोसकून त्याचा प्राण घेतला ! गोळ्यांची निवड जरी त्यानें केली असती तरी दिनकरप्रमाणें विषारी गोळ्याच त्याच्या नशीबास आल्या असत्या अशी माझी पक्की खात्री आहे. कारण या मृत्युलोकीं न्याय नसला तरी ईश्वराच्या दरबारांत न्याय आहे अशी दिनकराच्या उदाहरणावरून माझी बालंबाल खात्री झाली होती. ”

“ मला आतां विशेष सांगायचें कांहीं उरलें नाहीं. आणि कांहीं सांगायचें राहिलें असलें तरी माझ्या अंगांत आतां शक्ति राहिली नाहीं. त्यानंतर एक दोन दिवस मी गाडी हाकीतच होतों. कांहीं पैसे जमवून पुनः कुसुमपुरास जावें असा माझा मानस होता. मी एका मैदानावर उभा

जीवन ?डिंगला येथें आहे का ? त्याची गाडी भाड्यानें असा शोध करीत एक तरुण मनुष्य तेथें आला. तो ासें नांव घेत आलेला पाहून वास्तविक मला शंका याव-ती. परंतु तशी कांहीं मला शंका आली नाहीं. गाडी हे येथें गृहस्थ आहेत त्यांनीं मला हातकड्या घातल्या आणि त्यानंतरचा सर्व वृत्तान्त तुमच्या देखतच घडलेला आहे. मला सांगावयाचें होतें तें झालें. तुह्मी पाहिजे तर मला खुनी मनुष्य समजा. परंतु माझी मनोदेवता मात्र मला असें स्पष्ट सांगत आहे कीं, मीं गुन्हेगार नसून गुन्हेगारास योग्य व न्याय्य शासन देणारा न्यायाधीश आहें ? ”

त्या मनुष्याचा वृत्तान्त फारच हृदयद्रावक होता; आणि तो त्यानें इतक्या जोरदार रीतीनें सांगितला कीं त्याची हकीकत संपेतोंपर्यंत आह्मी सर्वजण अगदीं चित्रासारखे निश्चल बसलों होतों गिरधरलाल वगैरे अधिकाऱ्यांना अशा मनःक्षोभ उत्पन्न करणाऱ्या गोष्टी ऐकण्याचा व पाहण्याचा रोजचा राबता होता परंतु त्यांना सुद्धां ही हकीकत अपूर्व व विलक्षण वाटली ! त्याची हकीकत सांगणें झाल्यानंतर आह्मी सर्वजण कांहींवेळ स्तब्ध होतों. लक्ष्मणसिंग त्याची हकीकत पेन्सिलीनें लिहून घेत होते; त्यांच्या पेन्सिलीचाच काय तो आवाज तेथें ऐकूं येत होता !

यानंतर शरच्चंद्र ह्मणाला— जीवनराव, आतां एकच मुद्दा तुह्माला विचारावयाचा राहिला आहे ! ज्या आंगठीबद्दल आह्मीं जाहीरात दिली होती ती आंगठी माझी आहे असें सांगण्यास आमच्याकडे एक मनुष्य आलें होतें तें कोण ?

यावर जीवनराव हंसून ह्मणाला—“ मी आपल्या स्वतःवर हवी ती जबाबदारी घेण्यास खबरदार आहे परंतु दुसऱ्याचीं नांवें सांगून त्यांचा जीव धोक्यांत घालणें बरें नाहीं असें मला वाटतें. मीं तुमची जाहिरात पाहिली आणि माझ्या एका सोबत्यानें तुमच्या येथें जाऊन आंगठी घेऊन येण्याचें कबूल केलें. पण त्यानें आपलें काम बेमालुम केलें कीं नाहीं ? ”

‘ त्याबद्दल तर संशयच नाहीं ! ’ असें शरच्चंद्रानें उत्तर दिलें.

ज्यांच्या परवानगीनें आरोपीनें आपला साद्यंत वृत्तान्त सांगितला तें

अधिकारी ह्मणाले– ' आरोपीला आणखी तीन दिवसांनीं न्यायासनापुढें उभें करण्यांत येईल. तेव्हां तुह्मा सर्वांस तेथें हजर राहिलें पाहिजे. तोंपर्यंत आरोपी माझ्याच ताब्यांत राहणार ! ' यानंतर आरोपीस अटकेंत नेऊन ठेवण्यांत आलें व आह्मीं सर्वजण घरीं परतलों.

---

# भाग ७ वा

## अखेर.

न्यायमंदिरांत गुरुवारीं हजर राहण्याची आह्मास ताकीद देण्यांत आली होती. परंतु गुरुवार उजाडला तेव्हां आमच्या साक्षीचें कारणच उरलें नव्हतें ! सर्वांत वरिष्ठ न्यायाधीशानें हा खटला आपल्या हातीं घेतला. ज्याठिकाणीं अन्याय होण्याची भीतिच नाहीं अशा न्यायासनापुढें जीवनराव हजर झाला. त्याला पकडण्यांत आलें त्याचदिवशीं रात्रीं त्याच्या छातीचा विकार बळावून तो जमीनदोस्त झाला. आपण आपल्या आयुष्यक्रमांत फार उच्च प्रकारची कामगिरी बजावली अशाप्रकारेंच निधनसमयीं त्याच्या शांत मुद्रेवर सुंदर हास्य विलसत होतें.

त्याच्या मृत्यूसंबंधानें सायंकाळीं आमचें बोलणें चाललें होतें तेव्हां शरच्चंद्र ह्मणाला, " गिरधरलाल व लक्ष्मणसिंग हे त्याच्या मरणामुळें आतां आकाशपाताळ एक करून सोडतील ! कारण आपली टिमकी वाजवायला त्यांना आतां जागाच राहिली नाहीं. "

यावर मी ह्मणालों--' त्याला पकडण्याशीं त्यांचा मला मुळींच संबंध दिसला नाहीं. '

" या जगांत कोणी कोणाचा संबंध वगैरे का पहात बसतो ? लोकांना काय ? सर्वांत मोठ्यानें ओरडेल त्याचेंच त्यांना खरे वाटतें ! " यानंतर कांहींवेळ विचार करून तो आणखी ह्मणाला–' या प्रकरणांत माझा अंदाज चुकावयाचाच नव्हता ! माझें अनुमान इतकें तंतोतंत या पूर्वीं कधींही जमलें नव्हतें ! प्रकरण साधेंच होतें परंतु त्यांत कांहीं मुद्दे फार महत्वाचे होते. '

' काय ह्मणता ! हें प्रकरण साधेंच होतें ! '

' होय साधें नव्हे तर काय ? विशेषसा पुरावा नसतां व विशेषशी भानगड न करावी लगतां अवघ्या तीन दिवसांत मला गुन्हेगार पकडता आला ! या प्रकरणाच्या साधेपणाचा यापेक्षां आणखी पुरावा कोणता पाहिजे ? '

' आपण ह्मणतां तें खरें. '

' मीं तुह्माला पूर्वीं सांगितलेंच आहे कीं कार्यकारणभावाचा आश्रय करून कार्यावरून कारणाकडे जात चाललें ह्मणजे मूळ कारण तेव्हांच सांपडतें ! अशा रीतीनें संशोधन करीत जाण्याचें मनास वळण मात्र मिळालें पाहिजे. तें कांहीं इतकें अवघड नाहीं. पण लोकांचें त्याकडे जावें तसें लक्ष्य जात नाहीं. कारणापासून कार्याचें अनुमान करणेंही रोजच्या व्यवहारांतील आपली पद्धति असते परंतु याच्या उलट जाण्याचें मनास शिक्षण मिळालें ह्मणजे भानगड हा शब्दच निरर्थक ठरतो. '

' आपण काय ह्मणतां हें माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. '

' तें कठिणच आहे. तरी पण तें तुह्माला अधिक स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न करतों. एकामागून एक अनेक गोष्टी तुह्मी एखाद्याला सांगाल तर शेवटीं त्याचा अमुक परिणाम घडला असावा असें तो तुह्माला सांगेल. परंतु नुसता परिणामच त्याला सांगितला तर तो परिणाम घडून येण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या हें कांहीं त्याला सांगतां येणार नाहीं. पुढून मागें विचार करीत जाणें हीच पद्धत अशा वेळीं अत्यंत उपयोगीं पडते. '

' आतां माझ्या ध्यानांत आलें ! '

" आतां हेंच प्रकरण पहाता यांत तुमच्यापुढें एक परिणाम होता. तो घडून येण्यास कोणत्या गोष्टींचा समुच्चयकारण झाला हें तुह्मांस शोधून काढावयाचें होतें. आतां हें मी कसें केलें तें तुह्मांस समजावून सांगतों. ज्या जागीं खून घडला तें घर पहावयास मीं पायींच गेलों. तेथें जाण्यापूर्वीं मीं आपल्या मनाचा कोणताही पूर्वग्रह होऊं दिला नाहीं. प्रथम मी रस्ता तपाशीत गेलों. रस्त्यावर मला गाडीची चाकोरी दिसली. ही गाडी तेथून रात्रीं गेली हेंही आपल्याला नंतर समजलें. चाकोरी

अरुंद होती तेव्हां ती गाडी घरगुती नसून भाड्याची असली पाहिजे असें माझें ठाम अनुमान झालें. ”

“ याठिकाणीं एक मुद्दा हस्तगत झाला यानंतर बागेंतील रस्ता नीट न्याहाळून पाहिला तेथें मला पावलांचे वण दिसले. या वणावरून मला काय कळणार असें तुम्हाला प्रथम वाटलें होतें; परंतु त्यांचा मला फार उपयोग झाला; कारण माझा दृष्टि त्याकामीं तरबेज झाली होती. तेथें मला शिपायांचीं पावलें दिसलीं पण त्यांतच याप्रकरणांतील दोन व्यक्तिंचीही पावलें मला ताबडतोब ओळखता आलीं. कारण त्यांत पुसट पुसट पावलें दिसत होतीं, तीं तेथें अगदीं पहिल्यानें गेलेल्या माणसांचीं असलीं पाहिजेत. रात्रीं प्रथम या बागेंत दोनच माणसें आलीं हें मी यावरूनच ओळखलें. त्यापैकीं एक धिप्पाड व मजबूत होता हें मीं पावलांच्या लांबी वरून ताडले. याठिकाणीं दुसरा महत्वाचा मुद्दा माझ्या हस्तगत झाला.

‘ आंत गेल्यावर या मुद्याला बळकटी आली. दाराशीं छोट्या माणसाच्या जोड्याची खूण दिसत होती व पुढें खुद्द जोडाही दिसला. त्यानंतर तो मनुष्यही ( त्या मनुष्याचें प्रेत ) नजरेस पडला तेव्हां उंच व धिप्पाड माणसानेंच खून केला ही गोष्ट सिद्ध झाली. प्रेताच्या अंगावर जखम वगैरे कांहीं दिसत नव्हती; परंतु प्रेताच्या चेहऱ्यावर क्षुब्धता दिसत होती, तेव्हां आपल्यावर मरण ओढवणार ही गोष्ट त्याला आगाऊ समजली असली पाहिजे अशी माझी खात्री झाली. जी माणसें रोग होऊन किंवा वार्धक्यानें मरण पावतात त्यांच्या चेहऱ्यावर अशा प्रकारची क्षुब्धता दिसून येत नाहीं. मयत मनुष्याच्या ओठाचा आंबट आंबट वास येऊं लागला तेव्हां याला विषप्रयोग झाला असला पाहिजे हें निःसंशय ठरलें. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचीं व द्वेषाचीं चिन्हें दिसत होतीं तेव्हां हें विष त्याला धाकदपटशा दाखवून खावयास लावलें असलें पाहिजे. सक्तीनें विषप्रयोग झाल्याचीं उदाहरणें हरहमेष घडतात. ’

‘ हा विषप्रयोग कां झाला ? हा शेवटचा प्रश्न उपस्थित होतो. चोरी हा कांहीं या खुनाचा उद्देश नव्हता. कारण प्रेताच्या खिशांत पैसे जसेच्या तसेच होते. अर्थात् या खुनाशीं स्त्री किंवा राजकारण यांपैकीं कोणतें तरी कारण असलें पाहिजे. राजकारणाचे खून बहुधा घाईघाईनेंच

उरकण्यांत येतात. आपलें काम होईल केव्हां आणि आपण पळून जाऊं केव्हां असें खुनी मनुष्यास होऊन गेललें असतें. तसा प्रकार या खुनासंबंधांत दिसून येईना. हा खून अगदीं शांतपणानें व सावकाशीनें झालेला दिसला. शिवाय खुनी मनुष्यानें आपला माग तेथें ठेवला होता यावरून तो फार वेळ तेथें असला पाहिजे हें उघड होतें. तेव्हां कांहीं खासगी गोष्टीमुळें किंवा अदावतीमुळें हा पशु पडला असावा असें अनुमान झालें. भिंतीवर कांहीं अक्षरें लिहिलेलीं दिसलीं तेव्हां तर या अनुमानास चांगलाच पाठिंबा मिळाला. खुनाचा पत्ता लावणारांनीं भलत्याच मार्गाला लागावें ह्मणून हा डाव असल्याचें मीं प्रथमच ओळखलें होतें. आंगठी सांपडली तेव्हां तर कांहीं शंकाच उरली नाहीं. जो मनुष्य मयत झाला त्याला एखाद्या [illegible] ीची आठवण देण्याकरितांच ही आंगठी काढली असावी. [illegible]नकराच्या पर्वीच्या आयुष्यक्रमाबद्दल तुह्मीं कांहीं शोध मागविला [illegible] का [illegible] असा [illegible] गिरधरलालास प्रश्न विचारला त्याचें का[illegible] हें [illegible] [illegible] शोध मागविला नाहीं असेंच त्यांनी त्यावेळीं उत्तर दि[illegible] [illegible] असलेंच.

[illegible] [illegible]ण्यास प्रारंभ केला. त्यावरून खून कर[illegible] [illegible] त्यानें तेथें विडी ओढली हेंही माझ्या [illegible]नात आलें. त्या[illegible] नखें ही लांब असला पाहिजेत असें मीं सांगितलें. झटापटीचीं [illegible] कांहीं चिन्हें दिसेनांत तेव्हां तें जमीनीवर पडलेलें रक्त त्याच्या नाकांतूनच पडलें असावें असा मीं निश्चय ठरविला. मनुष्य सशक्त असल्याशिवाय केवळ मनःक्षोभानें त्याचा घुगुणा फुटणें अशक्य होय असा विचार करूनच तो मनुष्य धिप्पाड असला पाहिजे हें माझें पहिलें अनुमानच कायम झालें.

"घरांतून बाहेर आल्यानंतर मी जी तार पाठविली त्या तारेनें दिनकराच्या विवाहासंबंधानें शोध मागविला होता हें तुम्हास माहीत आहेच. गिरधरलाल यांनीं आपल्या तारेंत अशा प्रकारचा मजकूर लिहिला नव्हता. जीवनरावापासून आपलें संरक्षण होण्याबद्दल त्यानें केळवपुरच्या अधिकाऱ्यांना वर्दी दिली होती त्यावरून हे दोघेही एकाच

स्त्रीवर प्रेम करणारे असले पाहिजेत हें सिद्ध झालें. येथपर्यंत आमच्या तपासाची मजल आल्याबरोबर हें सर्व प्रकरण आतां हातांत आलें असें मला वाटूं लागलें.

"दिनकराबरोबर त्या घरांत शिरणारा माणूस गाडीवाल्याशिवाय दुसरा कोणी नव्हता हेंही माझ्या अगदीं आरंभींच ध्यानांत आलें होतें; कारण रस्त्यांतील एकंद रागरंगावरून माझ्या असें लक्ष्यांत आलें कीं गाडी उभी केल्यानंतर गाडीचा घोंडा मागें पुढें बराच वेळ सरला. गाडीवाला जर आपल्या जागीं असतां तर असा प्रकार झाला नसता. अर्थात् गाडीवान त्या घरांतच गेला असला पाहिजे. शिवाय एक मनुष्य दुसऱ्याचा खून करतो आणि तो सावकाशरीतीनें करतो अशावेळेस तो तेथें तिसरा मनुष्य हजर राहूं देणार नाहीं. कारण अशा ठिकाणीं तिसरा मनुष्य हजर राहिला कीं सर्व स्फोट झालाच ह्मणून समजावें. आतां शेवटची गोष्ट राहिली. मणिपरासारख्या विस्तीर्ण व अफाट नगरींत एखाद्या माणसाचा पाठपुरावा करावयाचा ह्मणजे गाडीवाल्याचाच धंदा केला पाहिजे; एरव्ही कांहीं निभाव लागणार नाहीं. या सर्व कोटिक्रमावरून जीवनरावाचा तपास लागण्याचें जर कोणतें स्थान असेल तर तें गाडीवाल्यांचा अड्डाच होय अशी मीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली.

"खून करण्यापूर्वीं जर तो गाडीवाल्याचा धंदा करीत होता तर खून झाल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं तो सोडून देईल हें केवळ अशक्य होतं. कारण तडकाफडकी धंदा बदलावा तर लोकांना शंका घेण्यास मात्र कारण उपस्थित केल्यासारखें होणार! बरें परक्या देशांत त्याच्या ओळखीचें कोण असणार? तेव्हां तो आपलें नांव बदलील असाही संभव नव्हता. ह्मणून आह्मीं आपली सेना शहरांतील सर्व गाडीवान धुंडाळण्यास रवाना केली. यामुळें किती अल्पकाळांत फत्ते कशी झाली हें तुह्मीं पाहिलेंच! श्रीनिवासाचाही खून झाला असेल अशी मात्र कधींच अटकळ झाली नव्हती. परंतु आतां त्याचाही उलगडा लागला. विषाच्या गोळ्यांचें मी कसें अनुमान केलें होतें व पुढें त्या गोळ्या माझ्या हातीं कशा आल्या ही सर्व हकी-

कत तुह्मांला माहीत आहेच. यावरून अव्वलपासून अखेरपर्यंत ही कार्यकारण शृंखला कशी शहाजोग ठरली. हें तुमच्या पूर्ण लक्ष्यांत आलेंच असेल. '

यावर मी ह्मणालों— " ही फारच आश्चर्यकारक गोष्ट आहे. तुमच्या अंगीं हा मोठा अद्वितीय गुण आहे. या प्रकरणाची हकीकत प्रसिद्ध होईल तर ती अत्यंत मनोरंजक व बोधक झाल्यावांचून रहाणार नाहीं. प्रसिद्ध करण्याची तुमची जर इच्छा असेल तर ती मी करीन. '

" तुमची इच्छा असेल तर करा प्रसिद्ध, माझी कांहीं त्याला हरकत नाहीं. पण हें पाहिलें का यांत काय लिहिलें आहे तें ! "

असें ह्मणून त्यानें माझ्यापुढें " प्रतिध्वनि " नांवाचें एक वर्तमानपत्र टाकलें. त्यांतील मजकूर येणेंप्रमाणें:— " दिनकर व श्रीनिवास यांचा खून केल्याच्या आरोपावरून पकडलेला जीवन नांवाचा गुन्हेगार खटला सुरू होण्यापूर्वींच तुरुंगांत मरण पावला; यामुळें एक मोठा मनोरंजक खटला लोकांपुढें येण्याची संधि वाया गेली ! या खटल्याची सविस्तर हकीकत यापुढें बाहेर येणें अशक्य होय. तथापि विश्वसनीय आधारावरून आह्मांला त्यांतील कांहीं महत्वाच्या गोष्टी समजल्या आहेत. एका स्त्रीवर या तिघांचेंही प्रेम होतें. त्यांची ही अदावत आज सुमारें वीसबावीस वर्षांची होती. हे सर्व लोक लवणपूर येथील नवीन वसाहतींतील रहिवासी होते. खून झालेले दोघेही गृहस्थ नवीन स्थापन झालेल्या जीवनपंथाचे अनुयायी होते. या खटल्यावरून एक गोष्ट विशेष लक्ष्यांत येते कीं, गुन्हा पकडण्याच्या कामांत आमचे अधिकारी फारच पटाईत झाले आहेत. येथें येऊन आपण हवे ते गुन्हे केले तरी ते उजेडांत येण्याची भीति नको असे जें विदेशी माणसांना वाटत असतें तें चुकीचें आहे असें आमच्या अधिकाऱ्यांच्या चाणाक्षपणामुळें दिवसेंदिवस उत्कृष्ट सिद्ध होत चाललें आहे. या येवढा गुंतागुंतीचा खटला पकडण्याचें श्रेय लक्ष्मणसिंग व गिरधरलाल यांनाच देणें अवश्य आहे. कोणी शरच्चंद्र नांवाच्या गृहस्थांच्या घरांत गुन्हेगारास पकडण्यांत आल्याचें समजतें. शरच्चंद्र हाही गुन्हा पकडण्याच्या कामाचा अभ्यास करीत असतो. परंतु या

अधिकाऱ्यांची त्याला सर येण्यास अद्याप पुष्कळ अवधि आहे. सदर गुन्हा पकडणाऱ्या या दोन अधिकाऱ्यांना योग्य बक्षिस दिलें जाईल अशी आह्मास उमेद आहे. "

पत्र-वाचणें झाल्यानंतर शरच्चंद्र ह्मणाला—" का, मी आरंभालाच सांगितलें होतें ना ? आमच्या श्रमाचें चीज झालें कीं नाहीं ! चातुर्य आमचें आणि बाक्षिस त्यांचें ! कसा आहे उलटा न्याय ! "

यावर मी ह्मणालों—" कांहीं फिकीर नाहीं. माझ्या स्मरणवहींत मीं साद्यंत हकीकत टिपून ठेवली आहे. ती मी प्रसिद्ध करतों ह्मणजे कांच कोणती आणि रत्न कोणतें याचा निर्णय लोक आपोआपच ठरवितील. "

समाप्त.